# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. १९/११/२००८**

आज बुधवार दि. १९/११/२००८ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १० दि. ०७/११/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | नरेंद्र मेहता | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| ३) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ४) | वैती चंद्रकांत सिताराम | विरोधी पक्ष नेता |
| ५) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ६) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ७) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ८) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ९) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १२) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १३) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १४) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १७) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १८) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १९) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| २०) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २१) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २२) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २३) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २४) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २५) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २६) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २७) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २८) | पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| २९) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३०) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३१) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३२) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३३) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३४) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३५) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३६) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३७) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३९) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४०) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |
| ४१) | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | सदस्य |
| ४२) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४३) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४४) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४५) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४६) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४७) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ४८) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ४९) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५०) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५१) | भाटकर प्रेरणा प्रमोद | सदस्या |
| ५२) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५३) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५४) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५५) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५६) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५७) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५८) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ५९) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६०) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६१) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६२) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६३) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६४) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६५) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६६) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ६७) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ६८) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६९) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७०) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७१) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७२) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| ७३) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य -</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| ३) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |

**<u>रजेचा अर्ज –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सभापती, स्थायी समिती |
| २) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ४) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ५) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ६) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ७) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, पुढील कामकाजाला सुरूवात करावी

**नगरसचिव :-**

आजच्या सभेचे रजेचे अर्ज आहेत. सौ. मुर्सरतबानो इब्राहिम शेख, श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स, सौ. निर्मला सावळे, श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर, सौ. सुनिता शशिकांत भोईर, श्री. परशुराम दामोदर पाटील प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात होत आहे. ११ वाजून ३० मिनिटे झालेली आहेत. पहिला प्रश्न सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचा आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, आज सभागृहाच्या बाहेर मिरारोडच्या जेष्ठ नागरीक संघटनेचे सर्व पदाधिकारी सभागृहाचे कामकाज बघण्यासाठी आलेले आहेत. मी सभागृहाच्या वतीने त्यांचे हार्दिक स्वागत करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, पिछले सभा मे शिक्षण संस्था मे शिक्षको के बारे मे विषय था आज शिक्षण विभाग से जी माहिती मिली है, त्या माहिती अनुसार सध्या मिरा भाईदर महापालिकेत ज्या संचालित शाळा आहेत त्यामध्ये एकूण ३८ शिक्षकांची कमी आहे. त्यामध्ये सर्वात जास्त म्हणजे २३ शिक्षक हिंदी शाळेमध्ये कमी आहेत. यावर मागच्या सभेमध्ये मा. आयुक्त साहेबांनी सांगीतले की, मी याचा आढावा घेतो. त्यांनी त्यांच्यावर काही आढावा घेतला आहे काय ?

**मा. आयुक्त :-**

याचा आढावा घेतलेला नाही. पण पुढील दोन दिवसात मी आढावा घेतो आणि आपल्याला उत्तर देतो. पण मला आपल्याला एवढेच सांगता येईल की, याच्यामध्ये आपल्याला शासनाचे सोळा शिक्षक दिलेले आहेत. त्यामुळे आपल्याकडे शिक्षकांचा जो काही बॅकलॉग होता तो सोळा शिक्षकांनी कमी झालेला आहे. आणि ते सोळा शिक्षक आपल्याकडे ऑलरेडी रुजू झालेले आहेत. आणि त्या सोळा शिक्षकांनी त्यांचे काम सुरू केलेले आहे. त्या सोळा शिक्षकां व्यतिरिक्त इतर आणखीन जो काही बॅकलॉग आहे. त्याबाबतीत आपण शासनस्तरावर पाठपुरावा चालू ठेवलेला आहे. पण अदयाप शासनाची मान्यता प्राप्त झालेली नाही. एक तर शासनाची मान्यता घेउन आपल्या स्तरावर शिक्षक भरण्याची कार्यवाही किंवा आता शासनाने जसे सोळा शिक्षक दिले त्याप्रमाणेच इतर शिक्षक त्यांच्याकडून घेउन बॅकलॉग कसा भरून काढता येईल याचा प्रयत्न करण्यांत येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता जे सोळा शिक्षक आलेले आहेत. व आपण असे ठरवले का की ते कोणत्या मिडीयमसाठी देणार किंवा कोणत्या वर्गासाठी देणार आहोत ?

**मा. आयुक्त :-**

आता हे सोळा शिक्षक जे आलेले आहेत, काही उर्दू माध्यमचे असतील, काही मराठी माध्यमचे असतील. आपण सांगीतलेली सुचना योग्य आहे की, सध्या आपल्या एकूण शाळेमधील शिक्षकांचा आढावा घेउन ज्या ठिकाणी अत्यंत कमी शिक्षक आहेत तिथे म्हणजे आत्ता शाळावाइज बॅकलॉग काढून जिथे जास्त बॅकलॉग आहे. तिथे हे शिक्षक देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आपण जर हा तक्ता बधितला त्यामध्ये शाळेची पटसंख्या दिलेली आहे. यामध्ये हिंदी शाळेची संख्या तीन हजार आहे आणि त्यावर तेवीस शिक्षक कमी आहेत. म्हणजे तुमच्याकडे १६ आलेले आहेत मग त्यात उर्दूचे असतील किंवा मराठी मिडीयमचे असतील त्यांना हिंदी शिकवताच येत नसेल मग ते आलेले सोळा शिक्षक केव्हा आले ? शासनाने मंजूर केलेल्या त्या सोळा शिक्षकांचा आपण आढावा घेतला का ?

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे शिक्षक आलेले आहेत परंतू मी सांगितल्या प्रमाणे शाळानिहाय सध्य शिक्षकांची जी उपलब्धता आहे आणि ज्या ठिकाणी जास्त शिक्षक कमी आहेत. तिथे पुढील दोन दिवसात शिक्षण अधिकाऱ्यांकडे बसून किंवा सगळया माहितीसह त्यांच्याबरोबर बसून आपण याचे योग्य नियोजन करून त्याचे इक्वल वाटप करून जेणे करून कुठल्याही शाळेत एकाच शाळेत पाच-पंचवीस शिक्षक कमी, एका शाळेत १०० टक्के आहेत असे व्हायला नको प्रत्येक शाळेत आपल्याला जास्तीत जास्त शिक्षक कसे देता येतील हे बाधितले जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, दुसरा प्रश्न असा आहे ....

**मा. आयुक्त :-**

हे सोळा शिक्षक या महिन्याच्या दहा तारखेला आलेले आहेत. तर आपण त्यांचे रिडिस्ट्रीब्यूशन इमिंजिएटली आपल्या सगळया शाळांचा बॅकलॉग गृहित धरुन करू

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब विषय असा आहे की, सोळा शिक्षक आलेले आहेत आपल्याला अडतीसची गरज आहे. आपल्याला अजूनही बावीस शिक्षक कमी पडतात आणि मला जो तक्ता मिळाला त्यामध्ये जर तुम्ही बधितले तर सर्वाज जास्त कमी हिंदी शाळेत एक तर चारच हिंदी शाळा आहेत. आपण जर या शहराची लोकसंख्या बधितली तर हिंदी शाळेची संख्या चार आहे तीही कमी आहे. संख्या कमी असली तरी तीन हजार मुले त्यामध्ये शिकतात आणि त्यामध्ये तेवीस शिक्षक नाहीत. म्हणजे मुलांवर नक्कीच हा अन्याय होत आहे. आपण बाकीच्या डिपार्टमेंटमध्ये, फायरब्रिगेड आहे, सफाई आहे किंवा आरोग्य आहे. त्यावेळी आपण ठेका पध्दतीने शिक्षक घेतो. आत्तापर्यत त्या शाळेमध्ये ठेका पध्दतीने शिक्षक का घेतले गेले नाहीत ? बाकीच्या सर्व विभागांमध्ये आपण ठेका पध्दतीने सर्व वस्तू भरून घेतो.

**मा. आयुक्त :-**

मी सन्मा. सभागृहाला सांगू इच्छितो की, आता आलेल्या शिक्षकांमुळे आपला जो उर्दू व मराठीचा बॅकलॉग होता तो पूर्ण होईल. पण तुम्ही म्हणता तशी हिंदीचीही अडचण आहे. आता आमचा असा प्रयत्न राहिल की, हिंदीचा हा जो २३ बॅकलॉक आहे तो ज्याला उर्दूही येते आणि हिंदीही येते किंवा ज्याला मराठीही येते आणि हिंदीही येते असे आपले काही विषय फक्त भाषेचे असतात पण काही विषय गणित, सायन्स यामध्ये त्याला जर बेसिक आयडीया असेल आणि त्याला जर भाषेवर प्रभूत्व असेल तर तो मराठीही शिकवू शकेल आणि हिंदी मधूनही शिकवू शकेल. अशा ठिकाणी काही शिक्षक ॲडजस्ट करण्याचा आपण प्रयत्न करू

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा विषय झाला बरोबर आहे सोळा शिक्षक आले. पण बाकीच्या सर्व विभागांमध्ये आरोग्य असो, बांधकाम असो, फायरब्रिगेड असो, आपण ठेका पध्दतीने माणसे घेत असतो. मग हया डिपार्टमेंटमध्ये आतापर्यत का लक्ष दिले नाही की याच्यामध्ये शिक्षक नाहीत. एका बाजूला आपण साक्षरता दिवस अभियान चालू केलेले आहे. सर्वांनी शिकावे सर्वांनी लिहावे आतापर्यत ठेका पध्दतीच्या माणसांना प्रशासनाने नकार दिला आहे की, संबंधित शिक्षण मंडळाकडून आपल्याकडे तसा प्रस्ताव आलेला आहे. मग आपण त्याच्यावर गांभिर्य का घेतलेले नाही?

**मा. आयुक्त :-**

ठेका पध्दतीने शिक्षक घेण्यावर काही वाद नाही. आपल्याला घेताही आले असते शिक्षणासारख्या विषयाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. पण शासनांच्या पदांची मंजूरी अदयाप प्रलंबीत असल्यामुळे ऑडीट ऑब्जेक्शन येण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे प्रशासन ठेका पध्दतीने घेउ इच्छित नाही. पण तरीही याबाबतीत शासनाकडे पाठपुरावा करून एक तर मान्यता आणण्याचा प्रयत्न करण्यात येईल किंवा शासनाकडे असाही प्रस्ताव पाठवू की, मान्यता मिळेपर्यत आम्हाला ठेका पध्दतीने लावण्याची परमिशन द्या असाही पाठपुरावा करून शासनाकडून मान्यता आणण्याचा प्रयत्न करण्यांत येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आपल्याला माहिती आहे की, शासनाकडे कुठलीही मान्यता गेली की दोन वर्ष पाच वर्ष, सात वर्ष दहा वर्ष ती मान्यता येत नाही. मग शासनाकडून मान्यता येत नाही म्हणून आपण इकडे थांबून बसायचे का?

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये आणखीन एक पर्याय आहे त्यांनी आपल्याला जसे हे सोळा शिक्षक दिलेले आहे हे सर्व आपल्याकडे शिक्षक सेवक म्हणून शासनाने मोठया प्रमाणावर भरती केली होती आणि त्याच्यामध्ये बी.एड.डी.एड झालेल्या लोकांना घेतले होते असे त्यांनी आपल्याला मराठी आणि उर्दूचे सोळा शिक्षक दिलेले आहेत. आपण आता शासनाकडे परत पाठपुरावा करून आम्हाला आता बाकी कुठल्याही लॅग्नवेजचा आमचा बॅकलॉग भरलेला आहे. यापुढे जे काही आम्हाला पाच दहा वीस आपल्याला देता येतील ते फक्त हिंदी माध्यमाचे द्या असाही प्रयत्न करून आपण हिंदी माध्यामाचे शिक्षक आणण्याचा प्रयत्न करू

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब शासनाचा तो विषय नक्कीच आहे आता शासन दोन दिवसांनी देते की, दोन वर्षांनी देते हे अजून आपल्यालाही माहिती नाही आणि मलाही माहिती नाही. म्हणून मी बोललो बाकीच्या सर्व डिपार्टमेंट मध्ये आपण ठेका पध्दतीने घेतो. मग आपण आज असा निर्णय का घेत नाही की, जोपर्यत शासनाचे शिक्षक आपल्याला मिळत नाहीत तोपर्यत आम्ही ठेका पध्दतीने शिक्षक घेउ.

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हाला त्याच्यामध्ये अडचण सांगीतली की, शासनाने पदांना मान्यता दिलेली नव्हती परंतू आता आपली आग्रही मागणी लक्षात घेता, प्रशासनाचा हट्ट नाही की, आम्ही घेणारच नाही. आपण त्याचीही प्रक्रिया सुरू करू या सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेउन आपण ....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब ही गोष्ट आताची नाही. ही गोष्ट मागील दिड दोन वर्षापासून चालू आहे. हा आजचा विषय नाही.

**मा. आयुक्त :-**

आपण ॲटलिस्ट फक्त हिंदीचे शिक्षक ठेका पध्दतीने घेण्याचे प्रयत्न करू आणि त्याप्रमाणे ....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रयत्न करू हे आश्वासन झालेले आहे आपण इकडे एक चिफ ऑफीसर म्हणून आहात मा. महापौर बसलेले आहेत. सर्व पदाधिकारी बसलेले आहेत बाकीचे निर्णय आपण या मा. महासभेत घेतो की, आपण ही वस्तू घेतली पाहिजे ती घेतली पाहिजे आता शिक्षणाचा विषय हा महत्वाचा विषय आहे.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे सक्षम सभागृहाची घेउन आपण ठेका पध्दतीने करण्याची कार्यवाही पुढे जाउ.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, मा. महासभेमध्ये हा प्रस्ताव आपण आणणार की, संबधित शिक्षक मंडळाकडून आपण मागवणार आहात ? आपण रुलिंग दया.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब सर्व कायदेशीर तरतूदी बघून आपण तो विषय मा. महासभेपुढे रितसर आणावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, असे नाही आता जसे मा. आयुक्त साहेब बोलले की, महासभेत आणू तर मा. महासभेत एक तर मा. महापौर साहेब प्रस्ताव आणणार.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब प्रस्ताव देणार आहेत.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, तत्पूर्वी मला दोन शब्द बोलायचे आहेत आपले हे जे अधिकारी आहेत. अनुदानीत शाळा आहेत, प्रायव्हेट शाळा आहेत, त्या लोकांची कामे शासनाकडून ताबडतोब होतात. आणि हे आपलेच अधिकारी जाउन ते करून आणतात. आणि आपल्याला एवढे महिने का लागतात ? आपल्याकडे शिक्षक घेण्याकरीता एवढे महिने लागतात हेच लोक आणतात आपल्या शासनाच्या ज्या अनुदानीत शाळा आहेत त्यांची कामे करून आणून देतात. प्रायव्हेट शाळेची आणून देतात त्या शिक्षकांना परमनन्ट करून आणून देतात आणि आपल्याला एवढे होत नाही. तुम्ही यांच्यावर काय ती कडक कार्यवाही करा की, आम्हाला एवढया दिवसामध्ये आणण्याची जबाबदारी ही तुमची आहे. त्यांच्यावर कडक कार्यवाही करा ....

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, याचा पाठपुरावा करा आणि लवकरात लवकर मान्य करून घ्या सचिव साहेब दुसरा प्रश्न घ्या.

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रकाश सिंग यांचा दुसरा प्रश्न आहे.

**मा. महापौर :-**

ते आलेले नाहीत पत्र दिलेले आहे. तिसरा प्रश्न घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रश्न मी घेणार असे पत्र दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

तर त्याबद्दल आपला अतिक्रमणचा विषय आहे नंतर .....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रश्नोत्तराला आणि त्याला तुम्ही मिक्सींग करू नका.

**मा. महापौर :-**

एकत्र घ्या ना

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मला एकत्र करायचा नाही. कशाला एकत्र करायचा?

**मा. महापौर :-**

विषय एकच आहे ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तो विषय असेल तर चर्चा होउ दया आमच्य विषयी पाहिजे तर तुम्ही सांगा की, त्या चर्चेनंतर तुमचे समाधान झाले नाही तर हा विषय घेउ तुम्ही असे बोला जर आम्हाला त्या चर्चेमध्ये समाधान झाले नाही. आमचा विषय पेन्डींग ठेवा आणि तुम्ही चर्चा करा. हा साधा विषय नाही.

**मा. महापौर :-**

ठिक आहे, पेन्डींग ठेवतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठिक आहे, पेन्डींग ठेवतो.

**नगरसचिव :-**

पुढचा प्रश्न सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील यांचा आहे.

**शरद पाटील :-**

माझा जो प्रश्न आहे, आपण ज्या शाळांना महापालिकेकडून ज्या जागा आरक्षित आहेत त्या कराराप्रमाणे १० टक्के म्हणजे नक्की काय ?

**मा. महापौर :-**

म्हणजे एखादया स्कूलमध्ये येणाऱ्या ॲकेडमीक इअरमध्ये दहा ॲडमिशन असतील त्यातील १० टक्के महापालिकेने सुचवलेले असतील त्यांना प्राथमिकता दयायची.....

**शरद पाटील :-**

त्यांना ते प्राथमिकता देतात का याची त्यांच्याशी कधी चर्चा झाली किंवा बोलणी झालेली का?

**मा. महापौर :-**

मी मा. आयुक्तांना तेच विचारले तर त्यांनी सांगीतले की, माझ्याकडे गेल्या जून-जूलैमध्ये कोणीही आलेले नाहीत किंवा कुठल्याही शाळेत...

**शरद पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे या सभागृहातील एक-दोन सन्मा. सदस्यांनी मागणी केली होती. त्यांच्या चिठया त्यांनी फेकून दिल्या.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांनी ?

**शरद पाटील :-**

मा. आयुक्तांनी नाही म्हणजे आपल्याला आता जर तिथे ॲडमिशन दयायचे असेल त्याची शिफारस दयायची असेल तर ती आपण कोणाकडे दयायला पाहिजे?

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांकडे

**शरद पाटील :-**

आता कमिशनर साहेबांकडे दिली नव्हती नगररचना विभागाकडे त्यांनी त्याची विचारपूस केली असता नगररचनाचे ऑफीसर मा. श्री. घेवारे साहेब त्यावेळेला होते. तर त्यावेळेला पण त्यांना त्यांनी विचारले नाही. त्यांच्या पण चिठ्ठीचा विचार केला गेला नाही.

**मा. महापौर :-**

आपण श्री. घेवारे साहेबांकडे प्रश्न केला होता ?

**शरद पाटील :-**

त्यांना सांगीतले होते की, आम्ही तिथे चिठ्ठी पाठवली होती. पण त्यांनी ॲडमिशन दिलेले नाही. फुल झाले म्हणजे फुल झाले म्हणजे मा. आयुक्त साहेबांनी सांगीतले की, माझ्याकडे एकही चिठ्ठी आलेली नाही. मग त्यांनी जर शिफारस केली तर त्यांनी फुल झाले असे कसे सांगायला पाहिजे की, आम्ही सगळे ॲडमिशन दिलेले आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. शरद पाटीलजी, यापुढे कुठलेही असे ॲडमिशन तर आपण मा. आयुक्ताकडे का सांगतो कारण एखादा नगरसेवक जाईल दहाच्या दहा ॲडमिशन घेउन टाकेल त्यासाठी आपण मा. आयुक्तांकडे तसा अर्ज करावा. मा. आयुक्त आपल्याला पत्र देतील.

**शरद पाटील :-**

बरोबर आहे आपण बोललात की, कमिशनर साहेबांकडे एकही चिठ्ठी आलेली नाही. मग त्यांनी एखादया नगरसेवकाची दिशाभूल का करावी की, इथे सगळे फूल झालेले आहे आम्ही सगळे ॲडमिशन दिलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये हा विषय दरवेळेस ज्यावेळी आपले ॲकेडमीक इअर जून मध्ये सुरू होते त्यावेळेस हा प्रश्न येतो माझी सर्व सभागृहाला विनंती आहे की, अशाप्रकारे ज्या शाळांना आपला १० टक्के कोटा आहे त्या ठिकाणी आतापर्यत बरेच लोक टॉउन प्लॅनिंगच्या मदतीने, स्वतः जाउन आपल्याकडे आपण नगरसेवक आहात म्हणून त्यांनी ॲडमिशन दिली असतील परंतू याचा हिसाब किताब आपण ठेवत नव्हतो पुढच्या ॲकेडमीक इअर पासून आपण टाउुन प्लानिंग डिपार्टमेंटकडे त्याचा शाळा निहाय लेखाजोखा ठेवू आणि १० टक्के मध्ये समजा ५० विदयार्थ्यांचा आपला कोटा असेल तर पन्नास मध्ये फर्स्ट कम सर्व्ह, जे येतील त्यांना आपण लेखी पत्र देउु जेणे करून त्यांचे जे काही नॉर्मस् आहेत त्याप्रमाणे आणि लेखी पत्र देउन त्यांनी जर लेखी पत्राची

नोंद घेतली नाही तर आपल्याला कार्यवाही करता येईल. माझी सर्व सन्मा. सदस्यांना अशी विनंती आहे की, आपण यापूढे आयुक्तांना किंवा महानगरपालिकेच्या टाउन प्लानिंग विभागाला पत्र ॲड्रेस करा. आपण त्यांना माझ्या सहीने कळवत जाउ आणि त्यांना आम्ही लेखी कळविलेली विनंती मान्य करावी लागेल त्यांनी अमान्य केल्यास आपण त्यांना विचारणा करू.

**शरद पाटील :-**

याच्यावर माझी एक उपसुचना आहे या ज्या शाळेत आपण परमिशन दिलेली आहे. ज्या ज्या शाळेत आपल्या १० टक्के जागा भरायच्या आहेत अशा शाळांची यादी आपण आपल्या नोटीस बोर्डवर लावावी जेणे करून सर्व सन्मा. सदस्यांना त्याची जाण होईल. कारण मला तरी वाटते की, सगळया सदस्यांना माहिती नसेल पण ती तशी यादी लागली गेली पाहिजे आणि...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, हा विषय जेव्हा आम्ही मा. आयुक्त साहेब, आपल्याही पत्र दिलेले आहे. आपल्याकडून मला अजूनपर्यत लेखी उत्तर मिळालेले नाही. दहा शाळांना आपण वापरण्यासाठी आरक्षण दिलेले आहे. एक तर संबधित विदयार्थ्यांना कधी प्रवेश देणार? कोण देणार? टक्केवारी आहे काय? कुठच्याही डिपार्टमेंटमध्ये त्याचा उल्लेख नाही. शिक्षण मंडळाकडे गेले तर आम्हाला माहिती नाही. नगररचना कडे गेले तर फक्त आम्ही रिझर्व्हेशन जागा या नियमाखाली देता येते म्हणून आम्ही दिली. शेवटी १० % रिझर्व्हेशन ही जागा या शहराच्या गरजू विदयार्थ्यांना मिळावी पाहिजे. आता मिळाली पाहिजे हे नक्की आहे. पण या महापालिकेमध्ये तशी नोंद नाही की, ही शाळा आहे याच्यामध्ये दहा टक्क्याने यावर्षी हे ॲडमिशन घेता येईल जे गरजू विद्यार्थी असतील ते नगरसेवकांनी सुचवावे आतापर्यत ही बाब काही ठराविक नगरसेवकांना माहिती होती. मला माहिती होती. मी चिठ्ठी दिली त्या गृहस्थांनी, म्हणजे पोरवाल जी शाळा आहे पहिल्या वेळी सांगीतले की, माझ्याकडे फुल झालेले आहे. मग १० % कुठे आहे. नंतर सांगीतले की, त्याची टक्केवारी कमी आहे. म्हणजे शेवटी महापालिकेने १० % रिझर्व्हेशन देताना पहिला प्रश्न महापालिकेने त्याला कुठे अर्ज केला पाहिजे? महापालिकेने अर्ज केल्यानंतर त्याने या मुदतीमध्ये अर्ज केला पाहिजे, नंतर या मुदतीमध्ये अर्ज केल्यानंतर एवढे टक्के मार्क असले पाहिजे याची नोंद काय याचे उत्तर पाहिजे याचे उत्तर आपण कुठेही दिलेले नाही. शेवटी तुम्ही टक्केवारी म्हणजे मार्क बघून १० टक्के ॲडमिशन देणार किंवा त्या संस्थांना वाटेल तसे देणार आहात? आम्हाला त्याचा खुलासा पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

यांच्यामध्ये एकतर आपण आतापर्यत अकरा शाळांना अशा प्रकारे बांधकाम परमिशन दिलेली आहे. त्यापैकी पाच शाळा पूर्ण झालेल्या आहेत. आता श्री. पाटील साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे त्याची यादी नोटीस बोर्डवर लावू या आपला दुसरा प्रस्ताव आहे. आपण इमिजिएटली ह्या ज्या पाच - सहा शाळा ज्यांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे आणि ॲडमिशन सुरू आहेत. मी त्या संबधित हेडमास्टर्स आणि त्यांचे जे कोणी प्रमुख असतील, संस्थाचालक यांची एक बैठक माझ्याकडे लावतो आणि आपण त्यांची बैठक लावून त्यांना आपण ही पूर्व कल्पना देउ की, यापूढे आमची आलेली पत्र तुम्ही कचऱ्याच्या टोपलीत टाकू नका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब आपला पत्राचा विषय बरोबर आहे मला पाहिजे....

**मा. आयुक्त :-**

मी तुमच्या मुदयावर येतो. आपला दुसरा मुद्दा असा आहे की, किती परसेन्टेज पाहिजे आणि आपले काय धोरण असावे? एक तर पाहिली गोष्ट, आपल्याला माहितीच नव्हते की, अशा किती शाळा आहेत आणि बऱ्याच लोकाना माहिती नाही, त्यामुळे हे पण ॲज युजूअल आहे की, आपले धोरणही अदयाप ठरलेले नाही. परंतू यामध्ये वेगळे धोरण ठरविण्याची आवश्यकता नसावी असे माझे मत आहे. शाळेत जे काही ॲडमिशन आहे. त्याच्यामध्ये परसेन्टेजवाईज हे काही कुठे MBBS आणि इंजिनिअरींगला किंवा MBA ला लागत नाहीत. फक्त शाळेतच ॲडमिशन घ्यायचे आहे. त्यामुळे त्याच्या परसेन्टेजचा विचार न करता तो जर फक्त पहिल्या क्लासमध्ये पास झाला असेल तर त्याला पुढच्या क्लासमध्ये ॲडमिशन दयायला काही हरकत नसावी आणि महानगरपालिकेने पत्र दिल्यानंतर त्यांनी त्याच्यामध्ये परसेंन्टेजला वेटेज न देता महानगरपालिकेच्या पत्राला वेटेज देउन त्या शाळेने त्याला ॲडमिशन दयावे. यासाठी आपण त्यांची एक बैठक पण घेउ.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, १० % जे दिलेले आहेत. ते चुकीचे आहेत त्यावेळी आपला ठराव २० % चा झाला होता. शाळांच्या बाबतीत ज्यावेळी प्रॉपर्टी टॅक्सचा विषय आला त्यावेळी २०% चा ठराव झालेला होता. डी.सी. रुल्समध्ये तसे १० टक्केचे नॉर्मस् आहेत. परंतु, डी.सी. रुल्स, टाउन प्लानिंग तर्फे ऑलरेडी १० टक्के आहेत पण ज्यावेळी मा. महासभेसमोर प्रॉपर्टी टॅक्समध्ये कन्शेशन देण्याचा विषय आला होता. त्यावेळी आपण ॲडीशनल १० टक्के वरून २० टक्के रिझर्व्हेशन केले होते. तसा ठराव झालेला आहे ते माहिती करून घ्या.

**मा. महापौर :-**

ते आपण कोणासाठी केले, एखादया एक्झम्पशन होत असेल त्याला एक्झेस्टेन्टेड असेल त्याला ना?

**अनिल सांवत :-**

प्रॉपर्टी टॅक्समध्ये ज्यांना कन्शेशन देण्याचा विषय आला होता. त्यावेळी मिरा भाईदर मधील शाळांमध्ये ऑन दॅट बिहाफ १० टक्के ॲडीशनल तो ठराव मा. महापौर साहेब, यांनी कार्यवाही केली नसणार तुम्ही तो ठराव मागवून घ्या आणि ठराव काय झाला आहे तो बघा.

**मा. महापौर :-**

त्या ठरावाप्रमाणे केले जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, एकतर ही आरक्षणे सर्व प्राथमिक विदयालये आणि माध्यमिक विदयालयांसाठी आहे आणि आपण आरक्षण ठेवतो या शहरातील लोकांना शिक्षण मिळावे. एक तर तिकडे शाळा बांधताना ज्या गरजू शाळेच्या मुलांना बांधली पाहिजे तशी शाळा बांधत नाही. ए.सी. शाळा बारा हजार पंधरा हजार रुपये फी आणि आपले ए टी पी डिपार्टमेंट त्याला परवानगी देते ठिक आहे दिली शेवटी शिक्षण घेतात पण हे १०टक्के रिझर्व्हेशन हे देउन त्यांना पाच पाच वर्षे झालेली आहेत. मी हा विषय असा पूर्ण करणार नाही. यामध्ये आपण नक्की करा १० टक्के  शाळेच्या रिझर्व्हेशनची यादी त्यांच्याकडे मागवून घेतली पाहिजे शाळा बंद झाली, जूनमध्ये रिझल्ट लागल्याबरोबर आपण आरक्षणामध्ये जी शाळा दिली आहे त्यांची १० टक्के  ची यादी मागीतली पाहिजे यादी मागवून आपण इकडे डिस्प्ले केले पाहिजे ज्या गरजू विदयार्थ्यांना परमिशन मिळावी नसेल, या या शाळेमध्ये महापालिकेचे आरक्षण आहे त्यांना दिले जाईल त्यामध्ये आम्ही अटीशर्ती नाही.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, ज्यावेळी मुलांचा रिझल्ट येतो. ॲकेडमीक इअर सुरू होते त्यावेळी प्रत्येक शाळेला आपण पत्र पाठवा की आपल्याकडे किती सिट उपलब्ध आहेत, त्याची आम्हाला माहिती दयावी. मग तुम्हाला त्याप्रमाणे १० टक्के  आरक्षण नक्की करता येईल

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब खाती रुलिंग से होता नही है ।

**मा. महापौर :-**

रुलिंग से नही आप बोलो ॲडमिशन करेंगे ।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आप यह जबाबदारी शिक्षण मंडळ या ए.टी.पी किसको दे रहे है ।

**मा. महापौर :-**

टाउन प्लानिंग

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टाउन प्लानिंग बोलते है की, यह हमारा काम नही है । मै उधर गया था । वहा पर किसी भी विदयार्थी को ॲडमिशन देना मेरा काम नही है ।

**मा. महापौर :-**

साहेब आपण त्यांच्या कडून यादी मागवावी आणि आपली यादी शिक्षण मंडळ अधिकाऱ्यांना देण्यात यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण शिक्षण मंडळाना तशी रुलिंग दया की, शिक्षण मंडळाने जूनच्या आधी सर्व शाळेची जी आरक्षणे आहेत त्यांची यादी मागवून घ्यावी. आपण तशी रुलिंग दया.

**मा. महापौर :-**

शिक्षण अधिकाऱ्यांनी जूनमध्ये सर्व शाळांचे किती ॲडमिशन रिकामे आहेत त्याची यादी मागविण्यात यावी.

**नगरसचिव :-**

पुढचा प्रश्न सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंह यांचा आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहेब, मेरे प्रश्न के बारे मे सन्मा. सदस्य श्री. संजय पांगे चर्चा करेंगे।

**संजय पांगे :-**

सन्मा. सदस्य श्री. मदन सिंह यांनी जो प्रश्न विचारला होता की, नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये मोरबे धरणाचे पाणी उपलब्ध होणेबाबत काय प्रगती झाली आहे?  आणि त्यांनी असे म्हटले आहे की, याच्यामध्ये सकारात्मक अथवा नकारात्मक काही झालेले नाही वस्तूस्थिती काय आहे?  खरे उत्तर काय आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो की, याबाबत कार्यकारी अभियंता शहर अभियंता, मा. महापौर आणि मा. आयुक्त लेव्हलला सर्वाबरोबर बैठका झालेल्या आहेत. मागे श्री. गायकवाड साहेब श्री. शिंदे साहेब होते त्यावेळेपासून आणि नवी मुंबईचे श्री. कोकाटे साहेब आणि श्री. नाहटा साहेब होते. त्यांच्याबरोबरही

बैठका झालेल्या आहेत. टेक्निकल डिस्कशन झाले होते. परंतू, अदयाप पर्यत नवी मुंबई महापालिकेकडून आपल्याला कळविण्यात आलेले नाही की, तुम्हाला पाणी देउ किंवा नाही ?

**संजय पांगे :-**

हे निविदा काढायच्या पूर्वी कि, निविदा काढल्यानंतर तुमचे हे जे डिस्कशन झाले हे निविदा काढण्याच्या पूर्वी झाले की निविदा काढल्यानंतर झाले ते सांगा

**शिवाजी बारकुंड :-**

नवी मुंबई महापालिकेकडून पाणी घेण्यासाठी मा. महासभेने.....

**संजय पांगे :-**

मी फक्त जो प्रश्न विचारला तेवढयाच प्रश्नाचे उत्तर द्या या ज्या चर्चा झाल्या, या निविदा काढण्यापूर्वी झाल्या की, निविदा काढल्यानंतर झाल्या ?

**शिवाजी बारकुंड :-**

कुठल्या निविदा ? अदयापपर्यत या कामाला तिकडून मंजूरीच मिळालेली नाही. त्यामुळे कोटाच नाही. त्यामुळे याची निविदा आपण काढलेली नाही.

**संजय पांगे :-**

मा. आयुक्त महोदय, सन्मा. सदस्य श्री. मदन सिंह यांच्या प्रश्नाबद्दल आपण मला जी चर्चा करायला दिली आहे. त्याबद्दल मी आपला आभारी आहे. आपल्या कॉर्पोरेशनचे अधिकारी या निविदेच्या माध्यमातून जो काही भ्रष्टाचार करत आहेत तो भ्रष्टाचार आपल्या निदर्शनास आणावा याच्यासाठी मी इथे उभा आहे. मा. स्थायी समिती सभा दि. २०/५/२००६ प्रकरण क्र. २५ अन्वये सदर विषयाचा गोषवारा या मा. स्थायी समितीसमोर देण्यात आला होता तो गोषवारा असा आहे, मोरबे धरण उध्दवाचे पाणी दिघा नवी मुंबई ते भाईदर पर्यत एम. एस वाहन व्यवस्थे द्वारे आणणे फिटरमेनद्वारे जलकुंभाना पुरवणे, आवश्यक त्या क्षमतेची मुख्य संतूलन टाकी बांधणे, उपशिर्ष कामासह डिझाईन आराखडा, नकाशे व निविदा प्रपत्र तयार करणेच्या कामाचा प्रोजेक्ट मॅनेजर, सल्लागार नेमणेसाठी निविदांना मंजूरी देणे. दि. २७/४/२००६ रोजीच्या दै. सामना या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिर निविदेनुसार निविदा सुचना क्र. २/२००६-०७, प्राप्त निविदा दि. ६/५/२००६ रोजी उघडण्यात आल्या. सदर प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे. ठेकेदाराचे नाव, एनर्जी कॉर्पोरेशन ८.९० अबॉव्ह प्रथमेश प्रोजेक्ट इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेट कन्स्लटंट ११.५ अबव्ह मे. जे ए सोलंकी १३ टक्के अबव्ह साहेब या सदरच्या निविदेचे अंदाजपत्रक हे ४०० कोटी रुपयांचे होते व हे चार वर्षात पूर्ण करायचे होते. अशी मला जी माहिती मिळाली ती सदरच्या प्रस्तावास सन २००६-०७ रोजी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी नव्हती सन्मा. सदस्यांची दिशाभूल करण्यासाठी याला अंदाजित रक्कमच नव्हती. तर हे प्रकरण ८.९० अबब्ह ते १३ टक्के अबव्ह हे कसे आले हे आम्हाला अवगत होत नाही. सदरची ही निविदा अंदाजित ४०० कोटी रुपयांची होती. ४०० कोटी रुपयांची निविदा असल्याकारणाने त्याला ग्लोबल प्रसिध्द देणे गरजेचे होते. परंतू प्रशासनाने गोषवाऱ्यामध्ये असे म्हटले आहे की, आम्ही दि. २७/४/२००६ रोजीच्या दै. सामना वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिलेली आहे. मी तुम्हाला पेपर प्रोड्युस करतो. या पेपरमध्ये जाहिरात आहे का ते तुम्ही जरा व्हेरीफाय करा मा. महापौर साहेब मी आपल्या निदर्शनास आणून देउ इच्छितो की, सदर निविदेची जाहिरात दै. सामना या वर्तमानपत्रात देण्यातच आलेली नव्हती. जाहिरात देण्यात आलेली नसल्यामुळे निविदा येण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. तरीही आमचे अधिकारी श्री. बारकुंड साहेब, यांनी या तीन कंपन्यांशी संधान साधले आणि या बनावट निविदा आपल्या कॉर्पोरेशनमध्ये आणल्या मे. एनर्जी कॉर्पोरेशन व आमचे श्री. बारकुंड साहेब यांचे किती घन संबंध आहेत याचा आपण जर शोध घेतला यांचे किती घन संबंध आहेत याचा आपण जर शोध घेतला तर अनेक धक्कादायक विषय उजेडात येतील. महोदय, मी आपल्या निदर्शनास दुसरी अशी धक्कादायक बातमी आणू देउ शकतो की, या बनावट निविदांमधील मे. ऑरेन्ज एनर्जी कॉर्पोरेशनची जी निविदा होती. ती वास्तविक ८टक्के अबव्हची होती. परंतू श्री. बारकुंड साहेब यांनी प्रशासकीय मंजूरीसाठी जेव्हा ही लेखापरिक्षकांकडे पाठवली तेव्हा ती ८.९० झाली जेव्हा ४०० कोटी रुपयांची निविदा ८ टक्के वरून ८.९० टक्के झाली. म्हणजेच या दोन अधिकाऱ्यांनी गोलमाल करून आणखीन चार कोटी रुपये त्यात वाढवले. विषय पाण्याचा असल्यामुळे पाण्याची गंभीर टंचाई लक्षात घेता.....

**मा. महापौर :-**

अर्धा तास संपलेला आहे. आपला विषय पुढच्या मा. महासभेत परत...

**संजय पांगे :-**

विषय संपू द्या मी पाच मिनिटात संपवतो.

**मा. महापौर :-**

टाईम ऑलरेडी संपलेला आहे मग तशी प्रथा पडेल तो विषय परत पुढच्या मा. महासभेत घेउ.

**नगरसचिव :-**

आजच्या मा. महासभेत दोन लक्षवेधी आलेल्या आहेत पाहिली लक्षवेधी श्री. मिलन गोविंद पाटील यांची आलेली आहे. दुसरी लक्षवेधी सौ. नयना गजानन म्हात्रे यांची आलेली आहे. एकच लक्षवेधी घेण्याची तरतूद असल्याने जी पहिली लक्षवेधी आलेली आहे ती वाचून मी मा. महापौरांना सुपूर्द करतो. सचिव साहेब, निकृष्ठ दर्जाचे औषध शहरात वापरल्याबाबत. महोदय, महासभेच्या ठरावाप्रमाणे बायर इंडिया कंपनीचीच औषधे वापराची...

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मला मान्य आहे. तुम्ही पहिली लक्षवेधी घ्या पण माझ्या लक्षवेधीवर मला दोन शब्द तरी बोलायला दया

**मा. महापौर :-**

वाचू तर द्या.

**नगरसचिव :-**

मी लक्षवेधीचे वाचन करतोय, महासभेच्या ठरावाप्रमाणे बायर इंडिया कंपनीचीच औषधे वापरायची होती. तसेच ऐम.एल.ओ. ची फवारणी व बायटेक सारखी औषधे वापरण्याचे ठरावाद्वारे नक्की करण्यात आले होते. परंतु या ठरावाची अंमलबजावणी झालेली दिसत नाही. भरडा केमीकल्स लि. सारखी निकृष्ट दर्जाची औषधे शहरात वापरल्याने सर्वत्र रोगराई व डासांचा प्रार्दुभाव फार वाढलेला आहे व त्याचा दृष्परिणाम लहान मुलांवर होत आहे. या सर्व गोष्टीस जबाबदार कोण? ठरावाच्या तारखेपासून आजपर्यंत भरडा केमीकल्स व या सारख्या निकृष्ट दर्जाच्या कंपनीचे औषधे खरेदी केली व सध्या त्यांचा केवढा साठा आहे याची महासभे पुढे माहिती द्यावी व या लक्षवेधीवर मा. महासभेत चर्चा होउन दोशींवर कडक कारवाई करण्याची मी जनतेच्या हिताने मागणी करतो. सदर लक्षवेधी मी मा. महापौरांना सुपूर्द करतो.

**मा. महापौर :-**

एकूण दोन लक्षवेधी आलेल्या आहेत पहिली लक्षवेधी श्री. मिलन पाटील यांनी मांडलेली आहे. दुसरी लक्षवेधी सौ. नयना गजानन म्हात्रे यांनी मांडलेली आहे. पहिली लक्षवेधी मी स्विकारत आहे आणि दुसरी लक्षवेधी फेटाळत आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपल्याकडे नवीन अधिकारी आले आहेत, त्यांची ओळख वगैरे काही नाही का?

**मा. महापौर :-**

दोन्ही लक्षवेधी एकच आहेत. आपल्याला यांच्याबरोबर चर्चा करायला काही हरकत नाही.

**शरद पाटील :-**

ती लक्षवेधी पण वाचून दाखवा म्हणजे आम्हाला समजेल.

**नगरसचिव :-**

मी दुसरी लक्षवेधी वाचून दाखवतो. मी आपल्या सर्वांच्या निर्दशनास आणू इच्छिते की, प्रभाग क्र. २७ (मुर्धाखाडी ते राई ऑफीस) मध्ये अनेक ठिकाणी सफाई कामगारांनी कचरा गोळा करुन ठेवलेला असताना देखील गेल्या आठ दिवसापासून ठेकेदार मेसर्स गुडलक कंन्स्ट्रक्शन कंपनी, भाईंदर यांनी जाणून बुजून कचरा उचलणे बंद केलेले आहे. त्यामुळे कचरा पूर्णपणे कुजलेला आहे व संपूर्ण परिसरामध्ये दुर्गंधी पसरलेली आहे. माझ्या प्रभागातील नगारीक विशेष करुन लहोन मुलं आजारी पडलेली आहेत.

माझ्या प्रभाग क्र. २७ मधील सफाई कामगारांना रु. १६००/- (रुपये एक हजार सहाशे मात्र) सन २००७-०८ चे बोनस घेण्यास नकार देवून बोनस वाढवून मिळावा म्हणून माझ्या घरी न्याय मागण्यासाठी आले व त्या कामगारांनी ठेकेदारा विरुध्द प्रशासनाकडे लेखी तक्रार दि. ३१/१०/२००८ रोजी केलेली आहे.

त्यानंतर मी मा. आयुक्त, मा. उपायुक्त, मा. सहा. आरोग्य निरीक्षक यांना भेटून सफाई कामगार यांच्यावर होत असलेल्या त्रास बाबत चर्चा केलेली आहे. माझ्या प्रभागामध्ये एकून ४३ सफाई कामगार आहेत त्यापैकी ११ कामगारांची बदली उत्तन गांव येथे केली होती. पण मी प्रशासनाकडे तोंडी तक्रार व चौकशी केल्यानंतर त्यांची बदली थांबवून त्यांना पुन्हा माझ्याच प्रभागामध्ये कामावर घेतलेले आहे.

प्रशासनाने गटनिहाय प्रभाग साफसफाईचे करारनामा मागीलतारीख टाकून (बॅकडेटेड) केलेली आहे. त्यावर अजून मा. स्थायी समितीने दोन सदस्य व साक्षीदाराची सही नाही. लाड आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे व शासनाने (केंद्र/राज्य) दिलेल्या आदेश व निर्देशाचे पालन मनपाचे अधिकारी यांनी केलेली नाही. करारनाम्यामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे किमान वेतन कायद्याप्रमाणे इंडस्ट्रीयल डिस्प्युट अधिनियम, बोनस अधिनियम प्रमाणे वेतन, विमा, प्राविडंट फंड, बोनस, साप्ताहिक रजा व अन्य सुविधा, सवलती इ. बाबींची पूर्तता करण्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे. गेल्या १४ महिन्यापासून माझ्या प्रभागातील कामगारांनी काम केलेले व त्यांना गेल्या महिन्याचा पगार दिलेला नाही व त्यांचे हजेरी घेणे बंद केलेले आहे. माझ्या प्रभागातील ११ कामगारांना आजपासून कामावर येउ नका असे सांगण्यात आले आहे. “तुमचे पगार सौ. नयनाताई म्हात्रे देतील त्यांच्याकडून चिठ्ठी आणा’’ असे सांगून त्यांचे अपमान केलेला आहे.

नविन करारनामाप्रमाणे माझ्या प्रभागामध्ये ३४ कामगार काम करणार आहेत. पण मागील तारीख टाकून केलेला करारनामा बेकायदेशीर आहे.

मी आपल्या निर्दशनास आणू इच्छिते की, सफाई कामगार व प्रभागामध्ये लक्ष न दिल्याबाबत मेसर्स गुडलक कंन्स्ट्रक्शन कंपनीला दि. २४/१०/०७ रोजी "कारणे दाखवा नोटीस" काढलेली आहे. गंभीर स्वरुपाचे आरोप लावलेले असतानाही पुन्हा त्याच ठेकेदाराला / नगरसेवकांच्या नातेवाईक / राजकारणी पदाधिकारी इ. यांनाच ठेके देण्यात आलेले आहेत.

**प्रमुख कारण (Grounds) :-** माझ्या प्रभागातील सफाई कामगारांना बोनस रु. १६००/-( रुपये एक हजार सहाशे मात्र) घेण्यास नकार दिल्यामुळे ठेकेदार व स्वार्थी अधिकारी, भ्रष्ट अधिकारी मिळून माझ्या प्रभागातील सफाई कामगारांची बदली करणे, त्यांची संख्या कमी करणे, गोळा केलेला कचरा न उचलणे इ. त्रास देत आहे व करीत आहेत.

**प्रार्थना (Prayer) मागणी :-** करारनाम्यातील अटीशर्ती क्र. १४ प्रमाणे मा. आयुक्त (श्री. रा. सं. जाधव साहेब) मिरा भाईंदर मनपा यांनी उपरोक्त वाद मिटवून योग्य निर्णय घ्यावा व आवश्यक असल्यास मा. आयुक्तालय, कामगार कल्याण विभाग, ठाणे व राज्य सफाई कामगार आयोग, मुंबई यांचे प्रतिनिधी यांना बोलवून सफाई कामगार यांचे प्रश्न कायमचे सोडवून त्यांना न्याय मिळवून द्यावा ही नम्र विनंती.

**मा. महापौर :-**

श्री. पाटील साहेब बोला.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो मा. आयुक्त साहेब, प्रत्येक वेळेला या औषध फवारणी आणि औषंधाच्या बाबतीत सर्व नगरसेवकांची चर्चा झालेली आहे. आपण श्री. पानपट्टे, उपायुक्त यांना शोकॉज नोटीस आणि कारणे दाखवा नोटीस हे दोन्ही दिले होते. आणि त्यांच्याकडून आपण कुत्रे निर्बिजीकरणाचा आणि औषधांचा अहवाल मागीतला होता. त्यांचा तो अहवाल तुमच्याकडे आला का ?

**मा. आयुक्त :-**

आला.

**मिलन पाटील :-**

तुम्ही त्यांच्यावर काय कार्यवाही केली? आपण त्यांना शोकॉज नोटीस दिली का?

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये कुत्र्यांच्या निर्बिजीकरणासाठी आपले मुख्य लेखापरिक्षक श्री. पाटील यांना चौकशी करण्यासाठी सांगीतले होते. मुख्यलेखापरिक्षकांनी चौकशी करून त्यांचा अहवाल दिलेला आहे आणि त्या अहवालामध्ये मी शेवटचा पॅरा वाचतो. वरील परिस्थिती पाहता या संदर्भामध्ये संबंधित उपायुक्त (आरोग्य) व जे संबंधित लिपीक आहेत. ते दोषी असल्याचे दिसून येत असल्यामुळे त्यांच्याविरुध्द लेखी समज देण्याची कार्यवाही करावी असे त्यांनी प्रस्तावित केलेले आहे. या व्यतिरिक्त त्यांना आपण औषधांसाठी एक नोटीस दिली होती. औषधांसाठी जी नोटीस दिली होती. त्याच्यामध्ये देखिल ठिक आहे श्री. पाटील यांनी जो काही अहवाल दिला आहे. त्यावर अंतिम कार्यवाही केलेली नाही. दुसऱ्या नोटीसलाही त्यांचे उत्तर आलेले आहे. याच्यामध्ये मी श्री. पाटील साहेबांना फक्त एक सांगू इच्छितो, मी स्वतः मागे मॅडमनी एक बॉटल आणली आणि त्याच्यावरची एक्पायरी डेट पुसल्याचे किंवा नसल्याचे निदर्शनास आणले. त्याच्या दुसऱ्या-तिसऱ्या दिवशीच मी स्वतः त्या स्टोअर रुमला भेट दिली. सर्व मोठे औषधांचे कॅन, औषधांचे छोटे कॅन्स, मग त्याच्यामध्ये काही ऑईल असेल, काही पेस्टी साईडस् म्हणजे मॉस्क्यूटोची औषधे असतील.त्या सगळयाची मी पाहणी केली. आणि त्याच्यामध्ये कुठलाही औषधांचा डबा मला एक्स्पायरीच्या पुढे दिसलेला नाही. मी एकटाच नव्हे तर माझ्यानंतर सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर साहेबपण स्वतः तिथे जाउन आले आणि त्यांनीही मला येउन सांगितले की मी स्वतः ही खात्री केलेली आहे. सन्मा. श्री. शशिकांत भोईरच नव्हे तर सन्मा. सदस्य श्री. गडोदियाजी माझ्या माहितीप्रमाणे ॲटलीस्ट दररोज त्या ठिकाणी जातात. आणि ते काय चालले आहे आणि काय नाही ते बघतात. त्यांनीही मला सांगीतले की, औषधे आहेत. म्हणजे मॅडमनी काही तरी दिशाभूल केली असेही माझे म्हणणे नाही. त्यांच्याकडे जो डबा होता. त्याच्यावरच्या डेटस् पुसल्या होत्या म्हणून मी वस्तूस्थिती सांगीतली म्हणजे मी स्वतः आणि आपले दोन सन्मा. सदस्य त्या ठिकाणी जाउन पाहणी केलेली आहे.

**कांचन पुजारी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते मच्छर मरत नाहीत. वॉर्डमध्ये एवढे मच्छर झाले आहेत. सगळी बिमारी झाली आहे.

**मा. आयुक्त :-**

मॅडम मी त्या विषयावर येतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांचे झाल्यावर तुम्ही बोला.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यामध्ये आपली जी मूळ तक्रार होती की, आलेली औषधे ही अतिशय निकृष्ट दर्जाची आहेत. किंवा त्याची एक्सपायरी संपलेली आहे किंवा जुनी कुठली तरी पडलेली उचलून आणली असे नाही. आपण फक्त दहा लाखाचीच औषधे खरेदी केलेली आहेत. त्या व्यतिरिक्त तिथे शासनाकडुन दिलेली भली मोठी औषधे आहेत. त्यावेळेस शासनाने जवळपास नउ-साडेनउ लाखाची औषधे दिली होती. आता मला सांगायला आनंद वाटतो की, आणखीन पंधरा लाखाची औषधे शासनाने मोफत दिलेली आहेत. त्याव्यतिरिक्त आपण दहा लाखाची औषधे घेतलेली आहेत. म्हणजे सध्या आपल्याला पस्तीस लाखाची औषधे उपलब्ध आहेत. माझी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की, आपण ही मान्य करतो की, औषध मारले तरी डास आहेत. मी नाही म्हणत नाही. परंतु आपण जी सिस्टम केली आणि मग डास काढण्यासाठी आपण पुढे काय करतो तेही आपल्याला सांगतो. आपण वॉर्डवाईस एक-एक माणूस दिलेला आहे. जो प्रिमिगेशनला ठेवला आहे. फवारणीला ठेवला आहे. आपण वॉर्डवाईस सर्व नगरसेवकांच्या सहमतीने आणि त्यांना विश्वासात घेउन त्यांच्याकडे औषधे ठेवतो आहोत. बाटल्या पण सन्मा. सदस्यांच्या ऑफीसमध्ये ठेवतो. याउपरही आणखीन परिस्थिती आहे. आता आपण त्याच्या पुढे जात आहोत. आपल्याकडे.....

**चंद्रकांत म्हात्रे :-**

कमिशनर साहेब, एक मिनिट. आता आपण म्हणालात की, आपण त्याठिकाणी माणसे ठेवलेली आहेत. तोच विषय आहे म्हणून त्या विषयाला धरुन मी बोलतो.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये मी सन्मा. सभागृहाला सांगू इच्छितो

**मिलन पाटील :-**

तुम्ही जे बोललात त्याचे मी खंडन करतो आणि ते तुम्हाला मान्य करावेच लागेल. मी तुमच्याकडे उंदिर मारण्याच्या औषधाचा पॅक डबा आणून दाखवला होता. त्याच्यानंतर मी तुम्हाला तो डबा आणून दिला. तेव्हा त्याची एक्सपायरी डेट संपली होती. मी तुम्हाला लेखी दिले नाही परंतु मी तुम्हाला डबा आणून दिला. तुम्ही बघितले की, त्याची एक्सपायरी डेट संपलेली होती आणि तो स्टेडियममध्ये वापरत होते. मी तो डबा तेथुन आणला आणि तुम्हाला दिला. त्याच्यानंतर तुम्ही ताबडतोब श्री. खतगांवकर साहेबांना बोलावले. श्री. पाणपट्टे साहेबांकडे तुम्ही त्याचा रिपोर्ट दिला. त्याच्यानंतर मला तुम्ही किंवा पाणपट्टे साहेबांनी किंवा श्री. खतगांवकर साहेबांनी सांगितले का की, हे एक्सपायरी डेटचे चुकुन वापरले गेले किंवा काय झाले जर तुम्ही त्यांच्याबाबतीत एवढी सफाई करता. मग ही गोष्ट तुम्ही केली तर त्यांच्यावर काय कार्यवाही केली? हा एक्सपायरी डेटचा डबा मी तुम्हाला स्वतः आणून दिला.

**सिसिलिया बावीघर :-**

मी दोन वेळा दिलेला पहिला घरी ठेवलेला. नंतर दुसऱ्या वेळेला मी तो इकडे आणला.

**मिलन पाटील :-**

मी तुमच्या हातामध्ये तो डबा आणुन दिला होता की नाही? तुम्ही हे मान्य करता की नाही?

**सिसिलिया बावीघर :-**

दोन वेळा मी त्यांची चुक मी तुमच्या लक्षात आणून दिली पण तुम्ही त्याच्यावर काही कार्यवाही केली नाही.

**मा. आयुक्त :-**

पाटील साहेब, दोन विषय आहेत.

**मिलन पाटील :-**

तुम्ही मान्य करता की नाही ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

होय, मान्य आहे. मी तुम्हाला सांगतो. दोन विषय आहेत.

**सिसिलिया बावीघर :-**

म्हणजे आम्ही चुकीचे सांगतो असे तुम्हाला वाटते का?

**मा. आयुक्त :-**

मॅडम तसेच नाही. मी कुठे सांगितले की, चुकीचे सांगता.

**सिसिलिया बावीघर :-**

तुम्ही असेच सांगितले. तुम्ही बोलले की, आम्ही जाउन औषधे चेक केली. काहीही सापडले नाही. तुम्ही जाण्याअगोदर त्यांनी लपवली असतील.

**मा. आयुक्त :-**

श्री. पाटील साहेब, त्याच्यामध्ये मला आपल्याला हेच सांगायचे आहे की, आपण जी चर्चा करत होतो ती मच्छरांच्या औषधाबद्दल करत होतो.

**मिलन पाटील :-**

आता एक्सपायरी डेटची चालू आहे. त्याच्या बद्दल तुम्ही सभागृहाला सांगता.

**मा. आयुक्त :-**

श्री. पाटील साहेब, मी तुम्हाला संगतो. मी जे सांगितले. आम्ही स्वतः जाउन जी बघितली....

**मिलन पाटील :-**

तुम्ही कार्यवाही काय केली? ते प्रमुख आहेत की नाहीत?

**मा. आयुक्त :-**

श्री. खतगांवकर साहेब त्याचे प्रमुख आहेत.

**मिलन पाटील :-**

आपल्या इकडे एक्सपायरी डेटचे जे औषध मिळाले आणि ते टाकतात. त्याचा उंदरावर काही परिणामच होत नाही.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये मी सन्मा. सदस्यांना हेच सांगतो की, तो एक मुद्दा होता. आपण हा ही मुद्दा काढला त्याची मी नोंद घेतो. आम्ही स्वतः तिथे जातो.

**मिलन पाटील :-**

साहेब, याला तीन महिने झाले. तुम्ही मला एक साधा जवाबपण दिला नाही, की आम्ही हे दक्ष नगरसेवक आहेत. याच्याबद्दल आमची काही चुक झालेली आहे, अधिकाऱ्यांची चुक झाली आहे.कोणाची चुक आहे. तुम्ही दोन शब्दपण लिहिले नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब मला परवानगी द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु) सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. पाटील साहेबांना माझी विनंती आहे की, वृक्षप्राधिकरण समितीचे सदस्य आहेत. आम्ही गेल्यावर्षी सुद्धा उंदराचे औषध खरेदी केले नाही किंवा आताही केले नाही. कदाचित तुम्ही कोणता डबा घेउन चर्चा करता ते तपासावे लागेल. मी सन्मा. सभागृहाला निश्चित सांगतो की, आपण उंदराचे औषध खरेदी केलेले नाही. सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील यांनी मागील सभागृहात मागणी केली होती. पण त्याच्यावर अजून कोणती पूर्ण कार्यवाही झालीच नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, गेल्या कित्येक महिन्यांपासुन प्रभागामध्ये औषध फवारणीचे काम बंद आहे. तर ते का बंद आहे त्याचा खुलासा करावा.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, आता यांनी मान्य केले की, यांचा जो अहवाल घेतला. त्याच्यावर यांची चुक आहे आणि कारवाई करावी असे लेखापरिक्षकांनी सांगितलेले आहे. त्याच्यानंतरसुद्धा तुम्ही काय कार्यवाही केली? तुम्ही याच्यावर काय निर्णय घेता ते बोला नाहीतर मी निलंबनाचा ठराव मांडतो.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब आम्हालापण याच्यावर चर्चा करायची आहे. तुम्ही आम्हाला वेळ द्या.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, आता तुम्ही सांगितल्याप्रमाणे लेखापरिक्षकांनी यांच्याकडे अहवाल दिलेला आहे. ते दोषी आहेत. मी त्याच्याबाबतील निलंबनाचा ठराव मांडतो. महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य विषयक तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत. कचरा डंपींगचा प्रश्न सातत्याने निर्माण होत आहे. साफसफाई, नालेसफाई बाबत तक्रारी तसेच सध्या डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे.

आरोग्य विभागातर्फे औषध फवारणी, गटार सफाई नियमीतपणे होत नसल्यामुळे डासांचे प्रमाण वाढलेले असून ह्याबाबत महासभेत नेहमीच चर्चा होत असते. अनेक नगरसेवकांनी आरोग्य विभागाच्या कामकाजाबाबत तक्रारी केलेल्या आहेत. त्यावर आरोग्य विभागामार्फत समाधानकारक कारवाई होत नसल्याचे दिसून आले आहे.

आरोग्य विभगाचे प्रमुख उपायुक्त, श्री. पानपट्टे सो., हे आरोग्य विभागाच्या अकार्यक्षम कामकाजास जबाबदार आहेत. महासभेमध्ये आरोग्य विषयक प्रश्नांवर रुलींग देताना मा. महापौरसो., ह्यांनी औषध खरेदी विषयावर सविस्तर चौकशी करुन मा. आयुक्त सो., ह्यांना पुढील महासभेत अहवाल सादर करावा असे निर्देश दिलेले होते. तथापी, मा. आयुक्त सो., ह्यांनी देखील त्यावर आपला अहवाल दिलेला नाही.

कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यास औषध खरेदी बाबत आरोग्य विभगाचे उपायुक्त श्री. पानपट्टे सो., हे जाबाबदार असून आरोग्याच्या चांगल्या परिणामकारक कामकाजास ते अकार्यक्षम ठरलेले आहेत. सबब त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिकेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार निलंबीत करण्यास यावे ह्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

**राजेश म्हात्रे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, ज्यावेळेला गेल्या महिन्यामध्ये मिटिंग लागली. त्यावेळेला देखील मी बोललेली की, सफाई कामगारांना एक पगार बोनस द्यावा. आणि माझ्या प्रभागातील कर्मचारी माझ्या घरी आले आणि मला विचारले की, ताई आम्ही किती बोनस घ्यावा? तर मी सांगितले की, ठेकेदाराने आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेशी ॲग्रीमेंट बनवली आहे. त्याच्यामध्ये सगळ्या अटीशर्ती लिहिलेल्या आहेत की, तुम्हाला एक पगार बोनस द्यायचा. तर माझ्या कर्मचाऱ्यांचनी तो बोनस घेतलेला नव्हता. त्यावेळेला ठेकेदार श्री. नवाब यांचा माणूस माझ्या घरी आला आणि मला असा सांगू लागला की, नयनाताई तुम्ही कामगारांबद्दल भांडु नका. तुम्हाला आम्ही दर महिन्याला पाच हजार रुपये देउ. तर मी त्याला घरातुन हाकलुन काढला. कारण जे कामगार लोकांचा गू भरतात त्यांचे जर पाच हजार मी दर महिन्याला घेतले तर ते मला पचणार नाहीत. म्हणुन मी त्या ठेकेदाराला हाकलून काढले. त्या ठेकेदाराने असा विचार केला की, आता ही बाई ऐकत नाही. म्हणुन कामगारांना हैराण करायला घेतले. जे कामगार चौदा पंधरा महिन्यांपासुन काम करतात त्यांची बदली केली तर हे कामगार थंड पडतील. बाकीच्या कामगारांनी सांगितले की, यांची बदली कशामुळे करता. तसे न होता दहा जणांना डायरेक्ट घरी बसवले की, तुमचे या मस्टरमध्ये नाव नाही. असे चालते का हे मला सांगा. त्या ठेकेदारांनी असे सांगितले की, आम्हाला फक्त तेहतीस माणसांची हजेरी घ्यायला सांगितले आहे. मग बाकीच्या माणसांची हजेरी घ्यायला सांगितले आहे. मग बाकीच्या माणसांची हजेरी घ्यायला सांगितले आहे. मग बाकीच्या माणसांची हजेरी कोण घेणार? आता मला सांगा, धुवा फवारणीचे काम याच कामगारांनी करायचे. औषध फवारणीचे काम याच कामगारांनी करायचे. मग आम्ही माणसे कुठुन आणायची? मिरा भाईंदर मधून लोक पळुन गेले का? तर या अधिकाऱ्यांनी माणसांचा कोटा कमी केला. मी चुकीचे बोलते का ते मला तुम्ही सांगा. सगळ्या गोष्टीवर तुम्ही पैशांचे बजेट वाढवतात मग आरोग्याचा विषयावर श्री. पानपट्टे साहेबांनी मस्ती का करावी? ते ठेकेदार सरळ असे बोलतात की, श्री. पानपट्टे साहेब आम्हाला ऑर्डर देत नाहीत. असे करत नाही, तसे करत नाही. मग त्याचा त्रास आम्ही का सहन करावा? साहेब, हे असे चालणार नाही. कारण माझे कामगार बिचारे तिकडे बाहेर बसले आहेत. ठेकेदार येउन त्यांना उलटसुलट बोलतो की, तुम्ही श्रीम. नयना म्हात्रे यांच्याकडुन पगार घ्या. का? नयना म्हात्रेचा जरी वॉर्ड असला तर त्यांना मी पगार द्यावा. मग तुम्हीच त्या कामगारांच्या जीवावर कमवता. मग तुम्हीच त्यांना पगार द्या. आज त्यांची मुलेबाळे ए.सी. मध्ये फिरतात. कोणामुळे फिरतात? त्या कामगारांमुळे फिरतात. आज माझ्या वॉर्डमध्ये जो ठेकेदार आहे तो देखील एका ठिकाणी कामाला होता. तो लिफ्टमॅन होता. आज तो मोठ्या पदावर गेला म्हणुन त्या कामगारांना त्याने विसरु नये. कारण त्याने असा विचार केला पाहिजे की, मी देखील कुठेतरी शेठकडे कामाला होतो. आणि आज जर तो त्या कामगारांचा शेठ झाला असेल तर त्याने एवढी मस्ती करु नये. मा. महापैार साहेब, मा. आयुक्त साहेब जर या कामगारांना व्यवस्थित न्याय मिळाला नाही. कायद्यानुसार तर माझ्या वॉर्डची लोकसंख्या दहा ते बारा हजार आहे. तर मला साठ कामगार पाहिजेत. साठ नको पण कमीत कमी चाळीस होते. त्यातले पण बंद केले. जर मला व्यवस्थित न्याय मिळाला नाही तर मी उद्या मिरा भाईंदर महापालिकेच्या बाहेर उपोषणाला बसणार. म्हणून मला व्यवस्थित न्याय मिळावा. मा. महापौर साहेब, यापुर्वीपण माझी अशी तक्रार होती की, त्या ठेकेदाराला माझ्या वॉर्डमध्ये काम देउ नये. तरीसुद्धा श्री. पानपट्टे साहेबांनी त्याला काम दिले असे का? मा. आयुक्त साहेब, तुम्हाला ती परत या मिटिंगला बोलते की, श्री. पानपट्टे साहेबांकडुन ते अधिकार काढा नाहीतर त्यांना घरी तरी बसवा. मा. आयुक्त साहेब, त्यांच्या जागेवर असा सक्षम अधिकारी द्या की, जो पायी चालेल. मा. आयुक्त साहेब, तुम्ही आठ महिन्यापासुन, या मिरा भाईंदरला आल्यापासुन एक-एक वॉर्ड न् वॉर्ड पिंजुन काढलात श्री. पानपट्टे साहेबांनी श्री. संदिप शिंदे, श्री. राजकुमार कांबळे यांनी किती वॉर्ड फिरुन आले ते मला सांगावे. जागेवरची खुर्ची खाली करत नाहीत. सगळ्या खुर्च्या गरम करायला येतात. त्या लोकांनी मिरा भाईंदरचे नुकसान केले. मी तर सांगते यांना घरी बसवा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. श्री. म्हात्रेजी बोला.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, या शहरामध्ये दिवाळीच्या अगोदर पासुन अनेक ज्या लेबर युनियन आहेत. लक्षवेधीवर प्रत्येक सदस्याला बोलण्याचा अधिकार आहे. आमच्या लक्षवेधीवर यापुर्वी तुम्ही बोललेले आहेत.

**मा. महापौर :-**

श्री. म्हात्रेजी आपण माझ्याशी बोला.

**मिलन म्हात्रे :-**

दिवाळीपासुन कुठलाही सणसुद असले की, या शहरामध्ये लेबर युनियनचा हैदोस सुरु होतो. आणि मग नाटके चालू होतात. आज सगळ्यात पहिला वन विभागामध्ये पाच ते सहा दिवसाचा स्ट्राईक झाला. आता त्या उपायुक्तांचा पुढे प्रस्ताव आहें की, त्यांना इथे ठेवायचे आहे. त्याच्यानंतर आता या दिवाळीमध्येच

ठेकेदाराने पगार द्यावा, बोनस द्यावा खर्ची द्यावी या निरनिराळ्या कारणास्तव सहा दिवस स्ट्राईक झाला आमच्या प्रभागातील ठेकेदाराने पहिला आग्रह धरला की, आम्हाला खर्ची पाहिजे, खर्ची द्यायची तयारी दाखवली तर आम्हाला खर्ची नाही पाहिजे. ंनतर परत स्ट्राइक केला, आम्हाला आता बोनस पाहिजे. बोनस घेउ तो एवढाच. पगार पाहिजे. ह्या सगळ्या कारणास्तव सहा दिवस हे शहर कचऱ्याने जसेच्या तसे पडून होते. दिवाळी होती. आज मला एक सांगा. मा. आयुक्त साहेब, परवाच तुमच्या दालनामध्ये श्री. विवेक पंडित यांची मिटिंग झाली. त्याच्यामध्ये एक विषय चर्चिला गेला की, लेबर कमिशनरने तुम्हाला जे पत्र आणि आदेश दिलेले आहेत. त्यानुसार तुम्ही टेंडर का दिले नाहीत? आता युनियनचे लिडर टेंडर कसे असावेत ती पण चर्चा करायला लागले. आमच्या नगरसेवकांचे काम नाही की, महापालिकेचे कोणाला टेंडर द्यावे. कोणाला न द्यावे ते कितीला द्यावे. त्या ठेकेदारांनी कामगारांना काय द्यावे हा आमचा लुकआउट नाही. निदान माझा तरी नाही. माझ्या वॉर्डमध्ये तुमचे जे काही कर्मचारी आहेत ते ठरलेल्या वेळेला कामाला लागले पाहिजेत हा माझा लुकआउट आहे आणि हे माझे कर्तव्य आहे. एक लक्षात घ्या, आता आपल्या भाषणात निघाले की, औषध फवारणीची जी जंतुनाशकाच्या बाटल्या तुम्ही नगरसेवकांकडे दिल्या आहेत. मी तुमच्याकडुन कधीही औषधाची बाटली घेणार नाही. कारण ते लहान मुलांपासुन दुर ठेवा, माणसांपासून दुर ठेवा अशी नोटीस त्याच्यावर लिहिली आहे. तुम्ही दिली तरीही मी घेणार नाही तुम्ही म्हणता प्रत्येक नगरसेवकाला दिली आहे. आम्ही कशाला कोणाची रिस्क घ्यायची. ते एस.आय सक्षम आहेत. त्यांच्याकडे गोडाउन आहेत. आम्ही ते गोडाउन मध्येच ठेवणार. आज या युनियनचा एवढा हैदोस चालला आहे. कधीही विदाउट नोटीस देता काहीही करतात. एक लक्षात घ्या, सुप्रीम कोर्टाचे अनेक आदेश आहेत की, स्ट्राइक कसा करावा? करावा की करु नये? केल्यावर त्याच्यावर काय बंधने आहेत. एक लक्षात घ्या. ज्यावेळेला तुमचे टेंडर पास होतात. सभागृहामध्ये ठराव पास होतात. त्यांना इकडे आम्ही लेबर नक्की करतो की, अमुक अमुक या माणसाला एवढा पगार दिला पाहिजे. भले तो कर्मचारी कायम अकायम तो भाग निराळा. पण ज्यावेळेला तुमचे टेंडर तयार होतात. जे टेंडर ॲग्रीमेन्टस तयार होतात. तेव्हा या सगळृया युनियनचे पुढारी काय करत असतात. आता स्टॅडींगला आम्ही त्यांना दरवाढ करुन दिलेली आहे. म्हणजे हे शहर असेच चालायचे का? आता तुम्ही एका वर्षी दिलेले जे ॲग्रीमेंट बनवले आहे. हे तुमच्या कॉन्ट्रॅक्ट ॲक्टनुसार तुम्ही आणि ठेकेदार, दोघेही त्याला बांधील आहात. आपण थोडे नियमाचे आणि कायद्योच बोलु. उद्या कोणीही, उद्या मी लेबर युनियनचा बॅनर घेउन येईन आणि तुम्हाला त्रास देईन. कोण दोनशे मागते, कोण ऐंशी मागते, कोण सत्तर हे काय चालले आहे. तुम्हाला कुठेतरी एक स्पष्ट भुमिका घ्यावी लागेल. काल परवा तुमच्या ॲन्टी चेंबरला जी चर्चा झाली. त्याच्यामध्ये माझ्या माहितीनुसार तुमचे टेंडर मे मध्ये दिले. तुमची ॲग्रीमेंट मे मध्ये झाली आहे. त्यांनतर तुमच्या लेबर कमिशनरचे जे पत्र आहे ते जूनमधले आहे. त्याअगोदर जर तुमचे टेंडर पुर्ण झाले असेल तर त्याला जूनच्या पत्राचा इफेक्ट लागू शकत नाही. तुम्ही अशी पत्र रितसर या युनियनच्या लिडरना द्या. आणि त्याच्या कॉप्या प्रत्येक पोलीस स्टेशनला द्या. परवा माझ्या वॉर्डमध्ये मारामारी झाली. आपल्या परमनन्ट मुकादमाला पाच पंचवीस लोकांनी मारले ठेकेदाराला मारले. एवठी दादागिरी! उद्या आमच्या नगरसेवकांवर, उद्या तुमच्यावर हात टाकतील. कुठेतरी कोणतरी ताळ्यावर असले पाहिजे. नियम तुमच्या बाजूने आहे. ॲग्रीमेंट बनवताना ॲग्रीमेंटच्या अगोदरच लेबर युनियनचा जो काही कायदा असेल तो तुम्ही तपासा. त्यांचे जे ठरलेले रेट आहेत ते अगोदरच नक्की करा. हे शहर वेठीस धरले जाते. या अगोदर घनकचरा व्यवस्थापनचा प्रकल्प बंद पाडला गेला. त्याकरीता तीन महिने कचऱ्याच्या राशी शहरामध्ये जमल्या. आम्ही काय काय सफर करायचे? करदात्या नागरिकांनी काय काय बघायचे? आमच्या घरासमोर कचऱ्याचे ढिग आहेत. आठवडा आठवडा, दिवाळीच्या सणामध्ये कचऱ्याचे ढिग उचलले गेले नाहीत. त्याला कुठची लेबर युनियन जबाबदार आहे? प्रशासन तर आहेच पण लेबर युनियन पण जबाबदार आहे. आज पाच दिवस वन विभागामध्ये पाणी मारलेले नाही. बगिच्यातील सगळी झाडे मेलेली आहेत. कुठलाही युनियनचा लिडर आला तरी मेलेले झाड जिवंत होणार नाही. आणि हे सगळे प्रशासन आणि लेबर युनियनच्या साठगाठीने होते असे माझे मत आहे. तुम्ही याच्यावर जरा विश्लेषण कराल तर बरे होईल आणि मला कायदेशीर कार्यवाही पाहिजे.

**मा. महापौर :-**

श्री. पाटील साहेब, आपण आपले थोडक्यात मांडा.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहेब, मै फायर ब्रिगेड ऑफीस मे गया था। वहा पर मैने किटकनाशक, सब डबे उनका बॅच नंबर, उनकी एक्सपायरी का स्टॉक चेक किया। एक्सपायरी तो कोई नही है सब बराबर थे। लेकिन उसपर बॅच नंबर नही है। मैने पुछा की, आपका सामान कहा से आया। आपके पास क्या जानकारी है? जो सॅनिटरी इन्स्पेक्टर श्री. पवार साहेब थे उनका बोलना था की, इस साल की जानकारी हमारे पास नही है। यह सामान लोकल परचेस किया कैसे किया, एक नगरसेवक अगर जाचना भी चाहेगा तो सारे कागज श्री. शिंदे साहब के पास है। मैने तुरंत बोला की, श्री. शिंदे साहब को बोलो. मेरे को जानकारी चाहिए। मैन श्री. पवार साहब को दस पॉइन्ट भी लिख कर दिए की, आपका लोकल टेंडर परचेस हुआ है ी, आउट डोर टेंडर परचेस हुआ है। कैसे किया गया? क्यो हर बार सेंन्ट्रल ऑफीस से जानकारी कैसे करेंगे? सारा स्टॉक

वहापर है तो कागज वही पर होने चाहिए। चलान नंबर है लेकिन बॅच नंबर नही है। यह जुना स्टॉक है या नया स्टॉक है यह कैसे मालुम पडेगा। आपने कितना सामान लाया, कितना सामान डिस्ट्रीब्युट किया उसका भी कोई रेकॉर्ड नही है। जो लेनेवाला है, अगर आपके पास दो टन पावडर आया है, आपने एक टन दे दिया। किसन मांगा? आपने दिया या बेच दिया यह कैसे मालुम पडेगा? ले जाने का कोई सिस्टम ही नही है। उसमे वह भी बाते होनी चाहिए। यह बाते मै बोला लेकिन श्री. शिदे साहब के कान पर जू नही रेंगती है। उनको मैने इतनी चिजे बतायी है की, ऐसे ऐसे होना चाहिए। यहा पर जितना भी चलान आता है, उसका बराबर नोटीस से टेंडर आया है तो मालुम पडना चाहिए की, यह दवाई आयी। यह मंगाई थी। वहा पर बैठे बैठे मुझे कैसे मालूम पडेगा। वहा टेंडर की नोटीस होनी चाहिए की, यह दवाई आयी थी हम उसका बॅच नंबर देखेंगे। आपने जो सप्लाय किया उसका भी लिस्ट आना चाहिए। ठेकेदारने आपको जो टेंडर सप्लाय किया उसका पूरा पुरा लिस्ट वहापर रहेगा। और हम चेक करेंगे की, यह बॅच नंबर है। यहा सप्लाय कुछ दिखाया, वहा कुछ और है। हमे कैस मालूम पडेगा। जितना भी सेंट्रल ऑफिस से कामकाज होता है वह ऑफिस से नही होगा। हम कुछ नही कर सकते है। श्री. शिंदे साहबकडे बारबार बोला है, वह कुछ नही करते है। सारा सामान सेंट्रल मे रखो और उसको डिस्ट्रीब्युट करो।

**मा. महापौर :-**

ठिक है बोला।

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर. साहेब, आता श्री. मिलन पाटील साहेबांनी जो ठराव मांडला. श्री. पानपट्टे साहेबांना घरी बसवा. आणि त्याचा चार्ज श्री. अजित पाटील यांना द्या.

**मिलन पाटील :-**

शहरामध्ये एवढे मच्छर झालेले आहे. आम्ही अगोदर मागणी केली की, आपल्याला बायर इंडियाची बायटेक्सचे वापरायचे, एम.एल.ओ. वापरायचे. या दोन गोष्टी आम्ही ठरावामध्ये पण ठासुन दिलेले आहे आणि त्यावेळेला मी तुम्हाला उल्लेखपण केलेला आहे की, आपल्याला बायर इंडियाचेच पाहिजे. आता महानगरपालिका असतानापासुन आम्ही बायर इंडियाचीच औषधे वापरत होतो. त्याचा इफेक्ट इतका सुंदर आणि चांगला आहे. पण या लोकांना ते नको. कारण यांचे कमिशन जास्त आहे. ह्या डब्यावर यांचे कमिशन जास्त आहे. म्हणुन आता हे निकृष्ट दर्जाचे वापरतात. बायर इंडियावाला एक टक्का देतो. हे वीस टक्के देतात. म्हणुन या कंपनीची औषधे वापरतात. साहेब, एवढी निकृष्ट दर्जाची औषधे आहेत. माझी नात हे बघा मी हॉस्पीटलचा रेकॅार्ड आणलेला आहे. माझी नात आजसुद्धा ॲडमिट आहे. आज आम्ही मुलांच्या मागे वीस-पचंवीस हजार रुपर्य खर्च करु. पण गरीबांचे काय? या औषधाचा काही परिणाम होत नाही. हे जर औषध वापरले त्याची काही आवश्यकता नाही. हफ्त्याला एक डबा लागतो. गरीब काय वापरणार आहेत? अशा अधिकाऱ्यावर आता मी माहिती मागितली. त्यांनी मला फक्त वापरल्याची माहिती दिली. आले किती ते दिलेले नाही. आमचे अधिकारी गोलमाल करण्यामध्ये एवढे हुशार आहे आणि गोलमाल करत आहेत. त्यांनी मला फक्त वितरण केल्याचे दिले की, या इकडे एवढे दिले, या इकडे तेवढे दिले. आता डॉक्टर साहेबांनी सांगितले तसे पण कोणाला किती दिले तसे काही नाही. फक्त लिटरचा हिशोब आहे. आपल्याकडे आले किती आणि कोणाला पेमेन्ट किती केले? साहेब याच्यामध्ये त्यांनी आलेल्या औषधाचे घेतले. त्याला तुम्ही बिल अदा केले असेल की, नाही? साहेब, मी सांगतो की, अजिबात बिल अदा करु नका.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

श्री. पाटील साहेब, तुम्ही सत्ताधारी पक्षात असताना तुमची ही परिस्थिती आहे. तिथे आमच्या लोकांचे काय आहे?

**मिलन पाटील :-**

आपल्याला बायर इंडियाचीच औषधे पाहिजेत आणि ती वापरायची आहेत.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर महोदय, मा. आयुक्त साहेब, सव्वा वर्ष झाले. महापालिकेच्या नवीन कामकाजाला सुरुवात झालेली आहे. आपला कालावधी साधारणपणे आठ महिन्यांचा झाला आणि या आठ महिन्यांमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना, बी.जे.पी., अपक्ष संकलीत आघाडी सत्तेचे जे कामकाज आहे.त` सत्ता पक्षाचेच लोक आपल्या कामाचे कौतुक करत आहेत. आणि आपण आपली पाठ थोपटुन घेता. ते खोटे बोलतात अशातला भाग नाही. बेंबीच्या देठापासुन बोलतात. कारण आम्हाला लोकप्रतिनिधी म्हणुन समाजाचे नेतृत्व करायचे आहे. ते नेतृत्व करताना रोज नगारिकांच्या तक्रारी आमच्या लोकांनी का ऐकायच्या? अधिकाऱ्यांकडुन वारंवार चुका होत असतील. साहेब यांचे पालकत्व आपण स्विकारलेले आहे, आपण आयुक्त आहात. त्याचा अर्थ आपले या प्रशासनावर बिलकुल नियंत्रण नाही. आपले नियंत्रण नाही की आपल्याला ठेवायचे नाही तेही कळत नाही. पण आपण कुठेतरी या गोष्टी आज सगळेच बोलायला लागले. आम्ही बोलत होतो तेव्हा वाटत

होते की, विरोधी पक्ष बोलतो आहे. सत्तापक्ष बोलतो आहे आणि पुराव्यासह गोष्टी बोलतो. प्रश्नोत्तराच्या काळाने काय प्रश्न निर्माण केले, तर प्रशासनाच्या, महापालिकेच्या कामकाजाबद्दल प्रश्न उपस्थित केले. लक्षवेधीने काय प्रश्न उपस्थित केल, तर आपल्या कामात किती अनागोंदी चाललेली आहे. किती प्रकारचे आपले दुर्लक्ष प्रशासनावर आहे. जे स्पष्ट होते. सत्तापक्षाला आजच्या सभेच्या माध्यमातुन एक विनंती करतो. लक्षवेधीवर सगळ्यांनी बोलायचे असते कारण शहराच्या हिताची असते. नयना ताईंनी आणलेली लक्षवेधी देखील निश्चितच शहराच्या हिताची होती. साहेब आपण फक्त इथे बोलतो. आमच्या सन्मा. सदस्यांना वाटते की, आम्ही आमच्या भावना व्यक्त केल्या. त्याला न्याय मिळण्याची वाट बघतात. परंतु आपल्याकडुन सकारात्मक दृष्टीकोनातून कुठल्याही प्रकारचे कामकाज झाल्याचे आतापर्यंत दिसले नाही. दिसावे अशी अपेक्षा आहे. तुम्हाला पुढील कामकाजासाठी शुभेच्छा की, आपण कुठेतरी सक्तीचे धोरण वापरले पाहिजे. दुसरी गोष्ट सांगू इच्छितो की, श्री. मिलन पाटील साहेब, आपण ठराव आणला असा ठराव करताना रितसर विषयच आणला असता आणि ठराव केला असता तर ठरावाचे वेटेज कुठेतरी वाढेल. आपण आपल्या ठरावाचे कुठेतरी चुकीचे काम करतो. लक्षवेधीला आपल्याला तसा ठराव आणता येणार नाही. हा रितसर पुढच्या सभेला सभापटलावर विषय आणा. हे औषध कमकुवत आहे. हे औषध कामाचे नाही. याच्यापासुन कुठल्याही प्रकारचे हित साधल जात नाही. असा तुम्ही विषय आणा. आणि मग ठराव करा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. अनिल सावंत साहेब बोला.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर सोहब, आता सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी लक्षवेधी आणली, शहरातील औषध फवारणी आणि साफसफाई मला वाटते या मिरा भाईंदर शहरामध्ये साफसफाई आणि कचरा याला आजकाल सोन्याचा मोल आलेला आहे. या एका बजेटसाठी आपले गेल्यावर्षी बारा करोडचे प्रोव्हिजन होते. त्याच्यानंतर चौदा करोड केले. नंतर सोळा करोड केले. आणि अजूनही त्याला पैसे कमी पडतात. म्हणुन अजुन वाढवायचे आहेत. या मच्छरबद्दल सन्मा. नगरसेवक श्री. चंद्रकांत वैतीजी यांनी लक्षवेधी यापुर्वीसुद्धा आणली होती. पण त्यावेळी ती चर्चा होउ शकली नाही. सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी जी लक्षवेधी आणली. त्यांचा जो मुळ विषय आहे की, ठराविक कंपनीची औषधे घेतली जात नाहीत. तर माझा असा स्पष्ट आरोप आहे की, ह्यांनी टेंडरमध्ये जी औषधे मागविलेली आहेत. त्याप्रमाणे त्या औषधांचा सप्लायच झालेला नाही. यांनी चुकीची औषधे खरेदी केलेली आहेत. कारण यांनी टेंडर मध्ये जी औषधे मागविली. त्यांचे रेट आणि त्यांनी परचेस केलेल्या औषधाचें रेट याच्यामध्ये जवळजवळ ५० टक्के चा फरक आहे. जो कुठेही असु शकत नाही. आणि यांनी चुकीची औषधे खरेदी केली आणि त्याची फवारणी आज शहरामध्ये होत आहे. मी आजच श्री. पानपट्टे साहेबांना हे लेटर दिलेले आहे, याच विषयावर मला माहिती नव्हते की, हे लक्षवेधी आणतात. याच विषयावर पत्र दिलेले आहे, शहरामध्ये ह्या मच्छरचा प्रार्दुभाव गेल्या एक-दोन महिन्यापासुन एवढा वाढलेला आहे की, साफसफाई कामगार साफसफाई करतात. फवारणी करतात पण त्याचा काही उपयोग होत नाही. तर ही जी औषधे खरेदी केलेली आहेत. त्याची जातीने चौकशी करा. लेखापरिक्षकांचे तुम्हाला लेखी आदेश येतात की, चौकशी करा. त्याच्यावर कार्यवाही होत नाही. आरोग्याचा एवढा महत्त्वाचा विषय आहे. मिरा भाईंदरमधील शहरातील नागरिकांकडुन आपण जवळ जवळ करोडो रुपयांचा प्रॉपर्टी टॅक्स घेतो. त्यांना आपण काय देतो? पाणी आणि आरोग्य. आरोग्याच्या बाबतीत तर सगळीकडे बोंबच आहे. शहरामधील सर्व सरकारी किंवा प्रायव्हेट दवाखाने जाउन बघा. संध्याकाळी किंवा सकाळच्या वेळेला सर्व हाउसफुल्ल असतात. मलेरियाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झालेला आहे. तर हा विषय सिरिअसली घ्या आणि ह्याची ठोस उपाययोजना काय करता येईल या दृष्टीकोनातुन विचार करा.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, बराच वेळ झाला. याच विषयाबद्दल बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवालजी एक मिनिटात आपले म्हणणे मांडा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एक मिनिटात होणार नाही. दोन मिनिटे तरी नक्कीच लागतील. पहिली गोष्ट, आता विरोधी पक्षनेते श्री. चंद्रकांत वैती यांनी भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेचा उल्लेख सत्ताधारी पक्ष म्हणुन केला. आणि तेच वाद घालतात. पंधरा वर्षामध्ये या सभागृहामध्ये ही पहिली वेळ आहे, सत्तेमध्ये असुनही सत्ताधरी म्हणुन आम्ही या शहराची काळजी घेतो आहे. आजपर्यंत जे सत्तेमध्ये होते त्यांनी काळजी घेतलेली नाही. म्हणुन याची नोंद सन्मा. सदस्य श्री. चंद्रकांत वैती साहेबांनी घ्यावी. आमच्यावर कुठलेही ताशेरे ओढायचे नाहीत. दुसरी गोष्ट आमच्या सन्मा. नगरसेवकांनी जी एक्सपायरीची बाटली दाखवली. कॉम्प्युटरमध्ये अशी फिडींग होते की, हे औषध तीन महिन्यानंतर एक्सपायर होणार आहे. एक्सपायरीच्या तीन महिने आधी कंपनीने ती औषधे बाहेर काढायची असतात आणि कॉम्प्युटरमध्ये तशी फिडींग असते. त्यांनी जो आरोप केला आहे, त्या आरोपाला मी नाही म्हणत नाही. जी औषधे आली होती ती एक्सपायर झाली असतील. एखादा त्या कॉम्प्युटरमध्ये

एक्सपायरीची नोंद चुकीची फिड झाली. म्हणुन ती औषधे आपल्याकडे आली आहेत. हे प्रशासनाने कबुल केले पाहिजें. म्हणजे नगरसेवक खोटे बोलता या गोष्टीचे तुम्ही करु नका. मिस्टेक झाली असेल. आमचा मेडिकलचा धंदा आहे. अनेक वेळा आम्ही फिडींग करताना २००८ च्या ऐवजी २००७ करतो. एक्सपायरी नसताना एक्सपायरी दाखवतो. तर ही अशी गोष्ट आहे. मा. महापौर साहेब, आता जो ठराव झालेला आहे. त्याबाबत आपण आता खुलासा करा. या अगोदर श्री. ओमप्रकाश दिवटे साहेब यांचाही ठराव या पद्धतीने या सभागृहामध्ये झालेला आहे. फक्त ठराव करुन दिशाभुल करायची असेल तर नाही. एक तर या ठरावावर इम्लिमेंट होणार की नाही. हे वॅलीड आहे की नाही.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतो. आमचे महान मा. आयुक्त साहेब, तुमचे लक्ष जरा इथे केंद्रीत करा. कारण हा विषय तुमच्याकरीता जास्त आहे. कारण या विषयाबद्दल तुम्हालाच जास्त उत्तर द्यावे लागणार आहे. आमचे सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील साहेब यांनी एक चांगली लक्षवेधी आज इथे आणली. याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे की, बायर इंडिया कंपनीचीच औषधे खरेदी करण्याबद्दल ठराव मांडण्यात आला होता. तर अधिकाऱ्यांना हे अधिकार कोणी दिले? ठरावाला अशा पद्धतीने बाजुला ठेवुन दुसऱ्या कंपनीची औषधे का विकत घेतली? आपली याला मान्यता आहे का? अशा पद्धतीची मान्यता त्यांना आपण दिली का? आजपर्यंत आरोग्य विभागाची जी परिस्थिती आहे. किंवा जी चालेलली आहे त्या विषयामध्ये आपण याच्यात सुधारणा करण्याकरीता स्वतःहुन काय प्रयोग केलेले आहेत. डासांचा विषय हा पहिला नाही. लक्षवेधी पहिल्यांदा आलेली नाही. सन्मा. विरोधी पक्षनेते श्री. चंद्रकांत वैती साहेबांनी गेल्यावर्षी या विषयाबद्दल लक्षवेधी आणली होती. त्यावरसुद्धा चर्चा झाली. आज परत सत्ताधरी पक्षाच्या लोकांनी लक्षवेधी आणलेली आहे. मग या शहरातील डासांचा जो त्रास आहे किंवा आरोग्याचा जो विषय आहे, तो किती कळकळीचा आहे. याबद्दल आपले स्वतःचे काय म्हणणे आहे? आपल्या भाषणामध्ये आण ते कधीच स्पष्ट करत नाही. साहेब, मला बोलावे लागेल. घनकचरा प्रकल्प आजपर्यंत तसाच आहे. सुरु करण्यात आलेला नाही. त्याला आपण कारणीभुत नाही का? जे काय चाललेले आहे. आपण या शहराचे आयुक्त आहात. त्याला आपण कारणीभुत नाही? फक्त अधिकाऱ्यांवरच आम्ही आपला रोष काढायचा? आमचे विरोधी पक्षनेते म्हणाले तसे अधिकारी तुमचे ऐकत नाहीत? या शहराच्या बाकीच्या सभासदांना मी माहिती देउ इच्छितो. २००७-०८ च्या अर्थसंकल्पाच्या बजेटमध्ये बारा कोटींची तरतुद २००८-०९ मध्ये सोळा कोटींची तरतुद मा. स्थायी समितीमध्ये परत दोन कोटी पंच्चाहत्तर लाखाची तरतुद त्यांनी वर्गीकरणाकरीता परत विषय आणला. आरोग्य विभागाला इतका जास्त पैसा देउनसुद्धा आजच्या तारखेत शहराची ही परिस्थिती आहे. जागोजागी कचरा पडलेला आहेञ ठेकेदारांची दादागिरी संपत नाही. मा. महापौर साहेब याचे उत्तर.......

**मा. महापौर :-**

आता बस झाले.

**जुबेर इनामदार :-**

सर्वांनाच बस झाले आहे. परिस्थिती इतकी गंभीर आहे की, सर्वांनाच बस झाले आहे. मा. महापौर साहेब, मुंबई महानगरपालिकेमध्ये आरोग्य विभागाला एक उपविधी आहे. त्याचे बायलॉज आहेत. ते आपल्याकडे का नाहीत? ते आजपर्यंत तयार करण्यात आलेले नाहीत का? केले नसतील तर तयार करुन घेण्यात यावेत.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपल्या इकडे १८०० रुपये बोनस दिला गेला. त्यातले दोनशे रुपये लेबर युनियनचे कापले गेले. प्रत्यक्षात कर्मचाऱ्यांना १६०० रुपये मिळाले. लेबर युनियन दोनशे रुपये कोणत्या नियमाने कापते? त्या युनियनच्या श्री. विवेक पंडीत यांना तुम्ही नोटीस काढा. लेबर युनियन दोन रुपयांच्या वर सभासद वर्गणी घेउ देत नाही. तुम्ही या मुद्दयावर खुलासा करा.

**नयना म्हात्रे :-**

माझ्या कामगारांना बोनस दिला नाही. तरीसुद्धा माझ्या कामगारांनी वॉर्ड साफ केला.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, हा विषय संपविण्याची एवढी घाई का?

**एस. ए. खान :-**

नेहमी नेहमी तीच लक्षवेधी येते. कचरा बरोबर उचलत नाही. औषध बरोबर येत नाही.

**चंदकांत म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, गेल्या कित्येक महिन्यांपासुन प्रभागामध्ये धूर फवारणी होत नाही. त्याच्याबद्दल मी प्रश्न उपस्थित केला होता. त्याचे आपण उत्तर दिलेले नाही. त्यांना मी सांगितले होते की, थोडक्यात माहिती द्या.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, गेल्या काही महिन्यांपासुन वारंवार आरोग्याची चर्चा होत आहे. मा. महासभेने स्पष्ट ठराव केला होता की, प्रत्येक कर्मचाऱ्याला एक मोबाईल द्यायचा. तरीही आपण डावलले गेले. मा. महासभेने हा ठराव केलेला की, पर्टिक्युलर कंपनीचे औषध घ्यावे. तरी तेही डावलले गेले. त्यानंतर दोन महिन्या अगोदर मा. महासभेने निर्णय घेतला होता की, शोकॉज नोटीस द्या. पुर्ण तपास करावा आणि मा. महासभेपुढे आपण रितसर अहवाल सादर करावा. तेही केले गेले नाही. आणि त्याच्यामध्ये दोषी सापडले आहेत. त्या संदर्भात सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटीलजी यांनी श्री. पानपट्टे यांचा निलंबनाचा ठराव मांडला, तो मी मान्य करत आहे. आता यापुढे जी औषधे घ्यायची आहेत. कृपया ठरावामध्ये जे नमुद केलेले आहे. त्याचप्रमाणे आपण ती औषधे घ्यावी. आपल्याला एखादी शंका असेल, तर ते परत मा. महासभेपुढे यावे. सन्मा. सदस्या सौ. नयना म्हात्रे यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे की, त्यांच्या वॉर्डमधील कमर्चारी कमी केले. तर ते का कमी केले याची तपासणी करा आणि ते कर्मचारी परत पुर्णतः करुन द्यावी. तसेच सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे की, १८०० रुपये बोनस द्यायचा आणि दोनशे रुपये युनियनने घ्यायचे. आपण कुठल्याही युनियनसाठी इकडे काम करत नाही. आणि जे मंजुर आहे, आपल्या करारामध्ये जे काही बोनस ठरलेले आहे. त्या सर्व कॉन्ट्रॅक्टरना तो बोनस द्यायला लावा. हा विषय वारंवार मा. महासभेत नको. ज्यावेळी आपण त्यांना बोनस देतो तो कर्मचाऱ्यांसाठी आहे. कुठल्याही कॉन्ट्रॅक्टर किंवा कुठल्याही युनियनसाठी आपण बोनस देत नाही. त्या संबंधित कॉन्ट्रॅक्टरला आपण तशी समज द्यावी. त्या सर्वांचे ताबडतोब ......

**मिलन म्हात्रे :-**

दुपारच्या कालावधीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बाकीचे कर्मचारी मारहाण करतात. त्याची पोलिस कम्प्लेंट का झाली नाही? जथ्थाने जाउन लोक मारतात. गार्डनमध्ये पाच-पाच, दहा-दहा कर्मचारी जाउन काम करणाऱ्या माणसांना मारतात. झाडांना पाणी मारणाऱ्या माणसांना जाउन मारतात. युनियन हे शिकवते का?

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, कुठे ना कुठे ही आपली सुद्धा जबाबदारी आहे. प्रशासनावर आपलासुद्धा कन्ट्रोल दिसत नाही. हे सभागृहाचे मत झालेले आहे. तर आपणही याच्यावर काळजी घ्यावी आणि त्याप्रमाणे पुढील योग्य निर्णय घ्यावे. विषय संपलेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आज तुम्ही खरोखरच चांगला निर्णय दिला. तुमचे माझ्या पक्षातर्फे अभिनंदन.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर सहेब, आरोग्याचा विषय चाललेला आहे. म्हणुन त्याला संलग्न असलेला आपला वृक्षप्राधिकरण विभाग आहे. आपले अधिकारी श्री. इरकर साहेब यांची तिकडे नियुक्ती करण्यांत आलेली आहे. त्यांनी आजपर्यत आपले कार्यालय कधीच सोडलेले नाही. आज उद्यान, मैदान, बगिचे यांची जी गत आहे. त्या अधिकाऱ्यांना सांगा की, आपले कार्यालय सोडा. त्यांना गाडी दिली आहे. त्यांना ऑफीस दिले आहे. त्यांनी कर्मचारी दिले आहेत. साहेब, पदोन्नतीच्या पद्धतीने तुम्ही त्यांची चौकशी करा. त्यांची अर्हता, त्यांचे क्वालिफिकेशन त्या कामाकरीता नाही. त्याच्यावर त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. मा. आयुक्त साहेब, मी तुमच्या कार्यालयामध्ये याबद्दल मोघमपणे चर्चा केली होती. आमच्या शहराचे उद्यान, मैदान हे आम्ही विकसित केलेले आहेत. साहेब, आम्ही सकाळी तिथे फिरता. आमचे सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील साहेब यांची सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये रोज भेट होते. तुमचे अधिकारी श्री. अजित पाटील तिकडे बसले ओहत, त्यांची भेट होत असते. परिस्थिती एवढी गंभीर आहे की, कर्मचारी काम करतात. अधिकारी बघायलासुद्धा नसतात की, काय काम चाललेले आहे? दिलेले काम झाले की नाही! आम्ही ठेका पद्धतीने मजुर घेतो. त्याचे चाळीस-चाळीस, पन्नास-पन्नास लाख रूपये वर्षाला चुकवतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांनी जी सुचना मांडली त्याचं आपण लक्षात घ्यावे. सचिव साहेब, दुसरा विषय घ्या.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब, आपण माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहेब, वृक्ष प्राधिकरण की जो बात चली है। पिछले वन विभाग की मिटिंग मे मा. आयुक्त साहब के सामने श्री. इरकर साहेब ने वादा किया था की, हम आपको काम करनेवाले आदमीयों की लिस्ट देंगे। ताकी नगरसेवक जान सके की, वहा पर काम कर रहे है। अभी तक वह हुआ नही है।

**मा. महापौर :-**

आजच त्यांना ती लिस्ट देण्यात यावी.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

प्रभागामध्ये औषध फवारणीचे काम बंद आहे. ते का बंद आहे त्याचे उत्तर द्यावे.

**मिलन पाटील :-**

२० तारखेला आपण जाहिर केलेले आहे की, मॅरेथॉन येथे भरणार आहे. तुमची मॅरेथॉन येथे होणार नाही. कारण स्टेडीयम मध्ये अजिबातसुद्धा काम झालेले नाही.

**मा. महापौर :-**

स्टेडीयम मध्ये मॅरेथॉन नाही आहे. स्टेडीयम आणि मॅरेथॉनचा काहीही संबंध नाही. आयुक्त साहेब ते ही काम आपण लवकरात लवकर करावे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, अम्हाला बोलायला देणार की नाही....

**अरुण कदम :-**

जी काय जाहिरात लावणार आहेत ती मराठीत असावी.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेब मराठीत आपण जाहिरात लावण्यात यावी. मला सर्वच भाषेवर प्रेम आहे, दुसरी गोष्ट ती जाहिरात आपल्या महापालिकेने लावलेली नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

बोलू द्या साहेब, प्रभागामध्ये औषध फवारणीचे काम बंद आहे. त्याला कारण काय त्याचा खुलासा करावा. किती महिन्यापासुन बंद आहे सांगून सुद्धा कंम्प्लेंट करून सुद्धा काही होत नाही. त्याचा ठेका बंद करण्यात यावा.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेबांना आता सांगितले आहे की आजच्या सभेमध्ये जेवढ्या कंम्प्लेंट आलेल्या आहेत....

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, मला सुद्धा यावर दोन शब्द बोलायचे आहेत, आपण आता बोललात की सर्व नगरसेवकांकडे त्या औषधांच्या बाटल्या दिलेल्या आहेत. त्या आम्ही घेणार सुद्धा नाही आहोत.

**उमा सपार :-**

आयुक्त साहेब, आमच्या नगरसेवकांकडे कुणाकडेच औषधे नाही आहेत.

**शरद पाटील :-**

दुसरी गोष्ट साहेब आपण कुठेही व्हिजीट करत फिरत असतात, आणि पानपट्टेसाहेबांना १२ दिवस अगोदर मी सांगितले होते की, साहेब मच्छर भरपुर झालेले आहे आपण आमच्या वॉर्डात या आलेले औषध आहे ते निष्कृष्ट दर्जाचे आहे ते बघुन घ्या कारण हे जे औषध आहे हे एकदम नित्कृष्ट दर्जाचे आहे. त्याच्यानंतर साहेब काही आले नाहीत. साहेब म्हणतात माझी एम.एम.आर.डी.ए. ला मिटींग होती माझी मंत्रालयात मिटींग होती. त्याच्यानंतर मी पत्र दिले त्याला झाले आठ दिवस त्या पत्राचे उत्तरही नाही आहे. आणि त्याच्यावर परत बघण्यासाठी यावे असे कुणाला वाटलेले नाही. तर हा किती निष्काळजी पणा चाललेला आहे. या शहरात डेंग्यु आहे, लिलावती हॉस्पीटलमध्ये एक पेशंट डेंग्युचा आहे आता तो जीवनमरण्याच्या पेचात पडलेला आहे. हे पण त्यांना सांगितले हे डॉक्टर तिथे जाउन आले की नाही हे मला माहिती नाही पण ह्याची तुम्ही काळजी घ्या आणि आपण स्वतः मनावर घ्या कारण आपल्याला आता ऑलराउंडर बनायचे आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, ते औषधाचे सर्व नगरसेवकांना एकदा प्रशिक्षण दिले ना तर बरे होईल.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेबांनी निर्णय दिलेला आहे की, जी मा. महासभेने ठरवले असेल तीच औषधे घ्यावी. बायर इंडीया घ्यायची तर बायर इंडीया घ्या आणि जर तशीच गरज पडली तर परत तो विषय आणा.

**शरद पाटील :-**

आपण जे डीझल देतो त्यांना औषध फवारणी साठी ते एक वॉर्ड पुर्ण होत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांनी अर्धा वॉर्ड केल्यानंतर.....

(सभागृहात गोंधळ)

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर साहेब, जो कर्मचारी काम करता है उसका दो रजिस्टर रहता है काम करता है उसका अलग रजिस्टर और पगार का अलग रजिस्टर और करोडो का भ्रष्टाचार का आरोप...

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेब, कुठलीही औषध घ्या पण पहिला डेमॉन्स्ट्रेशन घ्या.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, औषध फवारणीवर आता जो एवढा गोंधळ झाला जो नगरसेवक औषध फवारणीला जोडीला फिरतो त्या नगरसेवकाला प्रशिक्षण द्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६९, दि. १९/०६/२००८ व दि. ०१/०७/२००८ (दि. १९/०६/२००८ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभोंचे इतिवृत्तांत कायम करणे.

**प्रभात पाटील :-**

चायनिज ची गाडी नाही आहे. चायनिजचे हॉटेल आहे. आणि मा. महापौरांना मी तेव्हा आव्हान केल होत की मी तुमचे विशेष कौतुक करेन, तुमचे आभार मानेन, धन्यवाद म्हणेन मी तुमचे, सत्कार करेन सन्मान करेन ते जर चायनिज तेथुन हटले तर. प्रोसिडींग कधीचे आहे किती महिने झाले त्या गोष्टीला.

**मा. महापौर :-**

नवघर शाळेचे म्हणता का तुम्ही?

**प्रभात पाटील :-**

हा नवघर शाळा. मला त्याची कल्पना आहे. ठिक आहे आयुक्त साहेबांनी त्याचे काम केलेले आहे. आता तुम्ही जे त्याचे बॉन्ड्रीचे काम करायला घेता माझा त्याला पुर्ण पाठिंबा आहे. जयंत दादांचे आणि माझेही त्यांच्याशी बोलणे झाले. परंतु जर ते चायनीज हटले नाही तर तुम्हाला मी त्या बॉन्ड्रीला हात लावायला देणार नाही. पहिला चायनिज हटवायचे तेथून.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेब आज सभा संपल्यानंतर किंवा उद्या ते चायनिज तेथून काढून घ्या.

**प्रभात पाटील :-**

आपण आपल्या नवघर शाळेसाठी दोन गार्ड ठेवले आहेत. पण त्यांचा काही उपयोग नाही. त्या चायनीज च्या मागे दारू प्यायला बसतात. आणि तेथे मुतारी सुद्धा करून ठेवली आहे. सकाळी साडे सात ते आठ एक गुटखेवाला एवढ्या एवढ्याशा पुड्या घेउन गुटखा नाही पण मी गुटखा म्हणते त्याच्यामध्ये काय असते त्याची तुम्ही चौकशी करा. सकाळी एवढ्या पुड्या घेउन माणूस सरळ विक्री करायला तेथे बसलेला असतो. म्हणजे आपण त्यांना चायनीजचा परवाना द्यायचा झुणका भाकर खाली दारू चा परवाना दिला, तिथे मुतारी बनवण्याचा परवाना दिला आणि आता परत चरस आणि गांजाचा सुद्धा परवाना दिलेला आहे.

**मा. महापौर :-**

आजच किंवा उद्या सकाळी काढण्यात येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

चार नंबर वरती बघा आपण वॉटर टेंडर म्हटलेय, ते वॉटर टेंडर आहे की फायर टेंडर आहे.

**नगरसचिव :-**

फायर टेंडर.

**प्रफुल्ल पाटील :-**

आणि त्याच्यामध्ये आम्ही एक सुचना मांडली होती, वरील प्रमाणे साहित्य खरेदी केल्यानंतर त्याची हाताळणी योग्य रितीने होण्यासाठी आवश्यक तांत्रिक कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी. आणि शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर नेमणूक करण्याकरिता उपमुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर कार्यरत असलेले अधिकारी यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा अशी सुचना मांडली होती. तर तो प्रस्ताव शासनाकडे का पाठवला नाही? याच उत्तर द्या. हा प्रस्ताव पाठविण्यात काही अडचणी आहेत का?

**मा. आयुक्त :-**

माहिती घेवून आपल्याला सांगतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

लगेच सांगणार का? ठिक आहे. तोंडी माहिती नाही. कारण मगाशी जो ठराव झाला की उंदरांची औषध मारण्याचा ठराव जर माणसांनी केला तरच तुम्ही तो मान्य करणार असे आहे का?

**जयंत पाटील :-**

दि. १९/०६/२००८, दि. ०१/०७/२००८ व दि. ०१/०७/२००८ (दि. १९/०६/२००८ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**भगवती शर्मा :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ६९ :-**

प्रकरण क्र. ६९, दि. १९/०६/२००८ व दि. ०१/०७/२००८ (दि. १९/०६/२००८ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभोंचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ६२ :-**

दि. १९/०६/२००८, दि. ०१/०७/२००८ व दि. ०१/०७/२००८ (दि. १९/०६/२००८ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

खतगांवकर साहेब तो शासनाला आपण प्रस्ताव पाठवलेला आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब हा प्रस्ताव आम्ही तयार केलेला आहे. आणि कालसुद्धा आमची चर्चा झाली की, तो तपासुन साहेबांकडे दाखवून आम्ही साहेबांकडे सादर करणार आहोत.

**मा. महापौर :-**

या आठवड्यात आपण पाठवून द्या.

**जयंत पाटील :-**

या देशाच्या माजी पौलादी महिला मा. इंदिराजी गांधी यांची आज जयंती आहे. या सभागृहाच्या वतीने त्यांच्या स्मृतीस आपण सर्वांनी अभिवादन करावे आणि त्यांचे अभिनंदन करावे. असा मी ठराव मांडत आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मेरा अनुमोदन है।

**जयंत पाटील :-**

त्याचप्रमाणे दि. ११/११/२००८ रोजी अशी आपल्या सभागृहामध्ये प्रथा आहे की, नवी नियुक्ती झाल्यानंतर त्या पदाधिकाऱ्याचे अभिनंदन करायचे असते. करिता मॉरस रॉड्रीक्स यांचे स्थायी समिती सभापती पदी तिसऱ्यांदा नियुक्ती झाल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करत आहे.

**नयना म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब पुढील विषय घ्या.

**अनिल सावंत :-**

दि. ०२/१०/२००८ रोजी चंद्रयान हे अवकाशात सोडण्यात आले व दि. १४/११/२००८ रोजी चंद्रावर तिरंगा फडकवणारे इंडीयन स्पेस ऑर्गनायझेशनचे जे प्रमुख डॉ. माधवन नायर व त्यांचे सर्व सहकारी शास्त्रज्ञ ह्यांचे हार्दिक अभिनंदन करणारा ठराव मी मांडत आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मेरा अनुमोदन है।

**अनिल सावंत :-**

संगिताचार्य पं. भिमसेन जोशी ज्यांनी आपले शास्त्रीय संगित घराघरात पोहचवले त्यांना भारताचा सर्वोत्कृष्ठ पुरस्कार भारतरत्न मिळाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करणारा ठराव मी मांडत आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मेरा अनुमोदन है।

**अभिनंदन ठराव ६१ :-**

दि. ०२/१०/२००८ रोजी चंद्रयान हे अवकाशात सोडण्यात आले व दि. १४/११/२००८ रोजी चंद्रावर तिरंगा फडकवणारे इंडीयन स्पेस ऑर्गनायझेशनचे जे प्रमुख डॉ. माधवन नायर व त्यांचे सर्व सहकारी शास्त्रज्ञ ह्यांचे हार्दिक अभिनंदन करत आहे. तसेच संगिताचार्य पं. भिमसेन जोशी ज्यांनी आपले शास्त्रीय संगित घराघरात पोहचवले त्यांना भारताचा सर्वोत्कृष्ठ पुरस्कार भारतरत्न मिळाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करणारा ठराव मी मांडत आहे. तसेच या देशाच्या माजी पौलादी महिला मा. इंदिराजी गांधी यांची आज

जयंती आहे. या सभागृहाच्या वतीने त्यांच्या स्मृतीस आपण सर्वांनी अभिवादन करावे तसेच त्यांचा अभिनंदनाचा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. राजेंद्र जैन**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७०, नामकरण प्रस्तावांना मान्यता देणे. (मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेली प्रकरणे.)

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब.....

**भगवती शर्मा :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते, चौक, इमारती व वास्तू यांचे खालीलप्रमाणे नामकरण करण्याबाबत प्रस्ताव व सुचना मा. महासभेपुढे आल्या आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित नांव |
|---|---|---|
| १ | घोडबंदर रेतीबंदर ते एम. टी. डी. सी. कडे जाणारा रस्ता | नेहरू नगर पिरपेठ्ठे शॉ दर्गा मार्ग |
| २ | मिरारोड भागातील रस्ता (शांतीनगर) | श्री. जयगुरू जम्मेश्वर मार्ग |
| ३ | पेणकरपाडा सुकाळ तलाव | साईदत्त तलाव |
| ४ | श्री. महाराज अग्रसेन मार्गावरील चौक | स्वातंत्र्यसेनानी दामोदर भाई बंगेरा चौक |
| ५ | संगीता शॉपिग सेंटर समोरील महाराणा प्रताप मार्गावरील चौक | न्यायाधिश के. सदानंद हेगडे चौक |
| ६ | साई कॉम्प्लेक्स, मिरारोड (पूर्व) रस्ता | पी. जी. व्होरा रोड |
| ७ | जनतानगर मुख्य रस्त्यावरील प्रवेशद्वार | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार |
| ८ | जनतानगर साईकृपा कॉम्पलेक्स उदयान | सावित्रीबाई फुले उदयान |
| ९ | आरक्षण क्र. ९६ क्रिडांगण | शहिद भगतसिंग क्रिडांगण |
| १० | भाईंदर (पू) नवघर शाळा इमारत | स्वातंत्र्य सैनिक कै. रामचंद्र पांडूरंग पाटील इमारत |
| ११ | उत्तन नाका चौक | श्री. बाप्टीष्टा चौक |
| १२ | भाईंदर (पू) इंद्रलोक १८.०० मीटर रस्ता | संत शिरोमणी नामदेव महाराज मार्ग |
| १३ | राधास्वामी सत्संग मार्ग, जनाभाउु रकवी मार्ग मार्ग व सुभाषचंद्र बोस मैदान चौक | राज राजेश्वर भगवान परशुराम चौक |
| १४ | मुर्धा बाल उदयान | ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले |
| १५ | मुर्धा मनपा शाळा क्र. २२,२३ | साने गुरूजी भवन |
| १६ | भाईंदर (प) गांधीनगरकडे जाणारा चौक | मान्यवर काशिरामजी चौक |
| १७ | भाईंदर (प) डॉ. आंबेडकर भवन मधील वाचनालय | डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन वाचनालय |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन मधील अभ्यासिका | सर डॉ. विश्वेश्वरय्या अभ्यासिका |
| १९ | राई व्यायाम शाळा | छत्रपती शिवाजी महाराज व्यायामशाळा |
| २० | भाईंदर (प) सालासर प्लाझा (भट्ट सोसायटी) ते तपस्या बिल्डींग रस्ता | डॉ. दिगंबर केशव कुलकर्णी मार्ग |
| २१ | भाईंदर (प) भिमनाथ बिल्डींग (सुदामानगर पाण्याची टाकी) ते देवदर्शन बिल्डींग | सौ. मायरा मेंडोन्सा मार्ग |
| २२ | भाईंदर (प) बद्रीनाथ बिल्डींग ते बाबुलनाथ | फुटरमल पुखराज परमार मार्ग |
| २३ | मिरा एम.आय.डी.सी. ते रॉयल कॉलेज रस्ता | केशव हरि पदाजी भोईर मार्ग |
| २४ | मिरा हनुमान मंदिर रंगमंच | हनुमान मंदिर रंगमंच |
| २५ | एम.आय.डी.सी. जलकुंभ | स्वातंत्र्य सैनिक कै. मोतीराम कमळया जावर जलकुंभ |
| २६ | मिरागांव सातकरी तलाव | तुळशी तलाव |

| | | |
|---|---|---|
| २७ | काशिगांव प्रवेशद्वार | स्व.सौ. रमाबाई भीमराव आंबेडकर प्रवेशद्वार |
| २८ | खारीगांव मनपा शाळा क्र. ६ मधील हॉल | श्री गांवदेवी हॉल |
| २९ | अमरप्रेम बिल्डींग पासून स्वामी नारायण बिल्डींग पर्यत | कै. अनंत विठ्ठल पाटील (राजा) मार्ग |
| ३० | हावलू निवास ते तुलसी निवास पर्यत | जानकाई मंदिर मार्ग |
| ३१ | गांवदेवी मंदिर मार्ग, नवघर स्मशान मार्ग, नवघर गावात जाणारा मार्ग, लोढा कॉम्पलेक्स मार्ग | छत्रपती शिवाजी महाराज चौक |
| ३२ | भाईंदर (प) व्यंकटेश्वर पार्क उदयान | श्री. पीरबाबा रामदेव उदयान |
| ३३ | नवघर चाळघर परिसर (साईचरण बंगला) ते नवघर उघाडी पर्यतचा रस्ता | श्री. चाळघर मार्ग |
| ३४ | मिरारोड निलम पार्क, नयानगर चौक | बज्मे रजा चौक |
| ३५ | मिरारोड वाचनालय | राष्ट्रपिता महात्मा गांधी वाचनालय |
| ३६ | मिरारोड हॉस्पीटल इमारत | स्व. इंदिरा गांधी रूग्णालय |
| ३७ | मिरारोड रक्तपेढी | भारतरत्न स्व. राजीव गांधी रक्तपेढी |
| ३८ | शांतीनगर सेक्टर ४ मैदान | पंडीत जवाहरलाल नेहरू क्रिडांगण |
| ३९ | मिरारोड अयप्पा मंदिर ते हॉस्टेल पर्यंत | बाप्पा सिताराम मार्ग |
| ४० | शांतीविहार इमारती बाजुचा रस्ता | अयप्पा मार्ग |
| ४१ | शांतीनगर पोलिस चौकी समोरील चौक | शामळजी अजमेरा चौक |
| ४२ | शांतीपार्क, सेंट झेविअर्स समोरील चौक | श्री. गोवर्धन चौक |
| ४३ | उड्डाणपूल चौक पासून दहीसरकडे जाणारा १८.०० मीटर रस्ता | श्री. आचार्य श्री. महाप्रज्ञ मार्ग |
| ४४ | भाईंदर (प) नियोजित हॉस्पीटल इमारत | भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी हॉस्पीटल |
| ४६ | मिरारोड पूनम नगर नर्सरी | राणी लक्ष्मीबाई नर्सरी |
| ४६ | मुर्धा स्मशानभूमी | मुक्तीधाम |
| ४७ | मुर्धा बाल दफनभूमी | अमरधाम |
| ४८ | भाईदर (प) स्व. तेरेसा जॉन मेन्डोसा चौक समोर भैरव सृष्टी व जानकी हेरीटेज इमारती मधून पुढे जाणारा रस्ता | हाजी गुलाब लाडजी शेख मार्ग |
| ४९ | भाईंदर (प) विनायक नगर समाजमंदिर | श्री. भालचंद्र साधुराम अग्रवाल भवन |
| ५० | शांतीनगर ए - ८ व ९ ते स्मशानरोड | वैकुंठधाम मार्ग |
| ५१ | शांतीनगर सेक्टर ४ व ५ मधील रस्ता ते सृष्टी सुर्या शॉपिंग सेंटर समोरील टॉवर रस्ता | लायन्स क्लब मिरारोड मार्ग |
| ५२ | सृष्टी सेक्टर - ३ समोरील चौक | नवयुवान चौक |
| ५३ | सृष्टी सुर्या शॉपिंग सेंटर समोरील चौक | सृष्टी चौक |
| ५४ | शांतीनगर से. ८ सी २० समोरील मैदान | गणेश मैदान |
| ५५ | शांतीनगर से. ८ सी ३९ समोरील उदयान | चाचा नेहरू बालोदयान |
| ५६ | शांतीनगर से. ८ सी समोरील उदयान | मदर टेरेसा नाना नानी पार्क |
| ५७ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग ते विनय नगर पर्यतचा रस्ता | विनय नगर मार्ग |
| ५८ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील संघवी नगर चौक | भगवान गौतम बौध्द चौक |
| ५९ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २१७,२३६ समोरील चौक | सेव्हन स्केअर चौक |
| ६० | भाईंदर (प) शंभू सदन ते क्लींट टॉवर पर्यत रस्ता | जिनदत कुसल सुरीजी मार्ग |
| ६१ | नवघर गांव उदयान | स्वातंत्र्य सैनिक कै. शंकर विठ्ठल पाटील उदयान |
| ६२ | पेणकरपाडा सुकाळ तलाव मार्ग | श्री. दत्त मंदिर मार्ग |
| ६३ | पेणकरपाडा मनपा शाळा समोरील सभागृह | स्व.सौ. गुलाब रामजी घरत सभागृह |
| ६४ | भाईंदर (प) उपकर कार्यालय | डॉ.श्री. बळीराम हेडगेवार भवन |
| ६५ | नवघर तलाव येथून संत निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज संतसंघ भवन मार्ग | संत निरंकारी बाबा हरदेवसिंहजी मार्ग |
| ६६ | शांती पार्क सेंट जोसेफ शाळे समोरील उदयान | बालगोपाळ उदयान |
| ६७ | शांतीपार्क एचडीएफसी बँक ते आरएनए कोर्ट यार्ड, | साईबाबा मार्ग |

| | | |
|---|---|---|
| | सेक्टर ९,१० रस्ता | |
| ६८ | मिरारोड शितल नगर चौक | सेंट जोसेफ चौक |
| ६९ | मिरारोड बरखा हॉटेल ते सेंट थॉमर्स चर्च रस्ता | सेंट थॉमस मार्ग |
| ७० | मिरारोड सेंटर प्लाझा हॉटेल ते क्लब ९ पर्यत रस्ता | ब्रम्हकुमारी मार्ग |
| ७१ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील शिवार गार्डन समोरील चौक | आचार्य श्री तुलसी चौक |
| ७२ | भाईंदर (प) सेस कार्यालयासमोरील चौक | आचार्य श्री. महाप्रज्ञ चौक |

यापूर्वी ज्या रस्त्यांची / उदयाने, चौक व इतर वास्तूची नामकरणे झाली आहेत अशी नामकरणे वगळून मा. सदस्यांनी सुचविलेल्या वरील नामकरण प्रस्तावांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची ''ड'' मधील प्रकरण अकरा (२) (१) (अ) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**मिलन पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

महापौर साहेब माझी एक सुचना आहे की, झनकारच्या डाव्या बाजुचा रस्ता विनय नगर आहे त्याला विनय नगर असे नाव देण्यात यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब आमची सुचना आहे, शिवार गार्डन टाउन पार्कमध्ये शिवार गार्डन आहे त्याला मा. खासदार स्वर्गिय प्रमोद महाजन यांचे नाव देण्यात यावे.

**मिलन म्हात्रे :-**

शिवार गार्डनचा अगोदर ठराव झालेला आहे प्रमोद महाजनचे नाव चौपाटीला दिले आहे अजुन किती ठिकाणी देणार त्याचे नाव त्याचे ब्रम्हदेव उद्यान असे झालेले आहे. भाईंदरला ब्रम्हदेवापेक्षा प्रमोद महाजन मोठे नाहीत. आमचा विरोध आहे.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

भाईंदर पश्चिम येथे जे नियोजित हॉस्पीटल बांधणार आहेत. त्याला भारतरत्न पं. भिमसेन जोशी रूग्णालय असे नाव द्यायचे आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मुर्ध्याला वॉर्ड नं. २७ चे जे स्मशान आहे त्याला मुक्तीधाम असे नाव द्यावे आणि राई गावात आहे त्याला अमर धाम असे नाव द्यावे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, इथे नामकरणाची अशी भावगर्दी चाललेली आहे. मला आनंद आहे. पण तुमच्या निदर्शनास आणते. मागच्या टर्ममध्ये तुम्ही नगरसेवक होते त्यावेळेला दि. ०६/१२/२००६ च्या महासभेत सुचक श्री. हॅरल बोर्जीस आणि अनुमोदन श्री. जयंत पाटील यांचा ठराव आहे. प्रकरण क्र. ९२ आणि ठराव क्र. ६९ ने या मुख्य इमारतीला स्वर्गिय इंदिरा गांधी भवन असे नाव देण्याचा प्रस्ताव माझ्याकडे आहे, नोंद आहे. आणि आज श्रीम. इंदिरा गांधी यांची जयंती आहे. या प्रस्तावाचे काय झाले? आज आपण हे नाव द्या, ते नाव द्या अशी घाईगर्दी करतो. तुमच्या मुख्य रस्त्यावर आजही तुमचे नोटीफिकेशन बघा. तुमचे महापालिकेचे सगळे कागदपत्र बघा, मुख्य इमारत का? तुम्ही मुख्य इमारतीला नाव ठेवले नाही? तुमच्या कागदपत्री हा व्यवहार का होत नाही? आपण नावे देण्याचे प्रस्ताव घाईगर्दीने आणता. पण ठरावांचे काय? त्यांची अंमलबजावणी होत नाही. मी वारंवार या विषयावर बोलते.

**आसिफ शेख :-**

मी सहा महिन्यापुर्वी एक पत्र दिले होते. माझ्या प्रभागामध्ये एक प्रभाग कार्यालय आहे. त्या प्रभाग कार्यालयाला स्वातंत्र्यसैनिक भालचंद्र अनंत रकवी यांचे नामकरण करावे असे पत्र दिले आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, हे अधिकारी आहेत त्यांना भाईंदरचे काही देणेघेणे नाही. आज भाईंदर वेस्टमध्ये एक स्वातत्र्य सैनिक आहेत. त्या स्वातंत्र्यसैनिकाची तुम्हाला आठवण नाही? तुम्हाला त्यांची नावे देता येत नाहीत? बाहेरच्यांची सगळ्यांची नावे तुम्ही देता. त्यांचे नाव तुम्हाला देता येत नाही. तुम्ही प्रभाग समिती दोन सांगता आपण बाप्तीस्टा हे नाव आपण चौकाला दिलेले आहे. त्यांचे वेस्टला उत्तनला काम आहे. आणि आपण ते दिलेले आहे. आपण का दिले नाही? ते भाईंदर वेस्टचे स्वातंत्र्यसैनिक आहेत. आम्ही अधिकाऱ्यांना काही माहिती नाही. तुम्ही झोपले आहात काय? इतर लोकांची नावे तुम्हाला माहिती पडतात. स्वातंत्र्य सैनिकाचे नाव माहिती नाही. ते वारल्यानंतर आपल्या नगरपालिकेतर्फे कोण एक हार घेउन गेले नाहीत. ही शरमेची गोष्ट आहे. आपले स्वातंत्र्यसैनिक आहेत. इतर प्रत्येक वेळेला श्री. शिंदे साहेब होते. त्यांनी मानसन्मान केलेला आहे. पण ते वारल्यानंतर तुमच्या डोळ्यावर झापड आली होती. तुम्हाला समजत नव्हते की, आपण एक हार

द्यावा. स्वातंत्र्यसैनिक कशाला बोलतात? तुम्ही काय घालवले आहे? तुम्ही पालघरमध्ये घालवले. तुम्हला त्यांची काय आठवण आहे. या भाईंदरशी तुमचे काय देणेघेणे आहे. तुम्हाला भाईंदरच्या लोकांची अजिबात जाण नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही दुसरे नाव सुचवा.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, मला वाटते एक वर्ष झाले मी पत्र दिले आहे. त्याचे निधन झाले. ताबडतोब दुसऱ्या दिवशी मी पत्र दिले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, खाली जो आंबेडकरांचा पुतळा आहे. त्याठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरातील सर्व स्वातंत्र्यसैनिकांची नावे आणि एक त्याचे प्रतिक म्हणून हातात मशाल घेतलेला पुतळा असावा असा ठराव पास झाला आहे. त्याला जवळजवळ दिड दोन वर्षे होत आली आहेत. पण अजुनपर्यंत स्वातंत्र्यसैनिकांची नावे लावण्याचे काम झालेले नाही.

**प्रशांत पालांडे :-**

जांगिड सर्कल, मिरा रोड पुर्व, प्रभाग क्र. ६२ या चौकास स्व. मासाहेब मिनाताई ठाकरे चौक असे नामकरण करावे अशी मी सुचना मांडत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये प्रत्येक रस्त्याला किंवा चौकाला रितसर प्रस्ताव आणून नावे देतो. पण आमच्या इंद्रलोक विभागमध्ये त्या बिल्डरने त्याच्या आईचे नाव स्वतंत्रपणे टाकले आहे.

**मा. महापौर :-**

त्याने काय केले त्याला संबंध नाही आपण सांगा.

**लक्ष्मण जंगम :-**

साहेब, संबंधित विषय आहे म्हणून बोलतो. तिथे प्रत्येक रस्त्याला त्याने स्वतंत्र आईचे नाव, बहीणीचे नाव, बापाचे नाव टाकून मोकळा झालेला आहे.

**मा. महापौर :-**

कोणीही खाजगी नाव दिलेले असेल त्याला महत्व नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

ते काढून टाका ना.

**मा. महापौर :-**

काढणार.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, या ठरावाला एक सुचना आहे. शांतीनगर सृष्टीपर्यंतचा जो रोड आहे, शॉपिंग सेंटर पर्यंत सुर्या शॉपिंग सेंटर चौक, सृष्टी चौक आणि सेक्टर ३ नरिमन चौक आणि सेक्टर - ८ गणेश मैदान.

**मा. महापौर :-**

सुचनांसह ठराव मंजुर.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, नावे डबल होतील याची काळजी घ्या.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर साहेब, आपल्याला हे ठराव रितसर मा. स्थायी समितीसमोर सादर करावे लागतील की नाही, की डायरेक्ट मा. महासभेतच मान्यता देणार आहोत. कारण काही रस्त्यांची नावे डबल झालेली आहेत. पुर्वी जी नावे दिली आहेत, ती नावे बदलता कामा नये. आणि याला मा. स्थायी समितीसमोर न्यावे लागेल.

**मा. महापौर :-**

मागची नावे कुठलीही बदलली जाणार नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

तो ठराव जरा वाचून दाखवा.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण रूलिंग दिली की, मागची नावे बदलली जाणार नाहीत. पण मागची नावे बदलली आहेत त्याचे आपण काय करणार?

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, याच्यामध्ये आपण एक सुचना घ्यावी मिरा रोडमध्ये पुनम सागर नर्सरी विकसीत करण्यात आलेली आहे. त्याचेही नामकरण बाकी आहे. या ठरावामध्ये त्याची सुचना आपण समाविष्ट करावी. राणी लक्ष्मीबाई नर्सरी या नावाने मी सुचना करत आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, सर्व नगरसेवकांना या देशातील नेत्यांची नावे देण्याबद्दल जो आदर आहे. आणि ते देत आहेत त्याबद्दल मला काही दुःख नाही उलट आनंदाची गोष्ट आहे. परंतु नावे दिल्यानंतर आपण रस्त्याला जे बोर्ड लावता त्या बोर्डाची आज हालत काय आहे. आपण बघुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांनी जी सुचना मांडली त्याला माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

सर्व सिमेंटचे बोर्ड तुटलेले आहेत. कुठेही दिसत नाहीत. त्याच्यावर कोणी पोस्टर लावलेले आहेत. कुठलीही एखादी संस्था असेल, मंडळ असेल त्याचा बोर्ड आपल्यापेक्षा पुढे म्हणजे त्या रस्त्याला मंडळाचे नाव आहे की, आपण दिलेले नाव आहे. हे ही सिद्ध होत नाही. गोडदेव स्मशान रोडला आपण स्वातंत्र्यसैनिक गोविंद उंदराजी पाटील हे नाव दिलेले आहे पण आजसुद्धा स्मशानरोड असा त्याला उल्लेख होत आहे. याचे कारण असे आहे की, आपला स्पष्ट तिथे कुठे उल्लेख नाही. आपण जरासे दोन फुटाचे बोर्ड लावतो. ते तुटलेले आहेत. दिसतही नाहीत. यासंबंधी आपण चांगला निर्णय घ्या.....

**मा. महापौर :-**

साहेब, आपण चांगल्या बोर्डची डिझाईन मा. महासभेपुढे मागवावी आणि त्याचे कायमस्वरूपी राहिल अशी आपण नोंद घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

शहरामध्ये बऱ्याचशा नगरसेवकांनी काही नामकरणे केली आहेत. तिकडे जे महापुरूष, संत किंवा देव यांच्या नावा व्यतिरिक्त कोणाचीही नावे नसावीत आणि ही नावे आहेत ते बोर्ड तुम्ही काढा कारण हे पंडाल अमुक तमुक याच्यावरून गावामध्ये दंगली होतात कारण ही तक्रार केलेली आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. आयुक्त महोदय, यापुढे जी नावे दिलेली आहेत. त्या नावाचाच विनियोग या महानगरपालिकेला पत्रव्यवहार झाला पाहिजे. तरच लोकांना कळेल.

**मा. महापौर :-**

सचिव महोदय दुसरा विषय घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

एक मिनिट, मला जरा महत्वाची सुचना मांडायची आहे. आपण नगरसेवक इतक्या मोठ्या मनाने तिकडच्या लोकांची मागणी असते म्हणून एखाद्या रस्त्याचे नामकरण करावे म्हणून प्रस्ताव आणतात. आपणसुद्धा मा. महासभा मोठ्या मनाने त्याला मंजुरी देतो. प्रत्यक्षात त्याठिकाणी त्या नावाचा बोर्ड लावला जातो की नाही हे माहिती नाही. परंतु आपल्या महानगरपालिकेच्या रेकॉर्डवर ती नावे आणायची. म्हणजे नेमके काय करायचे, तर आपण जी घरपट्टी कराची बिल आकारणी करतो. त्याच्यावर आपण ती नावे न टाकता जुनी नावे टाकतो. तर मा. आयुक्त साहेब, आपण कर विभागाला असे आदेश द्यावे की, याच्यापुढे तुम्हाला रेफरस्नसाठी पाहिजे असेल तर जे नविन नाव असेल आणि कंसामध्ये जुने अमुक अमुक नाव असे घरपट्टी कराच्या पावतीवर जर दिले तर ते जे घरपट्टी भरणारे लोक आहेत ते सुद्धा त्यांच्या करस्पॉन्डन्समध्ये प्रत्येकवेळी त्या रस्त्याचा उल्लेख करतील. अशा प्रकारे मग ती प्रसिद्धी होईल.

**मा. महापौर :-**

सन्मा. श्री. अजित पाटील जी आपण यादी मागवून घ्यावी आणि त्याप्रमाणे ॲड्रेसमध्ये दुरूस्ती करण्यात यावी. सचिव साहेब दुसरा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ७० :-**

नामकरण प्रस्तावांना मान्यता देणे. (मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेली प्रकरणे.)

**ठराव क्र. ६३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते, चौक, इमारती व वास्तू यांचे खालीलप्रमाणे नामकरण करण्याबाबत प्रस्ताव व सुचना मा. महासभेपुढे आल्या आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित नांव |
|---|---|---|
| १ | घोडबंदर रेतीबंदर ते एम. टी. डी. सी. कडे जाणारा रस्ता | नेहरू नगर पिरपेट्ठे शॉ दर्गा मार्ग |
| २ | मिरारोड भागातील रस्ता (शांतीनगर) | श्री. जयगुरू जम्मेश्वर मार्ग |
| ३ | पेणकरपाडा सुकाळ तलाव | साईदत्त तलाव |

| | | |
|---|---|---|
| ४ | श्री. महाराज अग्रसेन मार्गावरील चौक | स्वातंत्र्यसेनानी दामोदर भाई बंगेरा चौक |
| ५ | संगीता शॉपिग सेंटर समोरील महाराणा प्रताप मार्गावरील चौक | न्यायाधिश के. सदानंद हेगडे चौक |
| ६ | साई कॉम्प्लेक्स, मिरारोड (पूर्व) रस्ता | पी. जी. व्होरा रोड |
| ७ | जनतानगर मुख्य रस्त्यावरील प्रवेशद्वार | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार |
| ८ | जनतानगर साईकृपा कॉम्पलेक्स उदयान | सावित्रीबाई फुले उदयान |
| ९ | आरक्षण क्र. ९६ क्रिडांगण | शहिद भगतसिंग क्रिडांगण |
| १० | भाईंदर (पू) नवघर शाळा इमारत | स्वातंत्र्य सैनिक कै. रामचंद्र पांडूरंग पाटील इमारत |
| ११ | उत्तन नाका चौक | श्री. बाप्टीष्टा चौक |
| १२ | भाईंदर (पू) इंद्रलोक १८.०० मीटर रस्ता | संत शिरोमणी नामदेव महाराज मार्ग |
| १३ | राधास्वामी सत्संग मार्ग, जनाभाउु रकवी मार्ग मार्ग व सुभाषचंद्र बोस मैदान चौक | राज राजेश्वर भगवान परशुराम चौक |
| १४ | मुर्धा बाल उदयान | ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले |
| १५ | मुर्धा मनपा शाळा क्र. २२,२३ | साने गुरूजी भवन |
| १६ | भाईंदर (प) गांधीनगरकडे जाणारा चौक | मान्यवर काशिरामजी चौक |
| १७ | भाईंदर (प) डॉ. आंबेडकर भवन मधील वाचनालय | डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन वाचनालय |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन मधील अभ्यासिका | सर डॉ. विश्वेश्वरय्या अभ्यासिका |
| १९ | राई व्यायाम शाळा | छत्रपती शिवाजी महाराज व्यायामशाळा |
| २० | भाईंदर (प) सालासर प्लाझा (भट्ट सोसायटी) ते तपस्या बिल्डींग रस्ता | डॉ. दिगंबर केशव कुलकर्णी मार्ग |
| २१ | भाईंदर (प) भिमनाथ बिल्डींग (सुदामानगर पाण्याची टाकी) ते देवदर्शन बिल्डींग | सौ. मायरा मेंडोन्सा मार्ग |
| २२ | भाईंदर (प) बद्रीनाथ बिल्डींग ते बाबुलनाथ | फुटरमल पुखराज परमार मार्ग |
| २३ | मिरा एम.आय.डी.सी. ते रॉयल कॉलेज रस्ता | केशव हरि पदाजी भोईर मार्ग |
| २४ | मिरा हनुमान मंदिर रंगमंच | हनुमान मंदिर रंगमंच |
| २५ | एम.आय.डी.सी. जलकुंभ | स्वातंत्र्य सैनिक कै. मोतीराम कमळया जावर जलकुंभ |
| २६ | मिरागांव सातकरी तलाव | तुळशी तलाव |
| २७ | काशिगांव प्रवेशद्वार | स्व.सौ. रमाबाई भीमराव आंबेडकर प्रवेशद्वार |
| २८ | खारीगांव मनपा शाळा क्र. ६ मधील हॉल | श्री गांवदेवी हॉल |
| २९ | अमरप्रेम बिल्डींग पासून स्वामी नारायण बिल्डींग पर्यत | कै. अनंत विठ्ठल पाटील (राजा) मार्ग |
| ३० | हावलू निवास ते तुलसी निवास पर्यत | जानकाई मंदिर मार्ग |
| ३१ | गांवदेवी मंदिर मार्ग, नवघर स्मशान मार्ग, नवघर गावात जाणारा मार्ग, लोढा कॉम्पलेक्स मार्ग | छत्रपती शिवाजी महाराज चौक |
| ३२ | भाईंदर (प) व्यंकटेश्वर पार्क उदयान | श्री. पीरबाबा रामदेव उदयान |
| ३३ | नवघर चाळघर परिसर (साईचरण बंगला) ते नवघर उघाडी पर्यतचा रस्ता | श्री. चाळघर मार्ग |
| ३४ | मिरारोड निलम पार्क, नयानगर चौक | बज्मे रजा चौक |
| ३५ | मिरारोड वाचनालय | राष्ट्रपिता महात्मा गांधी वाचनालय |
| ३६ | मिरारोड हॉस्पीटल इमारत | स्व. इंदिरा गांधी रूग्णालय |
| ३७ | मिरारोड रक्तपेढी | भारतरत्न स्व. राजीव गांधी रक्तपेढी |
| ३८ | शांतीनगर सेक्टर ४ मैदान | पंडीत जवाहरलाल नेहरू क्रिडांगण |
| ३९ | मिरारोड अयप्पा मंदिर ते हॉस्टेल पर्यंत | बाप्पा सिताराम मार्ग |
| ४० | शांतीविहार इमारती बाजुचा रस्ता | अयप्पा मार्ग |
| ४१ | शांतीनगर पोलिस चौकी समोरील चौक | शामळजी अजमेरा चौक |
| ४२ | शांतीपार्क, सेंट झेविअर्स समोरील चौक | श्री. गोवर्धन चौक |
| ४३ | उड्डाणपूल चौक पासून दहीसरकडे जाणारा १८.०० मीटर रस्ता | श्री. आचार्य श्री. महाप्रज्ञ मार्ग |
| ४४ | भाईंदर (प) नियोजित हॉस्पीटल इमारत | भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी हॉस्पीटल |

मा. महासभा दि. १९/११/२००८

| | | |
|---|---|---|
| ४६ | मिरारोड पूनम नगर नर्सरी | राणी लक्ष्मीबाई नर्सरी |
| ४६ | मुर्धा स्मशानभूमी | मुक्तीधाम |
| ४७ | मुर्धा बाल दफनभूमी | अमरधाम |
| ४८ | भाईदर (प) स्व. तेरेसा जॉन मेन्डोसा चौक समोर भैरव सृष्टी व जानकी हेरीटेज इमारती मधून पुढे जाणारा रस्ता | हाजी गुलाब लाडजी शेख मार्ग |
| ४९ | भाईंदर (प) विनायक नगर समाजमंदिर | श्री. भालचंद्र साधुराम अग्रवाल भवन |
| ५० | शांतीनगर ए - ८ व ९ ते स्मशानरोड | वैकुंठधाम मार्ग |
| ५१ | शांतीनगर सेक्टर ४ व ५ मधील रस्ता ते सृष्टी सुर्या शॉपिंग सेंटर समोरील टॉवर रस्ता | लायन्स क्लब मिरारोड मार्ग |
| ५२ | सृष्टी सेक्टर - ३ समोरील चौक | नवयुवान चौक |
| ५३ | सृष्टी सुर्या शॉपिंग सेंटर समोरील चौक | सृष्टी चौक |
| ५४ | शांतीनगर से. ८ सी २० समोरील मैदान | गणेश मैदान |
| ५५ | शांतीनगर से. ८ सी ३९ समोरील उदयान | चाचा नेहरू बालोदयान |
| ५६ | शांतीनगर से. ८ सी समोरील उदयान | मदर टेरेसा नाना नानी पार्क |
| ५७ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग ते विनय नगर पर्यतचा रस्ता | विनय नगर मार्ग |
| ५८ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील संघवी नगर चौक | भगवान गौतम बौध्द चौक |
| ५९ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २१७,२३६ समोरील चौक | सेव्हन स्केअर चौक |
| ६० | भाईंदर (प) शंभू सदन ते क्लींट टॉवर पर्यत रस्ता | जिनदत कुसल सुरीजी मार्ग |
| ६१ | नवघर गांव उदयान | स्वातंत्र्य सैनिक कै. शंकर विठ्ठल पाटील उदयान |
| ६२ | पेणकरपाडा सुकाळ तलाव मार्ग | श्री. दत्त मंदिर मार्ग |
| ६३ | पेणकरपाडा मनपा शाळा समोरील सभागृह | स्व.सौ. गुलाब रामजी घरत सभागृह |
| ६४ | भाईंदर (प) उपकर कार्यालय | डॉ.श्री. बळीराम हेडगेवार भवन |
| ६५ | नवघर तलाव येथून संत निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज संतसंघ भवन मार्ग | संत निरंकारी बाबा हरदेवसिंहजी मार्ग |
| ६६ | शांती पार्क सेंट जोसेफ शाळे समोरील उदयान | बालगोपाळ उदयान |
| ६७ | शांतीपार्क एचडीएफसी बँक ते आरएनए कोर्ट यार्ड, सेक्टर ९,१० रस्ता | साईबाबा मार्ग |
| ६८ | मिरारोड शितल नगर चौक | सेंट जोसेफ चौक |
| ६९ | मिरारोड बरखा हॉटेल ते सेंट थॉमर्स चर्च रस्ता | सेंट थॉमस मार्ग |
| ७० | मिरारोड सेंटर प्लाझा हॉटेल ते क्लब ९ पर्यत रस्ता | ब्रम्हकुमारी मार्ग |
| ७१ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील शिवार गार्डन समोरील चौक | आचार्य श्री तुलसी चौक |
| ७२ | भाईंदर (प) सेस कार्यालयासमोरील चौक | आचार्य श्री. महाप्रज्ञ चौक |

यापूर्वी ज्या रस्त्यांची / उदयाने, चौक व इतर वास्तूची नामकरणे झाली आहेत अशी नामकरणे वगळून मा. सदस्यांनी सुचविलेल्या वरील नामकरण प्रस्तावांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची “ड'' मधील प्रकरण अकरा (२) (१) (अ) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७१, परिवहन उपक्रमामधील प्रवासी तिकीट दरात वाढ करणेबाबत. (मा. परिवहन समिती सभा दि. १८/१०/२००८ अन्वये शिफारस केलेले प्रकरण क्र. १७)

**जयंत पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम दि. १५/०९/२००५ रोजी सुरु झाला असून सदर उपक्रमाच्या बसेसकरीता प्रथम भाडेसारणी मा. महासभा दि. ०२/०८/२००५ रोजी ठराव क्र. २१ ने मंजुरी दिली होती. यानंतर प्रवासी तिकीटे दरामध्ये वाढ झालेली नाही.

परिवहन उपक्रमामध्ये सध्या ५० बसेस १७ धाव मार्गावर धावत असून परिवहन उपक्रमास होणारा तोटा काही प्रमाणात कमी करणेकरीता मा. परिवहन समिती सभा दि. १८/१०/२००८ प्रकरण क्र.१७, ठराव क्र. १० ने प्रस्तावित भाडे वाढीस मंजुरी दिलेली आहे. भविष्यात व प्रत्येक आर्थिक वर्षात महानगरपालिकेकडून परिवहन सेवेमध्ये प्रमाणात अनुदान मिळणे शक्य होणार नाही. सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये महापालिकेकडून अनुदानाद्वारे मिळणारी रक्कम रु. ७५ लाख आहे. या मिळणाऱ्या अनुदानातुन परिवहन विभागातील विविध खर्च मार्च २००९ पर्यंत भागविणे शक्य होणार नाही. ही बाब विचारात घेवून परिवहन उपक्रमाचा खर्च लक्षात घेता परिवहन उपक्रमाने प्रवासी तिकीटाच्या दरामध्ये खालीलप्रमाणे वाढ सुचवलेली आहे. या प्रवासी तिकीट भाव वाढीचा प्रचलीत भाडे तक्ता (अ) व प्रस्तावित भाडे तक्ता (ब) देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंतर कि.मी. | प्रचलीत भाडे (अ) | प्रस्तावित भाडे (ब) |
|---|---|---|---|
| १ | ० - २ | -- | -- |
| २ | ० - ३ | ४.०० | ४.०० |
| ३ | ३.१ - ५.० | ४.५० | ५.०० |
| ४ | ५.१ - ७.० | ५.०० | ६.०० |
| ५ | ७.१ - ९.० | ६.०० | ७.०० |
| ६ | ९.१ - ११.० | ७.०० | ८.०० |
| ७ | ११.१ - १३.० | ८.०० | ९.०० |
| ८ | १३.१ - १५.० | ९.०० | १०.०० |
| ९ | १५.१ - २०.० | ११.०० | १२.०० |
| १० | २०.१ - २५.० | १३.०० | १४.०० |
| ११ | २५.१ - ३०.० | १४.०० | १५.०० |
| १२ | ३०.१ - ३५.० | १५.०० | १६.०० |

प्रवासी भाडे वाढीमध्ये पहिल्या ३ कि.मी. करीता कोणत्याही प्रकारची भाडे वाढ सुचवलेली नाही. ३.१ कि.मी. ते ५ कि.मी. च्या टप्प्यामध्ये ५० पैशाची वाढ सुचवण्यात आलेली आहे व ५ कि.मी. पासून ते ३५ कि.मी. पर्यंतच्या एकुण ९ टप्प्यामध्ये प्रत्येक टप्प्यात रु. १/- याप्रमाणे वाढ सुचवण्यात आलेली आहे. तरी वरील सर्व बाबींचा विचार करुन परिवहन उपक्रमामधील प्रवासी तिकीट दरवाढीस आजची सभा मंजुरी देत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

अनुमोदन आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, या विषयावर थोडी चर्चा करायची आहे. मला श्री. विजय पाटील साहेबांना विचारायचे आहे की, आपल्या परिवहन सेवेमध्ये एकूण किती बसेस आहेत? मला त्याची थोडीशी माहिती पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, परिवहन उपक्रमामध्ये ५० बसेस कार्यरत आहे. आणि दोन बसेस एक्स्ट्रा आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, बरोबर आहे. मग आपण त्या पन्नास बसेस वाल्यांना पेमेंट कोणत्या हिशोबाने करता? किलोमिटरप्रमाणे करता की, लमसम करता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

परिवहन समितीमध्ये मा. महासभेच्या मंजुरीने खाजगीकरणाच्या माध्यमातुन बसेस घेण्याचे जे धोरण निश्चित झाले होते, त्या आधारे सन २००५ मध्ये रितसर निविदा काढून ठेकेदार निश्चित करून या बसेस भाड्याने घेतलेल्या आहेत. आणि यामध्ये प्रती बस एकोणीस रूपये पर किलोमिटर या दराने त्यांना भाडे देण्याचे दर मंजुर आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, प्रती बस दिवसाला किती किलोमिटर चालते याच्याबद्दल मी विचारले आहे. एकोणीस रूपये तुम्ही प्रति किलोमिटरल देता ते मला माहिती आहे. पण एक बस दिवसाला किती किलोमिटर चालते याच्याबद्दल मी तुम्हाला विचारले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

संबंधित ठेकेदाराशी परिवहन समितीने जो करारनामा केलेला आहे. आणि ह्या ज्या पन्नास बसेस चालू आहेत. ह्या पर डे प्रत्येक बस २५० किलो मिटर चालली पाहिजे असे त्यात आहे. आणि त्याप्रमाणे........

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही २५० प्रमाणे बिल देता की, रोज किती किलोमिटर चालते त्याप्रमाणे बिल देता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

२५० प्रमाणे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग हा लॉस का सहन करावा?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोणता?

**प्रेमनाथ पाटील :-**

रोजचे अकरा किलोमिटर एका बसमागे कधी चौदा कधी एकोणीस, सोळा, चौदा, अठ्ठाविस, पंधरा, अठरा, छत्तीस, सतरा, सात, चौदा, सतरा आणि सव्वीस हे प्रत्येक दिवशी इतके किलोमिटर बसेस कमी चालतात. म्हणजे एकुण बेचाळीस....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. पाटील साहेब, ह्या ज्या निविदा काढल्या होत्या....

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण इथे उत्पन्नाची घट दाखवता. आपण त्या ठेकेदाराला त्रेसष्ट लाख रूपये वर्षाला जास्त देतो. आपण हा फुकटचा त्यांच्याकडे खर्च करतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांनी याठिकाणी मांडल्याप्रमाणे आपण ह्या ज्या निविदा काढल्या होत्या त्यावेळेस एका बसेसचे रन पर डे २५० किलोमिटर अपेक्षित केले होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

बरोबर आहे. पण दिवसाला २५० किलोमिटर होत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण नव्वद टक्के बसेस २५० प्रमाणे चालवतो जे शॉर्ट रूट आहेत ते होत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तरीपण आपल्याला त्यांना आपल्या कराराप्रमाणे २५० प्रमाणे पेमेंट द्यावे लागते. ही बाब प्रकर्षाने चर्चेत आल्यानंतर....

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण हा उपक्रम ठेकेदारांसाठी चालवतो का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या करारामध्ये दुरूस्ती करण्याचा जो ठराव आहे. तो परिवहन समितीकडून मान्य करून घेतलेला आहे आणि २५० च्या ठिकाणी आम्ही २२५ किलोमिटर पर डे अंतिम केलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

पण आत्तापर्यंत आपण सन २००७-०८ मध्ये ६३ लाख रूपये त्यांना जास्तच अदा केलेले आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ठेकेदाराला त्यांच्या बसेस न चालता पैसे दिलेले आहेत अशी बाब नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

हे बघा साहेब, याच्यात क्लिअर लिहिलेले आहे. मला माहितीच्या अधिकारात माहिती दिलेली आहे. मी माझ्या मनाप्रमाणे....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बसेस २५० किलोमिटर पर डे चालवल्या गेल्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, बंद गाड्यांचे पण आपण पैसे देतो. गाड्या दिवसभर रस्त्यावर बंद असतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रत्येक बस प्रत्येक महिन्याला किती किलोमिटर चालली याची माझ्याकडे पुर्ण माहिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे २२५ सुद्धा ठरवून जास्त किलोमिटर द्यायचे उद्योग आहेत. पंचवीस दिले तरी पंचविस त्रिक पंच्च्याहत्तर साडे सात हजार किलोमिटरचे जास्त पैसे तुम्ही देणार.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण एका वर्षाला ६३ लाख रूपये जास्त देतो. एक करोड तीन लाख रूपये आपण लॉस दाखवतो. हा लॉस आपण का सहन करावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बसेसच्या माध्यमातुन होणारे उत्पन्न आणि ठेकेदाराला द्यावयाचे पेमेन्ट याचा निव्वळ अभ्यास जर आपण केला तर बसेसचे उत्पन्न हे ठेकेदाराला जे पैसे देतो, त्याच्यापेक्षा जास्त आहे. महिन्याकाठी दोन तीन लाखाचे जास्तीचे उत्पन्न होते.

**मिलन म्हात्रे :-**

त्या करारानुसार त्या गाड्यासुद्धा प्रवासी वाहतुक करण्यासाठी सक्षम असल्या पाहिजेत. आत्ता त्या सगळ्या गाड्या बिघडलेल्या आहेत आणि गाड्या उभ्या असतात. बाकीच्या महापालिकांमध्ये तिकिटे देतात. पैसे भरा आणि तुम्ही संपवा. आमचे पैसे आम्हाला आणून द्या. हे दरवेळेला तुम्ही भिकमागे धंदे काय करता. आत्ता तुमच्या ॲग्रीमेंटनुसार गाड्यापण चांगल्या पाहिजेत कि नाही. त्या गाड्या रस्त्यातुन जाताना खुळखुळ्या सारख्या वाजतात आणि प्रत्येक ठिकाणी बंद पडतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

आत्ता हे त्रेसष्ट लाख रूपये आपण त्यांच्याकडून वसुल करून घेणार आहात का? याचे पहिले मला उत्तर द्या. आपण इकडे एक करोड तीन लाख लॉस दाखवतो. आणि माझ्या मते ते तेवढे नाही मग आपण जे त्रेसष्ठ लाख रूपये ठेकेदारांना जास्त दिले ते वसुल करणार आहात का?

**प्रभात पाटील :-**

ते वसुल करायचे असे बोलूच नका. ठराव मांडा की, ठेकेदाराकडून वसुल करा. मी तो ठराव मांडते की, हा सगळा पैसा त्याच्याकडून वसुल करण्यात यावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जे धोरण आहे. त्या धोरणाच्या बाहेर जाउन ठराव कसा करणार? आपण जे दरपत्रक मंजुर केले.

**प्रभात पाटील :-**

किलो मिटरप्रमाणे पण तुमचे दर ठरलेले आहे. इतके किलोमिटर झाले पाहिजे. त्या किलोमिटर नुसार तुम्ही त्यांना पैसे देणार आहात. पण त्यांच्या बसेस ठरविल्याप्रमाणे निम्म्यासुद्धा चालत नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे सव्वा दोनशे कोणी ठरवले? बसेस दिडशे किलोमिटर पण चालत नाहीत. चालूच शकत नाहीत. चला आपण बसुया आणि ती गाडी दिडशे किलोमिटर चालवूया. ती चालणारच नाही. पंचवीस किलोमिटरमध्ये तुमची गाडी बंद पडणार.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

माझ्याकडे सतरा रूट आहेत. सतरा रूट मध्ये उदा. भाईंदर (वेस्ट) ते चौक, त्या एका रूटचे किलोमिटर आहेत, चौदा किलोमिटर प्वाईंट टू, म्हणजे चौदा किलोमिटर त्या रूटला त्यांना एकूण पाच बसेस दिलेल्या आहेत. आणि त्याच्या ज्या फेऱ्या आहेत त्या छप्पन फेऱ्या होतात. आत्ता एका रूटचे पर डे किती किलोमीटर होते हे आपल्याला काढता येते. चौदा किलोमिटरचा आपल्याकडे हिशोब आहे. कोणत्याही एका रूटची ढोबळ चर्चा करण्यापेक्षा वस्तुस्थिती चर्चा करायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

ढोबळ सोडून द्या. तुम्ही मॅक्ससमधून बसेस सुरू केल्या आहेत. त्याच्यात फक्त चार प्रवासी असतात. जरा बघितले का? कुठल्या आयुक्तांनी चेक केले का? एक महिना लॉस झाला. प्रत्येक फेरीमध्ये चार प्रवासी जाताना आणि येताना दोन्ही.....

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपली बस जर स्टेशनवरून चौकला गेली तर त्याचा काहितरी टायमिंग असेल की, या वेळेमध्ये आली पाहिजे. ती किती मिनिटामध्ये आली पाहिजे ते मला सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दर पंचेचाळीस मिनिटाला चौकची बस आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपली बस जर स्टेशनवरून चौकला गेली तर त्याचा काहीतरी टायमिंग असेल की, या वेळेमध्ये आली पाहिजे ती किती मिनिटामध्ये आली पाहिजे. ते मला सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दर पंचेचाळीस मिनिटाला चौकची बस आहे.

**नयना म्हात्रे :-**

जर आपली बस स्टेशनवरून सुटली, चौकला गेली. तर ती चौकवरून स्टेशनला किती मिनिटांनी आली पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तो डिस्टन्स चौदा किलोमिटरचा आहे. त्याला कमीत कमी पंचेचाळीस मिनिटात तो रूट पुर्ण करायला पाहिजे. आणि त्याच्यामध्ये एकूण ४९ स्टॉप आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

या बसेसची जरा व्यवस्थित पाहणी करा. रात्री तुम्ही स्वतः फिरा.

**नयना म्हात्रे :-**

त्या ड्रायव्हरला आम्ही पायलट बनवले का? तो बसवाला दहा मिनिटात येतो.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या इकडे पोलिस स्टेशनसमोर ड्रायव्हर बस खाली सोडतात, दुसरा ड्रायव्हर बसतो, तो घेउन जातो. आत्तापर्यंत किती अपघात झाले?

**नयना म्हात्रे :-**

जरा तिकडे जाउन बघा की, ते ड्रायव्हर काय करतात. मस्तपैकी टायर वगैरे काढतात आणि झोपतात. बोलायला कोण आहे. टायर पंक्चर झाला.

**मिलन म्हात्रे :-**

परिस्थिती अशी आहे की, उत्तनला एखादा माणूस उतरला. त्याची तिकीट घेतात. तीच परत दुसऱ्याला देतात. कोण चेकींग करते का? मा. आयुक्त किंवा उपायुक्त तुम्ही कधी फिरले आहात का? नाहीतर आमच्या बरोबर फिरा आम्ही तुम्हाला दाखवतो हे मागच्या मिटींगमध्ये पण सांगितले. प्रवासी उतरताना लिटरली कंडक्टर तिकीट हातात घेतो आणि ती तिकिट परत दुसऱ्याला दिली जातात. एकही अधिकारी, एकही विजिलन्स, साहेब आपला खरेखरच प्रोग्रेस आहे. आपला श्री. पाटील नावाचा अधिकारी कुत्र्याचा वाढदिवसाला पंचविस हजार रूपये खर्च करतो आणि मोठ्या हॉटेलला ठेवतो. परिवहनचे अगोदरचे अधिकारी, श्री. पाटील, श्री. विजय पाटील नाही. प्रत्येक महापालिकेच्या सगळ्या परिवहनला हे उदाहरण द्या की, असे पंचवीस हजार रूपये कुत्र्याच्या वाढदिवसाला खर्च करणारा अधिकारी ठेवा आणि जे कर्मचारी पैसे देत नाहीत त्यांना शोकॉज नोटीस वगैरे देउन कामावरून काढून टाकायचे. त्या अधिकाऱ्याला नेमले त्यावेळेला तुम्हाला आम्ही बोललो होतो.

**हेलन गोविंद :-**

मा. उपायुक्त साहेब, बसला खरोखर खुप स्पीड असते. आम्ही नेहमी बसमध्ये ट्राव्हलींग करतो. एवढा स्पीड असतो. दोन तीन वेळा ॲक्सीडंटपण झाले. आमच्या गावातील बऱ्याचशा बायकांचे ॲक्सीडंट झाले. त्याचे ओठ फुटले. जरा ड्रायव्हरना गाडी स्लोमध्ये आणायला सांगा. मा. महापौर साहेब, माझी एक सुचना आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये नगरसेवक आणि नगरसेविकांना फ्रीमध्ये तिकीट मिळते तसे मिरा भाईंदरमध्ये सुद्धा द्यावे अशी मी सुचना मांडत आहे.

**सिसिलिया बावीघर :-**

आम्ही पण जाता येताना बसमधुनच प्रवास करतो. पण भाईंदरवरून चौक या ठिकाणी बसेस जातात त्यावेळेला बसेस एवढ्या भरलेल्या असतात. कधी आम्ही बसमध्ये प्रवास करताना इथून चढतो तेव्हा आम्हाला एकाही दिवशी उत्तन चौक बसमध्ये जागा नसते. स्टँडींगवर प्रवासी जातात आणि उत्तनपर्यंत जाईपर्यंत ती बस एवढी भरते की, दोन बसची माणसे एकाच बसमध्ये घुसवली की काय असे आम्हाला वाटते. त्याचवेळी जर दुपारी शाळा सुटली तर एवढे हाल होतात. मुलांच्या मोठमोठ्या बॅगा आणि बससेवा अशी आहे की, मुलेपण त्याच्यात आणि प्रवासी कधी उतरायचे कसे चढवायचे एवढे हाल होतात. अक्षरशः तिकडे आमचे हाल होतात. मुलांसाठी तुम्ही उत्तनवरून एक्स्ट्रा बस चालू करा. इकडे भाडे वाढ भाडे वाढ तेच करतात. बसेसची काय सोय आहे ते माहिती नाही. भाडे वाढ करायची नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, माझ्या प्रश्नाचे उत्तर अजुन मला मिळालेले नाही. हे त्रेसष्ठ लाख हे लोक वसुल करणार आहेत की नाहीत?

**नयना म्हात्रे :-**

आपली बस ठाण्याला कशी जाईल त्याचा पहिला बंदोबस्त करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. पाटील साहेबांचा जो मुद्दा आहे की, आपण जास्तीचे पेमेंट केले. करारनाम्याप्रमाणे, आपल्या निविदेप्रमाणे आपण ठेकेदाराशी जे धोरण निश्चित करून करारनामा केलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, बरोबर आहे. करारनाम्यावर अडीचशे किलोमिटर केले. पण तुमची बस अडीचशे किलोमिटर चालली कुठे? अडीचशे किलोमिटर पर्यंत तुमची बस जातच नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी तोच रूट आणि किलोमिटर तुमच्यासमोर वाचतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही वाचा. माझ्याकडे पण आहे. प्रत्येक महिन्याला किती किलोमिटर झाले ते वाचून दाखवा. मी याच्यामध्ये माझे टॅली करतो. हे तुमच्याच विभागातून मला दिलेले पत्र आहे. तुम्ही टॅली करता की, मी टॅली करू?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपले धोरणच आहे की, बंद बसेसला अडीचशे किलोमिटरचे पैसे द्या असे नाही. कार्यान्वित बस....

**प्रेमनाथ पाटील :-**

पण साहेब, आपण दिलेले आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बंद बसला दिलेले नाही. उलट बंद बसला आम्ही दंड लावलेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

बंद बसचे नाही. तुम्ही अडीचशे किलोमिटरप्रमाणे दिलेले आहे. तुम्ही अडीचशे किलोमिटर प्रमाणे पेमेंट करता ना? बस चालो अथवा न चालो. तुम्हाला अडीचशे किलोमिटर पर डे पेमेंट करायचे आहे, हा तुमचा करारनामा आहे की नाही? मग उद्या त्याने पन्नास बस बंद ठेवल्या तरी तुमच्याकडून तो पैसे घेणारच आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी आपल्या मताशी सहमत आहे. पैसे जास्तीचे बस न चालवता दिले असे नाही. बस चालवली आहे. कदाचित त्याचे फेरे जास्तीचे आहेत. आणि ते फेरे शेवटी शेवटी इकॉनॉमिक होत नाहीत म्हणून आपण पंचवीस किलोमिटर पर बस आत्ता कमी करतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

आत्ता कमी करता पण ते अगोदर अदा केले. त्याचे काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण काम घेतलेले आहे आणि त्याला मोबदला दिलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण त्याच्याकडून दोनशे पन्नास किलोमिटर काम कुठे घेतलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मुद्दा कसा आहे की, समितीने आणि मा. महासभेने अडीचशे किलोमिटरचे जे धोरण निश्चित केले होते.....

**प्रेमनाथ पाटील :-**

याचा अर्थ त्या बसवाल्याने त्या ठेकेदाराने पुर्ण दिवस बस बंद.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मागे चर्चा झाल्याप्रमाणे आपण आत्ता त्याच्यामध्ये सुधारणा करत आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, अडीचशे किलोमिटर प्रमाणे त्याला पेमेन्ट अदा करायचे.....

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, मै परिवहन मे था तब मैने भी यही बताया था की, अपनी बस २५० किलोमिटर नही घुमती है। इधर उधर खडी रहती है। कभी कभी तो दो दो दिन बस खडी रहती है। और महिने मे दस बस तो खराब होती है।

**प्रेमनाथ पाटील :-**

इनकी बस चलती नही है।

**चंद्रकांत मोदी :-**

कभी टायर तुटता है, कभी पाटा तुटता है तो कभी कुछ तुटता है।

**जुबेर इनामदार :-**

साहेब, केलेल्या ठरावामुळे चौतीस लाखची वाढ होणार आहे. त्याच्यामुळे परिवहन सेवा सुधारणार आहे काय? ते पैसे कशाला वाढवून देता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हा मुख्य भाववाढीचा विषय आणण्याचे कारण असे आहे. मी आपली दोन मिनिटे घेतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही लॉस दाखवता म्हणून याच्यामध्ये भाडेवाढ दाखवता काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

२००५-०६ मध्ये ज्यावेळेस परिवहन समिती स्थापन झाली.....

**प्रभात पाटील :-**

तुम्हाला दरवाढ करून दिली. दरवाढ करायला सभागृहाने विरोध केला नाही. पण तुम्ही त्याच्यामध्ये जो लॉस दाखवता की, आपली परिवहन सेवा ही तोट्यामध्ये चालते. तोटा तुम्ही ठेकेदारांच्या घशात घालता ना. हे का चालणार नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी तीच माहिती आपल्याला सांगतो.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही याच्यामध्ये तुमचे स्टेटमेंट द्या. तुम्हाला ही गोष्ट पटत नाही का? आपला पैसा जातो, नागरिकांचा पैसा जातो.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, त्यांच्याबरोबर आपले ॲग्रीमेंट दोनशे पन्नास किलोमिटरचे आहे. आपल्या काही बस १८५ चालत असतील, काही दिडशे, काही दोनशे पंचवीस, काही दोनशे तीस, आपण पहिल्यांदा ऐव्हरेज काढा की, टोटल किती बसेस चालतात. त्याप्रमाणे त्याला निगोशिएट करून त्या एव्हरेजवर आणा. मग दोनशेवीस असु द्या किंवा दोनशे दहा असु द्या. दुसरी गोष्ट सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी जे उपस्थित केले की, काही बसेस चालत नाहीत. आणि ही वस्तुस्थिती आहे की, काही बसेस चालत नाहीत. आत्ता सन्मा. सदस्या श्रीम. प्रभातताई पाटील यांनी पण चांगला मुद्दा उपस्थित केला. माझे म्हणणे ऐकले पाहिजे. मी थोडक्यात एक उदाहरण देतो आणि परत मी काही टेक्नीकल सांगितले तर तुम्हाला ते आवडत नाही किंवा पटत नाही. आपण जर जी.पी.आर.एस. केले तर फक्त आठ हजार रूपये एका बसला लागातात. त्याच्यामध्ये काही करायचे नाही. सकाळी कितीला बस चालू झाली, कितीला निघाली? आपल्या कम्प्युटरमधून ती प्रिंटआउट निघेल. बस बंद ठेवली तर आपल्या कम्प्युटरमधून प्रिंटआउट निघणार नाही. आणि आपल्या नगरसेवकांना सुद्धा तो ॲक्सेस देता येईल. कोणीही कधीही ती प्रिंटआउट काढू शकतो की, २१० नंबर बस किती चालली. तुम्हाला पण घरी बसुन ते बघता येईल. आठ हजार रूपये एका बसमागे खर्च करा. म्हणजे कोणाचा वादच नाही की, ती बस चालू होती किंवा बंद होती.

(सभागृहात गोंधळ)

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर साहेब, जब मै परिवहन समिती मे था तब यह प्रस्ताव रखा था। लेकीन कोई बात आगे बढी नही।

**मा. महापौर :-**

मा आयुक्त साहेब, आरोग्य मध्ये पण तसेच झाले होते की, आपले पुर्ण कर्मचारी कामावर येत नाहीत आणि जे ट्रक आणि वाहन आहेत ते पुर्णपणे आपण जेवढा ठेका देतो तेवढी गाडी चालवत नाही. त्याहीसाठी आपण तो निर्णय दिला होता तरी आपण लावले नाही. आपण असे म्हणता की, जोपर्यंत तो लावत नाही तोपर्यंत पैसे देणार नाही. त्याने बारा महिने लावले नाही आणि नंतर लावले तर आपण बारा महिन्याचे पैसे देणार का? मग काय करणार?

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, हा पुढचा विषय झाला पण आपण त्रेसष्ठ लाख ज्यादा दिले त्याचे काय मला त्याचे उत्तर पाहिजे. आपण ते ठेकेदाराकडून कसे वसुल करणार?

**मा. महापौर :-**

आपला त्याच्याबरोबर करारनामा होता की, पर बसेस अडीचशे किलोमिटर प्रमाणे पेमेंट करायचे. आता यापुढे मा. आयुक्तांना सांगितले की, त्यांना बोलवून एक ऐव्हरेज काढा की, आपल्या बसेस किती चालतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझ्याकडे सर्व लेखी आहे.

**प्रभात पाटील :-**

जे झाले आहे त्याचे काय?

**मा. महापौर :-**

तो आपला करारनामा होता.

**प्रभात पाटील :-**

करारनामा झाला म्हणून काय? करारनामा केला त्याच्यामध्ये त्याने फट पाडली. करारनामा आपण केला तो त्यांच्या फायद्याचा होता की, आपल्या फायद्याचा होता.

**प्रेमनाथ पाटील :-**

करारनामा केला. पण मिरा भाईंदर महानगरपालिका लॉसमध्ये चाललेली आहे.

**मा. महापौर :-**

पण आपण सही केली आहे. परिवहनचे यापुढेच करता येईल. मागचे काही करता येणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण हा करार ठेकेदारासाठी केला होता का? मिरा भाईंदर महानगरपालिकेला त्याच्यापासुन उत्पन्न नको का?

**मा. महापौर :-**

उत्पन्न पाहिजे. ऑलरेडी जे ॲग्रीमेंट झालेले आहे....

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, झालेले आहे. तेच तर सांगतो. मग त्याच्या पुढचे काय? आत्ता तुम्ही सांगितले की, किलोमिटरप्रमाणे करू या. पण मागे त्यांना त्रेसष्ठ लाख रूपये जास्त दिलेले आहेत. त्याचे काय?

**मा. महापौर :-**

मा. उपायुक्तांचे वर्कींग चालू आहे. एव्हरेज किती बसेस चालतात. किती किलोमिटर चालतात. त्याच्यावर आपण त्यांच्याकडून ते कमी करुन घेउ.

**प्रेमनाथा पाटील :-**

मग मागे जे पैसे दिले ते बुडले?

**मा. महापौर :-**

तो करारनामा होता.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, करारनामा असला म्हणून काय झाले? त्या लोकांनी इथे चक्क उल्लेख केलेला आहे की, प्रत्येक महिन्याला एवढे एवढे किलोमिटर चाललेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, ही जी भाडेवाढ सुचवलेली आहे. राज्य शासनाचे एस.टी. बसचे दर, बेस्टचे दर, ठाण्याचे दर, आणि नवी मुंबईचे दर, या सर्वांपेक्षा वाढ केलेले दरसुद्धा कुठेही जास्तीचे नाहीत. त्याच्यापेक्षा कमीचेच आहेत किंवा इक्वल आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्ही वाढ मान्य करतो. पण तुम्ही जो लॉस दाखवलेला आहे.....

**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या पेरीफेरीमध्ये ज्या परिवहन सेवा आहेत. त्यांच्यापेक्षा आपले दर कमीचे होते. आपण हे जे वाढ केलेले आजचे दर आहेत ते सुध्दा कुठेही जास्तीचे नाहीत. दुसरा मुद्दा असा होता की, परिवहन सेवा, आपला जो दृष्टीकोन आहे, ना नफा ना तोटा पध्दतीने चालवा. तर या वर्षामध्ये आतापर्यंत आम्ही फक्त वीस लाख रुपये महापालिकेतुन घेतलेले आहेत.

**शरद पाटील :-**

आपण जे बोललात तशीच्या तशी सुचना मी मांडतो. ती ठरावात घ्यावी आणी दुसरी गोष्ट आपण भाववाढीला कुठेही विरोध करत नाही. पण तरी सुध्दा आत्ता भाववाढ केल्यानंतर या परिवहन सेवेला महापालिकेने अनुदान देवू नये ही सुचना ठरावात घ्या.

**मा.महापौर :-**

आपली सुचना स्विकारण्यात येत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा.महापौर साहेब, आपण २५० किलोमीटर पर डे चा जो करार केला त्याच्यामध्ये असा क्लॉज आहे की, महानगरपालिका लॉसमध्ये चालली पाहिजे. ठेकेदार प्रॉफीटमध्ये चालला पाहिजे असे लिहिलेले आहे का?

**प्रशांत पालांडे :-**

मा.महापौर साहेब, आत्ता मध्ये एक बातमी आपण पेपरला वाचली. मुंबईचे मा.महापौर आणि ठाण्याचे मा.महापौर एकत्र बसुन मुंबईच्या काही बसेस ठाण्यामध्ये प्रवेश देण्यास परवानगी दिली. त्याप्रमाणे आपल्या महानगरपालिकेच्या स्तरावर आपण काही हालचाली केलेल्या आहेत का ? जर ठाण्याचा किंवा मुंबईचा एक एक रुट आपल्या परिवहनला मिळाला तर तोटा वगैरे ब-याच अंशी आपण भरुन काढू शकतो. मी स्वतः मा.खासदार श्री.आनंद परांजपे साहेबांशी याबाबत बोललेलो आहे. त्याची मध्यस्थी करण्याची तयारी आहे. आपण आपल्या स्तरावर काही करणार आहोत का ?

**मा.महापौर :-**

आपण त्यांना वारंवार पत्र व्यवहार केला. तिकडचे मा.महापौर व मा.आयुक्तांशी भेट झाली. आत्ता आठ दिवसा अगोदर त्यांचे पत्र आले की, आम्ही तुमचा विषय फेटाळलेला आहे. तेव्हा आम्हाला परवानगी देता येणार नाही.

**अनिल सावंत :-**

मा.महापौर साहेब, हा जो विषय आहे तो महानगरपालिकेशी संबंधित नाही. तुम्हाला आर.टी.ओ. ने परमिशन दिलेली आहे का ? मुंबई आणि ठाणे हद्दीमध्ये जायला....

**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रशांत पालांडे साहेबांचा मुद्दा मी थोडा खुलासा करतो. ह्या पेरीफेरीमध्ये एम.एम.आर. रिजनमध्ये ज्या परिवहन सेवा आहेत आणि स्थानिक सेवा चालवताना ह्या सर्वांच्या परिवहन सेवा तोट्यातच आहेत. म्हणूनच काही इकॉनॉमीक रुट आयडेन्टीफाय व्हावेत म्हणून आपल्या हद्दीच्या बाहेर ज्या

सेवा चालविण्याच्या परवानग्या लागतात. जे अे.टी.एस. विभागीय आयुक्त, कोकण होते. आत्ता ते काढून या एम.एम.आर. साठी मा.प्रधान सचिव, ट्रान्सपोर्ट आत्ता श्री.झा साहेब होते. त्यांच्याकडे याचे नियंत्रण होते आणि सर्व परिवहन व्यवस्थापक आणि या भागातील परिवहन समितीचे सभापती त्यांचे सदस्य होते. त्यांच्या दोन बैठका झालेल्या आहेत. आणि त्यामध्ये आपल्या ज्या मागण्या आहेत, बोरिवली रुट, विरार आणि ठाणे ह्या ज्या तीन आपल्या मागण्या आहेत की, आम्हाला जरी इतर सेवा चालू असता आपली ग्रामपंचायत होती, नगरपरिषद झाली, आत्ता महापालिका झाली आणि आपली स्वतःची परिवहन सेवा झाली. पुर्वी आपण त्यांना संमती दिलेली आहे आणि त्याच्या आधारे त्यांच्या सेवा चालू आहेत. तर त्याच्यातील काही भाग आपल्या सेवेला उपलब्ध करुन देण्यासाठीचे आमचे प्रस्ताव त्या समितीसमोर आहेत. त्यांच्या दोन बैठका झाल्या. पण अजुन त्याच्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, माझी एक सुचना आहे. आपल्या परिवहन सेवेच्या ज्या बसेस आहेत, बंदरवाडी नाक्यावर पाच, सहा, सात बसेस एक-एक वेळेला उभ्या राहतात. एक बस तीन तास, दिड तास, अडिच तास उभी राहते. त्या ठिकाणी शनी मंदिर आहे. बंदरवाडी म्युनिसीपालीटीची शाळा आहे. डिवाईन इमेज कॉलेज आहे. अशा गर्दिच्या ठिकाणी संध्याकाळच्या वेळेस कमीत कमी दोन ते तीन तास ट्राफीक जाम होते. आणि या ठिकाणी लेटरदेखील दिलेले आहेत. त्या ठिकाणी बसेसचा स्टॉप ठेवलेला आहे. त्या ठिकाणी थांबा कशासाठी ठेवलेला आहे. तर कृपया आपण त्याची सुधारणा करुन घ्या. तीन-तीन, चार-चार तास त्या ठिकाणी ट्राफीक जाम होते. रोड एकदम अरुंद आहे. आपण या बाबतीत काय निर्णय घेता? हे जे बस स्टॉप त्या ठिकाणी आहेत. पाच बस, सहा बस दिड तास दोन तास एक-एक बस त्या ठिकाणी उभी राहते. ड्रायव्हर कंडक्टर त्या ठिकाणी फिरायला जातात. त्या ठिकाणी कोणी नसते. अशा वेळेला गर्दि जाम होते. त्या ठिकाणीच रिक्शा स्टँड आहे. कृपया आपण याच्याकडे लक्ष द्या.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आपल्या ज्या नव्यावरुन मिरा रोड मध्ये टी.एम.सी. च्या बस येतात. मा. आयुक्त साहेब, याच्याबद्दल मी आपल्याला पत्र पण दिलेले आहे. तर जुनच्या पुर्वी काय व्हायचे की, जे स्टूडन्ट ट्राव्हेल करतात. त्यांना कन्सेशन पण मिळायचे. पण आत्ता ठाणे महानगरपालिकेने काय केले आहे की, त्यांच्या फक्त ठाणे महानगरपालिका हद्दीतील जे विद्यार्थी आहेत. त्यांनाच फक्त ते कन्सेशन मिळते आणि बाहेरच्या विद्यार्थ्यांचे कन्सेशन त्यांनी बंद केलेले आहे. तर तुम्ही मा. आयुक्तांशी संपर्क साधुन जे बाहेरचे विद्यार्थी, आपण इथून सुध्दा प्रवास करतो आणि मिरा रोड ते ठाणे हा सर्वात प्रॉफीटेबल रुट आहे, त्या विद्यार्थ्यांना कन्सेशन मिळावे.

**मा.महापौर :-**

विषय संपला. साहेब, दुसरा विषय घ्या.

**दिनेश नलावडे :-**

ज्या ठिकाणी बस थांबा आहे त्या ठिकाणी बसेस थांबवा. सात दिवसामध्ये त्या ठिकाणी बस रुटीनमध्ये झाल्या पाहिजेत. श्री.पाटील साहेब, नवघरचे सगळे नगरसेवक त्या ठिकाणी उपोषणाला बसतील.

**जुबेर इनामदार :-**

मा.महापौर साहेब, परिवहनचा ठेकेदारांबरोबर जो करार करण्यात आला होता तो किती वर्षांकरीता होता ? पाच वर्षे संपली की नाहीत ?

**मा. महापौर :-**

पाच वर्षे पन्नास बसेस होतील त्या दिवसांपासून.

**जुबेर इनामदार :-**

त्याने पन्नास बसेस किती वर्षानंतर पुर्ण केल्या ?

**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.) सो.) :-**

पन्नास बसेस ज्या तारखेला आल्या तिथून पाच वर्षे असे करारनाम्यात होते. तो विषय आम्ही दुबारा परिवहन समितीत ठेवून त्याची डेट अंतिम करुन घेतलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

माग ते आत्ता तरी कधी संपणार आहे ?

**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन २०१३ ला त्यांची मुदत संपणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे २००८ मध्ये त्यांनी पन्नास बसेस पुर्ण केल्या. तिथून त्याचा करार सुरू झाला.

**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.) सो.) :-**

जे दोन्ही करारनामे होते, २५० किलोमीटरचा आणि डेटचा, ते दुबारा आम्ही समितीसमोर ठेवून त्याला अंतिम करुन घेतलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

त्याला कुठे बंधन नव्हतेच. तू कधी ही चालू कर. पन्नास कधीही पुर्ण कर. तोपर्यंत एकोणपन्नास ठेव. असे कुठे होते का ? पन्नास बसेस त्याने २००८ मध्ये पुर्ण केल्या. म्हणजे त्याच्या अगोदर त्याने एकोणपन्नास ठेवल्या असत्या किंवा अर्ध्या ठेवल्या असत्या तर त्याचा करार सुरूच झाला नसता.

**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.) सो.) :-**

जुन २००८ मध्ये त्याने पन्नास बसेस पुर्ण केलेल्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण बस उपक्रम १५ सप्टेंबर २००५ ला चालू केला आणि आपल्या पन्नास बसेस १६ मे २००८ ला पुर्ण झालेल्या आहेत. म्हणजे त्याला पन्नास बसेस पुर्ण करण्यासाठी तीन वर्षांचा कालावधी लागला.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे अजुन पाच वर्षे त्या ठेकेदाराला पोसायचे आहे का ?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण किती कालमर्यादा दिली होती की, पन्नास बसेस एवढ्या पिरीयडमध्ये आणल्या पाहिजेत ? काही टाईम लिमिटेशन असेल ना. एक वर्ष, दोन वर्ष, तीन वर्ष, पन्नास बसेस चालू झाल्या पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, अशा पध्दतीचे करार जेव्हा तयार केले जातात. त्याला जबाबदार कोण?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्या ॲग्रीमेंट मध्ये असे नमुद आहे की, पन्नास बसेस कधी कम्प्लीट कराव्यात? कुठल्या वर्षामध्ये कराव्या? असे काही आहे का? एक वर्षात, दोन वर्षात, तीन वर्षात?

**जुबेर इनामदार :-**

कुठल्या वर्षामध्ये करावे हे कुठेच नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

कुठल्या वर्षात, कुठल्या महिन्यात असे काही करारनाम्यामध्ये होते का?

**मा. आयुक्त :-**

मी सन्मा. सभागृहाला सांगू इच्छितो की, त्या ॲग्रीमेंटमध्ये असे काही नसल्यामुळे मी इथे आल्यानंतर आधी त्या ॲग्रीमेंटचा आढावा घेतला आणि मला जे काही योग्य, चांगले करता आले तेवढे एक केले की, ॲटलीस्ट जुन २००८ पासून तरी पन्नास बसेस आल्या पाहिजेत. त्या आल्या आणि आत्ता तरी कमीत कमी पाच वर्षाचे घड्याळ सुरू झालेले आहे एवढे सांगतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्या करारनाम्यामध्ये असे होते की, सन २००८ मध्ये पुर्ण बसेस आणाव्यात.

**मा. आयुक्त :-**

तशी काही तरतुद नव्हती.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, आत्ता श्री. खतगांवकर साहेबांनी सांगितले की, दोनशे पन्नासचा एव्हरेज त्यांचा पर डेचा होता. आणि आपले सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील यांनी जी माहिती घेतली तर डेलीची वीस ते पंचवीस किलोमीटर बस कमी धावते. आणि त्याचा एव्हरेज काढला तो त्रेसष्ठ लाखाच्या आसपास. मग आपले ॲग्रीमेंट जर २५० चे बनले होते तर २५० च्या ॲग्रीमेंटमध्ये कम्प्लसरी रोजची वीस किलोमीटर कमी चालली. तर असे चालेल का ? अशा काही क्लॉज ॲग्रीमेंट होता का ? अशी काही अट होती का ?

**मा.महापौर :-**

त्याला २५० किलोमीटर कम्पलसरी पेमेन्ट द्यायचे.

**लक्ष्मण जंगम :-**

म्हणजे एखादी बस दोन-पाच किलोमीटर पाठीपुढे चालली तो विषय समजून घेता येईल. पण नेहमीच्या याच्यामध्ये त्रेसष्ठ लाखाची कमी येते किंवा जास्त पैसे जातात आणि एवढी बस कमी चालते. तर आपल्या ॲग्रीमेंटमध्ये अशा काही अटीशर्ती होत्या का की, अशी कमी चालली तरी चालेल. सभागृहाच्या माहितीसाठी जरा तो खुलासा करा. मा.महापौर साहेब, आत्ता चार रुपयाचे तिकीट पाच रुपये हा विषय आपण इथे आणला आहे. मिरा भाईंदरमध्ये साधारणतः प्रत्येक रिक्षावाला आणि जाणारा प्रवासी इथून त्या नाक्यावर जायचे असेल तर आपण पाच रुपये दिले तर आपल्याला माहिती आहे की, रिक्शाने जाता येते. मग ही बस, एवढ्या मोठ्याने आवाज करते, खुळखुळ वाजते. त्या बसमध्ये ते पाच रुपये भरुन जायचे असेल आणि तेच पाच रुपये देवून जर रिक्शाने जायचे असेल तर मला सांगा बसमध्ये कोण बसेल ? मग अशीच बस फिरवायची का ? बसमध्ये आणि रिक्शामध्ये फरक राहिला पाहिजे. प्रवासी कधी बसतील की, तुमच्या रिक्शामधील आणि बसमधील फरक जर दिसेल, तर प्रवासी बसने प्रवास करतील. ठिक आहे, उत्तनला वगैरे

जाण्यासाठी लोक निश्चितपणे बसने प्रवास करतील. पण आपल्या मिरा भाईंदरच्या क्षेत्रामध्ये आपल्याकडे रिक्शाची शेअरींग पध्दती आहे, पाच रुपयामध्ये मग त्याच रुटला रिक्शा फिरतात. त्याच रुटला आपली बस फिरते. आणि मग मला सांगा की, जर पाच रुपयामध्ये प्रवासी रिक्शाने तिथे जातो. मग आपल्या बसमध्ये कशासाठी फिरणार ? मला असे वाटते की, ॲग्रीमेंटच्या बाबतीत बोललो की, कमी चालते. त्याबाबतीत परिवहनचे कोण अधिकारी आहेत त्यांनी खुलासा करावा.

**नयना म्हात्रे :-**

मा.महापौर साहेब, माझ्या वॉर्डमध्ये एकदा डांबरीकरणाचे काम चालू होते. त्या दिवशी खुप ट्राफिक झालेली. तर मी विचार केला की, दोन्ही बाजुनी मी व्यवस्थित गाड्या सोडत जाईन. तर एक बसवाला आला आणि त्या रिक्शावाल्याला एकदम जवळ टच झाला. तर मी त्या बसवाल्याला एवढेच बोललो की, त्या माणसांना मारतो का? त्याने तुला लाईट दिली तर जरा थांब. तर त्या बसचा ड्रायव्हर मला बोलला की, शहाणपणा करु नको, म्हणजे हे ड्रायव्हर एवढे कोणाच्या जीवावर माजवले आहेत? अशा ड्रायव्हरची मी तक्रार केली तरी मला तो अजुन बसवर दिसतोच. त्याच्या डोक्यावर कोणाचा हात आहे मला माहिती नाही.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपल्या महानगरपालिकेच्या बसमध्ये ज्या काही जाहिराती लागलेल्या आहेत. त्याच्यामध्ये काही बंगाली बाबांच्या जाहिराती लागलेल्या आहेत. त्या बंगाली बाबांची आपण शहानिशा केली आहे का? कारण मागच्याच वेळेला शिवसेनेतर्फे आंदोलन करुन एका बंगाली बाबाने एका गृहस्थाला साडेतीन लाखाला लुबाडलेले होते. अशी त्याची आपण रितसर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार केली. शहानिशा केली. त्याच्यानंतर अशी शहानिशा केल्याशिवाय त्यांच्या जाहिराती लावू नका.

**मा. महापौर :-**

सन्मा. श्री. खतगांवकर साहेब, आपण ती तपासणी करा. सन्मा. सदस्य श्री. लक्ष्मण जंगम यांनी प्रस्ताव उपस्थित केला. त्याच्यामध्ये ठरावामध्ये असे होते की, एखादी बस शंभर किलोमीटर जरी चालली तरी त्याला अडीचशे किलोमीटरचे पैसे देणे बंधनकारक होते. सचिव साहेब, दुसरा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ७१ :-**

परिवहन उपक्रमामधील प्रवासी तिकीट दरात वाढ करणेबाबत. (मा. परिवहन समिती सभा दि. १८/१०/२००८ अन्वये शिफारस केलेले प्रकरण क्र. १७)

**ठराव क्र. ६४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम दि. १५/०९/२००५ रोजी सुरु झाला असून सदर उपक्रमाच्या बसेसकरीता प्रथम भाडेसारणी मा. महासभा दि. ०२/०८/२००५ रोजी ठराव क्र. २१ ने मंजुरी दिली होती. यानंतर प्रवासी तिकीटे दरामध्ये वाढ झालेली नाही.

परिवहन उपक्रमामध्ये सध्या ५० बसेस १७ धाव मार्गावर धावत असून परिवहन उपक्रमास होणारा तोटा काही प्रमाणात कमी करणेकरीता मा. परिवहन समिती सभा दि. १८/१०/२००८ प्रकरण क्र.१७, ठराव क्र. १० ने प्रस्तावित भाडे वाढीस मंजुरी दिलेली आहे. भविष्यात व प्रत्येक आर्थिक वर्षात महानगरपालिकेकडून परिवहन सेवेमध्ये प्रमाणात अनुदान मिळणे शक्य होणार नाही. सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये महापालिकेकडून अनुदानाद्वारे मिळणारी रक्कम रु. ७५ लाख आहे. या मिळणाऱ्या अनुदानातुन परिवहन विभागातील विविध खर्च मार्च २००९ पर्यंत भागविणे शक्य होणार नाही. ही बाब विचारात घेवून परिवहन उपक्रमाचा खर्च लक्षात घेता परिवहन उपक्रमाने प्रवासी तिकीटाच्या दरामध्ये खालीलप्रमाणे वाढ सुचवलेली आहे. या प्रवासी तिकीट भाव वाढीचा प्रचलीत भाडे तक्ता (अ) व प्रस्तावित भाडे तक्ता (ब) देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंतर कि.मी. | प्रचलीत भाडे (अ) | प्रस्तावित भाडे (ब) |
|---|---|---|---|
| १ | ० - २ | -- | -- |
| २ | ० - ३ | ४.०० | ४.०० |
| ३ | ३.१ - ५.० | ४.५० | ५.०० |
| ४ | ५.१ - ७.० | ५.०० | ६.०० |
| ५ | ७.१ - ९.० | ६.०० | ७.०० |
| ६ | ९.१ - ११.० | ७.०० | ८.०० |
| ७ | ११.१ - १३.० | ८.०० | ९.०० |
| ८ | १३.१ - १५.० | ९.०० | १०.०० |
| ९ | १५.१ - २०.० | ११.०० | १२.०० |
| १० | २०.१ - २५.० | १३.०० | १४.०० |
| ११ | २५.१ - ३०.० | १४.०० | १५.०० |
| १२ | ३०.१ - ३५.० | १५.०० | १६.०० |

प्रवासी भाडे वाढीमध्ये पहिल्या ३ कि.मी. करीता कोणत्याही प्रकारची भाडे वाढ सुचवलेली नाही. ३.१ कि.मी. ते ५ कि.मी. च्या टप्प्यामध्ये ५० पैशाची वाढ सुचवण्यात आलेली आहे व ५ कि.मी. पासून ते ३५

कि.मी. पर्यंतच्या एकूण ९ टप्प्यामध्ये प्रत्येक टप्प्यात रु. १/- याप्रमाणे वाढ सुचवण्यात आलेली आहे. तरी वरील सर्व बाबींचा विचार करुन परिवहन उपक्रमामधील प्रवासी तिकीट दरवाढीस आजची सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जयंत म. पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रफुल्ल का. पाटील**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्या श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद व अनुमोदक सन्मा. सदस्या श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मुंबई महानगरपालिकेतील नगरसेवक, तसेच नगरसेविका यांना मोफत प्रवास "बेस्ट" (BEST) मध्ये आहे. त्याच धर्तीवर मिरा भाईंदर परिवहन सेवेतील बसेसमध्ये महापालिकेतील सर्व नगरसेवकांना त्यांचा कार्यकाल असेपर्यंत मोफत पास देण्यात यावा.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**
प्रकरण ७२, अतिक्रमणाबाबत आढावा घेणे.

**जुबेर इनामदार :-**
सचिव साहेब, याचा गोषवारा का दिला नाही ?

**प्रेमनाथ पाटील :-**
साहेब, याच्यामध्ये गोषवारा नाही.

**अनिल सावंत :-**
या विषयाचा गोषवारा का देण्यात आला नाही ?

**मा. महापौर :-**
हा विषय यासाठी आणला की, दरवेळी मा. महासभेमध्ये साधारण अर्धा तास ते एक तास हीच चर्चा होत असते. म्हणून हा रितसर विषय आणलेला आहे. यापुढे हा विषय परत परत येता कामा नये.

**जुबेर इनामदार :-**
मा. महापौर साहेब, जेवल्यानंतर निवांतपणे दोन तास चर्चा करु.

**अनिल सावंत :-**
जेवल्यानंतर करा.

**मा. महापौर :-**
जेवणाला एक तास सुट्टी देण्यात येत आहे.
(लंच टाईम दु. १.५० ते ३.१५ वा.)

**मा. महापौर :-**
सचिव साहेब विषयाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**
जेवणानंतर सभा कामकाजाला सुरुवात होत आहे. प्रकरण क्र. ७२, अतिक्रमणाबाबत आढावा घेणे.

**जुबेर इनामदार :-**
आढावा कोणी घ्यायचा.

**एस. ए. खान :-**
अतिक्रमणची माहिती तरी द्या.

**चंद्रकांत वैती :-**
मा. महापौर साहेब, शहरामध्ये कमिशनर साहेब आल्यापासून जवळ जवळ सगळ्यांनीच तक्रारी केलेल्या आहेत. आणि माझे असे एक प्रामाणिक मत आहे की, या शहरामध्ये कुठचाही चिफ ऑफीसर आला असेल त्याच्या कारकिर्दीत किंवा कुठच्याही आयुक्तांच्या कारकिर्दीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम झालेले नाही जेवढे आपल्या कारकिर्दीत झालेले आहे. आणि आपण तो विषय आणलेला आहे. विषय आणुन आढावा मागितला आहे. आत्ता आढावा घ्या, आडवा घ्या कसाही घ्या. त्याच्यातून काय निष्पन्न होणार आहे ते पहिले सांगा की, तुम्ही या विषयात काय करणार आहात ? नसेल तर तुमचा आणि कोणाचा वेळ खराब करु नका. कारण तुम्ही वाईट ऐकणार, आम्ही वाईट बोलू आणि सहन करायचे म्हणजे नेमके काय करायचे ? तुम्ही नेमके काय करणार आहात की, प्रशासनाने विषय आणलेला आहे. मा. महापौर साहेब, तुम्ही विषय आणला आहे तर तुम्ही सांगा की, नेमकी तुमची काय अपेक्षा आहे, सन्मा. सभागृहाने काय सांगितले पाहिजे की, तुम्हाला सभागृहाबद्दल काय सांगायचे आहे ? सन्मा. सभागृहाला माहिती देवू इच्छितो

की, मागच्या काही दोन-तीन कामांबद्दल मी तक्रार केली होती आणि त्याच्यामध्ये आपल्या अधिकाऱ्यांनी फार मोठे अजब रंग दाखवले. मग मला मा. आयुक्त महोदयांना पत्र द्यावे लागले की, सदर बांधकामे तोडल्यामुळे राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान होत आहे असा आपला समज असेल असे माझे मत आहे. म्हणून आपण अशी कुठचीही अनधिकृत बांधकामे तोडू नयेत. असे लिहिले होते. तर पहिला प्रशासनाने खुलासा करावा. नाहीतर उगाच आमचे सन्मा सदस्य भावनिक होतील. आणि काही बोलतील. तुमच्याकडून अपेक्षा व्यक्त करतील. आणि त्या पुर्ण होणार नाहीत असे करु नका.

**मा. महापौर :-**

विषय महत्वाचा यासाठी आणला गेला की, दर मा.महासभेत साधारण अर्धा-एक तास त्याच विषयावर रोज-रोज चर्चा होते. तर ज्या कोणाची आज भावना आहे, तक्रार आहे त्याच्यावर आपण काहीतरी एखादा निर्णय घ्यावा लागेल की, या अतिक्रमणाबाबत आत्ता काय करायला पाहिजे. आणि मा.आयुक्त साहेब, सन्मा. विरोधी पक्ष नेते त्यांची जशी भुमिका आहे तशी माझी सुध्दा भुमिका आहे, आणि पूर्ण सभागृहाची आहे की, अतिक्रमण ज्याप्रमाणे ह्या शहरात वाढत चालले आहे की, त्याला कारवाई करायला कोणीच नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते. गेल्या मिटींगमध्ये सुध्दा या विषयावर मी चर्चा केली होती आणि माझ्या प्रभागामध्ये चालू असलेल्या बांधकामाबद्दल सुध्दा सांगितले. आत्ता सन्मा. विरोधी पक्षनेते श्री. चंद्रकांत वैती साहेबांनी म्हटले की, खरोखरच अनधिकृत बांधकामे मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणात सुरु आहेत. जेव्हा एखादा स्थानिक नगरसेवक सदर बाबत आपणास कळवतात, क्षेत्रिय अधिका-याला कळवतात किंवा संबंधित अधिका-याला कळवतात त्यावेळेला आपले अधिकारी जागेवर जात नाहीत. आणि त्या सुट्टीचा फायदा ते व्यावसायिक लोक म्हणा किंवा घर बांधणारे लोक म्हणा, ते घेवून तिथे चाळी निर्माण करणे किंवा फाउण्डेशन तयार करणे आणि नंतर त्याचे गाळे करुन ते व्यावसायिक करतात आणि अशा वेळेला तिथे स्थानिक नगरसेवक असतो. तो तिथे बदनाम होतो. त्याचा रोष आम्ही का घ्यायचा? अधिका-यांना त्या विषयाबद्दल जर कल्पना दिली असेल तर तिकडचे जे स्थानिक क्षेत्रिय अधिकारी असतील त्यांनी तिकडे जायला पाहिजे. जागेवर जावून प्रत्यक्ष पाहणी करायला पाहिजे. नगरसेवकांना तसे अधिकारच नाहीत की, तिकडे जावून कुठल्याही प्रकारचे बांधकाम थांबवावे. ज्यांना अधिकार आहेत ते काय करतात? आत्ता मा. उपायुक्त श्री. दिवटे साहेब, पुन्हा इकडे आलेले आहेत. त्यांनी काय काम केले आहे? मला जरा खुलासा मिळेल का? आत्ता आल्यानंतर त्यांनी एवढ्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये काय काम केले? कुठल्या प्रभागामध्ये ते फिरले आहेत? आणि कुठल्या प्रभागांमध्ये काम चालू आहे, याची त्यांनी पाहणी केलेली आहे का? आपण मला जरा त्याचा खुलासा द्यावा.

**प्रशांत पालांडे :-**

मा.महापौर साहेब, अनेक प्रकारची अतिक्रमणे आपल्या शहरामध्ये होतच असतात. आम्ही अनेक तक्रारी करतो. त्या तक्रारींची दखल काही वेळा घेतात, काही वेळा घेत नाहीत. पण स्वतः मा. आयुक्त साहेबांना मागच्या वेळी एक वेगळ्या प्रकारचे अतिक्रमण आम्ही निदर्शनास आणून दिले होते. मिरा गावठणामध्ये एक वीस माळ्याची चाळ आहे. ती चाळ पुर्णपणे त्यांनी दुरुस्तीची परवानगी घेतलेली. कुडाची घरे होती. त्यांनी ते अतिक्रमण केले. पक्की दोन मजल्याची, वीस रुमची चाळ बांधली. इथपर्यंत ठिक आहे. त्याने त्याच्यापुढे जावून आपले एम.एम.आर.डी.ए.चे शौचालयाचे काम तिकडे चालू होते. त्या चाळीतले रुम विकले जात नाहीत म्हणून त्याने काहीतरी करुन त्या शौचालयाचे काम थांबविण्यात आले होते. मी स्वतः मा. आयुक्त साहेबांना, त्यांनी त्यावेळी भेट पण दिली होती. त्यांनी ती परिस्थिती पाहिली होती. आत्ता पण तिथे ती अडचण अजुन दूर झालेली नाही. आत्ता त्या एम.एम.आर.डी.ए. च्या शौचालयाचे काम पण बंद पडले आहे. शौचालयाची खाली जी टाकी असते त्या टाकीचे बांधकाम मागच्या चाळीमुळे होत नाही अशी तिकडच्या लोकांची तक्रार आहे. या तक्रारींकडे जर आपले विभगा लक्ष देवू शकत नसेल तर आजची या सभागृहामध्ये चर्चा करण्याची गरजच काय? सन्मा. विरोधी पक्षनेते श्री. चंद्रकांत वैती साहेब म्हणाले की, नक्कीच आपला वेळ फुकट जाईल. एक-दोन तास चर्चा होईल आणि त्याच्यातून काही निष्पन्न होणार नाही. त्या चाळीबद्दल पुढे काय झाले ते मा.आयुक्त साहेब जरा आम्हाला सांगा.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहब, मैने आर.टी.आय. के अंदर एक पत्र दिया था और उसमे यह पुछा था की, मा. महासभाने दि. २०/१२/२००७ को इतिवृत्तांत पेज क्र. २९ प्रकरण क्र. ३ और ४ के बारे मे क्या किया है ? उसमे मा. महापौर साहब ने रुलिंग दिया था की, हर महिने कितने अतिक्रमण हो रहे है उसकी लिस्ट बनायी जायेगी, जो जाहिर की जाएगी। उसके पिछे मेरा मांगने का उद्देश्य यह था की, अगर इस महिने तक की लिस्ट निकाल दी गयी और अगली बार कोई बिल्डींग निकलती है, जो इललिगल बनी है। इसका मतलब अधिकारी ने वहाँ पर कुछ अलग उद्देश से काम किया है। हर महिने लिस्ट निकलने का मतलब होता है की, इस महिने तक बांधकाम प्लींथ लेव्हल या फ्लोअर लेव्हल तक आ गया है। उसको नोटीफाय किया नहीं है। इसका मतलब अधिकारी ने साठगाठ किया है। यह मैने हर महिने लिस्ट निकालने की मांग किया था। यह

बात २९/१२/२००७ की है। कोई कार्यवाही हुई नही। उसके बाद मैने आर.टी.आय. में जवाब मांगा। आर.टी.आय. मे मुझे जो जवाब मिला है, मै आपको उस जवाब का प्रकार दिखाता हूँ। उसका जवाब मिला है ७ मे, जो बिच मे अतिक्रमण के लिए बडी समिती बनी थी और नगरभवन में मिटींग हुई थी, उसका एक कागज दे दिया गया है। और साथ में लिखा गया है की, यह जबाबदारी हमने प्रभाग अधिकारी को दे दी है और इसका पेज जोड रहा हूँ। जो भी जवाब मांगा उसको साफ टाल दिया गया। यह हमेशा होता रहता है। यह जवाब आपके सामने है। आप पढ सकते है। हर महिने लिस्ट निकालने की मांग, मा. महापौर साहब ने रुलिंग दिया हुआ है। हर महिने लिस्ट निकलना चाहिए। और सिर्फ यह जवाब मिलता है की, मा. आयुक्त साहब ने वॉर्ड ऑफीस को ड्युटी दे दी गयी है। सेंट्रल ऑफीस को वॉर्ड ऑफीस से यह मागने तक की जहमत उठाने की जरुरत नहीं है की, उन्होने क्या इल्लिगल काम की लिस्ट निकाली है। मुझे वह भी नहीं दिया गया। सिर्फ यह दिया गया की, ड्युटी बांधी गयी है। कृपया इसका स्पष्टीकरण अभी के अभी किजीए।

**कल्पना म्हात्रे :-**

मा.महापौर साहेब, आपण अतिक्रमणावर नेहमी पत्रव्यवहार करत असतो. अधिकारी तिकडे कधीच लक्ष देत नाहीत. आपण पत्र लिहिले की, ते केराच्या टोपलीत टाकतात. आत्ता मी पंधरा दिवसापुर्वी एक लेटर लिहिलेले आहे. भाईंदर ईस्टला जिथे जकात नाका होता, बंदरवाडी नाका आणि प्रशांत हॉटेल समोर, तिथे आज अतिक्रमण झालेले आहे. पानाची गादी चालू आहे आणि राजरोसपणे तिथे चालू आहे. त्याच्यावर लेटरही दिलेले आहे. पण आजही कारवाई झालेली नाही. म्हणजे अधिकारी काय करतात? आम्ही निदर्शनास आणून दिल्यानंतर पण कारवाई करत नसतील तर पत्रव्यवहार करण्याचा काय उपयोग आहे? आणि महापालिकेच्या जागेतच अतिक्रमण होते तेही ते लोक त्याच्यावरही कार्यवाही करत नाहीत. याचे तुमच्याकडे काय उत्तर आहे? अधिकारी काम करु शकत नसतील तर त्यांच्यावर कार्यवाही केली पाहिजे. त्यांना जर असे वाटतच नाही की, आपल्या जागेत अतिक्रमण होते आणि आपण तिकडे लक्ष दिले पाहिजे याची त्यांना जाणीवच नाही. मग असे ठेवण्यात काय अर्थ आहे. कोणत्याही कामाचे आपण लेटर दिले तर ते त्याच्यावर कधीच कार्यवाही करत नाहीत. आत्ता माझ्या वॉर्डमध्ये पण इंडस्ट्री आहे. इंडस्ट्रीचे गाळे वाढवतात असे आम्ही लेटर लिहिले. त्याच्यावर कधीच कार्यवाही झालेली नाही.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेबांचे मी लक्ष वेधू इच्छितो. शासनाचा २५ जानेवारीचा एक जी.आर. होता आणि त्याच्यामध्ये ठाणे जिल्ह्यातील चाललेले वाढते अतिक्रमण याविषयी स्पष्ट निर्देश म्युनिसिपल कार्पोरेशन्सना देण्यात आले होते. त्याच्या बद्दल माझी एक लक्षवेधीपण झाली होती. त्याला अनुसरुन प्रभाग कार्यालयामध्ये विकली रिपोर्ट डिसप्ले केले जाणार होते आणि ते रिपोर्टींग मा.आयुक्तांना होणार होते. मागच्या लक्षवेधीच्या वेळी मी मा.आयुक्तांना विचारले होते की, तुम्हाला अजुनपर्यंत असे रिपोर्टींग झाले का ? तेव्हा मा.आयुक्त बोलले की, कोणीही रिपोर्टींग करत नाहीत. मी त्याच्यानंतर आढावा घेवून माहिती देतो. अजुनपर्यंत ती माहिती मिळालेली नाही. आणि शासनाचा स्पष्ट जी.आर. आहे की, जे अधिकारी ही माहिती देत नसतील त्यांच्यावर ताबडतोब कार्यवाही करावी म्हणजे उशीरसुध्दा लावू नये असा शासनाचा यु.डी. चा जी.आर.आहे. अजुनपर्यंत कुठच्याही प्रभाग कार्यालयाच्या बाहेर ही काही माहिती लावली जात नाही की, कुठची अतिक्रमणे आहेत? किती अतिक्रमणांवर कार्यवाही केली ? जी नवीन बांधकामे होत आहेत त्यातील अनधिकृत किती आहेत? अधिकृत किती आहेत ? अतिक्रमण हा बिल्डींगचा विषय झाला. फेरीवाल्यांबद्दल तर बोलायलाच नको. मिरा रोड स्टेशनला जर तुम्ही जावून बघाल तर संध्याकाळी तिथे उतरायला, चालायला जागा नसते. एवढा फेरीवाल्यांनी कब्जा केलेला असतो. आमचे प्रभाग अधिकारी श्री.गणेश पाटील साहेब तिथे कार्यवाही करतात. दोन दिवस कार्यवाही केल्यानंतर परत ती कार्यवाही बंद होते. परत अतिक्रमण होते. आणि लोकांना तिथे परमनन्ट स्ट्रक्चर बांधले आहेत. ज्या शहरामध्ये आपण एन्ट्री करतो त्याचीच जर अशी अवस्था असेल तर आतमध्ये शहरामध्ये काय काय चाललेले असेल ?

**उमा सपार :-**

मा.आयुक्त साहेबांच्या परवानगीने बोलते. माझ्या वॉर्ड क्र. ५२ मध्ये बांधकाम चालू आहे. मी माहितीच्या अधिकारामध्ये पत्र टाकलेले आहे. पण मला त्याचे बरोबर उत्तर मिळत नाही. मला ती सगळी माहिती द्या आणि त्याचा अहवाल मला ताबडतोब पाठवून द्यायला लावा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, माझ्या वॉर्डमध्ये दोन तीन लोकांनी गल्लीमध्ये एवढे बांधकाम वाढवलेले आहे. मी त्याचे पत्र देखील दिले. तोंडी देखील सांगितले. आज एका माणसाने एवढे बांधकाम वाढवले. उद्या समोरचा माणूस वाढवेल. मग ती गल्ली पुर्ण पॅक होवून जाईल. असे मी श्री.यादव साहेबांना सांगितले. श्री.यादव साहेबांनी मला एवढेच उत्तर दिले की, आम्ही त्यांना नोटीस देतो, हे करतो, ते करतो. या गोष्टीला दोन-तीन महिने झाले. तिकडे लोक राहायला आले. तर त्यांनी काय केले त्याचे मला जरा उत्तर द्यावे. दुसरा विषय मिरा रोडला डेपोच्या जागेवर अतिक्रमण झाले. तिकडे गाळे बनवून विकले. तो एक विषय.

**मा. महापौर :-**

मिरा रोडला कुठे ?

**नयना म्हात्रे :-**

मिरा रोडला कुठे ते तुमच्या अधिका-यांना विचारा. आपली महापालिका ती केसदेखील जिंकलेली आहे. तुमच्या विधी सल्लागारांना विचारा आणि माझ्या प्रभागामध्ये बाहेर जिने काढले. ते जिने आपल्या रस्त्यावर, फुटपाथवर आहेत. ते सुध्दा घरे भाड्याने द्यायचे. म्हणजे खालचे आम्ही वापरायचे आणि वरचे भाड्याने द्यायचे. त्याच्याकरिता मी तक्रार केली. तर काही लोकांनी असा एक माहोल तयार केला. लोकांच्या सह्या वगैरे घेतल्या की, आम्हाला त्याची अडचण नाही. तर लोकांना जर अडचण नसेल म्हणून लोकांनी रस्त्यावर घर बांधायचे का ? तर ते जिने काढायला पाहिजेत. मी माझ्या प्रभागाचे बोलते. तुम्ही अख्या मिरा भाईंदरचे काढा, नका काढू तो तुमचा विषय आहे. आणि मी स्टँडींगला असताना मला मा. आयुक्त साहेबांनी असे सांगितलेले की, फुटपाथवर ज्या सगळ्या वस्तु ठेवलेल्या आहेत त्या उचलणार. तर ती देखील कारवाई केलेली नाही. तर मिरा भाईंदरचे जे सगळे अतिक्रमण आहे ते काढून टाका.

**विजया वैती :-**

मा. महापौर साहेब, जी.सी.सी. क्लबजवळ होंडा सर्व्हीस सेंटर आहे. तिथे मी लेटर लिहिलेले. कारवाई केलेली आहे. पण सकाळी कारवाई होते आणि संध्याकाळी आहे तीच परिस्थिती असते. मग त्या कारवाईचे महत्व काय? आणि हटकेश उद्योग नगर फेरीवाले येथे मला एक पत्र आले आहे की, २१/०४ ला, २९/०६ ला आणि १०/०७ ला तिथे हटविण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण मी तिथे माहिती घेतली तर असा एकही दिवस हटवलेले नाही. आणि मला हे खोटे पत्र पाठवलेले आहे. मग असे पत्र पाठविण्याचा उद्देश काय आहे ? जर तिथे कार्यवाहीच केलेली नसेल तर.....

**चंद्रकांत वैती :-**

त्या अधिका-यावर आपल्याला कार्यवाही करायची आहे.

**विजया वैती :-**

माझ्या वॉर्डमध्ये अजुन एक असे बांधकाम चालू आहे. मी त्याचे फोनवर सांगितले की, त्या कारवाईचे काय ? तर प्रत्यक्ष तिकडे तुमचा माणूस उभा करा तरच आम्ही त्या कार्यवाहीला थांबवू असे पण सांगण्यात आले आहे.

**मा. महापौर :-**

आपल्याला कोणी सांगितले ?

**विजया वैती :-**

श्री. गणेश पाटील

**मा. महापौर :-**

आणि आपल्याला पत्र कोणी दिले की, कार्यवाही केली गेली.

**विजया वैती :-**

प्रभाग अधिकारी. आम्ही तिथे उभे राहून हटवायचे असेल तर कसे होईल.

**कल्पना ठाकूर :-**

माझ्या वॉर्ड क्र. ६३ मध्ये संघवी टॉवरच्या बाजुला सृष्टी ब्रिजजवळ एक गॅरेज आहे. त्याचे मी लेटर दिले होते. तर त्याचे काय झाले ?

**अनिल सावंत :-**

मा.महापौर साहेब, या गॅरेजबद्दल तुम्ही तिथेच आदेश दिले होते की, ताबडतोब जावून तोडा.

**जुबेर इनामदार :-**

मा. महासभा संपायच्या आधी ते गॅरेज तुटेल.

**चंद्रकांत वैती :-**

सदर जागा महापालिकेची आहे.

**जुबेर इनामदार :-**

तिथे सी.आर.झेड. चे उल्लंघन होते.

**मा. महापौर :-**

श्री. पाटील साहेबांचे म्हणणे आहे की, ते तोडले.

**जुबेर इनामदार :-**

अधिका-यांना कामाला लावा.

**कल्पना ठाकूर :-**

तसेच आहे. तोडलेले लेटर दिले होते.

**मा. महापौर :-**

कागदपत्रांवर तोडलेले आहे. रेकॉर्डवर तोडलेले आहे. ॲक्च्युअल तिथे काम चालू आहे.

**कल्पना ठाकूर :-**

ते गॅरेज चालू आहे.

**गणेश पाटील :-**

गॅरेज तोडलेले आहे की, तोडलेले नाही असे म्हणायचे आहे का ?

**कल्पना ठाकूर :-**

पण तिथे सर्व्हिस सेंटर चालू आहे ना ?

**मा. महापौर :-**

त्याचे म्हणणे असे आहे की, गॅरेज तोडले असेल तरी चालू आहे. पण सन्मा. श्री. चंद्रकांत वैतीजींचे म्हणणे आहे की, ती जागा महापालिकेची आहे.

**जुबेर इनामदार :-**

श्री.पाटील साहेब, जागा महापालिकेची आहे. त्यांनी जे गॅरेजचे बांधकाम केले होते ते तुम्ही तोडले. सर्व्हिस स्टेशन अजुनही तिथे तसेच चालू आहे. सर्व्हिस स्टेशन बंद करण्यात आलेले नाही.

**चंद्रकांत वैती :-**

त्या जागेबद्दल सांगतो की, आपण गार्डन विकसित केले आहे. त्याकडे एक महापालिकेचा डी.पी.रोड जातो. डि.पी.रोडचा वापर होतो. तर बाजुला जी उर्वरित जागा राहिली आहे. त्याच्यामध्ये काय वॉश चालू केले आहे. सर्व्हिस स्टेशन चालू आहे.

**मा.आयुक्त :-**

गॅरेज तोडलेले आहे. पण जरी तिथे गॅरेज सुरु असेल तर ते आज संध्याकाळपर्यंत निघून जाईल. गॅरेज तोडले नसेल तर गॅरेज तोडून तिथले सामान पण काढून टाकावे आणि ते आपल्या ताब्यात घ्यावे.

**कांचन पुजारे :-**

त्रिवेदी बिल्डर, हायब्रीज चौकमध्ये त्यांचे अतिक्रमण झालेले आहे. पण तो स्लॅब हँगींग आहे. मी श्री.गणेश पाटील यांना लेटरपण दिले आहे. पण त्याचे काही झाले नाही.

**मा. आयुक्त :-**

मी सन्मा. सभागृहाचे ऐकतो. परंतु आपण याच्यात सविस्तर चर्चा करु. आम्ही काय केले आहे तेही मी सांगतो. जोपर्यंत आपण प्रत्येक अतिक्रमण धारकावर एम.आर.टी.पी. ची केस दाखल करणार नाही तोपर्यंत हे थांबणार नाही. आणि मी आत्ता याप्रमाणे सन्मा. सभागृहाला विनंती करतो की, तुम्ही माझ्या मागे राहा. मी सगळ्यांवर एम.आर.टी.पी. च्या केस दाखल करतो. आणि आपण ह्या गॅरेजपासून सुरु करु.

**कांचन पुजारी :-**

अतिक्रमण झालेले आहे. पण ते हँगींग आहे. ते कधीपण पडू शकते.

**एस.ए.खान :-**

मा. आयुक्त साहेब, सन्मा. सदस्या सौ. कांचन पुजारे जे सांगतात ती बिल्डींग तोडलेली आहे. पण अर्धवट तोडलेली आहे आणि इन डेंजर कंडीशन आहे. ती परत कधीही पडू शकते. ते पुर्ण जमिनदोस्त करुन टाका.

**मा.महापौर :-**

काढून घेवू.

**मर्लिन डिसा :-**

वॉर्ड नं. ६० मे दो जगह पर गॅरेजस है, साई बाबा नगर और रश्मी पार्क सोसायटी के वहाँ। लेटर्स दे देकर थक चुकी हूँ लेकिन श्री.गणेश पाटील साहब का यह कहना है की, डंपर और टोईंग व्हॅन नही है। जब तक वह नही आएगा वहा से हटा नहीं सकते। और सर्व्हे नं. ७२८ मे लोगो ने छोटी छोटी दुकाने काँक्रीटाइज कर दिए है। फाय टू सिक्स शॉप्स हॅव बीन काँक्रीटाइज्ड.

**मा. आयुक्त :-**

मॅडम आपण टोईंग व्हॅनची परमिशन दिलेली आहे. पण ह्या एका केससाठी श्री.गणेश पाटील, तुम्ही एक दिवस भाड्याने टोईंग व्हॅन घ्या. त्याचे बिल आपण महानगरपालिकेकडून देवू आणि ते काढून घ्या.

**मर्लिन डिसा :-**

नो हॉकींग झोन मे जो फेरिवाले बैठते है वह शाम के टाईम बैठते है। लेकिन शाम के टाईम वहा पर कारवाई करने के लिए कोई नही होता है। ॲण्ड व्हॉट अबाउट सोसायटीज। इससे छोटे छोटे जगह जो पॅराफीट्स होते है, फीफ्थ फ्लोअर ॲन्ड सिक्स्थ फ्लोअर वहा छोटेसे पॅराफीटपर उन्होने बेडरुम एक्स्टेन्शन किए है। इट इज अलाव विथआउट परमिशन ? जो टेरेस है इन्क्रोच करके कमर्शियल किया है। वह लेटर्स देकर भी वहाँ र कुछ काम नहीं हो रहा है। फस्ट एट टू टेन मन्थ्स आय हॅव बीन कम्प्लेनींग लेकिन वहा पर कुछ ॲक्शन नहीं हो रहा है।

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. महापौर साहेब, अतिक्रमणचा विषय आहे. शहरामध्ये वारंवार होणारे अतिक्रमण, मा. महासभेमध्ये वारंवार होणारी चर्चा. आमच्या नियमामध्ये आहे की, मा. आयुक्तांना माहिती दिल्यानंतर महापालिकेच्या अधिका-यांना माहिती दिल्यानंतर चोविस तासांच्या अवधीमध्ये ते अतिक्रमण हटवता येते. ते अतिक्रमण हटविण्याचा विषय तर बाजुलाच राहिला. त्याला इतकी संधी दिली जाते. बरेच कागद काळे करण्याची अधिकाऱ्यांना जशी सवय झालेली आहे. त्याचा फायदा घेउन ते न्यायप्रविष्ठ होईपर्यत आणि नंतर आम्हाला, महापालिकेला आपले वकील उभे करून विधी विभागाला आपला दुसरा कारभार चालू करून त्यांच्याविरूद्ध आम्हाला परत खटले लढवायचे. हे कुठपर्यंत योग्य आहे? ज्या वस्तुला महापालिकेने अनधिकृत ठरवले, त्याच्यावर कारवाई करता येत नाही? तुम्हाला एक छोटेसे उदाहरण देतो. दोन दिवस आधी फोनवर बोलणे झाले होते. शितल नगरमध्ये एक अनधिकृत बांधकाम आहे. सर्व्हे क्र. ४८२, श्री सतिश कदम विरूद्ध महापालिकेचा खटला चालूच आहे. त्या विषयाबद्दल एक बाजुला केलेले पुर्ण बांधकाम अनधिकृत आहे त्याची माहिती मला माहितीच्या अधिकारामध्ये आहे. त्या बांधकामाबद्दल त्याचा फक्त एक टप्पा त्याच्यावर पंचनामा करण्यात आला. त्याचा खटला चालू आहे विरोधकाला इतका फायदा देण्यात आला की, त्याने पुर्ण बांधकाम आज त्याने हायकोर्टमध्ये त्याच्याबद्दल स्टे घेतला. आणि तो वन साईडेड स्टे आहे. कारण आमचे कुठले वकील तिथे उपस्थितच नव्हते. अशा पद्धतीची सुट दिली जाते ती जाणून बुजुन दिली जाते असे वाटत नाही का? आपले अधिकारी किंवा आपली महानगरपालिका अंशावर कारवाई करण्याकरिता सक्षम नाही का? की, त्यांची करायची इच्छा नाही? अतिक्रमण बद्दल ते बांधकामाचे झाले. ते तर आमच्या नशीबातच आलेले आहे. सन्मा. श्री. चंद्रकांत वैती साहेबांनी तर स्पष्ट उल्लेखच केला की, राष्ट्रीय संपत्तीचा कदाचित नाश होणार असेल त्याच्याकरिता अनधिकृत बांधकाम काढले जात नाही. आम्ही ठराव मांडला १९/०७/२००८ मध्ये प्रकरण क्र. २७, ठराव क्र. २७ अतिक्रमण काढण्याबाबत, फेरीवाल्यांना हटविण्याबाबत ज्या ज्या परिसरामध्ये आपला ठराव निश्चित करण्यात आलेला आहे. त्यावरसुद्धा कारवाई केली जात नाही. आत्ता त्याचा आढावा फक्त नगरसेवकांनीच घ्यावा. लोकप्रतिनिधींनीच घ्यावा. कुठेतरी त्या अधिकाऱ्यांना ज्यांना आम्ही आज क्लास १, क्लास २, गाड्या, ए.सी. ऑफिसेस इतक्या सगळ्या सोयीसुविधा देउनसुद्धा पुन्हा पाहिजे तेवढा मनुष्यबळ देउनसुद्धा ती कामे होत नाहीत तर याचा आढावा आम्ही घ्यायचा की, आयुक्त साहेबांनी घ्यायचा की, प्रशासनाने घ्यायचा? अतिक्रमणामध्ये गॅरेजेस, गॅरेजच्या बाहेर उभ्या असणाऱ्या गाड्या विचारले तर आमच्याकडे टोईंगची गाडीच उपलब्ध नाही. ती कोणी उपलब्ध करून द्यायची आहे? त्याचा निर्णय घेणे गरजेचे आहे. पुर्ण शहरामध्ये जेवढे गॅरेजेस आहेत. त्यांच्या शंभर दिडशे स्क्वेअर फुटच्या गॅरेजमध्ये ते गाड्या कुठे उभे करतील? या गाड्या आमच्या रस्त्यावर उभ्या असतात. महानगरपालिकेच्या मुख्य रस्त्यावर शहरामध्ये जागोजागी त्या गाड्या उभ्या असतात. रिक्शाची रिपेअरींग चालू आहे, गाड्यांची रिपेअरींग चालू आहे, पेंन्टींग शॉप चालू आहे. अशा गाड्या उचलण्याकरिता आपल्याकडे काम यंत्रणा उपलब्ध आहे त्याविषयाबाबत आजपर्यंत कधीच कुठला विषय यांनी का आणला नाही? आढावा घेणे म्हणजे कुठल्याही कारवाईचे विश्लेषण करणे, त्याचा पोस्टमार्टम म्हणतो तसाच झाला. मग त्यातुन काहीतरी निष्पन्न झाले पाहिजे. आज आपण आढावा घ्यायला उभे राहिलो. इथे विचार चर्चा चालू आहे. त्याचे निष्पन्न आलेच पाहिजे. नाही तर अशा अधिकाऱ्यांवर ज्यांना अशा पद्धतीनचे आदेश दिले जातात. त्यांच्यावर कारवाई करा. आम्हाला तुमच्याकडून बरीच काही अपेक्षा होती.

**कांचन पुजारी :-**

गाड्या उभ्या असल्यामुळे ट्राफीक पण होते.

**मर्लिन डिसा :-**

शितल नगर मे एम.टी.एन.एल. रोड पर साई नुपुर नाम का रेसिडेन्शीअल एरिया था, वहापर टोटली कमर्शिअल करनेवाले है ॲन्ड आय डोन्ट नो इफ परमिशन इज टेकन फ्रॉम द कॉर्पोरेशन.

**वर्षा भानुशाली :-**

मा. महापौर जी की परमिशनसे बोलना चाहती हू। मेरे वॉर्ड क्र. ४७ मे मेन रोड पर एक इललिगल बिल्डींग का काम चालू है। उसका करीबन मैने चार लेटर दिया हुआ है। अभी तक उसके बारे मे कुछ भी कार्यवाही नही किया है और वह बिल्डींग का काम चालू है। मा. आयुक्त साहब को भी मैने इसके बारे मे लेटर दिया हुआ है। तो यह हम लोगो का कार्यवाही सिर्फ लेटर मे होगा की, आप लोग कुछ करोगे? जैसे अभी सर ने बोला की, अधिकारीयो को ऑफिस देते हो तो यह सब क्या काम के है। अगर आप लोग हम लोगो को यह लेटर ही देना रहता है.....

**मा. महापौर :-**

याच्यात दोघांच्या पॅरेलल वॉर्डची मधली भिंत आहे, ही इमारत अशी आहे की, बसमेंट बांधले आहे ते इललिगल आहेत. अजुनही इललिगल आहे आणि त्याला आपण हमीपत्र घेतले की, ही बिल्डींग मी पाडणार आहे आणि वरचे काम नंतर करणार. ही परवानगी आपण त्याला दिलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे ती

आपलीच सही आहे. आपण जागेवर जाउन पाहणीसुद्धा केली. त्यावेळी ग्राउन्ड फ्लोअर होता, आज सात माळे झाले. पण आपण कारवाईच केली नाही. म्हणजे इललिगल बिल्डींगला आपण परवानगी देतो.

**वर्षा भानुशाली :-**

मेन रोड पर सिर्फ दस फुट का रास्ता छोडा है। अधिकारी को दस बार बताते हुए भी, वह काम चालू किए हुए आज छह महिना हो गया है। आपने छह महिने मे क्या कारवाई की है। और मैने उसके बारे मे तीन से चार लेटर दिया हुआ है। एक २७/०८ को दिया है। १०/०९ को दिया है। २०/०९ को दिया है। तो एक इललिगल बिल्डींग के उपर कारवाई के लिए आपको कितना टाईम चाहिए। हम खुद नगरसेवक आपको यह लेटर लाकर देते है। उसके उपर आप कुछ करते नही, तो फिर आप अपने हिसाब से क्या करोगे? और यह चीज का आप कब तक जवाब दोगे? मा. आयुक्त साहब, आप खुद उठकर बताईए की, इस बिल्डींग पर कारवाई कब होगी? और नही होगी तो फिर वह भी बता दिजिए। क्योंकी अब तक उसके चार माले बन गये है। शायद वह सात माले की, बनाने वाला है। तो आपने उसके कुछ बोला है? इसके लिए आपने उसको परमिशन दिया है क्या?

**मा. आयुक्त :-**

त्यांचा आग्रह आहे म्हणून आपण उत्तर देउ या मी ती केस बघुन घेतो आणि आपण त्यांना जोपर्यंत अनधिकृत बांधकाम होणार नाही.....

**मा. महापौर :-**

साहेब, आपल्याला पुर्ण केस माहिती आहे. कशाला परत गोलगोल?

**मा. आयुक्त :-**

मला मिाहती नाही.

**मा. महापौर :-**

काय नाही? आपण त्या जागेवर जाउन आले.

**वर्षा भानुशाली :-**

आपको जगह दिखाया हुआ है।

**मा. आयुक्त :-**

जागेवर जाणे आणि केस माहिती असणे याच्यामध्ये फरक असतो. जागेवर जाउन तुम्हाला अनुभव आहे. मला समजुन घेउ द्या. मी समजुन घेतो आणि पुढे जातो.

**वर्षा भानुशाली :-**

सर, यह कुछ जवाब नही हुआ। आपको खुद हम लेकर गये थे। वह बिल्डींग भी बताया हुआ है। लेकीन हर बार हम लोगो को यही जवाब होता है। फिर आप विषय ही मत लिजिए। अगर किसी चिज का आप सोल्युशन देते नही तो वह विषय आप मत लिजिए। हर बार इलिगल काम की चर्चा होती है लेकीन उसका कुछ भी सोल्युशन निकलता नही है।

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, याठिकाणी अतिक्रमणाबाबत आढावा घेणे असा विषय आणला. मला असे वाटते त्याच्यानंतर त्या आढाव्यामध्ये जी चर्चा होईल, जे दोषी आढळतील त्यांच्यावर कार्यवाही होईल अशा पद्धतीची पुढे दोन अक्षरे आणखीन लिहायची गरज होती. मला वाटते त्याच्यात वाढवून घेतली तर तशी नोट करून घ्या. एखाद्या जागेवर अतिक्रमण होतात. तो एक वेगळा विषय आहे. आणि मा. आयुक्त साहेब, गणपती मार्बलच्या बाजुला डी.पी. रोड आहे. त्या डी.पी. रोडवर मार्बलचे अतिक्रमण झाले. तुम्हाला प्रत्यक्ष नेउन दाखवले. पण ते अतिक्रमण एवढे विचित्र आहे. मला असे वाटते सगळ्या लोकांना जाउन तिकडे एकदा भेट द्यायची गरज आहे डी.पी. रोड त्याठिकाणी चक्क डायवर्ट केलेला आहे. त्याचे कारण असे की, बाजुच्या बिल्डरने त्याठिकाणी सात आठ दुकाने बनवली आणि त्याला रोड मिळावा म्हणून तो रोड त्या साईडला गेला आहे. माहितीसाठी सगळ्या लोकांनी जाउन बघायची गरज आहे. मा. आयुक्त साहेब, तुम्हाला मी नेउन दाखवले होते. दुसरा विषय तुमच्या बंगल्याकडे आपण जातो. पोलिस स्टेशनच्या बाजुला सोसायटीच्या प्रिमायसेसमध्ये स्ट्रक्चर चालू केले. आम्ही दोन तीन वेळा तक्रारी केल्या. जाउन तोडले. नंतर काय कारण आले काय माहिती. मध्ये नोटीस दिली आणि नोटीस दिल्यानंतर कोर्टामध्ये जाउन स्टे आणला. सर्वसामान्य माणसाची आणि आमची सगळ्यांची अशी समज आहे की, स्टे म्हणजे ॲज इट इज, जसे असेल तसे, त्या कंडीशनमध्ये थांबायला पाहिजे. पण हा कुठला स्टे होता माहिती नाही. की, स्टे च्या नावाखाली दोन माळे बांधून गेले. मला वाटते तुमच्या नेहमीच्या येण्याजाण्याच्या रस्त्यावरचे आहे. बाकीच्या ठिकाणी तुम्हाला विचारायची गरज आली की, कुठल्या कोपऱ्यावर चालले आहे. पण इथे जरासुद्धा विचारायची गरज नाही. फक्त जाताना एक डोळा जर तुम्ही उजव्या बाजुला फिरवलात तर तुमच्या लक्षात येईल. बऱ्याच वेळा तुम्ही बघितले असेल. आणि मग मला सांगा जर अशा पद्धतीचे काम होत असेल, मी श्री. दिवटे साहेबांना सांगितले. साहेब, जरा दोन मिनिटे बोलणार आहे. तुम्ही जर ऐकलात तर ही फार मजेची गोष्ट आहे. आपले अतिक्रमणचे डेप्युटी श्री. दिवटे साहेबांना मी सांगितले की, अशा पद्धतीचे तिथे अतिक्रमण काम चालू आहे.

श्री. दिवटे साहेबांनी मला सांगितले की, माणसे पाठवतो. ती माणसे एक गाडी भरून गेली. दहा पंधरा लोक गेलेले. त्या स्ट्रक्चरच्या बाजुने गोल गोल फिरत होते. त्याच्यामध्ये श्री. अरविंद पाटील होते. बाकीची सगळी मंडळी होती. ते म्हणाले की, त्याला जेसीबी शिवाय ते तुटणार नाही. आम्ही मोठे घण आणले आहेत. पण त्याच्याने काही होत नाही. मध्ये दोन ठिकाणी त्यांनी दोन बाय दोनचे तोडले आणि निघुन गेले. मी. श्री. दिवटे साहेबांना सांगितले की, त्यांच्याने जमत नाही. तुम्ही जेसीबी द्या. ते म्हणाले की, मी इथे आल्यापासुन जेसीबी बघितलाच नाही. तुम्ही श्री. वाघ यांना सांगा. मला असे वाटते की, आपण सगळे लोक गावाला आणि इथेही म्हणतो की, वाघ असतो तो मोठा आणि दिवटा त्यांच्यापेक्षा लहान. मग हा दिवटा पुढे जाउन बसला आणि वाघ खाली वाघाकडेच जायचे असेल तर वाघाला तिथे बसवले पाहिजे. आणि दिवट्याला खाली बसवले पाहिजे. दिवटा जर वर बसला तर उलटा वाघाला सांगतो. आणि म्हणून वाघाला तिथे बसवले पाहिजे म्हणजे दिवटा खाली बरोबर ऐकेल. तुम्ही डेप्युटी म्हणून तुमची ही उत्तरे आहेत का? आणि हे श्री. वाघ, श्री. दिवटे, काय नावे आणि कारवाई कशी म्हणून कमिशनर साहेब, हे वाघ, दिवटे आहेत का हे नक्की तपासुन घेतले पाहिजे. नाहीतर हे जंगलात जाउ द्या तिकडे तरी ह्यांचे काय झाले तर बघु पण इथे नको. इथे यांनी डोक्याला फार ताण दिला.

**जयंत पाटील :-**

आपण कितीही बोललो तरी काही होणार नाही. गेले चार टर्म आम्ही हेच बोलत आहोत. अधिकारी येतात आणि जातात.

**मा. महापौर :-**

चर्चा थांबवा.

**लक्ष्मण जंगम :-**

आणि जर काहीच होणार नसेल तर श्री. वैती साहेबांनी सांगितले तसे....

**जयंत पाटील :-**

खरे म्हणजे आपण आपला वेळ खर्च करतो. जर या विषयावर प्रशासन गंभीर असेल. तरच उपयोग होणार आहे. हे काय चालले आहे? मी तुमच्याकडे रायटींगमध्ये एक कम्प्लेंट केली. त्याचे फोटोग्राफ आपल्याला दाखवले काही झाले नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

सन्मा. श्री. जयंतदादा पाटील मला असे वाटते की, जर आपण इथे चर्चा केली तर त्याच्यापासुन यांचे काही बाकीचे बेनिफिट आहे का?

**जयंत पाटील :-**

वरून तुम्ही त्याला सतरा तारखेला हेअरिंग दिले. मी सतरा तारखेला साडे अकरा वाजता आलो. बारा वाजता फोन केला. त्याला एक तारीख दिली. तो आलाच नाही तर तुम्ही एक तारीख कोणाला दिली. हे काय चालले आहे? म्हणजे याच्यामागे काही आर्थिक संबंध असेल तर सांगा. आम्ही काही बोलत नाही. सांगा आमचे खिसे भरलेले आहेत. मालपानी पाहेचलेले आहे, विषय संपला. आम्ही कशाला याच्यामागे करू? तुमचा एकही रस्ता मोकळा नाही. अतिक्रमणामध्ये हा अनधिकृत बांधकामाचा एक विषय झाला. कुठला रस्ता मोकळा आहे ते सांगा. मी दोन महिन्यांपुर्वी ठराव केला आहे. काही झालेले नाही. मग तुम्ही हे विभाग कशाला ठेवायचे? त्या विभागांची आवश्यकता आहे का? एवढ्या ऐंशी नगरसेवकांचा वेळ घालविण्यासाठी विषय आणलेला आहे.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. सर्व सन्मा. सदस्यांचे जे विषय आहेत. त्याचे सविस्तर उत्तर मी जरूर देणार आहे. परंतु, असे एकटे एकटे उत्तर देण्यापेक्षा सगळ्यांना बोलून होउ द्या. आपण ही सभा आजच्या ऐवजी आणखीन उद्या जर चालवली तरी माझी तयारी आहे. आपण सविस्तर उत्तर देवू.

(सभागृहात गोंधळ)

**चंद्रकांत वैती :-**

मा. आयुक्त साहेब, मी आधी आपल्याला सांगितले की, ह्या सभेत आपण काही निर्णयाप्रत जाणार आहोत का तर या विषयावर चर्चा करा. साहेब, न संपणारा विषय आहे. तुम्हाला सांगतो की, काही महानगरपालिकांमध्ये उदाहरणे आहेत की, ज्या नगरसेवकांनी त्याच्यामध्ये इंटरफेअर केले त्याचे नगरसेवक पद बाद होते असे लोक दबाव टाकतात त्याची रिपोर्टींग अधिकारी का करत नाहीत? आणि काय बांधकामे केली आहेत? बांधकामे केली आहेत, लॉज बांधले आहेत आणि आपण त्याला पाण्याचे कनेक्शन दिले. लाईटसाठी परवानग्या दिल्या. आज म्हाडाने मुंबई महानगरपालिकेला पत्र दिले की, इलिगल बिल्डींगमध्ये पाणी पुरवठा आणि वीज पुरवठा देण्यासाठी एन.ओ.सी. देउ नये. आपण तर प्राधान्याने देतो. ज्याच्यामध्ये रहिवासी राहतात त्यांना देत नाही. पण एखाद्या गरिबाने आपली खिडकी बाहेर काढली असेल, नविन दरवाजा काढला असेल तर आपले लोक तोडायला जातात. त्या श्री. राठोड महोदयांनी एका झोपड्याचे पत्रे जसे पापड तोडावा तसे जेसीबीने तोडले होते. अशी विद्वान माणसे आपल्याकडे आहेत. मग त्यांच्याकडून खरी कामे

करून घ्या. नाहीतर या अतिक्रमणामध्ये तुम्ही लोक लावू नका. तसे तुम्ही आमच्याकडे खुप प्रयोग केलेले आहेत. अधिकाऱ्यांना खुप जबाबदाऱ्या दिलेल्या आहेत. ज्याला जबाबदारी द्याल त्याला एकाच डिपार्टमेंटची द्या. साहेब, तुमचे प्रयोग असफल झालेले आहेत. पण परत सांगतो की, जर निर्णयापर्यंत जात असाल तर चर्चा करा. नाहीतर उगाच तुमचा आमचा सगळ्यांचा मुड खराब होईल.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहेब, आप सक्षम अधिकारी है। आपसे हमको बहूत आशा है। ऐसा जवाब, मै आपको एक छोटासा एक एक्झाम्पल देता हू, अतिक्रमण विभाग का क्या हालचाल है। हॉटेल साई वेज, वेदरशेड बांधा हुआ है। हॉटेल नवरंग, वेदरशेड बांधा हुआ है। इन्फॉरमेशन है। कोई फॉरमॅलिटी नही हुई है। इनकी नजर वहॉपर पडती नही है। इनकी नजर कहा पडती है? ऐसा जवाब देनेवालो को तुरंत बरखास्त कर देना चाहिए। आप इनसे पुछीए क्या सविस्तर उत्तर देंगे?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, श्री. दिवटे साहेबांचे म्हणणे असे आहे की, जर मी असे बोललो किंवा जर काम केले नाही तर माझी इकडून बदली होईल. त्यांची बदली करू नका. जसे बैलांना शेतामध्ये काम देतात तसे त्यांना काम द्या.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर साहेब, परमिशन द्या. मा. आयुक्त साहेब, आपण जरा माझ्याकडे लक्ष द्या. सगळ्यांच्या शेवटी बोलते. अतिक्रमणाचा विषय आलेला आहे. मा. आयुक्त साहेब, मी आपल्याला ड्रीमलॅन्ड पार्कचे १६६ नंबरचे पत्र दिले होते. त्याच्यावर श्री. गणेश पाटील यांनी आणि अतिक्रमण विभागाने काय कारवाई केली याचे मला उत्तर पाहिजे. मी वारंवार सांगून, पत्रव्यवहार केलेले आहेत. त्याच्यावर ते तोडले पाहिजे ही माझी मागणी आहे. ते जर तोडले नाही तर मी कुठल्या थराला जाईन हे मी सांगू शकत नाही. मी शॉर्टकटमध्ये फक्त एवढाच इशारा देते. कारण अशा बिल्डरवर कारवाई झाली पाहिजे. आजुबाजुला बिल्डींगपॅक आहे. एवढ्याश्या जागेमध्ये बिल्डींग बांधलेली आहे. ती बिल्डींग तोडली पाहिजे अशी माझी मागणी आहे. अतिक्रमणाचा विषय निघालेला आहे. याच्यामध्ये बरेचसे विषय आहेत पण मी बोलत नाही. आम्ही वारंवार पत्रव्यवहार करूनही त्या बिल्डींगमध्ये पाणी पुरवठा अभियंत्यांनी पाण्याचे कनेक्शन दिलेले आहे. त्यांनाही माझे सांगणे आहे की, लाइन कापून टाकावी. कापली नाही तर मी पुढचे पाउल उचलणार. मी इलेक्ट्रीक वाल्यांना सुद्धा पत्र दिलेले आहे की, त्यांनी मिटर का द्यावा? तिकडेही पत्र दिलेले आहे. त्याच्यावरही माझी ॲक्शन असणार. आणि चौथे, आपण तिकडे बोर्ड लावतो. मग अतिक्रमणे झाले, कोर्टात गेले, स्टे आले, स्टे गेले. हे जे विधी अधिकारी आहेत हे ही बरोबर काम करत नाहीत. सगळे दिशाभुल करायचे काम मिळून करतात. असे करू नये अशी माझी सुचना आहे दुसरी गोष्ट आपण त्याठिकाणी महानगरपालिकेचा बोर्ड लावावा ही माझी सुचना आहे. माझ्या वॉर्डमध्ये ज्या ज्या ठिकाणी मी पत्र दिले त्या त्या ठिकाणी बोर्ड लागले पाहिजेत. जे घरे घेणारे लोक आहेत त्या लोकांची फार मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे. आयुष्यभराचा पैसा, कष्टाचा कमवलेला पैसा, लोन घेतलेला पैसा घरामध्ये टाकून फसवणूक होत आहे. कधी काय वेळ येईल सांगता येत नाही. कधी बुलडोझर लागेल की, वाचेल असेही सांगता येत नाही. म्हणून माझी मा. महापौरांना विनंती आहे की, आपण याची काळजीपुर्वक दखल घ्यावी. मला याचे उत्तर पाहिजे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, मा. आयुक्त साहेब, आपण याच्यापुर्वी सुद्धा प्रत्येक बांधकाम झाले, प्लींथ, तळाला सुरूवात झाल्यानंतर त्याने त्याच्या बोर्डवर त्याला जेवढ्या परमिशन आहत. ह्या परमिशन लावल्या पाहिजेत. मागचा काळ गेला त्यावेळेला सबंध लावत होते. आत्ता बघितले गेले तर ७० टक्के लागत नाहीत. फक्त ३० टक्के लागलेले आहेत. आणि ७० टक्के बोर्ड लागलेले नाहीत. ते अधिकृत आहेत की, अनधिकृत आहेत हे काही कळत नाही. आपण काशिमिरा रोडला सर्व उपायुक्त जाता. ७० टक्के नगरसेवक मुंबईला, ठाण्याला जातात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या इथे श्री. दिवटे साहेबांना मी प्रत्यक्ष फोन करून दोन तीन वेळा सांगितले की, ज्याचे दोनशे फुटाचे दुकान आहे तो तिनशे फुट पुढे आलेला आहे. पाचशे फुटाचे दुकान वापरतो. आपल्याला पैसे फक्त दोनशे फुटाचेच देतो. आणि तेवढे ट्राफिक असते. पुन्हा त्याची स्वतःची गाडी असते. ती त्या तीनशे फुटाच्या पुढे उभी राहते. आपण जातो, तुम्ही सुद्धा जाताना काशिमिराला दोन्ही बाजुला बघता. किती हैराणी होते? म्हणजे जे पाच मिनिटात बाहेर जायचे त्याला पंचवीस मिनिटे त्या लाईंनमध्येच उभे राहावे लागते. तिकडे किती ट्राफिक जाम होते. कोणी लक्ष देत नाहीत. सर्व उपायुक्त तिथुन जातात येता. पण कोणाला नाही. मा. आयुक्त साहेब पण जाता. पण तिकडचे अतिक्रमणे हटवले जात नाही. तिकडे मोटर सायकल उभ्या असतात तिथे सगळे बिगारी उभे असतात. तुम्ही हायवेच्या साईडला बघा. हायवे साईड जरी त्यांची असली तरी आपण त्यांच्यावर थोडीतरी कारवाई केली पाहिजे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, काकाच्या घराच्या बाजुला बिल्डींगचे काम चालू आहे. ते बरोबर आहे का? नंतर उत्तर देणार का?

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर साहेब, साहेब, नवघरला सर्व्हे नं. २०९ एक झोपडपट्टी आहे. गेल्या अनेक वेळा मी पत्रके दिली, मा. महासभेमध्ये विषय काढला. मागच्या वेळेल्या पावसाळ्याच्या अगोदर विषय काढला तेव्हा पावसाळ्याचे कारण सांगितले. पावसाळा झाल्यानंतर झोपडपट्टी काढू. आत्ता पावसाळा संपला. ऑक्टोबर संपला. पण त्याच्यावर काहीच कार्यवाही झालेली नाही. आपण पण मागच्या वेळेला रूलिंग दिलेले होते की, पावसाळा संपल्यावर त्याच्यावर कार्यवाही करू. त्याचे काय झाले? कशाला कार्यवाही होत नाही?

**रामनारायण दुबे :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, अतिक्रमण के विषय मे चर्चा चल रही है। बिल्डींग के स्टील्ट के नीचे अगर देखा जाए तो मिरा रोड मे तमाम होटल और दुकान बनकर तैयार है। खाली जगह पर जगह जगह गॅरेज, जैसे अभी चर्चा हुआ। इसके साथ साथ मै आपको बताना चाहूंगा की, मिरा रोड स्टेशन के पास टिकट खिडकी के बगल मे संडास - बाथरूम बना हुआ है। जो बहुत भीडभाडवाला इलाका है। हमेशा वहा लोगो का आनाजाना रहता है। लेकीन बडे दुर्भाग्य की बात है की, वहापर बाथरूम मे जाने का दो जगह है। दोनो जगह के बगल मे कही पावभाजी और वडा समोसा बिक रहा है। दुसरे जगह चाय बिक रहा है। अब आप यह समज लिजिए की, ऐसी जगह पर कोई आदमी चाय पिता है। या नास्ता करता है। कितना प्रदुषण और कितनी गलत बात है। और यह इतना जबरदस्त भीड है की, मै आपसे फिर कुछ बता नही सकता। मै भी श्री. पाटील साहब को एक बार बोला भी था की, वहा पर ऐसा है। उन्होने हमे आश्वासन दिया की, मै वहा से हटाकर दुंगा। इसके साथ साथ स्टेशन से पोस्ट ऑफिस रोड से बाहर निकलिए तो बगल मे मटन का दुकान है। और स्टेशन के पास करीब तीन मंदिर है। सुबह लोगो का आना जाना रहता है। अगर उस मटन के दुकान का लायसन्स है तो ठिक है। और लायसन्स है या नही है तो कम से कम ऐसा व्यवस्था किया जाए की, वहा कुछ पर्दा लगाया जाए। ताकी आने जाने वाले भक्तो को उस तरह की परेशाने का सामना और वहा का मलबा वह लोग बिच रोड पर लाकर डाल देते है। बडे दुःख की बात है। उसके साथ साथ उसी रोड पर एक बी – १७ नंबर की बिल्डींग है। दुकान के सामने एक टेलिफोन का केबिन बना हुआ है। और वह दुकानधारक कही बार महानगरपालिका मे कंम्प्लेंट कर चुका। लेकीन उस भीडभाड वाले इलाके मे वह केबिन कब हटेगा। वह अनधिकृत केबिन है। उसको जल्द से जल्द वहा से हटा दिया जाए ऐसा मेरा आपसे निवेदन है। प्रार्थना है।

**कल्पना ठाकूर :-**

ओस्तवाल बिल्डरच्या इथे ओल्ड पेट्रोलपंप आहे. . ओस्तवाल बिल्डरने रेसीडेन्ट म्हणून दिलेले आहे. पण ते लॉजिंग केलेले आहे. त्याचे मी लेटरपण दिले आणि श्री. गणेश पाटील जाउन ते बघुन पण आले. त्याचे उत्तर वगैरे मला काही दिलेले नाही आणि तसेच त्या कॉर्नरमध्ये बून म्हणून आहे. तिकडे क्रॉस आहे, त्याच्याजवळ बिल्डींग बांधली आहे. पण ॲक्च्युअली क्रॉसजवळ फाईव्ह फिट किंवा टेन फिट सोडायला पाहिजे. त्याने काही जागा सोडलेली नाही. तर त्याच्यातपण जरा लक्ष घातले तर बरे होईल.

**प्रेरणा भाटकर :-**

माझ्या वॉर्ड क्र. ५९ मध्ये, शांतीनगर सेक्टर पाच मध्ये एक अमुल दुधाची टपरी आहे. ती अगोदर खुप लहान होती. आत्ता त्याने एवढी वाढवलेली आहे. मला वाटते त्याने तीन वेळा बदली केले. म्हणजे पाच सात लाखाला विकलेले आहे. आणि ते अनधिकृत आहे. दुसरे शितल नगरमध्ये बऱ्याच बिल्डींगमध्ये अनधिकृत बांधकाम केलेले आहे. वाढीव बांधकाम पण केले आहे. लोकांना जायला यायला फार त्रास होतो. आणि हॉटेल्स आहेत, फिशलॅंड आहे, हॉट बाईट आहे. असे तीनही कंटीन्यु आहे. शितल प्लाझाच्या इकडे राधाकृष्ण कॅटरर्स आहे. त्यांचेपण आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहब, जैसे अब यहा पर शिक्षण समिती मे बहस चल रही थी। तो उन्होने कुछ पुछा तो आप लोग बोले की, क्लास चल रही है क्या? आप को अतिक्रमण की एक एक शिकायत लेनी है तो आप लेटर बॉक्स लगवा दिजिए। नही तो फिर कारवाई करेंगे उसकी बात किजीए। कितने अतिक्रमण दिखते है यह तो आपका काम है। यह हम आपको बतायेंगे आप हमसे शिकायत मांग रहे है? हमारा टाईम खराब हो रहा है। आप क्या कारवाई करेंगे उसकी बात किजिए। शिकायत के लिए यहा पर लेटर बॉक्स लगवा दिजिए।

**मर्लिन डिसा :-**

श्री. दिवटे साहब को बोलिए जवाब दे। जो भी, जितनी भी शिकायते है, एक एक जन को अलग अलग से जवाब देना चाहिए।

**मा. महापौर :-**

बहोत समय जाएगा। एक साथ मे जवाब देंगे पहले सबका सुन लेते है।

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर साहेब, आज अजेंड्या वरचा विषय वाचल्यानंतर मनामध्ये थोडासा प्रश्नचिन्ह निर्माण झाला. गेल्या अनेक वर्षामध्ये अतिक्रमणाचा विषय प्रत्येक मा. महासभेमध्ये गाजतच आलेला आहे. अधिकारी बदलले, पदाधिकारी बदलले, बरेचसे नगरसेवक तेच आहेत. पण विषय बदलला नाही. विषय वाचल्यानंतर मागची पाने उघडली तर बधितले की, गोषवारा नाही. सर्वप्रथम आपल्याला अशी विनंती आहे की, हा विषय तुमच्या संदर्भात नाही किंवा हा विषय लोकप्रतिनिधींच्या संदर्भातील सुद्धा नाही. पण ह्या विषयावर लोकप्रतिनिधींनी नेमका कुठला निर्णय घ्यावा. असेसुद्धा कुठे प्रेरित नाही. ह्या विषयावर आपण प्रशासनाकडे गोषवारा मागितला होता काय? आणि मागितला असेल तर तो का दिला नाही? आणि मा. महापौरांनी विषय एकदा विषयपटलावर आणल्यानंतर प्रशासनाची जबाबदारी आणि कर्तव्य आहे की, त्या विषयावर गोषवारा देणे गरजेचे आहे. इतक्या सगळ्या नगरसेवकांनी आत्ता अतिक्रमणाबाबतच जवळ जवळ सत्तर ते ऐंशी तक्रारी केल्या पण मगासपासुन असा एक घोळ चाललेला दिसतो की, आपण आज अतिक्रमणाचा आढावा घेणार आहोत. आणि मग पुढच्या सभेला आपण अनधिकृत बांधकामाचा आढावा घेणार आहोत का? अतिक्रमण आणि अनधिकृत हे विषय वेगवेगळे आहेत की, हे विषय एकमेकाला धरून आहेत? माझ्या माहितीप्रमाणे अतिक्रमण आणि अनधिकृत, आज जी चर्चा झाली ती जास्त अनधिकृत बाबत झाली. अतिक्रमण म्हणजे कुठल्या स्वरूपाचे? सरकारी जागेवरचे अतिक्रमण की एखाद्या खाजगी मालकाने दुसऱ्याच्या खाजगी मालकीत केलेले अतिक्रमण किंवा खाजगी मालकाने एखाद्या रस्त्यावर केलेले अतिक्रमण? कुठलाही विषय असला तरी तो नगरसेवकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणून ते विषय मांडतात. पण इथे या ठिकाणी कुठल्याही प्रकारची कार्यवाही होत नाही. सन्मा. श्री. म्हात्रे साहेब बोलतात की, ती एन.सी. आहे की, एफ.आय.आर. आहे? पहिल्यांदा ते एन.सी. म्हणून घेतील आणि जर ते वातावरण फेवरेबल दिसले तर त्याचे रूपांतर एफ.आय.आर मध्ये करतील. माझे तर मत आहे की, आपण त्याचे एफ.आय.आर. मध्ये लवकरच रूपांतर करा. म्हणजे तो नॉन कॉकनेजेबल गुन्हा राहणार नाही, तरीसुद्धा आपल्याला एक विनंती आहे. मा. महापौर साहेब, आपण एक आदेश द्या. प्रत्येक प्रभाग अधिकाऱ्याने त्याच्या प्रभागात असलेल्या प्रत्येक वॉर्डमध्ये सगळ्या नगरसेवकांना वैयक्तीक पत्र लिहावे की, अतिक्रमणा संदर्भात, अनधिकृत कामाच्या संदर्भात आपल्या कुठल्या तक्रारी असतील त्या लेखी स्वरूपात द्याव्या आत्ता आम्ही पुन्हा आम्हालाच काम लावतो. पण काय आहे, जेव्हा आपला कुठलाही गोषवारा येत नाही तेव्हा आम्ही असे म्हणतो की, आम्ही आमच्याकडून तरी एखादी कार्यवाही पुर्ण करतो. म्हणजे कमीत कमी आपण काय कराल त्याचा तरी आढावा पुढच्या सभेला घेता येईल. हे सगळे करत असताना, मा. आयुक्त साहेब, आपण प्रभाग अधिकाऱ्यांना आणि विधि विभागाला अशा सक्त ताकीद द्या की, अतिक्रमणाच्या बाबतीत आत्तापर्यंत झालेल्या सगळ्या केसेस, मग त्या कुठल्या कुठल्या बाबतीत याचे सगळे वर्गिकरण करावे. कुठल्या न्यायालयामध्ये कुठल्या गोष्टी न्यायप्रविष्ठ आहेत? न्याय प्रविष्ठ आहेत तर त्याच्यामध्ये कोर्टाचे कुठले ंअंतरीम ओदश आहेत? अंतरिम आदेश आहेत तर त्याच्या विरोधात महानगरपालिकेने वरिष्ठ कोर्टामध्ये काय कार्यवाही केलेली आहे? एखाद्य ठिकाणी स्टेटस्को आहे तर त्या ठिकाणी पंचनामा केलेला आहे का? फोटोग्राफ्स काढलेले आहेत का? ते कोर्टाला सबमिशन केलेले आहेत का? किंवा एखाद्या विशिष्ठ ठिकाणी तुम्हाला कार्यवाही करायची असेल तर एखाद्याने स्टे आणला तर त्याठिकाणी आपल्या विधी अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मा. आयुक्तांनी नेमलेल्या एखाद्या अभियोक्त्याच्या मार्फत कोर्टामध्ये आम्ही अशाप्रकारची मागणी केलेली आहे की, ताबडतोब तिथे कोर्ट कमिशनर अपॉइंट करा. कोर्ट कमिशनर जागेवर आल्यानंतर त्यांनी त्या जागांची वस्तुस्थिती पाहून त्याठिकाणी अहवाल सादर करा. अशाप्रकारची कुठली तरी कारवाई वेगवेगळ्या अतिक्रमणाबाबत आपण केलेली असणार. त्याचा संपुर्ण तपशिल मा. महापौर साहेब आपण याच्यावर परफेक्ट विषय आणा की, संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यासाठी आपण तो प्रभागावाईज संपुर्ण तपशिल पुढच्या मा. महासभेला सादर करायला सांगा. त्या गोषवाऱ्यामध्ये प्रत्येक अतिक्रमण मग ते एखादे अतिक्रमण तुम्हाला वाटते की, ते नियमीत करण्याजोगे आहे असे प्रशासनाला वाटते तर प्रशासनाने त्याच्यावर जरूर शिफारस करावी. एखादे नियमित करता येणार नाही. मग त्याच्यावर पुढे काय कार्यवाही करणार आहोत. किंवा आम्हाला कोर्टाचे कशा प्रकारचे बंधन आहे किंवा न्यायप्रविष्ठ आहे तर अंतरीम आदेशात कशा प्रकार म्हटलेले आहे? मग त्याच्यावर काय उपाययोजना करता येईल? अशाप्रकारे कुठेतरी अतिक्रमण विभाग काम करत आहे. असे शहरामध्ये दिसले पाहिजे. मागे आम्ही श्री. अजित पाटील साहेबांना धन्यवाद देणारा एक ठराव मंजुर केला. त्यावेळी सन्मा. सभागृहामध्ये सौ. प्रभात पाटील मॅडम बोलल्या. तो ठराव कशा संदर्भात होता हे पण मी तुम्हाला सांगतो. त्यांच्याकडे दोन चार दिवस चार्ज दिला होता. त्यांनी रस्त्यावर जे अनधिकृत फेरीवाले बसत होते ते सगळे उठवले. दोन दिवसात त्यांनी धडक कार्यवाही केली. आणि म्हणून लगेच मा. महासभा लागली त्या मा. महासभेत ठराव केला. ठराव मंजुर झाल्यानंतर, म्हणजे त्यांचे अभिनंदन झाल्यानंतर सौ. प्रभात पाटील मॅडम उठल्या की, आम्ही आज त्यांचे अभिनंदन करतो. पण असे व्हायला नको की, उद्यापासुन ते फेरीवाले पुन्हा रस्त्यावर बसतील आणि खरे तसेच झाले. म्हणजे अभिनंदनाचा आपण जर ठराव आणू आणि ठराव आणण्यापुरती जर एखादी कार्यवाही होत असेल तर अशाप्रकारचे विषय या मा. महासभेत न आणलेले बरे. मला वाटते या शहरामध्ये आपल्याला

बरीचशी कामे आहेत. मग जर लोकप्रतिनिधींचा वेळ घ्यायचा असेल किंवा लोक प्रतिनिधींना याच्यावर एक्सरसाईज किती तरी लोकांनी एक्सरसाईज केला. जास्तीत जास्त नगरसेवक बोलले. बऱ्याचशा नगरसेवकांना अजुन बोलायचे आहे. पण त्यांना माहिती आहे की, आम्ही इथे बोललो तरी काही होणार नाही. सगळ्यांना ठाम पटलेले आहे. आपल्याकडून जोपर्यंत प्रखर पावले उचलली जात नाहीत, एम.आर.टी.पी. केली तरी तोडण्याची कारवाई केली जात नाही. तोडले तरी ते पुन्हा उभे राहते म्हणून ते पुन्हा तोडण्याची कार्यवाही केली जात नाही. तेव्हा अशाप्रकारे, मा. महापौर साहेब, विशिष्ट अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून हा विषय आणा. मग तुम्ही बघा की, याच्यावर काय रिझल्ट येते. कारण प्रशासनाकडून जोपर्यंत गोषवारा घेउन प्रशासनाला आपण जोपर्यंत बंधनकारक ठरत नाहीत तोपर्यंत तुम्ही तुमच्या मताने किंवा तुम्हाला या शहरामध्ये अतिक्रमण दिसते म्हणून तुम्ही त्याच्यावर बंधन आणा या हिशोबाने जरी एखादा विषय तुम्ही सन्मा. सभागृहापुढे आणत असाल आणि आम्ही किती जरी चर्चा केली तरी ती चर्चा वायफळ ठरणार आहे. त्याच्यावर कुठलाही धोरणात्मक निर्णय होणार नाही आणि म्हणून हा विषय आपण पुन्हा आणा. पाहिजे तर त्यांना दोन महिन्यांचा अवधी द्या आणि संपुर्ण तपशिल घेउन आत्तापर्यंत जेवढी अतिक्रमणे झालेली आहेत, चालू आहेत. पुर्ण झालेली आहेत, तोडलेली आहेत, कोर्टात आहेत. त्याचा सगळा तपशिल केस संदर्भात केसच्या नंबरसह आणि सगळ्या नगरसेवकांच्या पत्रासह तो मा. महासभेपुढे आणावा अशी मी तुम्हाला विनंती करतो. त्यासोबत त्याच्यावर झालेला खर्च साहेब, मी तुम्हाला एक दुसरी विनंती करतो आपण विधी विभागामध्ये किंवा अतिक्रमण विभागामध्ये किंवा अनधिकृत बांधकाम विभागामध्ये बघा, कधीही कोणीही सापडत नाही. मी कोणावर आरोप करत नाही की, कोणी कामचोर आहेत म्हणून कामावरून पळून जातात. पण आपण जर त्याची डायरी बघीतली तर अनधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमणावर जेवढ्या केसेस १९८५ पासुन विविध न्यायालयामध्ये पेंडींग आहेत त्या रोजच्या कुठल्यातरी दोन चार पाच केसेस ह्या कोर्टात नाहीतर त्या कोर्टात अशाप्रकारे अख्ख्या वेळ तुमच्या विधी विभागाच्या अधिकाऱ्यांचा आणि तुम्ही नेमलेल्या अभियोक्त्यांचा म्हणजे वकीलांचा जातो. आपल्याला विनंती करतो. आपण आय.ए.एस. अधिकारी आहात. आपण मा. आयुक्त आहात. आपण ज्या पद्धतीने रिप्रेझेन्टेशन करू शकतो आणि रिप्रेझेन्टेशन करण्यासाठी जी कॅपेसिटी असावी लागते. ती कॅपेसिटी आपल्याकडे क्वालिफिकेशनसह, अनुभवासह आहे. आपण डिस्ट्रीक्ट जजना असे एक रिप्रेझेन्टेशन द्या की, १९८५ साली जेव्हा आमच्याकडे कधी, मी आत्ता कोणाची बाजु घेउन बोलत नाही, जेव्हा डी.पी. प्लान नव्हता त्यावेळी बांधकामे झाली आहेत. जेव्हा कुठेही प्लान पास करण्याची पावर कोणालाही ग्रामपंचायतीला नव्हती. ग्रामपंचायतीच्या एन. ए. रिसिटवर ती बांधकामे झाली आहेत. मध्ये यु.एल.सी. च्या कायद्याच्या अडचणीमुळे काही अनधिकृत बांधकामे झाली आहेत. जे झाली ती १९८५ साली उभ्या राहिलेल्या अनधिकृत बांधकामांना तोडण्याची कार्यवाही तर आम्ही करू शकत नाही. याउलट शासनाने एक कमिटी नेमली आणि त्या कमिटीचे कामकाज चालु आहे. मगाशी कोणत्यातरी सन्मा. नगरसेवकांच्या बोलण्यातुन त्याचा संदर्भ आलेला आहे. ती बांधकामे नियमित होतील तेव्हा होतील. किंवा त्यांना दंडात्मक कारवाई करायची असेल तेव्हा शासन ठरवेल किंवा ती बांधकामे पाडा असा आदेश शासन काढेल तेव्हा काढेल. पण तुर्त तुम्हाला जे रोजचे काम लावले आहे. जे भलतेच काम, ज्याची काही गरज नाही किंवा नकारून तुम्हाला जे रोजचे त्या विविध न्यायालयामध्ये साहेब, तुम्ही टाउन प्लानिंगला फोन करून बघा. तिथे तुम्हाला कधीही अधिकाऱ्यांची पुर्ण संख्या दिसणार नाही. आपले ए.डी.टी.पी म्हणून प्रभारी काम करत असतात. ए.टी.पी. सुद्धा बघावे तर हायकोर्टात आहेत किंवा ठाणे कोर्टात आहेत. तुमच्या अनधिकृत बांधकामामध्ये सुद्धा तिथले अधिकारी बघा. मा. उपायुक्तांपासुन तुम्ही बघा. ते कधी सिव्हील कोर्टमध्ये आहेत. कधी क्रिमिनलमध्ये आहेत. तर कधी मुंबई उच्च न्यायालयामध्ये आहेत. अशा पद्धतीमध्ये आपण जर १९८५ साल, साहेब, वर्गवारी करा. ह्या अनधिकृत बांधकामामध्ये वेगवेगळ्या, तशा फक्त अनधिकृत बांधकामांच्याच केसेस नाहीत तर अनधिकृत नळ कनेक्शनच्या आहेत. विविध प्रकारच्या केसेस विविध प्रकारच्या न्यायालयामध्ये आहेत. आणि हे सगळे अधिकारी त्या कामासाठी जुंपले असताना आपण जे १९८५ साली, एम.आर.टी.पी. च्या कायद्याखाली ज्या केसेस दाखल झालेल्या आहेत. आणि त्याच्यावर अजुनही निर्णय झाला नाही. खरे म्हणजे सगळ्या कोर्टमध्ये सध्या सगळ्या केसेस फास्ट ट्रॅकवर जाउन आत्ता अलीकडे दोन वर्षापर्वी दाखल झालेल्या ज्या अपिल आहेत आणि ज्या याचिका आहेत त्याच्यावर आत्ता हेअरिंग सुरू झाले असताना, १९८५ पासुनच्या एम.आर.टी.पी च्या सगळ्या केसेस क्रिमिनल साईडला पेन्डींग आहेत. आपण डी.जे. साहेबांना जर निवेदन केले, रिप्रेझेन्टेशन केले तर एम.आर.टी.पी. ॲक्ट खालच्या प्रोव्हीजनखाली जर एखादा गुन्हा साबित झाला तर जास्तीत जास्त काय शिक्षा आहे? माझ्या माहितीप्रमाणे रू. ५०००/- दंड किंवा सहा महिने कैद, किंवा दोन्ही मिळून साहेब, बरोबर आहे का? मग तुम्ही डी.जे. साहेबांना विनंती करा की, आमच्या सगळ्या केसेस एकत्रित घ्या. एकदा त्या निकाली लावा. या शहरावर जो कलंक लागला आहे की, अनधिकृत बांधकामाच्या पाच हजार केसेस, पाच हजार नसतील, कमी असतील पण पाच हजाराच्या घरात आहेतच. या हजारो अनधिकृत बांधकामाच्या महानगरपालिकेच्या कसेस कोर्टमध्ये प्रलंबित आहेत आणि त्याच्यामुळे ही महापालिका बदनाम होत आहे. कुठेतरी नगरसेवकांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या हात आहे. असे बोलले जाते. असे वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होते. जेव्हा जेव्हा नवे पदाधिकारी येतात त्यांच्यावरसुद्धा तशाच प्रकारचा बदनामीचा प्रसंग येतो आणि म्हणून आपण

डि.जे. साहेबांकडे हे निवेदन करावे वस्तुस्थिती त्यांच्या ध्यानात आणून द्यावी की, अशाप्रकारे आमचे वकील, कारण मला वाटते आपण ९९ टक्के केस हरतो. तुम्ही तेही परसेंटेज काढा की, एवढा सगळा विधी विभाग निर्माण केला. आत्तापर्यंत इतक्या वर्षामध्ये एवढ्या अभियोक्त्यांना वकीलांना आम्ही इतकी लाखो रूपये फि दिली. आणि किती केसेसमध्ये आम्ही जिंकलो आणि किती केसेसमध्ये आम्ही हरलो असे म्हणाले तर आपण उलट जिंकलेल्या लोकांनाच म्हणायला पाहिजे की, तुम्हाला काय द्यायचे ते द्या. पण निदान आमचा विधी विभागाचा खर्च तर निघू द्या. म्हणजे तेही कॉम्पेन्सेट होउ शकत नाही. याची आपण सगळी विगतवारी काढा. तेव्हा आपल्या लक्षात येईल की, अतिक्रमण व अनधिकृत विभागाकरिता होणारा खर्च आणि त्याच्यातुन काय निष्पन्न होते तर शुन्य म्हणून या केसेस जेवढ्या निकाली काढता येतील. कारण शेवटी डी.जे. ना ते अधिकार आहेत. कारण पुर्वी मी तसा एक प्रयत्न केला होता. तो प्रयत्न मा. जिल्हाधिकारी श्री. मुकेश खुल्लर साहेबांनी मला स्वतःहून सांगितले होते की, इतक्या सगळ्या केसेस तुमच्या नगरपालिकेच्या ८५ सालापुर्वीच्या आहेत. तुम्ही डी.जे. साहेबांना निवेदन करा. गरज पडल्यास कलेक्टर म्हणून मी त्यांना सांगेन. तर तशा प्रकारचे एक निवेदन आपण करावे. जास्तीत जास्त केसेस ज्या आहेत त्या खारीज झाल्या. मग कोणाला दंड व्हायचा तो होउ द्या. शिक्षा व्हायची ती होउ द्या त्याच्याशी आपल्याला काही देणे घेणे नाही. पण त्या केस जर त्यांनी निकाली काढल्या तर तेवढा तुमचा भार कमी होईल आणि तुम्ही कुठेतरी अतिक्रमणाचा किंवा अनधिकृत बांधकामाचा जो भला मोठा डोंगराएवढा हिमालय आत्ता झाला. परवापर्यंत सह्याद्री होता. आत्ता हिमालय झाला. हिमालयापेक्षा वेगळा राहिलेला नाही. एवढा मोठा धावांचा डोंगर जसा होतो तसा अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामाचा डोंगर झालेला आहे. तो कुठेतरी कमी करण्याचा आपण प्रयत्न करा ही विनंती करतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. प्रकरण क्र. ७२, अतिक्रमणाबाबत आढावा घेणे ह्या विषयावर प्रशासनाने विगतवार टिप्पणी द्यावयास हवी होती असे मला वाटते. कारण माहितीच्या अधिकारात अतिक्रमण विभाग आणि नगररचना विभागाचे अनेक पेपर, त्यांचे आवक जावक रजिस्टर हे तपासले तर सगळ्यात जास्त संख्या नगरसेवकांची आहे. एखाद्या बिल्डींगचा प्लान मागण्यापासुन ते शेवटपर्यंत. माझी स्वतःची पत्र फार कमी आहेत. आज एखादे चार पाच फेरीवाले उचलले आणि अतिक्रमणाची ती कारवाई झाली हा सोपा विषय आहे. परंतु, आज या शहरामध्ये जी मोठमोठी संकुले उभी आहेत, यामध्ये ज्या मोकळया जागा ठेवल्या आहेत. गार्डन्स आहेत, मार्केट्स आहेत. काही पार्किंगच्या जागा आहेत. त्यानंतर आपण जे ओपन स्पेस म्हणतो. मागच्या वेळेला जो ठराव पास झाला. त्यावेळेला मी तुम्हाला एक शांती नगरचा प्लान दाखवला. तत्कालीन सन्मा. श्री. घेवारे साहेब आणि मा. आयुक्त श्री. सुदामराव गायकवाड यांनी शांतीनगरच्या पाण्याच्या टँकच्या बाजुला मोकळ्या असलेल्या जागेत नव्याने शॉपिंग सेंटर मंजुर करून दिले. १९७६ साली विकर सेक्शन खाली झालेली एवढी मोठी स्किम, ज्याला मंत्रालयातुन मंजुरी मिळाली आणि आमच्या शहरावर एवढा मोठा भार वाढला. त्या मोकळ्या जागेवर आपल्या मा. आयुक्तांना आणि सहाय्यक संचालकांना कुठल्या अधिकारात प्लान मंजुर करायला मिळाले ते मला अजुनपर्यंत कळलेले नाही. पत्र देउनसुद्धा लेखी उत्तर आलेले नाही. चार टपऱ्या उचलल्या म्हणजे झाले, अशातला भाग नाही. माझ्या वॉर्डमध्ये मधल्या क्रिकमध्ये चिखलामध्ये चाळी बांधल्या आहेत. त्याच्यावर माळे बांधले आहेत. वीस वीस भाडोत्री त्या एक एका रूममध्ये राहतात. एका व्यक्तीचे दिड हजार रूपये भाडे घेतले जाते. दिड म्हणजे दिड गुणीले वीस करा. एकेका रूममध्ये दहा पंधरा वीस लोक राहतात. सगळ्या रूमला तडे गेले आहेत. पावसाळ्यात मी स्वतः तुम्हाला येउन भेटून बऱ्याच वेळेला त्या खोल्या पडून मग जी काही जीवीतहानी होईल. त्याच्यामध्ये मग कोणालातरी वाचवणाऱ्या माणसाला आपल्या महापालिकेलाच दोन लाख रूपये द्यावे लागतील हे लक्षात घ्या. आत्ता आपल्याकडे एक निराळी प्रथा पडायला लागली आहे. आणि या मा. महापौरांनाच ते दोन लाख रूपये द्यावे लागतील. कारण अनधिकृत बांधकाम होते ते आम्ही कळवतो. पण सगळी कारणे देउन टाळले जाते. सगळे व्यवस्थित चालू आहे. अलबेल आहे. मोठ मोठ्या बिल्डींगमध्ये टॉवरमध्ये टॉवरच्या वर अनेक बांधकामे वाढवली जात आहेत. त्याचे कोणी चेकींग केलेले नाही. त्याचे एफ.एस.आय. कोणी चेक केले नाहीत. खालच्या स्टील्टचा अगदी सर्रास, म्हणजे १०० टक्के स्टील्ट चोऱ्या माऱ्यामध्येच विकले गेलेले आहे. पण त्या दुकानांना आपण एन.ओ.सी. देतो. आत्ता तुम्ही सेस वसुल कराल, त्याचा हाउस टॅक्स, गुमास्ता लायसन्स मिळते. महानगरपालिका आत्ता व्यवसाय कर घेईल. पण त्या टॉवरच्या खाली असलेली मोकळी जागा पार्किंगची आहे की, शॉपिंगची आहे. याचा कोणीच विचार केलेला नाही आणि आम्ही कशाला तक्रारी केल्या पाहिजेत? तुम्हाला आम्ही दहा दहा हजार रूपये देउन वाहने दिली आहेत. प्रचंड कामाचा ताण आहे आम्ही तुम्हाला फ्युलचे चार्जेस मंजुर करून दिले आहेत. चांगली आलीशान केबिन आहे. भरपूर स्टाफ आहे. कुठल्या महानगरपालिकेमध्ये एवढी सोय आहे. मी फिरतो ना. उल्हासनगरमध्ये काहीच नाही. एक एक टेबल टाकून बसले आहेत. ठाणे महानगरपालिकेत तीच गत आहे. आमच्याकडे कसे आहे की, मंत्रालयातुन आले की इकडे त्यांना वाटते की, प्रशस्त केबिन, खाली गाडीतुन उतरले की, लगेच सिक्युरीटी गार्ड बॅग घ्यायला आला. तो गेला लगेच लिफ्टचा दरवाजा उघडला. म्हणजे त्या अधिकाऱ्याला वाटते की, मी एखाद्या प्रायव्हेट मोठ्या कुठल्यातरी कंपनीत कामाला आलो आहे. एकही साहेब, मी तर म्हणतो मी नगरसेवक या नात्याने मला

तुम्हाला तक्रार करण्याची गरजच नाही. तुमचा व्हिज्युलन्स पाहिजे, तुम्ही फिरले पाहिजे, तुम्ही तिकडे गेले पाहिजे. कारण कायद्याने तुम्हाला अधिकार दिलेले आहेत. मला दिलेले नाहीत. पण आपले अधिकारी जात नाहीत. प्रभाग अधिकाऱ्याला अधिकार कशाला पाहिजेत. तुमचे जुने आदेश काढा. श्री. आर डी. शिंदे साहेबांनी आदेश दिलेले आहेत. तुमचे अतिक्रमण नगररचनापासुन सुरूवात होते. श्री. घेवारेंच्या सोयीकरिता तुम्ही अतिक्रमणचे चार्ज अतिक्रमणवाल्यांना दिले. अतिक्रमण झाले आहे किंवा अधिकृत आहे, अनधिकृत आहे हे कोण ठरवणार. साहेब, पहिल्यांदा नगररचना ठरविणार आणि मग त्यानंतर अतिक्रमण कारवाई करणार. माहितीच्या अधिकारात सरळ उत्तर दिले जाते की, नगररचनेशी काही संबंध नाही. त्या विभागाचेच नाव नगररचना आहे. शहराची नगररचना कशी असावी या शहरामध्ये हाय पावर टेन्शनच्या खाली पोलिस स्टेशन बनले आहेत. नगरसेवकांनी त्यांचे नगरसेवक निधी दिले आहेत. आम्ही जर परमिशन मागितली तर सांगणार की, तुम्हाला बांधकाम करायला मिळणार नाही. पोलिस स्टेशनला, चौक्यांना परवानगी आहेत. उद्या तिथे जिवितहानी झाली तर तुम्ही जिम्मेदार आहात. तक्रारी अर्ज देउन १५-१५, २०-२० दिवस उत्तर मिळत नाही. आपल्या कार्यालयातुन सुद्धा, मला उत्तर मिळालेले नाही. अपेक्षित होते की, चुकीचे आहे की, बरोबर आहे हे मी तुम्हाला पत्र दिलेले आहे. पण तेही नाही. आज अनेक ठिकाणी जी आरक्षणे केलेली आहेत. त्या आरक्षणामध्ये सुद्धा हाच प्रकार आहे. माझ्याकडचे एक मार्केटचे आरक्षण वगळून टाकले. म्हणजे त्याच्यात तुमच्या श्री. घेवारेंच्या आर्शिवादाने आत्ता एक मंदिर बनले आहे. कागदपत्र मला माहितीच्या अधिकारात मिळाली. प्रभाग अधिकारी आम्हाला लिहून देतो की, सिटी इंजिनिअरने परवानगी दिली आहे. टपऱ्या बांधायला किंवा शेड बांधायला सिटी इंजिनियर केव्हापासुन परवानगी द्यायला लागले पण सदर प्रकरणी श्री. घेवारेनी त्यांना व्यवस्थित रस्ते दाखवून पद्धतशीरपणे ते सिटी इंजिनियरकडे वर्ग केले आणि सिटी इंजिनिअरकडून ती परवानगी मिळवून त्या आरक्षणामध्ये पंडाल पडून आत्ता कोर्टातुन स्थगितीसुद्धा आली. आज आपल्याकडचे पॅनलवरचे चांगले चांगले वकील राजीनामा का दिला? त्यांनी ब्रिफ तुम्हाला परत दिले. त्याला काही कारणे आहेत. ते ब्रीफ परत का आले त्याचा जरा विचार करा. कोर्टातले दावे तुम्ही आणि आम्ही ठरवून नाही. माझ्या वॉर्डमध्ये एक सुलभ शौचालयाची केस आठ वर्षापासुन चालली आहे. ७/१२ उताऱ्यावर त्या व्यक्तीचे नाव नसुन ती व्यक्ती स्टे घेउन आली आहे आणि एका महिला जजने त्याला स्थगिती दिली आहे. हे आमचे सगळेच मोठे अहंभाग्य. त्याच्यामध्ये महिलांकरितासुद्धा सगळ्या सोयी होत्या. आपल्या पॅनलवरचे वकील यांनी आपल्या ब्रिफ का परत केल्या? कुठेतरी कसलेतरी दबाव आहेत. कोणतरी सांगितले म्हणून त्या ब्रिफ परत झाल्या की, आम्हाला हे जमणार नाही. यापुढे तुमच्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे काम आम्हाला चांगल्या रितीने करता येणार नाही. साहेब, याची टिपणी दिली नसल्या कारणाने आम्ही ठराव कसे करू शकतो. फक्त एक दिड लाईनचा विषय आहे. त्याकरिता कुठल्या डिपार्टमेंटची जबाबदारी आहे ते पहिल्यांदा फिक्स करा. त्या त्या डिपार्टमेंटवाईज तुम्ही जुने आदेश काढा. त्याच्यात काहीच दिलेले नाही. मा. आयुक्तांच्या आदेशाचे उल्लंघन झालेले आहे. मी तुम्हाला आदेश दाखवतो. पण त्याचे कुठेही काहीही दिलेले नाही. आमची अनेक प्रकरणे आहेत. त्याचा सगळा व्यवस्थित गोषवारा घ्या आणि हा विषय परत आणा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, मेरे विषय पर बोलने से पहले अब सन्मा. नगरसेवक श्री. मिलन म्हात्रे जी ने एक बात बोली की, माहिती के अधिकार मे सबसे ज्यादा पत्र नगरसेवकोंके है। मेरे सबसे कम है। वह क्या बोलना चाहते है यह शायद उनको पता है या जिन्होने उनका बोलने का अर्थ समझा है वो समझ पायेंगे। एक बात और बताता हु, जिस प्रभाग से वह तीन बार चुनकर आते है उस प्रभाग मे सबसे ज्यादा झोपडपट्टी उनके नगरसेवक काल मे बनी है।

**मिलन म्हात्रे :-**

हमारे नगरसेवक काल मे नही, उसके पहले ही हो गई है। हमने तो तोडने के लिए पत्र दिया लेकीन तुट नही रही है। जरा पुरा सुनाइए। मिलन म्हात्रे की, तरफदारी या निंदा करनी है तो सही ढंग से किजिए। हम कहते है की, यह तोडो। मगर तोडा नही है। यह देखिए सौ बखी और एक लिखी। हमने लेटर डाला है। उसके उपर कारवाई नही हो रही है। उसके बारे मे हम बोल रहे है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बाकीके निर्णय हायकोर्ट और सुप्रिम कोर्ट से लाए जा सकते है। उनके पत्रकार यहा के अधिकारीयो ने दखल नही लिया इसलिए उन्होने छोड दिया। एक हॉस्पीटल नही बना, या सडक नही तुटी, अतिक्रमण नही हुआ, उसके लिए सुप्रिम कोर्ट, हाई कोर्ट जा सकते है।

**मिलन म्हात्रे :-**

बाकी का काम करने के लिए आप नौ नगरसेवक है ना। वह करो। आपको अधिकार दिया है। लोकशाही है। आप अपना बात रखिए मुझपर व्यक्तीगत आरोप करना छोड दिजिए आप मे हिम्मत है तो आप किजिए। आपके वॉर्ड मे भी इललिगल है। आप उसके खिलाफ जाइए। आपके इधर का प्ले ग्राउन्ड का इश्यु बिल्डरने अडा कर रखा है। वह कोर्ट मे जाकर लाइए। व्यक्तीगत आरोप के बात किजिए।

**मा. महापौर :-**

सन्मा. श्री. ओमप्रकाश अग्रवालजी आप को क्या बोलना है बोलिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जब किसी विषय के लिए यह हायकोर्ट, सुप्रिमकोर्ट जा सकते है। जब आपने विषय की, शुरूआत की, उनका जो आक्षेप था। इसका मतलब है की, सब नगरसेवक माहिती के अधिकार मे पत्र डालते है। वह सेटींग करते है। यह दुसरे के दाढी मे तिनका दिखता नही है। मेरे बोलने का मतलब है की, अपने आप को शुद्ध शाकाहारी बोलने से पहले, इस शहरमे मे बहोत शुद्ध शाकाहारी लोग है। मा. महापौर साहब, महापालिका के कार्यकाल मे मैने मा. महासभा मे एक प्रश्न किया था। वह प्रश्न एसा था की, मिरा भाईंदर महापालिका क्षेत्र मे एम.आर.टी.पी. ॲक्ट मे कितने गुनाह दाखल है। जैसे हमारे सन्मा. नगरसेवक और वरिष्ठ......

**शरद पाटील :-**

बोलू द्या ना. सगळ्यांनी बोलले आम्हाला पण बोलायचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, त्यावेळी त्या मा. महासभेमध्ये असे उत्तर देण्यात आले की, ३५६ एम.आर.टी.पी दाखल करण्यात आले. १८ चे निर्णय आले आणि ते अठराच्या अठरा महापालिकेच्या विरूद्ध आज आपण आदेश काढला, चौथ्या महिन्यामध्ये, म्हणजे ०१/०४ ला आपला सर्व अधिकाऱ्यांना आदेश आहे. आत्ता आमचे श्री. अनिल सावंत यांनी विषय काढला. पुढच्या वेळी जेव्हा हा विषय येणार, आपण आदेश काढल्यानंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये किती अनधिकृत बांधकाम झाले? किती एम.आर.टी.पी. दाखल झाल्या? कारण एक एम.आर.टी.पी. फार ताकदीने दाखल केले होते. म्हणजे त्याच्यामध्ये एवढी प्रेस्टीज इश्यु केली. माझ्या प्रभागामध्ये झोपडपट्टी होती. त्या झोपडपट्टीवाल्यांनी तीन फुट बांधकाम केले आणि त्या झोपडपट्टी वाल्यांवर एम.आर.टी.पी दाखल केले. पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्यांना कोर्टामध्ये जाउन तीस हजार रूपये जामिन द्यावे लागले. म्हणजे एका झोपडपट्टीवाल्यांवर पण हा महापालिकेचा अधिकारी एम.आर.टी.पी. दाखल करू शकतो. पण बिल्डरवर करू शकत नाही. म्हणून आपले आदेश निघाल्यानंतर आत्ता चार महिन्यांमध्ये किती एम.आर.टी.पी. दाखल झाले? किती निर्णय झाले? आणि त्यावर महापालिकेने किती खर्च केला? याचाही आढावा द्या. मागचा तर द्यायचाच आहे. दुसरी गोष्ट आपण या मा. महासभेमध्ये प्रस्ताव पास केलेला आहे. तो प्रस्ताव काय झाला हे मला पण लक्षात येत नाही. कारण जे अधिकारी त्याच्यामध्ये काम करत आहेत, ज्या ज्या इललिगल बिल्डींग आहेत. त्यांना तिप्पट कर आकारणी करणे. आत्ता ज्या बिल्डींगने अधिकृत बांधकाम केले. तुम्ही तिप्पट कर आकारणी केली. एक वर्षामध्ये तुम्ही तिप्पट आकारणी केली. तो बिल्डर सुटला. आत्ता ती तिप्पट आकारणी, म्हणजे खालच्यावरून करणार की, जेव्हापासुन ते इललिगल केलले आहे. मी अधिकाऱ्यांना विचारले की, आत्ता सात माळ्याची बिल्डींग आहे. आणि पाच माळे अधिकृत आहेत. दोन मोठे अधिकृत आहेत. तर तुम्ही कर आकारणी कशी करणार? तर सांगितले की, फक्त दोन माळ्यांची तिप्पट आकारणी करणार. म्हणजे शेवटी या शहराला या अधिकाऱ्यांनी कुठपर्यंत शोषण करायचे? ज्यांनी फ्लॅट घेतला त्यांना माहितीच नाही की, ही बिल्डींग पाच माळ्यापर्यंत अधिकृत आहे. नंतर नाही. म्हणजे हा आढावा घेण्यापुर्वी मी मा. महापौरांनापण विचारले होते. आमच्या गटनेत्यांच्या मिटींगमध्ये विषय निघाला. की, याच्यामध्ये काहीतरी ठराव होईल. तेव्हा बोलले की, ठराव होउच शकत नाही. मी नंतर मा. महापौरांना विचारले की, याच्यावर ठराव होउ शकतो का? तर ते बोलले की, ठराव होउ शकतो. आत्ता ठराव हा ज्वलंत विषय आहे. शहरात येणारे पाणी आपल्याकडे नाही. इलिगल बांधकाम करतात, अठरा अठरा माळे, पंधरा पंधरा माळ्याचे बांधकाम आहे. शेवटी तुम्ही त्यांना कनेक्शन देता. तुमच्याकडे पाणी नाही. बाकी इललिगल बांधकाम झाले. बिल्डरने पैसे कमवले. तुम्हाला टॅक्स आला. पण ती नंतरची बाब आहे, पाण्याची. हा गंभिर विषय या अतिक्रमणाचा आहे. याची आपण दखल घेतली नाही. या शहरामध्ये आत्ता जे पाणी चाललेले आहे. त्याला तुम्ही कुठे घेउन जाणार आहात? ही गंभिर बाब या अतिक्रमणामुळे उभी राहणार आहे. म्हणून आपण याची ताबडतोब दखल घ्यावी आणि अधिकृत बांधकामाबाबत दखल घ्यावी.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतो, आत्ता सगळे अनधिकृत बांधकामाचे चाललेले आहे. त्याच्याबद्दल बोलायचे आहे. प्रत्येक मा. महासभेमध्ये मी बोलतो. छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर ज्या गाड्या आहेत. त्या गाड्या उचलायला पण त्रास होतो का? तिथे पण कोण दादागिरी करतो का? का उचलत नाही? आपण त्या रस्त्याने प्रत्येक वेळी येत असतो आणि फ्लायओव्हरच्या खाली जे आईस्क्रीमवाले बसतात. ज्या रोडपासुन या मिरा भाईंदरची शान वाढली आहे. अशा रोडवर फेरीवाले, चायनीजच्या गाड्या, आणि गॅरेज आहेत ते तुम्ही कधी उचलणार? प्रत्येक मा. महासभेत आम्ही बोलतो, मा. आयुक्त साहेब, आपल्या ऑफिसमध्ये त्या दिवशी सर्व अधिकाऱ्यांची मिटींग होती. त्या दिवशी मी आलो होतो. तेव्हा मी बोललो होते, की बी.पी.रोडला दिवाळीच्या सिझनमध्ये माणसांना चालायला रस्ता नव्हता, वाहने तर सोडून द्या. आपले मा. आयुक्त साहेब, त्यावेळी बोलले होते की, मी चार दिवसात त्यांच्यावर केसेस करून तुम्हाला खाली करून

देतो. तिथे अजुनपर्यंत एक दिवसही काही झालेले नाही. पण एक दिवस कोणता अधिकारी येणार होता ते माहिती नाही पण तिथे सगळ्या फेरीवाल्यांना सांगितले की, एक मोठा अधिकारी येणार आहे. म्हणून ते फेरीवाले त्यादिवशी बसलेच नाहीत. म्हणजे कुठच्या अधिकाऱ्याची धमक होती, कुठच्या अधिकाऱ्याचा धाक होता. हे माहिती नाही. केबिन रोड, जो बायपास रस्ता आहे तिथे चार फेरीवाले बसत असल्यापासुन मी माझा पत्रव्यवहार करतो, लिहितो आहे, बोलतो आहे. आत्ता दोन्ही बाजुने बसायला लागले आहेत. तिथेही आपली कोणती कारवाई होत नाही का होत नाही? आणि हे सगळे बोलून शेवटी फायदा तर नाही. उद्यापासुन परत तीच पद्धत चालू होणार. तरी याच्यावर कारवाई झाली पाहिजे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपल्या ओव्हरब्रिजवर संध्याकाळपासुन म्हणजे पाच सहा वाजल्यापासुन ते रात्री बारा एक वाजेपर्यंत बऱ्याचशा मोटर सायकल लागलेल्या असतात. आणि तिकडे लोक उभे असतात. तर तुम्ही किंवा मा. आयुक्त साहेब, यांनी पोलिस स्टेशनमध्ये एक पत्र दिले तर तिकडे त्या मोटर सायकल.....

**प्रभात पाटील :-**

मी कोणत्याही अनधिकृत बांधकामाबाबत बोलणार नाही. मला फक्त एवढेच म्हणायचे आहे की, आज जे प्रोसिडींग मंजुर झाले त्याच्यामध्ये माझे एक वाक्य आहे. आपण सगळी प्रोसिडींग वाचली नाहीत. मी मा. आयुक्त साहेबांना विषयी म्हटले होते की, तुम्ही ज्या दिवशी नगरसेवकांच्या पत्रांना उत्तरे देतील तो दिवस सुदिन समजायचा. कारण एकही पत्राचे उत्तर येत नाही. नगरसेवक इतके कमजोर आहेत की, मी तर म्हणेन की, नगरसेवक हलकट आहेत असे तुमचे अधिकारी समजतात का? की, आमच्या पत्रांना काही किंमत नाही? आम्ही आमच्या चोविस तासामधील काही वेळ त्या पत्रव्यवहारासाठी काढतो, पेनातील शाई संपवतो. आणि आमच्या शंका कुशंका तुमच्यापर्यंत पोहचवतो. अनधिकृत बांधकामाविषयी बोलताना याच प्रोसिडींगमध्ये माझा आणखिन एक उल्लेख असा आहे की, संपुर्ण महाराष्ट्रामध्ये जितक्या नगरपालिका आणि महानगरपालिका असतील त्या सगळ्या महानगरपालिकांमध्ये अनधिकृत बांधकामाबाबत बोलणारे नगरसेवक तुम्हाला याच महानगरपालिकेमध्ये भेटतील. इथले चार दोन नगरसेवक सोडले तर मला वाटत नाही की, कोणीही बिल्डर आहेत. किंवा त्यांची अनधिकृत बांधकामे असतील. असे असताना आम्ही प्रामाणिकपणे छाती ठोक पणे बोलतो का? अनधिकृत बांधकामांना पाठींबा दिला तर त्यांचे नगरसेवक पद धोक्यात घालविण्याची कारवाई आमच्यासाठी आहे. जे अनधिकृत बांधकामांना प्रोटेक्ट करतात त्या अधिकाऱ्यांचे काय? मला असे वाटते की, मा. महासभेने शिक्षा मंजुर करावी. ह्या मा. महासभेने त्यांना शिक्षा द्यावी. आणि सन्मा. सभागृह नेते म्हणून मी तुम्हाला सांगते. या सभेचे प्रतिनिधीत्व करणारे तुम्ही, मा. पिठासीन अधिकारी म्हणून सन्मा. श्री. जयंत पाटील लक्ष द्या. तुम्ही सभागृह नेते आहात. आणि तुम्ही पिठासिन अधिकारी आहात. या मा. महासभेमधून अनधिकृत बांधकामाचे जितके प्रोसिडींग नोंद झाले आहे, जितके रेकॉडींग झाले आहे. संपुर्ण शासनाला पाठविण्याची जबाबदारी तुमची आहे की, या शहरामध्ये जे अनधिकृत बांधकाम होते. त्याला लोकप्रतिनिधी जबाबदार नाहीत. हे आमचे पुरावे आहेत आणि त्याला जर कोणी जबाबदार असेल तर त्याची कारवाई ही मा. महासभा करणार आणि त्याला शासनाने मंजुरी द्यायची. मिरा भाईंदरमध्ये एक फॅशन झालेली आहे. त्याविषयी मी बोलेन. कारण बाकीच्यांनी अनधिकृत बांधकामाच्या सगळ्या पध्दती सांगितल्या आहेत. आपल्याकडे आपण पंपरुम बनवतो. त्यावर फ्रेम लावली जाते. थोड्या दिवसांनी त्याच्यावर एक छपरे टाकले जाते आणि ते वाढीव बांधकाम म्हणून बिल्डर पैसे घेतात. ते एक नोटीफिकेशन तुम्ही करा की, ही संपूर्ण शहरामध्ये फॅशन झालेली आहे. एवढे मात्र मी तुम्हांला सांगेन.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत होत असलेल्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकामाबाबत आजच्या महासभेत आढावा घेतला असता महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.

गेल्या वर्षभरापासून अनधिकृत बांधकामाबाबत वारंवार चर्चा महासभेत होत आहे. महापालिका क्षेत्रांमध्ये वाढत चाललेल्या अनधिकृत बांधकामावर नियंत्रण करण्यासाठी शासनाकडून जी.आर. काढण्यात आला व त्याचे पालन सर्व महापालिकांनी करुन त्यानुसार अनधिकृत बांधकामाबाबत नियमितपणे अहवाल अतिक्रमण विभागाकडून घेण्यात यावेत असे निर्देश देण्यात आले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागप्रमुख पदावर कार्यरत असलेले उपायुक्त, श्री. दिवटे ह्यांनी अतिक्रमण विभागाचा कार्यभार स्विकारण्यापासून अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रणाबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. तसेच अतिक्रमणाचा अहवाल देखील दिलेला नाही.

महापालिका क्षेत्रात सतत वाढत असलेल्या अतिक्रमणावरुन असे दिसून येते की, उपायुक्त, श्री. दिवटे हे त्या पदावर काम करण्यास सक्षम नाहीत. दि. ०९/०१/२००८ रोजीच्या महासभेत त्यांना कार्यमुक्त करावे असा ठराव पारित करण्यात आला होता. त्यावर प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

तसेच दि. १९/०६/२००८ रोजीच्या महासभेत अतिक्रमणबाबत लक्षवेधी सुचना मांडण्यात आली होती. त्यावर महासभेत मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली होती. मागील वर्षभरापासून अतिक्रमण विभागाच्या

असमाधानकारक कामकाजाबाबत वारंवार महासभेत चर्चा होत आहे. ह्या असमाधानकारक कामकाजास मा. आयुक्त देखील जबाबदार आहेत.

अतिक्रमण विभागाच्या प्रमुख पदावर काम करीत असलेले उपायुक्त, श्री. दिवटे हे महापालिकेत उपायुक्त पदावर काम करण्यास सक्षम नसल्याने त्यांना तातडीने कार्यमुक्त करण्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

अनुमोदन है।

**मिलन म्हात्रे :-**

ठराव वाचून कायम करा. सचिव साहेब, दोन्ही ठराव, पहिला श्री. पानपट्टे यांचा ठराव आहे. तो पण वाचून कायम करा आणि हासुध्दा ठराव वाचून कायम करा. थोडे शहर सुधारेल आणि रेल्वे स्टेशन जवळ रवि मुथानी, राजु मुथानी जे टॉवर बांधले आहेत. त्याला सी.आर.झेड. ची परवानगी नाही. सदर चारही टॉवर सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांच्या वॉर्डमधील आहेत. त्यांची चौकशी करा.

**नगरसचिव :-**

सुचक श्री. मिलन पाटील व अनुमोदक श्री. राजेश म्हात्रे यांनी श्री. पानपट्टे, उपायुक्त यांच्याबाबत मांडलेल्या ठरावाचे वाचन करीत आहे.

महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य विषयक तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत. कचरा डंपींगचा प्रश्न सातत्याने निर्माण होत आहे. साफसफाई, नालेसफाई बाबत तक्रारी तसेच सध्या डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे.

आरोग्य विभागातर्फे औषध फवारणी, गटार सफाई नियमीतपणे होत नसल्यामुळे डासांचे प्रमाण वाढलेले असून ह्याबाबत महासभेत नेहमीच चर्चा होत असते. अनेक नगरसेवकांनी आरोग्य विभागाच्या कामकाजाबाबत तक्रारी केलेल्या आहेत. त्यावर आरोग्य विभागामार्फत समाधानकारक कारवाई होत नसल्याचे दिसून आले आहे.

आरोग्य विभगाचे प्रमुख उपायुक्त, श्री. पानपट्टे सो., हे आरोग्य विभागाच्या अकार्यक्षम कामकाजास जबाबदार आहेत. महासभेमध्ये आरोग्य विषयक प्रश्नांवर रुलींग देताना मा. महापौरसो., ह्यांनी औषध खरेदी विषयावर सविस्तर चौकशी करुन मा. आयुक्त सो., ह्यांना पुढील महासभेत अहवाल सादर करावा असे निर्देश दिलेले होते. तथापी, मा. आयुक्त सो., ह्यांनी देखील त्यावर आपला अहवाल दिलेला नाही.

कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यास औषध खरेदी बाबत आरोग्य विभगाचे उपायुक्त श्री. पानपट्टे सो., हे जाबाबदार असून आरोग्याच्या चांगल्या परिणामकारक कामकाजास ते अकार्यक्षम ठरलेले आहेत. सबब त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिकेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार निलंबीत करण्यास यावे ह्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

**ठराव क्र. ६५ :-**

महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य विषयक तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत. कचरा डंपींगचा प्रश्न सातत्याने निर्माण होत आहे. साफसफाई, नालेसफाई बाबत तक्रारी तसेच सध्या डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे.

आरोग्य विभागातर्फे औषध फवारणी, गटार सफाई नियमीतपणे होत नसल्यामुळे डासांचे प्रमाण वाढलेले असून ह्याबाबत महासभेत नेहमीच चर्चा होत असते. अनेक नगरसेवकांनी आरोग्य विभागाच्या कामकाजाबाबत तक्रारी केलेल्या आहेत. त्यावर आरोग्य विभागामार्फत समाधानकारक कारवाई होत नसल्याचे दिसून आले आहे.

आरोग्य विभगाचे प्रमुख उपायुक्त, श्री. पानपट्टे सो., हे आरोग्य विभागाच्या अकार्यक्षम कामकाजास जबाबदार आहेत. महासभेमध्ये आरोग्य विषयक प्रश्नांवर रुलींग देताना मा. महापौरसो., ह्यांनी औषध खरेदी विषयावर सविस्तर चौकशी करुन मा. आयुक्त सो., ह्यांना पुढील महासभेत अहवाल सादर करावा असे निर्देश दिलेले होते. तथापी, मा. आयुक्त सो., ह्यांनी देखील त्यावर आपला अहवाल दिलेला नाही.

कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यास औषध खरेदी बाबत आरोग्य विभगाचे उपायुक्त श्री. पानपट्टे सो., हे जाबाबदार असून आरोग्याच्या चांगल्या परिणामकारक कामकाजास ते अकार्यक्षम ठरलेले आहेत. सबब त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिकेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार निलंबीत करण्यास यावे ह्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील अनुमोदक :- श्री. राजेश म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

सुचक श्री. बर्नड डिमेलो व अनुमोदक श्री. डॉ. राजेंद्र जैन यांनी श्री. दिवटे, उपायुक्त यांच्याबाबत मांडलेल्या ठरावाचे वाचन करीत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत होत असलेल्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकामाबाबत आजच्या महासभेत आढावा घेतला असता महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.

गेल्या वर्षभरापासून अनधिकृत बांधकामाबाबत वारंवार चर्चा महासभेत होत आहे. महापालिका क्षेत्रांमध्ये वाढत चाललेल्या अनधिकृत बांधकामावर नियंत्रण करण्यासाठी शासनाकडून जी.आर. काढण्यात आला व त्याचे पालन सर्व महापालिकांनी करुन त्यानुसार अनधिकृत बांधकामाबाबत नियमितपणे अहवाल अतिक्रमण विभागाकडून घेण्यात यावेत असे निर्देश देण्यात आले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागप्रमुख पदावर कार्यरत असलेले उपायुक्त, श्री. दिवटे ह्यांनी अतिक्रमण विभागाचा कार्यभार स्विकारण्यापासून अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रणाबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. तसेच अतिक्रमणाचा अहवाल देखील दिलेला नाही.

महापालिका क्षेत्रात सतत वाढत असलेल्या अतिक्रमणावरुन असे दिसून येते की, उपायुक्त, श्री. दिवटे हे त्या पदावर काम करण्यास सक्षम नाहीत. दि. ०९/०१/२००८ रोजीच्या महासभेत त्यांना कार्यमुक्त करावे असा ठराव पारित करण्यात आला होता. त्यावर प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

तसेच दि. १९/०६/२००८ रोजीच्या महासभेत अतिक्रमणबाबत लक्षवेधी सुचना मांडण्यात आली होती. त्यावर महासभेत मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली होती. मागील वर्षभरापासून अतिक्रमण विभागाच्या असमाधानकारक कामकाजाबाबत वारंवार महासभेत चर्चा होत आहे. ह्या असमाधानकारक कामकाजास मा. आयुक्त देखील जबाबदार आहेत.

अतिक्रमण विभागाच्या प्रमुख पदावर काम करीत असलेले उपायुक्त, श्री. दिवटे हे महापालिकेत उपायुक्त पदावर काम करण्यास सक्षम नसल्याने त्यांना तातडीने कार्यमुक्त करण्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

**ठराव क्र. ६६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत होत असलेल्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकामाबाबत आजच्या महासभेत आढावा घेतला असता महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.

गेल्या वर्षभरापासून अनधिकृत बांधकामाबाबत वारंवार चर्चा महासभेत होत आहे. महापालिका क्षेत्रांमध्ये वाढत चाललेल्या अनधिकृत बांधकामावर नियंत्रण करण्यासाठी शासनाकडून जी.आर. काढण्यात आला व त्याचे पालन सर्व महापालिकांनी करुन त्यानुसार अनधिकृत बांधकामाबाबत नियमितपणे अहवाल अतिक्रमण विभागाकडून घेण्यात यावेत असे निर्देश देण्यात आले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागप्रमुख पदावर कार्यरत असलेले उपायुक्त, श्री. दिवटे ह्यांनी अतिक्रमण विभागाचा कार्यभार स्विकारण्यापासून अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रणाबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. तसेच अतिक्रमणाचा अहवाल देखील दिलेला नाही.

महापालिका क्षेत्रात सतत वाढत असलेल्या अतिक्रमणावरुन असे दिसून येते की, उपायुक्त, श्री. दिवटे हे त्या पदावर काम करण्यास सक्षम नाहीत. दि. ०९/०१/२००८ रोजीच्या महासभेत त्यांना कार्यमुक्त करावे असा ठराव पारित करण्यात आला होता. त्यावर प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

तसेच दि. १९/०६/२००८ रोजीच्या महासभेत अतिक्रमणबाबत लक्षवेधी सुचना मांडण्यात आली होती. त्यावर महासभेत मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली होती. मागील वर्षभरापासून अतिक्रमण विभागाच्या असमाधानकारक कामकाजाबाबत वारंवार महासभेत चर्चा होत आहे. ह्या असमाधानकारक कामकाजास मा. आयुक्त देखील जबाबदार आहेत.

अतिक्रमण विभागाच्या प्रमुख पदावर काम करीत असलेले उपायुक्त, श्री. दिवटे हे महापालिकेत उपायुक्त पदावर काम करण्यास सक्षम नसल्याने त्यांना तातडीने कार्यमुक्त करण्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो      अनुमोदक :- श्री. डॉ. राजेंद्र जैन**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आपण त्याठिकाणी कॅमेरा घेउन चला.

**मर्लिन डिसा :-**

साहेब, माझ्या वॉर्ड क्र. ६० मध्ये एक पूर्ण सात माळ्याची बिल्डींग अनधिकृत आहे. बिहाईंड डी.सी.बी. बँक.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आमही विचारले, त्याची उत्तरे देणार आहात का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, त्या ठिकाणी व्हिडीओ कॅमेरा, आपले अधिकारी तोडूदस्ता आणि मी तुम्हाला जो पत्र देतो ते घेउन चला. एक नाही चारही टॉवर......

**नयना म्हात्रे :-**

दोन्ही ठराव वाचून कायम करा.

**चंद्रकांत वैती :-**

मा. आयुक्त साहेब, आपण त्याच्यावर काही निवेदन करणार आहात, खुलासा करणार आहात. जर असे करणार असाल की, मी कारवाई करतो आणि पुन्हा विसराल तर मग आश्वासन देउ नका. तुमची जर भुमिका, अगदी नक्की असेल की, मला असे काम करायचे आहे. कारण थांबवता येण्यासारख्या सगळ्या गोष्टी आहेत. मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ने आपल्याला खुप अधिकार दिले आहेत.

**बर्नड डिमेलो :-**

साहेब, याच्यावर आमच्या खुप अपेक्षा आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

साहेब, जी इललिगल कामे आहेत. काल ठाणे महानगरपालिकेचा निर्णय झाला. ठाणे महानगरपालिकेने अग्रवाल समितीने शिफारस केलेल्या तीन पटीने जास्तीचा टॅक्स भरणे. म्हणजे एखाद्या सामान्य माणसाने ती इमारत बघून, खोटी कागदपत्रे बघून फ्लॅट घ्यायचा आणि ज्या ठिकाणी त्याला दिड हजार रुपये टॅक्स भरायचा आहे. तिथे त्याने साडेचार हजार रुपये टॅक्स भरणे कितपत योग्य राहिल? आणि बरेचसे जे इललिगल स्ट्रक्चर झालेले आहेत. ते नाल्यांवर झालेले आहेत. किंवा रस्त्याच्या जागेत झालेले आहेत आणि त्याचा वापर फक्त आणि फक्त समाजाला बिघडविण्यासाठी, लॉजेस चालविण्यासाठी त्या इललिगल कन्स्ट्रक्शनचा, इललिगल स्ट्रक्चरचा वापर केला जातो आहे आणि त्याच्यामध्ये जे इतर ठिकाणी करतात त्याचा उपयोग आज जर सामान्य लोक करायला गेले तर त्यांना तीन पटीने जास्तीचा टॅक्स भरावा लागणार आहे. आणि याच्यात तुमचा सहभाग काय असेल, काय नसेल. पण त्या लोकांच्या वाट्याला ज्या ज्या यातना येतील. त्या यातनांना तुम्ही जबाबदार असाल. म्हणून जे काही आश्वासन द्याल, विश्वास द्याल तो खऱ्या अर्थाने देता येत असेल तर द्या. नाहीतर विषय असाच सोडून द्या.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, आपण खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

अनधिकृत अतिक्रमणाबद्दल सर्व सन्मा. सभागृहाच्या ज्या भावना आहेत. त्या मला तर समजलेल्याच आहेत. पण माझ्यासोबत आमच्या सर्व एच.ओ.डी.नासुध्दा समजल्या असाव्यात अशी मी आशा बाळगतो. ह्या भावना नवीन नाहीत. जरी मी या महापालिकेत नवीन असलो तरी महापालिका आणि पटीक्युलरली ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका, या अतिक्रमणाने बरबटलेल्या आहेत. त्यासाठीच शासनाला अग्रवाल समितीची स्थापना करावी लागली हे ही वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. मी फक्त एक सांगेन मी माझ्या मागच्या आठ महिन्याच्या काळात फारच जास्त काम करु शकलो असे मला सांगता येणार नाही. पण जे काही केले ते थोडक्यात सांगतो. दोन मोठ्या बिल्डींग पाडल्या आणि दोन्ही केसमध्ये मला कन्टेम्प्ट फेस करावे लागले. एका कन्टेम्प्टमध्ये आपण जिंकलो आहोत. दुसऱ्याही केसमध्ये आपण जिंकणार आहोत त्यात काही वाद नाही. पण मी माझ्या सगळ्या शासकीय कार्यालयात इथेच दोन कन्टेम्प्ट केसेस फेस केल्या. आणि आणखी दोनच नव्हे, दोनशे कन्टेम्प्ट केसेस फेस केल्या तरीही ह्याबाबतीत माझी पुढे जाण्याची तयारी आहे. कारण याच्याशिवाय शहर चांगले दिसणार नाही. ह्या मताचा मी आहे. त्यानंतर दहिसर चेकनाका ते घोडबंदर रोड हा जो आपला नॅशनल हायवे आहे. तो खरे म्हणजे एन.एच.ए.आय. चा आहे. (नॅशनल हायवे ॲथोरिटी ऑफ इंडिया) त्यांच्याच ताब्यातील आहे. तरीही त्याची परिस्थिती, आत्ता परत तसाच झाला आहे. मी म्हणत नाही की, झाला नाही. पण पूर्वीपण फार वाईट होती. आपण एक प्रयत्न करावा म्हणून माझ्या इनेशिएटीवमधून आपण स्वतः ते श्री. पाटील पण म्हणाले की, मुख्य नाका आहे. ह्याच्यामध्येसुध्दा हॉकर्स रिमुव्हलची मोहिम प्रभाग अधिकारी त्यांच्या स्तरावर करत असताना, खरेच काय अडचणी येतात आणि तिथे सर्विस रोड कसा आहे? तुमच्या माहितीस्तव सांगतो की, ४५ मीटरचा रोड आहे. त्याच्यामध्ये आपले दहा-दहा फुटची दोन

पक्की गटारे बांधलेली आहेत. त्याच्या बाजुलाही दहा-दहा फुटाचा एक रोड आहे. आणि त्याच्यानंतर सहा-सहा मीटर्सचे त्या मोठ्या बिल्डींगचे सेटबॅक आहेत. म्हणजे ४५ मीटर प्लस १२ मीटर, ५७ मीटरचे जर तुम्ही दोन लाईन पकडली तर एवढा मोठा रस्ता कमीत कमी ह्या भागात तरी नाही. त्यामुळे तो रस्ताही अतिशय चांगला आहे आणि त्याला थोडे वाचवावे. तो तरी ॲटलीस्ट ॲज इट ईज रहावा म्हणून मी स्वतःही दोन दिवस दोन्ही बाजू पायी फिरलो. जिथे अतिक्रमणे होती ती काढली. मी काही त्याचा हिशोब ठेवला नाही. पण जी काही पाच-पन्नास-शंभर असतील. काही सन्मा. नगरसेवक माझ्या सोबत होते आणि आम्ही तो ही सर्विस रोड मोकळा करण्याचा प्रयत्न केला आहे. मला सन्मा. सभागृहाला सांगायला आनंद होत आहे की, त्या सर्विस रोडमध्ये शहराच्या आणि आपल्या नशिबाने फक्त त्या बाजूला चंद्रेश आर्केड नावाची एक बिल्डींग आहे ती थोडी मध्ये आहे आणि ह्या बाजूला हटकेशकडे जाणारा जो रस्ता आहे. त्याच्या अलिकडे दोन-तीन बिल्डींग आहेत. एवढ्या बिल्डींग जरी सोडल्या तरी बाकीचा सर्विस रोड आपण कन्स्ट्रक्ट केला आणि त्याला बॉर्डर करुन त्या साईडला पोल लावून त्या साईडला कलर केले तर ॲटलीस्ट ती बॉर्डर आपली वाचेल आणि हा मोठा रस्ता वाचेल.

**अनिल सावंत :-**

त्यांना पण सोडू नका.

**मा. आयुक्त :-**

ते भविष्यात आपण करु. आत्ता परत त्याच्यामध्ये कोर्ट स्टे येईल. मग कोर्ट स्टे उठेपर्यंत रस्ताच करायचा नाही का? जेवढा होतो तेवढा करायचा या मताचा मी आहे. पुढे मी सन्मा. सभागृहाला सांगु इच्छितो की, अनधिकृत अतिक्रमणाच्या बाबतीत माझ्याएवढा हट्टीपणा कोणी केला नाही. आणि म्हणूनच सर्वच अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या मागे मी लागलो होतो. त्याप्रमाणे आपण कारवाई केलेली आहे. पण नंतर सेस असेल, ऑक्ट्रॉय असेल, इतर जे.एन.एन.यु.आर.एम. असेल आणखीन काही दुसरी कामे असतील. एकच काम धरुन कसे चालेल. मला शहराची साफसफाई बघायची आहे. तिथला जो आपला डम्पींग ग्राउंडचा प्रश्न होता. तो ही आहे. मी पाढा वाचत नाही. अनंत प्रश्न असतील. त्या प्रश्ना व्यतिरिक्त एकच प्रश्न न हाताळता सर्व प्रश्नांना सोबत घेउन जाण्याचा प्रयत्न असल्यामुळे ह्या प्रश्नावर नंतरसुध्दा काही दुर्लक्ष झाले असल्याची शक्यता आहे. पण आम्ही परत त्याच्यावर लक्ष देउन पुढे जाण्याची माझी तयारी आहे. मी जास्त काही सांगणार नाही. थोडक्यात, ज्यांनी सर्वांनी छोट्या छोट्या गोष्टी सांगितलेल्या आहेत. त्या एकदा रिपीट करतो. आणि त्या बाबतीत कार्यवाही करण्याची मी आपल्याला ग्वाही देतो. एक तर पहिली गोष्ट आहे.......

**मा. महापौर :-**

रिपीट करण्यापेक्षा आजपासून आपण काय नवीन करणार आहात ते सांगावे.

**मिलन पाटील :-**

आपले तीन-तीन उपायुक्त आहेत, अतिक्रमणचे पथक आहे. त्यांच्याकडून तुम्ही अहवाल घ्या. तुम्हाला काय काम करायचे आहे?

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये प्रत्येकाने काय मुद्दे मांडले आहेत ते रिपीट करण्यात मी वेळ घालवत नाही. माझी सन्मा. सभागृहाला विनंती आहे की, आपला पाठींबा असेल तर यापुढे ॲटलीस्ट आजपासून, मागचे तर जाउ द्या, जे नवीन बांधकाम होईल. त्याच्यावर आम्हाला एम.आर.टी.पी. चा गुन्हा दाखल करायची परमिशन द्या. नंबर दोन आजपासून जे नवीन बांधकाम करतील, ते ज्यांच्या वॉर्डमध्ये होईल त्या वॉर्ड ऑफिसरला तात्काळ त्याच दिवशी सस्पेन्ड करण्याची आपली मान्यता आहे असे मी गृहित धरतो. नंबर तीन, आजपासून ......

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

१९ जूनच्या मिटींगमध्ये हाच विषय चर्चेला आला होता. आता तुम्ही जे भाषण बोलतात हेच भाषण तुम्ही त्या दिवशी पण बोललात. असाच खुलासा तुम्ही त्या दिवशी पण केला. श्री. निशांत जाधव यांना सस्पेन्ड करा म्हणून मी या सभागृहामध्ये बोलली होती. तुम्हाला सस्पेन्ड करायला कोणी रोखले आहे? आणि एम.आर.टी.पी. कोणी नगरसेवकांनी दाखल करायची आपणच करायची आहे ना?

**मा. आयुक्त :-**

आपणच करणार आहोत. समजून घ्या, आपल्याला प्रत्येक अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांनाही चान्स द्यावा लागतो. मी माझ्या काळात दिला असे मला दाखवायचे आहे. दॅट्स ऑल. आत्ता आपण चान्स दिलेले आहेत आणि मी पण जुना झालो, ते पण मला जुन झाले.

**आसिफ पटेल :-**

साहेब, आपण त्याचीही माहिती घ्या. जनप्रतिनिधी, पत्रकार, सामान्य नागरिक हे आपल्याकडून माहितीचा अधिकार घेत आहेत आणि किती लोक त्या माहितीच्या अधिकारात कार्यवाही करण्यास पत्र देतात. म्हणजे ज्यांनी दिले नाही त्याचा खिसा गरम झाला असे आपल्याला समजायला पाहिजे. त्याने माहितीच्या आधिकाराखाली पत्र का दिले? पत्र दिले म्हणजे त्याने आपल्याला कारवाईचे पत्र दिले पाहिजे. मग तो फक्त माहिती घेतो त्या बिल्डरला भेटतो या शहरात मेन रोडला चिक्कार बांधकामे आहेत. त्यांचे कोणी बघत नाही.

जो एखादा बांधत असेल त्याच्यावर फार लक्ष असते. ही जेवढी पत्र माहितीच्या अधिकाराखाली आपल्याकडे पत्र आली आहेत आणि माहितीचे अधिकार घेतलेले आहेत. त्यांचाही आपण पुढच्या मा. महासभेत उल्लेख करा की, एवढ्या लोकानीं माहितीच्या अधिकाराखाली पत्र घेतले आणि एवढ्या लोकानीं त्या अनुषंगाने त्या इमारतीबद्दल आपल्याला पत्र का दिले नाही की, या इमारतीवर कारवाई करा? कारण त्या अनुषंगानेच त्यांनी आपल्याकडून माहिती घेतली. ज्यांनी केले नाही त्याची माहिती पुढच्या मा. महासभेमध्ये ठेवा की, यांनी माहितीच्या अधिकाराखाली कारवाईचे पत्र दिले नाही म्हणजे त्याचा खीसा गरम झाला.

**मिलन म्हात्रे :-**

अशा लोकांवर कारवाई झाली पाहिजे. त्यांनी माहिती मागितली पुढे काय? पुढे कडक कारवाई झाली पाहिजे.

**आसिफ पटेल :-**

बरेचसे पत्रकार, बरेचसे जनप्रतिनिधी सर्व याच्यामध्ये सामील आहेत. या शहरामध्ये अशा किती तरी बिल्डींग अनधिकृत इमारती आहेत. ज्यांची फक्त माहिती घेतली जाते. तिथे जातात, बघतात, फोटो काढतात. त्यानंतर त्याच्यावर कारवाई करण्याचे पत्र आपल्याकडे येत नाही. त्याचीही माहिती इथे पुढच्या मा. महासभेत सादर करा. कारण याचा अर्थ त्याचा खीसा गरम झाला. त्याने माहितीच्या अधिकाराखाली पत्र मागितले म्हणजे त्याने दोन रुपये तरी खर्च केले तर याची माहिती पण आपण सादर करावी. कारण आपल्या लक्षात येईल किती लोक कल्प्रेट आहेत.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, मागे ज्यावेळी शहरामध्ये कायदा-सुव्यवस्थेचा प्रॉब्लेम झाला होता. त्यावेळी ठाण्याचे एस.पी. श्री. बजाज साहेब......

**आसिफ पटेल :-**

सन्मा. सदस्य अनिल सावंत साहेब, तुम्ही सकाळपासून बोलता. मी आत्ता उभा राहिलो.

**अनिल सावंत :-**

त्यावेळी शहरामध्ये जे वाढते इललिगल लॉजिंग-बोर्डींग आहेत त्याबद्दल श्री. नवल बजाज साहेबांनी एक सुचना केली होती की, त्यामध्ये जे इंटरनल चेंजेस करतात. त्याच्या विरुध्द महानगरपालिकेने गुन्हे दाखल करावेत. मला वाटते त्यानंतरसुध्दा अजून काही गुन्हे दाखल झाले नाहीत. पोलीसांचे अधिकार त्याबाबतीत लिमिटेड आहेत. अनधिकृत बांधकामावर कारवाई करतेवेळी शहरामध्ये जे लॉजींग-बोर्डींग आहेत आणि ज्यांनी इंटरनल चेंजेस केलेले आहेत. त्यांच्या विषयीसुध्दा गुन्हे दाखल करण्यात यावे.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्याला पूर्ण सभागृहाची भावना लक्षात आलेली आहे. आपण आजच आपले जेवढे प्रभाग अधिकारी आहेत. सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांनी सांगितले, सर्व नगरसेवकांना एक पत्र द्या. त्यांनी जी काही अतिक्रमणाबाबतची पत्र दिलेली आहेत त्याची माहिती घ्यावी. आणि त्या प्रभाग अधिकाऱ्यांनी आपल्याकडे सुपूर्द करावी. आणि त्याच्या त्यांच्याकडे काय माहिती आहे ती ही त्यांनी आपल्याला द्यावी. तसेच टाउन प्लानिंग डिपार्टमेन्टने जेवढ्या बिल्डींगमध्ये व्हॅल्युएशन झाले आहे किंवा इललिगल बांधकाम झाले आहे. ती ही माहिती आपण सन्मा. नगरसेवकांकडून घ्यावी आणि त्यांना काही माहिती असेल तर आपल्याकडे द्यावी आणि त्यावर आपण ताबडतोब, बहुतेक १० डिसेंबरला मा. महासभा लागणार आहे. त्या मा. महासभेच्या अगोदर आपण त्याच्यावर आपला पूर्ण अहवाल आपण रितसर सादर करा. ज्या ज्या नगरसेवकांनी आज प्रश्न उपस्थित केले आहेत आणि अजून ते आपल्याला लेखी देणार आहेत आणि सर्व सन्मा. सदस्यांना निवेदन आहे की, आपले मागचे जे काही म्हणणे असेल. ते परत एकदा रेफरन्स देउन आपण प्रभाग अधिकाऱ्यांना द्यावे आणि येणाऱ्या मिटींगमध्ये त्याचा पूर्ण, रितसर.....

**मिलन म्हात्रे :-**

दोन्ही ठराव वाचून कायम करा.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, आत्ता मा. आयुक्त साहेब बोलले की, आजपासून जे काही अनधिकृत .....

**मा. महापौर :-**

आजपासून नाही.

**जुबेर इनामदार :-**

याच्या आधी झाले आहे त्यांचे काय?

**मा. आयुक्त :-**

मा. आयुक्त आल्यापासून.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे तेच झाले. आजपासून जे नवीन अनधिकृत बांधकाम होईल. त्याच्यावर एम.आर.टी.पी. आणि याच्या अगोदर झाले ज्याचे काय?

**मा. महापौर :-**

आजपासून नाही. जे काही झालेले आहे त्याची आपण माहिती द्यावी. सचिव साहेब ठरावाचे वाचन करा.

**मिलन म्हात्रे :-**

तो वाचून कायम करा.

**मा. महापौर :-**

आता दुसरा विषय घेतला. आता कसा वाचणार?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही वाचून कायम का केला नाही?

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त त्याच्यावर कार्यवाही करतील.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, ठराव वाचून कायम केला पाहिजे. मतदान झालेले नाही. अजून मिटींग संपलेली नाही. ठराव वाचून कायम केला पाहिजे.

**मा. महापौर :-**

तसे कसे करता येईल? दुसरा विषय चालु झाला.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुम्ही त्यावेळेला का केला नाही? आत्ता वाचून घ्या. तुम्ही कायम करा. मिटींग संपलेली आहे.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ७२ :-**

अतिक्रमणाबाबत आढावा घेणे.

(अतिक्रमणाबाबत आढावा घेण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७३, उपकराची वसुलीबाबत आढावा घेणे.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांनी आत्तापर्यंत जे काही केले आहे त्याचा पहिल्यांदा रितसर खुलासा करावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, अभी.....

**मा. महापौर :-**

पहले उनको पाच मिनिट का समय दिया है। उसके बाद आप बोलीए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपने आढावा लेने का दो विषय लिया। पहले आपने अतिक्रमण का आढावा लिया। अब आप सेसका आढावा ले रहे है। वापस इसमे जो अधिकारीने काम नही किया, जिनको फॉर्म दिया, फॉर्म बाटे, फॉर्म नही आये उनपर ठराव होगा के नही होगा? मैने आपको उस दिन भी पुछा था। यह दोनो विषय लिए है उसपर ठराव होगा। यह भी शहर के अतिक्रमण से ज्यादा महत्वका विषय है। आप मा. आयुक्त साहब को खडा कर दिया और उन्होने अपना आकडा बोल दिया। यहा पर कितने लोग कितने सुनते है और कितने लोगो को समझ मे आता है, तो फिर क्या होता है की, सब सही। ऐसा नही होगा। या तो मा. आयुक्त अपनी टिपण्णी लाये है तो हमे उसकी कॉपी दे दिजीए। बादमे भाषण दिजीए और नही लाये है तो हमे इस विषय मे चर्चा करने मे इंटरेस्ट नही है। क्योंकी यह महत्व का विषय है। जैसे अतिक्रमण का बहोत हुआ। इस शहर का आर्थिक ढाचा इससे बिगड गया है। इसलीए यह विषय को, जैसे सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील साहबने अतिक्रमण के बारेमे बोला, खास सभा लगाइए। और चार दिन मे पुरी माहिती आने दिजीए। क्योंकी अब तक शहर को भी मालूम नही है।

**मा. महापौर :-**

उसके लिए खास सभा लगायेंगे। जितनी जानकारी है आपकी जानकारी के लिए दे देते है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हमे जानकारी नही चाहिए।

**मा. महापौर :-**

बाकी लोगोंको चाहिए।

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, श्री. दिवटे साहेब इकडून जातील आणि श्री. पानपट्टे राहतील, असेच झाले.

**मा. महापौर :-**

दोघांचाही ठराव आलेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

दोघांचाही ठराव आहे, मग तुम्ही त्यांच्या बाबतीत काय करणार आहात ते सांगा. त्यांची पण हकालपट्टी करणार आहात की, या मिरा भाईंदरमध्ये परत घाण करण्याकरीता त्यांनाच ठेवणार आहात? साहेब, तुम्ही श्री. दिवटे साहेबांचा ठराव जसा वाचून कायम केला. तसा त्यांचादेखील करा. असे चालणार नाही. ज्यावेळेला महापालिकेमध्ये.....

**मा. महापौर :-**

तुम्ही ठराव केला ना.

**नयना म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांचे पत्र नाही. त्यांनी तुम्हाला सांगितले नाही?

**मा. महापौर :-**

मग ठराव केला ना.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, ज्यावेळेला श्री. पानपट्टे साहेबांना इकडे कायम केले तेव्हा फक्त आमचा चार नगरसेवकांचा विरोध होता.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या खेळ्यांना तुम्ही करता काय? वाचून कायम करा.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही तेवढे एक काम करा. अख्खा दिवस मग चांगली मिटींग गेली. एवढे पाच मिनीटाचे काम पटकन करा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही खेळी खेळता का?

**मा. महापौर :-**

श्री. दिवटे साहेबांना कार्यमुक्त करायचे असा ठराव सन्मा. सभागृहाने मांडलेला आहे. आणि श्री. पानपट्टे साहेबांना.....

**मिलन म्हात्रे :-**

तोसुध्दा तोच मांडलेला आहे.

**मा. महापौर :-**

त्यांनी जो ठराव मांडलेला आहे की, निलंबनाची कार्यवाही करावी. तो ही ठराव मांडला आणि मंजुर झाला.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव वाचून करा. ते बोलले आहेत. वाचून घ्या आणि कायम करा.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही फक्त सचिवांना एवढेच सांगा की, तो ठराव वाचून कायम करावा.

**मा. महापौर :-**

आत्ता दुसरा विषय झाला. परत कसे जाता येईल?

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा दृष्टीकोन निराळा आहे.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, असा वाचन करता येतो का?

**मा. महापौर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे अनुमोदन काय कामाचे? वाचून कायम करा.

**नयना म्हात्रे :-**

ते उद्यापासून मिरा भाईंदरमध्ये येणार नाहीत असे काहीतरी बोला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, आपको मै बता रहा हू, या तो ठराव करनेकी अनुमती दिजीए। इस साल के अंदर पाच दिन तक पुरे शहर को आग मे ढकेला है और आज वापस अगर मा. आयुक्त साहब, यहॉपर

टिपणी देंगे, हमको मालूम है क्या हो रहा है। आज कारखाने बंद है और वापस इस विषय को अगर अलग रंग देना है, या तो इस विषय को बाकायदेशीर मा. आयुक्त को लाने दिजीए की, मैने यह काम किया है।

**प्रफुल्ल पाटील :-**

विषय आणलेला आहे. विषयावर चर्चा होउ द्या. आणि मग सभागृहाचे मत घेवून तो विषय पुढे घ्या. तसा विषय निर्णय घेण्यासारखा नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एक बाजु मे बोलते है की, टिपणी नही है। यह तो ज्वलंत विषय है। पुरा शहर पाच दिन तक बंद रहा।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवालजी आप जैसे बोल रहे है वैसे विषय वापस लेकर आऐंगे। लेकीन जो कुछ जानकारी है वह देने दिजीए। किसी ना किसी के काम आएगी।

**जुबेर इनामदार :-**

गोषवारा क्यों नही आया?

**मा. आयुक्त :-**

माझी सन्मा. सभागृहाला विनंती आहे की, अनधिकृत अतिक्रमणाचे मॅडम म्हणाल्या. आम्ही मान्य करतो की, एखादी गोष्ट होत नाही, मागे राहते. दोन-चार महिन्यानंतर आपण आठवण करुन दिली तर आपण परत घेउ. पण हा आर्थिक विषय आहे. आणि या आर्थिक विषयामध्ये पैशाचे नाटक करता येत नाही. बाकी सगळी नाटके करता येतील. त्यामुळे माझी सन्मा. सभागृहाला विनंती आहे की, जी काही वस्तुस्थिती आहे ती पाच मिनिटे ऐकावी आणि नंतर आपण निर्णय घेण्यासाठी सक्षम आहात. म्हणून जोपर्यंत वस्तुस्थिती कळणार नाही. आपण कुठे आहोत, आपल्याला कुठे जायचे आहे आणि आपण कितपत जाउ शकतो की, जाउ शकत नाही की, आपण मध्येच चक्कर येउन पडणार आहोत. हे बघणे आवश्यक आहे. आणि म्हणून माझी विनंती आहे की, मी जे काही तीन-चार मिनिट सांगणार आहे ते जरा काळजीपूर्वक ऐकावे. पहिला मुद्दा असा आहे की, मी मागे जात नाही. म्हणजे सेस कसा लागला याच्यामध्ये मी जाणार नाही. परंतु, आपण घाईगडबडीत सेस लावला. एवढे फक्त मला सांगायचे आहे. आणि तो सेस लागल्यानंतर आमच्याकडे वेळ नसतानाही आम्ही आमच्या परिने आम्हाला जो काही प्रयत्न करता आला त्या परिने प्रयत्न करुन आपण सेसचा निर्णय देखील सक्सेसफुल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण मी सुरुवातीलाच सांगु इच्छितो की, दर महिन्याला ऑक्ट्रॉयमध्ये आपल्याला ६ कोटी ७१ लाख रुपये आले असते. त्याच्याऐवजी आपल्याला सेसमुळे पहिल्या सप्टेंबर महिन्यात जवळपास ४ कोटी रुपये आजपर्यंत आलेले आहेत. आणि ते जास्तीत जास्त ५ कोटीपर्यंत आपण जाउ. हे मी जबाबदारीने बोलतो, म्हणजे आपला सध्याचा जो काही अनुभव आहे त्याचा विचार करता, म्हणजे पहिल्या महिन्याचे बोलतो. कारण त्यामुळे आपण जरी हे ५ कोटी पहिल्या पहिन्यात केले असले तरी १ कोटी ७१ लाख रुपये आपले नुकसान होईल, असा अंदाज आहे. त्यानंतर शासनाने जरी १५ टक्के देण्याचे मान्य केले. ते १५ टक्के जरी मायनस केले तरी जवळपास पंन्नास-पंच्याहत्तर लाख रुपये आपले पहिल्या महिन्यात नुकसान होईल. आणि हीच परिस्थिती पुढेसुध्दा राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. आमचा प्रयत्न आहे की, आम्ही पुढेही हे नुकसान थोडे थोडे करत त्याला बिलकुल आपण ८५ टक्के वसुली करु. जेणेकरुन आपली ८५ टक्के वसुली आणि १५ टक्के शासनाचे आणि आमचा तर पुढे जाउन हा ही प्रयत्न आहे की, ८५ टक्केच्या पुढे आपण ९० टक्के, ९२ टक्के, ९५ टक्के पर्यंत जाण्याचा प्रयत्न करु. परंतु, मी तुम्हाला हे सांगु इच्छितो की, मागच्या दोन महिन्यातील अनुभव असा आहे की, व्यापाऱ्यांचे मी खरे म्हणजे आभार मानतो की, त्यांनी खरेच सहकार्य पण केलेले आहे. पण तरीही पूर्ण सहकार्य आहे असे म्हणता येणार नाही. अदरवाईज ऑक्ट्रॉय एवढा पैसा यायला पाहिजे होता. जर ऑक्ट्रॉय एवढा पैसा आला असता तर खरेच १०० टक्के सहकार्य आहे असे आपण म्हंटले असते. आता सर्वच माणसे सारखीच नसतात. तसे सर्वच व्यापारी सारखे नसतील. त्यामुळे मी सर्वच व्यापाऱ्यांना एका तराजूत तोलतो असे नाही. परंतु, तरीही आपल्याला काही स्ट्रीक्ट आणि हार्ड ॲक्शन घेण्याची आवश्यकता आहे. मी सन्मा. सभागृहाचा वेळ वाया घालवत नाही. आपण बाकी सगळ्या गोष्टी केल्या आहेत, त्या मी सांगत बसत नाही. मी वस्तुस्थिती सांगितली आणि रजिस्ट्रेशनच्या बाबतीतही सांगु इच्छितो की, जवळपास १७ हजार ५७० व्यापाऱ्यांनी आपल्याकडून फॉर्म घेतलेले आहेत. त्या १७ हजार ५७० पैकी जवळपास ६० टक्के लोकांचे आपण रजिस्ट्रेशन केले आहे, ९२०५ आणि बाकी उरलेल्यांचे रजिस्ट्रेशन करण्याची प्रक्रिया चालू आहे. मी फक्त एकच सांगेन. मी सुरुवातीलाही सांगितले आहे की, आपण सेसमध्येसुध्दा १०० टक्के सक्ससेफुल झालेले नाही. आम्ही आमची स्वतःची पाठ थोपटून घेणारे नाही. आपण एक कोटी किंवा दिड कोटी जरी नुकसान झाले तरी माझ्या दृष्टीने मोठी रक्कम आहे. आणि महानगरपालिकेच्या, शहराच्या दृष्टीनेसुध्दा मोठी आहे. त्यामुळे ह्याचाही मी वस्तुस्थितीचा अहवाल आपल्या समोर ठेवतो. मी हाच अहवाल शासनाला देखील पाठवला आहे. आपण म्हणत असाल तर तो ही मला वाचून दाखवता येईल. मी दुसरे एक सांगु इच्छितो की, आपण जरी हे रजिस्ट्रेशन केले असले तरी आत्ता मी थोडे हे ही सांगतो की, नवी मुंबई महानगरपालिकेत १९९६ साली सेस लागू झालेला आहे आणि

आजपर्यंत जवळपास बारा वर्षापासून त्यांचा सेस सुरु आहे. पण विशेष म्हणजे पूर्वी तिथे ऑक्ट्रॉय नव्हता. त्यामुळे त्यांना कम्पॅरिझनला काही साधन नाही. त्या ठिकाणी बारा वर्षापासून सेस चालू असतानाही १७ हजार लोकांचे रजिस्ट्रेशन झालेले आहे. आपण सुरुवातीलाच १७ हजार ५७० अर्ज दिलेले आहेत. तेवढे रजिस्ट्रेशन झाले नसले तरी आपण आपला प्रयत्न केलेला आहे. दुसरे हे ही सांगतो की, आपल्यासोबत 'ड' वर्गाच्या बाकीच्या ज्या पंधरा महानगरपालिका आहेत. तिथेही सेस लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता आणि तो त्यांनी कंम्प्लसरी लावावा असे शासनाने डायरेक्ट केले होते. तथापी १ नोव्हेंबरपासून ज्या सोलापूर, कोल्हापूर, अकोला-अमरावती, मालेगाव आणि औरंगाबाद अशा सहा-सात महानगरपालिकांमध्ये त्यांनी जे काही रजिस्ट्रेशन सुरु केले होते. पण त्यांना तिथे व्यापाऱ्यांची, मी यासाठीच आभार मानले की, आपल्याकडे त्यांनी ॲटलीस्ट रिस्पॉन्स तरी चांगला दिलेला आहे. तिकडे तर बिलकुल काहीच कार्यवाही झालेली नाही. जास्तीत जास्त पाच-पंचविस-पन्नास अशी रजिस्ट्रेशनची फिगर आहे. आणि त्यामुळे ते लवकर जागे झाले. कारण त्यांच्याकडे त्या महिन्यात पाच पैसेही येणार नव्हते आणि त्यांनी सर्वांनी मिळून शासनाकडे पाठपुरावा केल्यामुळे शासनाने त्यांना परत अशी मुभा दिलेली आहे की, तुम्ही ऑक्ट्रॉय लावायचा तर ऑक्ट्रॉय लावा, सेस लावायचा तर सेस लावा. तुम्ही तुमची आर्थिक परिस्थिती बघा आणि तुमची आर्थिक परिस्थिती सुधारेल असा निर्णय तुम्ही घ्या. आणि त्याप्रमाणे तुम्ही अंमलबजावणी करा. थोडक्यात शासनाने हा निर्णय सर्वाथाने संबंधित महानगरपालिकांवर सोडलेला आहे. मी मिरा भाईंदर सोडून असे म्हणता येणार नाही. मिरा भाईंदरच्या बाबतीतसुध्दा ज्याअर्थी शासनाने पंधरा महानगरपालिकांना मुभा दिली त्याअर्थी आपल्याला मुभा नाही, असे नाही. आपणही वर्ग 'ड' आहोत आपल्याकडे पैशांची गरज आहे. आपल्यालाही आपल्या स्वतःच्या फायनान्सचा विचार करणे आवश्यक आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण याच्यामध्ये काय निर्णय घेतला? उपकर लावायचा की जकात लावायची?

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हाला वस्तुस्थिती सांगतो. मी त्याच्यावर येतो. आता आपण शेवटी या गोष्टीकडे जाउ या की, हे जे काही चार कोटी आपल्याला आले आहेत आणि आणखीन थोडेबहुत पहिल्या महिन्याचे येण्याची शक्यता आहे आणि दुसऱ्या महिन्याचेही येतील. त्यासाठी फार कष्ट घ्यावे लागलेले आहेत. हे ही मला सन्मा. सभागृहाला सांगायचे आहे. त्यामध्ये आपले जवळपास १०० कर्मचारी एंगेज झालेले आहे हे ही मला सन्मा. सभागृहाला सांगायचे आहे. आणि आपण ज्यावेळेला जी.सी.सी. मध्ये सर्वसाधारण माहिती घेण्यासाठी एक मिटींग बोलावली होती, त्यावेळेस सर्वांचे असे मत होते की, पहिले काही महिने, तीन महिने आपण ज्यादा कम्प्लसरी करणे योग्य नाही. त्यांनाही माहिती नाही. त्यामुळे आपला तसाही प्रयत्न राहिलेला आहे. आपण कोणच्याही मागे जास्त लागलेले नाही. आम्ही दोन-एक हजार लोकांना तशा नोटीसा दिल्या. पण तरीही आपण अद्याप सक्तीची कार्यवाही केलेली नाही. कोणावरही पोलीस केस केलेली नाही. चौदा लोकांवर फक्त दहापट दंडाची कारवाई केलेली आहे. पण ती ही काही पर्टीक्युलर परिस्थितीत करावी लागली. जेणेकरुन, पाट्यावाले पैसे भरतील. अदरवाईज, सर्वसाधारणपणे आपण ही कार्यवाही केलेली नाही. तथापी, हा जो दर महिन्याचा दिड-दोन कोटी रुपये लॉस आपल्याकडे येतो आहे. तो भरुन काढायचा असेल तर आणखीन सक्त आणि स्ट्रीक्ट कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे हे ही मी सभागृहाला सांगु इच्छितो आणि प्रशासन त्याच्यासाठी पण मागेपुढे बघणार नाही आणि गरज पडल्यास पोलीस केसेस करणे, गरज पडल्यास त्यांची दुकाने सील करणे, त्यांचे गोडाउन सील करणे, त्यांना दहापट दंड लावणे, त्यांच्या गाड्या थांबविणे, हा सगळा सोपस्कार आवश्यकतेनुसार केला जाईल. आणि त्याला सभागृहाची मान्यता आहे असे मी समजतो. कारण आपण त्यांना एम्पल टाईम, तीन महिने, आत्ता ह्या ३० नोव्हेंबरला तीन महिने संपतील. दुसरी ही एक बाब निर्दशनास आली आहे की, दर महिन्याचा सेस त्याच्या पुढच्या महिन्याच्या दहा तारखेपर्यंत भरायला पाहिजे तो ही भरला जात नाही दहा तारखेनंतर पंधरा, वीस, पंचवीस तारखेपर्यंत ज्यावेळेस आमचे लोक त्यांच्याकडे जातील. भर रे बाबा, तु भरला नाही, मागच्या महिन्याचा एवढा राहिला, या महिन्याचा भर, मग ते भरतात. तर आपण आत्ता नोव्हेंबरच्या एक तारखेनंतर त्यांना एक पत्रही देत आहोत की, आत्ता नोव्हेंबर नंतर आपल्याला कुठल्याही परिस्थितीत दहा तारखेच्या पुढेही जाता येणार नाही, आपण गेलात तर परत दंडात्मक करावाई करावी लागेल, व्याज लावावा लागेल, वगैरे वगैरे. व्यापाऱ्यांना सवयी लावण्याचा भाग आहे. पण तथापी, मी हे ही सांगतो की, आपण व्यापाऱ्यांना आपल्या कर्मचाऱ्यांना कितीही सवयी लावली आणि आम्ही स्वतःही कष्ट करण्याचा प्रयत्न केला. तरीही शेवटपर्यंत हेच चित्र राहील किंवा त्यात कमी जास्त काही होईल. हे मला लगेच सांगता येणार नाही. एवढेच मी आपल्यासमोर सांगु इच्छितो आणि आय ॲम वेरी हॅप्पी की, सभागृहाकडूनही सेस अंमलबजावणी करताना कुठेही अनुचित प्रकार नाही किंवा कोणी फोन केले, काय केले आणि थांबा, यांना हे करा, ते करा असे नाही. आपल्या सर्वांचे सहकार्य आहे. पुढेही असेच सहकार्य ठेवले, ॲटलीस्ट या विषयात तरी ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन आपल्या शहराचे इन्कम आहे. म्हणजे ज्याच्यावर आपले शहर चालते, त्याच्यामध्ये आपल्याला काही नुकसान होणार नाही आणि आपण ॲटलीस्ट

ॲट पर विथ, ॲट पर म्हणजे इक्वल टू ऑक्ट्रॉय राहू. त्या व्यतिरिक्त बऱ्याच गोष्टी आहेत. आपण जर काही प्रश्न विचारले तर मला सांगता येतील. थँक यु.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेबांनी आता जे सांगितले. पण मला वाटते, मा. आयुक्त साहेब, उपकराच्याच फेवरमध्ये दिसतात. बरोबर की नाही? आपण जे सांगितले ते उपकराच्याच फेवरमध्ये सांगितले. सभागृहाने उपकरामध्ये आम्हाला सहकार्य केले. पण आज व्यापाऱ्यांमध्ये उपकराबाबत एवढा असंतोष आहे की ते जकात लावायला आजही तयार आहेत. जर आपण आपल्या महानगरपालिकेकडून शासनाला पत्र पाठविले की, आम्ही जकात लावायला सुरुवात करु तर बरे होईल.

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आजच्या तारखेला आपल्याकडे दोन्ही पर्याय उपलब्ध आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आत्ता आपले शंभर कर्मचारी उपकरामध्ये लागलेले आहेत. मग आपल्याकडे स्टाफ पण कमी झाला ना?

**अरूण कदम :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्याकडे आजच्या तारखेला दोन्ही पर्याय उपलब्ध आहेत. कारण मा. मुख्यमंत्र्यांनी आपल्या तिथे जर आपण ठराव करुन पाठवला तर आपल्याकडे जकात लागु शकतो. परंतु, आपल्याकडे मागच्या वेळेला जकात कर चालु होता. आजच्या तारखेला उपकर चालु आहे. याची तुलना करुन आपल्याला कुठला पर्याय निवडता येईल. कारण आपले बरेच अधिकारी आपण सांगितल्याप्रमाणे त्याच्यामध्ये गुंतलेले आहेत. बरीच शक्ती तिथे लागते आणि जसे अपेक्षित पैसा आपल्याला यायला पाहिजे तसा येत नाही आणि आजच्या तारखेला मा. मुख्यमंत्र्यांनी ही एक संधी दिलेली आहे. आपण मा. महासभेमधून ठराव करुन तिथे पाठवून सर्वसाधारण सिंम्पल मार्गाने जकातीच्या मार्गाने पैसा उपलब्ध करु शकतो. तर आजच्या तारखेला तुम्हाला काय वाटेल की, कोणता पर्याय आपल्याला सोपा आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

जकातीने आपल्याला रोजच्या रोज पैसे उपलब्ध होतील आणि उपकर महिन्यातून एकदा भरला जाईल. त्याच्यामध्ये परत तुम्ही दहा टक्के लावणार. त्याने दहा तारखेपर्यंत भरला, नाही भरला. त्याच्यामागे परत केसेस करा.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, कोणत्याही डिपार्टमेन्टला गेले. माणसे कुठे गेली तर उपकरला. म्हणजे आपले कर्मचारी ठिकाण्यावर नाहीच. त्याच्यापेक्षा आपल्याला ऑक्ट्रॉय परवडली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आता मा. आयुक्त साहेबांनी जो आढावा दिलेला आहे. महणजे एकतर आपल्याकडे चार कोटी झालेले आहे आणि एक कोटी त्यांनी अपेक्षित केलेले आहे. हे जे पाच कोटी आलेले आहेत, भाईंदर वेस्ट, भाईंदर ईस्ट आणि मिरारोड याची एक विभागणी करुन आपण जेव्हा पुढच्या वेळी अहवाल देणार आहात. आम्हाला भाईंदर वेस्टमधून एकूण किती रक्कम मिळाली? ईस्टमधून किती आणि मिरारोडमधून किती मिळाली आता आपण दिले आहे सतरा हजार पाचशे अठरा फॉर्म वाटलेले आहेत. त्यातले नउ हजार फॉर्म आपल्याकडे आलेले आहेत. म्हणजे अजून आठ हजार फॉर्म बाकी आहेत. त्या आठ हजार फॉर्मची तुमच्याकडे नोंद आहे. तुम्ही शंभर रुपये घेतली त्याची नोंद आहे. त्याची यादी पाहिजे की, ज्यांना तुम्ही फॉर्म दिलेले आहेत आणि त्यांनी तुम्हाला भरुन दिले नाहीत आणि न भरुन दिलेले जे व्यापारी आहेत. त्यांच्यावर आता तुम्हाला वेळ दिलेले आहे. आता तुम्ही सभागृहाला सांगितले की, मला सर्व अधिकार दिलेले आहेत. आम्ही ते दिलेले आहेत. त्या आठ हजार लाकांनी जे फॉर्म परत केले नाहीत किंवा तुमचे अधिकारी गेले नाहीत किंवा तुमचे अधिकारी गेले नाहीत किंवा त्यांनी का दिले नाहीत याचाही तपशिल आम्हाला पुढच्या मा. महासभेमध्ये जेव्हा विषय येईल तेव्हा पाहिजे. तिसरी गोष्ट आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये जी कर आकारणी आहे त्या कर आकारणीमध्ये कमर्शिअल आणि रेसिडेन्शीअल ही आपल्याकडे नोंद आहे. टोटल कमर्शिअल प्रॉपर्टी किती आहेत. त्याची नोंदपण आम्हाला पाहिजे. त्याच्यामध्ये किती दुकाने बंद आहेत हे आपल्याला कळणार आहे. सतरा हजार फॉर्म वाटले आणि आपण नवी मुंबईचे उदाहरण दिले. ते योग्य होणार नाही. आपल्याकडे कमर्शिअल गाळे किती आहेत आणि त्याची आपण आता कर आकारणी वसुल करतो. तो ही आकडा आपण पुढच्या मा. महासभेत आम्हाला द्यावा आणि ऑक्ट्रॉय आणि सेस हा शेवटचा विषय आहे. पहिला जो लागलेला आहे. त्याच्यावर विचार करायचा आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहब, जी.सी.सी. मे अपना मिटींग हुआ था। उस समय भी मैने एक सुझाव दिया था, लेकीन आपने अमान्य किया था। लेकीन आजकी परिस्थिती मे जब आप बोल रहे है की, आप १ करोड ५१ लाख से पिछे चल रहे है। मै वापस सुझाव देना चाहूँगा की, सेस के अंदर जो यह महिने की प्रक्रिया है और

जो कागजी कार्यवाही है इसमे कितने व्यापारी संघठन ऐसे है जो साल की निश्चित रकम देकर इस कागजी कार्यवाही से छुट्टी पाना चाहते है। आप इसका वापस विचार कीजीए की, अगर आपको साल के शुरुआत मे बारा महिने की रकम मिल जाती है, कुछ मापदंड अदा करके, तो उससे आपके पास ज्यादा रकम आयेगी और जो लोगो को इसमे कही हिचक है की, सेल्स टॅक्स नंबर है, यह है। उनके मन मे कही हिचक है और जो हर महिने की कार्यवाही है, उस महिने के जगह पर साल मे इकठ्ठा कर लेंगे तो जो लोग आगे नही आ रहे है वह भी आगे आ जायेंगे। कही लोग इसलीए अपना रसीद नही कॉटते की, हम नोटीस मे आ जायेंगे। कृपा करके बिझनेस लोगोंका माईंड है उसको आप रिड किजीए और इकठ्ठा लेने की प्रक्रिया के बारे मे विचार किजीए।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, या ऑक्ट्रॉयच्या विषयावर शहरामध्ये प्रचंड असंतोष, पाच दिवस शहर बंद होते. त्यानंतर आपण घाईघाईने सेस लावला आणि सेस लावल्यानंतर ही जी चार ते पाच करोडची रिकव्हरी आहे. ही खरोखरच आपल्या अधिकाऱ्यांनी चांगले काम केलेले आहे. सेस हा विशेषतः नवीन विषय असते वेळीसुध्दा पहिल्या महिन्यामध्ये एवढी रिकव्हरी करुन आपल्या अधिकाऱ्यांनी चांगले काम केलेले आहे. आज शहरामध्ये ऑक्ट्रॉय बंद झाल्यामुळे पब्लिक खुष आहे. व्यापाऱ्यांमध्ये जो असंतोष आहे तो पूर्वीसुध्दा होता. ऑक्ट्रॉय ज्यावेळी होता त्यावेळीसुध्दा, त्याच्यामध्ये असंतोष होता. आतासुध्दा आहे. म्हणजे त्या व्यापाऱ्यांमध्येच काहीतरी गडबड आहे. तर आत्तासुध्दा, याच्या पुढेसुध्दा ज्याप्रमाणे मा. आयुक्त साहेबांचे वर्कींग चालु आहे, कदाचित आपण ऑक्ट्रॉयच्या पुढेसुध्दा जाउ शकू असे मला वाटते. त्यामुळे उपकर हा चांगला पर्याय आहे आणि योग्यरितीने जर त्याची हाताळणी केली तर या शहरातील सर्व नागरीकांना आणि व्यापाऱ्यांनासुध्दा एक चांगला पर्याय होउ शकेल.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर महोदय, मा. आयुक्त साहेब, महाराष्ट्रामध्ये उपकर स्विकारणारी आणि अंमलात आणणारी आपली तिसरी महानगरपालिका आहे. मा. महापौरांनी सर्वांच्या सहकार्याने या शहराला गणेशोत्सवाची ती भेट दिलेली होती. तेव्हा त्यांचे अभिनंदन करायचे राहिले ते आज करतो. तुमचे आणि सगळ्यांचेही अभिनंदन. आणि कमिशनर साहेबांनी या उपकराच्या बाबतीमध्ये जे परिश्रम घेतले ते खरोखर कौतुकास्पद आहेत. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनादेखील आपले काम सांभाळून सेसच्या बाबतीमध्ये ज्या पध्दतीने काम केले. म्हणजे खऱ्या अर्थाने नोकरी करताना जी मेहनत करायची ती सगळी केली. कमिशनर साहेब, मी आपल्याकडे मागेही थोडीशी चर्चा केली होती की, आपण सरसकट सगळ्यांना एकाच फॉरमॅटमध्ये फॉर्म उपलब्ध करुन दिले होते. त्यावेळेला कॅटेगीरी करताना हेवी इंडस्ट्रीज, स्मॉल स्केल इंडस्ट्रीज, लेबर वर्क करणारे आणि प्रोफेशनल वर्कींग जे आहेत. तर त्यांना वेगवेगळे फॉरमॅट असते तर ते अधिक चांगले झाले असते. कारण एवढ्या मोठ्या फॉरमॅलिटीज कोणी पूर्ण करायच्या? एवढी पाने कशी भरायची? आणि एवढे नंबर कसे दाखवायचे? लोकांमध्ये कन्फ्युजन होते. आपण या शहराला उपकर लावला. महाराष्ट्र शासनाने उपकराचा एक पर्याय उपलब्ध करुन दिला होता. आपल्याकडे उपकर लावण्याची परिस्थिती का निर्माण झाली? तर आपण जकात ठेका पध्दतीने वसुल करत होतो आणि ती वसुली करताना ठेकेदाराकडून जो त्रास चालला होता, जो जाच चालला होता. ह्या सभागृहामध्ये अतिशय आक्रमकपणे या विषयात सगळ्यांनी आपण भुमिका मांडल्या होत्या. वसुली करताना कोणाच्या पर्स चेक करणे, बॅग चेक करणे, खुप गोष्टी आहेत. त्या विषयापर्यंत मी जात नाही. परंतु त्यानंतर झालेले व्यापाऱ्यांचे आंदोलन. त्या आंदोलनाच्या माध्यमातून बऱ्याच व्यापाऱ्यांशी महानगरपालिका सरळ संपर्कात आली. कमिशनर आणि इतर अधिकारी सरळ संपर्कात आले. सध्या या उपकराबद्दल त्या व्यापाऱ्यांमध्ये काय मत आहे? बऱ्याच संघटनांची, असोसिएशनची, व्यापाऱ्यांची नावे आपल्याकडे आहेत. मा. आयुक्त साहेब, काही लोकांनी सांगितले. कारण याच्यामध्ये कसे आहे की, तो धंदा व्हाईटचा दाखवायचा असतो किंवा इन्कम टॅक्स भरतात त्या पध्दतीने रिटर्न जसे भरतात. तशा पध्दतीने त्यांनाही शो करायचे असते आणि व्यापाऱ्यांना भिती वाटते की, आम्ही एवढा मोठा सेस भरला हे जर वर कळले तर आम्हाला ते अडचणीचे होईल. म्हणजे आपण किती गुप्तता ठेवू शकतो? पण जर उद्या खरेच इन्कम टॅक्सची रेड आली आणि त्यांनी आपल्याकडे पेपर मागितले तर आपण ते देउ शकतो की नाही याची कायदेशीर माहिती आपण कोणाला देत नाहीत. लोकांना आपण एवढेच सांगतो की, काही काळजी करु नका. पण खरी भुमिका काय आहे हे आपण स्पष्ट करत नाही. आत्ता हे असोसिएशन वगैरे आहेत. याच्याकडून आपल्याला याबाबत त्यांचे नेमके काय मत आहे याची एक आढावा बैठक आपण वेगवेगळ्या स्तरावर घेतली तर आपल्याला व्यापाऱ्यांची मानसिकता नेमकी काय आहे ती कळेल. ऑक्ट्रॉय संपल्यामुळे जर कोणाचा फायदा झाला असेल तर तुमच्या आमच्यासारखे शहरात राहणारे जे लोक आहेत ते मुंबई किंवा अन्य कुठून तरी काहीतरी वस्तु विकत आणतात. तर त्या वस्तुला आम्हांला कोणाला मस्का मारावा लागत नाही. म्हणजे जो सामान्य परचेसर आहे तो कुठूनही परचेस करुन ती वस्तु घरी घेउन येतो. तेव्हा त्याला कोणत्याही प्रकारच्या फॉरमॅलीटीजला सामोरे जावे लागत नाही. तर जो व्यापार करतो, जो उद्योग करतो. त्यालाच त्याच्यामध्ये इफेक्ट येतो. अजून सेससाठी काही सोर्स आपण शोधलेले नाहीत. पैकी, येणारी वाहने, रिलायन्स

एनर्जीची, टाटाची किंवा केबलची ही येणारी केबल, हा इन्कम सोर्स आपण अजून शोधलेला नाही. वाहने विकत घेतात तो इन्कम सोर्स आपण अजून शोधलेला नाही. डायमन्डस्वर, सोन्यावर किंवा अन्य कामासाठी जी मजुरी करतात हा इन्कम सोर्स आपण शोधला. परंतु, त्याच्यात अजूनपर्यंत आपण अंमलबजावणी करु शकलो नाही. कारण लेबरवर नेमका काय उपकर लावायचा हे आपण सांगु शकलो नाही. आपल्याला आजमितीस उत्पन्नाची आकडेवारी पाहिली तर ऑक्ट्रॉयमध्ये त्याच जागेवर महापालिकेचे कर्मचारी असते तर एवढी मोठी ऑक्ट्रॉय आपल्याला दिसली नसती. त्यात त्यांची चढाओढ झाली म्हणून जास्तीचे उत्पन्न आपल्याला मिळायला लागले. मग व्यापारी त्याचा फायदा कट करुन वजा अधिक खुश, खुश, खुश ते पण बाजूला करुन मागतो त्याचा फायदा घेत होत होता. पण आपल्या फक्त आत्ता निव्वळ जो उद्योग करतात, जो व्यापार उदिम करतात त्या व्यापार उदिमावरतीच सेस लावायचा आहे. आणि एखादी नवीन गोष्ट राबवायची तर बरेच लोक नाही नाही करत ती करत असतात. आपण ज्या पध्दतीने कामकाज करत आहात. त्या पध्दतीने खुप स्वागत आणि खुप चांगल्या पध्दतीने कामकाज सुरु आहे. परंतु, यदाकदाचित काही लोकांच्या भावना अशा असतील. काही व्यापारीही सांगतात. कधी कधी रागाला जसे एखादे वाक्य बोलले जाते की, मी हे करेन, मी ते करेन. तसे जर कोणी सांगत असेल की, याच्यापेक्षा ऑक्ट्रॉय चांगली. तर यासाठी ज्या विविध संघटनांनी शहरामध्ये आंदोलने केली होती. त्या संघटनांच्या प्रतिनिधींना बोलवा. त्यांची मते आजमावा, सभागृहाची मते आजमावा आणि याच्यामध्ये निर्णय घ्या. परंतु, याबाबतीमध्ये उपकरा संदर्भात जसे सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी सांगितले की, भाईंदर ईस्टमधून, वेस्टमधून आणि मिरारोडहून किंवा जे ग्रामीण क्षेत्र आहे किंवा हेवी इंडस्ट्रीज आहेत, स्मॉल स्केल इंडस्ट्रीज त्या पॉकेटमधून काय काय उत्पन्न झाले ती आकडेवारी जर आपण या सभागृहासमोर सांगितली असती तर आपल्या अधिक सक्षमतेने त्याच्यावर चर्चा करता आली असती.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर साहेब, आणि सन्मा. आयुक्त साहेब, अनेक गोष्टींना जेव्हा आपण प्रॅक्टीकल स्वरुप देतो. तेव्हा खरी परिस्थिती आपल्या समोर येते. जोपर्यंत कुठल्याही गोष्टीवर एक्सरसाईज केला जात नाही. तोपर्यंत बोलाचा भात आणि बोलाची कढी म्हणून आपल्याला मजा येते. पण जेव्हा प्रत्यक्षात एक्सरसाईज केला जातो त्यातून येणाऱ्या रिझल्टमधून पुढची पावले उचलायची असतात. सेस लावण्याचा निर्णय सभागृहाने एकमताने घेतला. त्याच्या पाठीमागे व्यापाऱ्यांचे आंदोलन निश्चितपणे होते. त्या आंदोलनाच्या मागे जकात ठेकेदार जाचक त्रास देत होता म्हणून त्यांना ठेकेदार नको होता आणि त्याला पर्याय म्हणून आपण या ठिकाणी १ सप्टेंबरपासून सेस लावला. आता सेस लागल्यानंतर त्या सेसमुळे या शहराच्या विकासाला नेमकी काय दिशा मिळणार आहे. याचा उहापोह होणे गरजेचे आहे. ऑक्ट्रॉय असताना या शहराच्या विकासाच्या कामामध्ये आर्थिक सहभाग कसा होता त्याची संपूर्ण माहिती आपल्यापुढे आहे. सेस लावल्यानंतर आपल्या आर्थिक उपाययोजनांमध्ये नेमके काय फरक पडला किंवा त्याचा काय परिणाम होणार आहे, याचाही उहापोह या ठिकाणी होणे गरजेचे आहे. एक गोष्ट मात्र सर्वांना या ठिकाणी मान्य करावी लागेल की, शेवटी पैशाला कुठलाही पर्याय नाही. पैशाला पैसाच लागतो. पैशाची नाटके कोणालाही करता येत नाहीत. तीन महिन्याच्या सेसच्या वसुलीच्या कारकीर्दीमध्ये माझ्याकडे जे काही प्रश्न निर्माण झाले. मी स्वतः जेव्हा त्याच्यावर आढावा घेतला. तेव्हा अनेक प्रश्न त्या सेसच्या संदर्भात निर्माण झाले. त्याच्यामध्ये काही महत्वाच्या प्रश्नांची प्रश्नावली मी तुम्हांला दिलेली आहे. तरीपण सभागृहामध्ये या प्रश्नावर मला आपले नेमके ठळक उत्तर पाहिजे. कारण व्यापारी संघटनांच्या प्रतिनिधींशी तुम्ही बोलणार आहातच. व्यापारी संघटनांच्या प्रतिनिधींशी बोलल्यानंतर त्यांचा रोख कुठे आहे याचा विचार करुन सभागृह पुढे विचार करेल तो प्रश्न आहेच. किंबहूना, तो प्रश्न अजून जास्त महत्वाचा आहे. पण त्यापेक्षा आज आमची आर्थिक परिस्थिती सेसमुळे काय आहे? प्रामाणिकपणे किती लोक सेस भरतात? किती लोकांना प्रामाणिकपणे सेस भरायचा आहे? परंतु, काही अडचणींमुळे ते भरु शकत नाहीत किंवा कितीतरी प्रकरणांमध्ये आपण सेस वसुल करु शकत नाही. अशी भयानक माहिती समोर आलेली आहे. तेव्हा माझा पहिला प्रश्न असा आहे की, सतरा हजार आणि काहीतरी ॲड फिगर आपण व्यापाऱ्यांना सेसचे अर्ज वितरीत केले. आपल्या माहितीप्रमाणे फक्त मिरा भाईंदरच्या पूर्ण शहरामध्ये इतकेच व्यापारी किंवा इंडस्ट्रीज किंवा उद्योजक आहेत काय? किंवा सतरा हजारपेक्षा जास्त उद्योग आहेत. परंतु, सर्वांनी फॉर्म नेलेले नाहीत. या संबंधी आपण ठळकपणाने उत्तर द्या की, याच्या विषयी साधारण वीस हजार किंवा बावीस हजार उद्योजक इथे आहेत. पण पाच सहा हजार लोकांनी किंवा हजार लोकांनी किंवा पन्नास लोकांनी किंवा एका व्यक्तीने मला सेस भरायचाच नाही किंवा मला सेसखाली रजिस्ट्रेशन करायचेच नाही म्हणून मी फॉर्म भरणार नाही. अशा प्रकारची भुमिका घेतली आहे. तेव्हा त्याची ठळक माहिती की, इतके उद्योजक आमच्या रेकॉर्ड प्रमाणे या शहरामध्ये आहेत. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ज्या उद्योजकांनी किंवा व्यापाऱ्यांनी सेसच्या रजिस्ट्रेशनसाठी अर्ज नेलेले आहेत. परंतु, सात-आठ हजार लोकांनी आपल्याला अर्ज लिहून दिलेले नाहीत, परत आणून दिलेले नाहीत अशा प्रकारची माहिती आहे. मग जर आपण त्यांना अर्ज दिले आहेत, ते अर्ज आपण त्यांन जबरदस्ती दिलेले आहेत का? त्यांच्या अंगावर आपण फेकले आहेत का? घ्या, तुम्ही रजिस्ट्रेशन करा आणि सेस भरा आणि मग जर त्यांनी रजिस्ट्रेशन केले नाही तर त्याच्यामागे त्याची भुमिका काय किंवा

वस्तुस्थिती काय की, आठ हजार ते नउ हजार लोक रजिस्ट्रेशन करु इच्छित नाहीत किंवा ते सेस भरु इच्छित नाहीत. आता त्याच्यामध्ये ज्या लोकांनी रजिस्ट्रेशन केलेले आहे. किती लोकांनी रजिस्ट्रेशन केलेले आहे पण ते सेस भरत नाहीत. त्याच्यापुढे एक फार मेन टेक्नीकल किंवा लिगल प्रश्न निर्माण होतो की, उदाहरणार्थ मी एक उद्योजक आहे. मी मिरा भाईंदरमधूनच माझी सगळी खरेदी आहे. पण मांझ्याकडे ही माहिती नाही की, मिरा भाईंदरच्या मी ज्यांच्याकडून खरेदी करतो त्याच्यापैकी किती व्यापाऱ्यांनी किंवा व्यावसायीकांनी स्वतःचे रजिस्ट्रेशन घेतलेले आहे? मी जेव्हा चलन भरतो तेव्हा माझ्या पुढे एक अडचण निर्माण होते की, मी खरेदी केलेले जे व्यापारी आहेत ज्यांच्याकडून मी माल खरेदी केला त्यांचे पर्टीक्युलर रजिस्ट्रेशन आहे की नाही? त्याच्यापैकी तुम्हाला आर.डी. म्हणजे रजिस्टर्ड डिलरकडून परचेस किंवा यु.आर.डी. अनरजिस्टर्ड डिलरकडून परचेस केले की नाही याची माहिती मी देउ शकत नाही. अशा प्रकारे किती तरी उद्योजक चलन भरताना किंवा त्यांच्याकडे पूर्ण माहिती नसल्याने ते सेस भरत नाहीत. तर असे किती लोक आहेत की, ते रजिस्ट्रेशन करुन पण सेस भरत नाहीत. तुमच्याकडे त्यांची चलने आलेली नाहीत. गेले तीन महिने त्या लोकांनी याची ठळक माहिती तीन बाबी दिलेल्या, एकूण उद्योजक किती? एकूण किती लोकांनी अर्ज नेले आणि त्यातील किती लोकांनी भरलेले नाहीत? त्याचे कारण काय? आणि ज्यांनी भरले आहेत त्यातील किती लोकांनी तुम्हाला सेस भरलेला नाही. आत्ता ज्या लोकांनी रजिस्ट्रेशनसाठी फॉर्म नेलेले आहेत किंवा नेलेले नाहीत अशामध्ये स्टील-पाटे व्यापाऱ्यांची संख्या किती? हे जास्त महत्वाचे आहे. कारण या शहरामध्ये ६० टक्के बिझनेस हा स्टेनलेस स्टील, युरीन स्टीलचा आहे. मोठ्या प्रमाणात रोलींग मिलमधून स्टेनलेस स्टीलचा पत्रा येतो आणि तिथे नंतर त्याच्यावर प्रक्रिया करुन, प्रोसेस करुन याच्यामधून स्टेनलेस स्टीलची भांडी, युरेन्सीज बनवली जातात आणि ती बाहेर विकली जातात. माल एक्स्पोर्ट होतो. पण स्टेनलेस स्टीलच्या किंवा पाट्याच्या व्यापाऱ्यांची ही मानसिकता दिसून येत नाही की, ते सेस भरायला तयार आहेत. आत्ता ज्या पाटेदारांना किंवा स्टीलच्या व्यापाऱ्यांना सेस भरायचा नाही. त्याच्या मागे नेमके कारण काय आहे? तर त्याच्यातही किती तरी लोक प्रामाणिकपणे सेस भरायला तयार असतील. परंतु, त्यांच्यापुढे असा प्रश्न निर्माण होतो की, त्यांनी एकदा सेस भरला तर त्यांनी चलनवर त्यांची माहिती द्यायची आहे की, इतके करोड रुपयांचे किंवा इतके लाख रुपयांचे स्टेनलेस स्टीलचे पत्रे आम्ही या शहरामध्ये आणले, विकत घेतले, खरेदी केले. त्याच्यावर इतका टक्का चलन भरुन आम्ही उपकर भरतो. आणि जी माहिती चिठ्ठ्यांवर स्टील व्यापाऱ्यांचे जे व्यापार चालतात, व्यवहार चालतात. ती सगळी माहिती त्या चलनामध्ये उघड करणार. यासाठी अलिकडेच झालेला एक किस्सा तुम्हांला सांगतो. किस्यापेक्षा एक सभेच्याबाबत मी तुम्हाला माहिती देतो. साधारण सेस लागण्याच्या पंधरा दिवस अगोदर या मिरा भाईंदरच्या सर्व टॅक्स कन्सलटंटनी आणि चार्टर्ड अकाउन्टंसी असिस्टन्ट इन्कम टॅक्स कमिशनरने शंकर नारायण कॉलेजमध्ये एक बैठक बोलावली होती. जेव्हा सगळ्या टॅक्स कन्सलटन्टना आणि सी.ए. लोकांना असिस्टन्ट कमिशनर ऑफ इन्कम टॅक्सने जेव्हा बोलावले. त्या ठिकाणी मला चिफ गेस्ट म्हणून बोलावले होते. त्याठिकाणी असिस्टन्ट कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स काय म्हणाले याची माहिती तुम्हाला देतो. त्यांनी असे सांगितले की, आमच्या संपूर्ण देशामध्ये आम्ही सगळ्या शहरामध्ये जे इन्कम टॅक्स भरतात. त्यांची टक्केवारी साधारण २० ते २२ टक्के आहे. पण कॅम्पॅरिझनमध्ये मिरा भाईंदरमध्ये जे व्यापारी आहेत. त्यांच्यामध्ये इन्कम टॅक्स भरण्याची संख्या फक्त १० टक्के आहे. हा १२ टक्के डेफिसिट का आहे ह्याचा तुम्ही मला अभ्यास करुन सांगा किंवा तुम्ही तुमच्या क्लाईंटना सांगा, त्या क्लाईंटच्या मित्रांना सांगा की, त्यांनी प्रामाणिकपणे इन्कम टॅक्स भरावा. हे तुम्हाला मी मैत्रिपूर्ण सांगतो. असे इन्कम टॅक्स कमिशनर सगळ्या सी.ए.ना बोलले. पण त्या उलट त्यांनी असे सांगितले की, जरी ही मैत्रिपूर्ण बैठक असली. आपल्याकडे विचारांची देवाण-घेवाण असली तरी हे मात्र विसरु नका की, यापुढे त्या व्यापाऱ्यांनी जर इन्कम टॅक्स भरला नाही. तर आम्ही त्यांच्यावर सक्तीने कारवाई करु. मग तुम्ही टॅक्स कन्सलटन्ट म्हणून आमच्या घरी येउ नका. हे बोलता बोलता त्यांनी एक उल्लेख केला की, मी अलिकडेच वर्तमानपत्रामध्ये वाचले की, आत्ता मिरा भाईंदरमध्ये सेस लागणार आहे. आणि जर तुम्ही इन्कम टॅक्स कन्सलटन्ट म्हणून कुठल्या व्यापाऱ्याची माहिती दिली नाही. तर सेस भरणाऱ्या व्यापाऱ्यांची माहिती आम्ही म्युनिसिपालीटीकडून घेउ आणि त्या आधारे आम्ही त्या व्यापाऱ्यांना इन्कम टॅक्स लावू आणि त्यांना हेव्ही पेनल्टी लावू. अशा प्रकारची सक्त ताकीद इन्कम टॅक्सचे असिस्टन्ट कमिशनर यांनी ..... (मधला गॅप घेणे)

**प्रफुल्ल पाटील :-**

इन्कम टॅक्सची ॲडीशनल लायबिलीटी जर त्यांच्या माथ्यावर बोकांडी बसत असेल तर ते असे म्हणतील, बोकांडीचा अर्थ असा की, त्याच्या मनाची इच्छा नसताना सुध्दा त्यांच्या मानगुटीवर इन्कम टॅक्स बसणार आहे. मग त्यावेळी ते काय विचार करतील की, एवढा हेवी इन्कम टॅक्स भरण्यापेक्षा, आमचे सगळे दोन नंबरचे धंदे व्हाईट म्हणजे रेकॉर्डवर येण्यापेक्षा आम्ही सेसच भरणार नाही. म्युनीसीपालीटीचे ऑफीसर किंवा अधिकारी, कर्मचारी जास्तीत जास्त काय करणार आहेत ? त्यांनी करावे हे मी सांगतोच. पण एक वेळ ते अशी मानसिकता तयार करतील की, आम्ही सेसच भरणार नाही. म्हणजे इन्कम टॅक्स ऑफीसकडे आमचा रेकॉर्डच जाणार नाही. तेव्हा साहेब, माझा तुम्हाला हा प्रश्न आहे, हा चौथा प्रश्न आहे, की, ज्या लोकांचे कुठल्याही प्रकारचे रेकॉर्ड ऑन बुक्स, ऑन रजिस्टर नाहीत. कुठल्याही प्रकारची चलने नाहीत, बिले नाहीत.

त्यांच्याकडून उपकर वसुली करण्याचे कोणतें नियम तुमच्याकडे आज अस्तित्वात आहेत ? एकही नाही. अलिकडे एक केबिनेट मिटींग झाली. मी तुम्हाला अनऑफीशिअली त्याचे प्रोसिडींगसुध्दा दाखवले होते. त्यामध्ये तो विषय केबिनेटच्या मिटींगमध्ये घेतला होता की, जे लोक कुठल्याही प्रकारचे आर्थिक लेखेजोखे ठेवत नाहीत. त्यांच्याकडून कशाप्रकारे सेस आकारण्यात यावा. त्याच्यासाठी कायद्यामध्ये अंमलबजावणी करता येईल का? कायद्यामध्ये काही असेसमेंट, काही दुरुस्ती करता येईल का? त्याच्यासंबंधी फार मोठी चर्चा झाली. त्याच्यातून काही निष्पन्न फायनली झालेले नाही. मागेपुढे झाले. तरीसुध्दा त्या कायद्यामध्ये तशा प्रकारची तरतुद करण्यासाठी नवीन अधिसुचना आणि अमेन्डमेंट आणायला लागेल आणि ती जेव्हा सात किंवा बारा महिन्यांनी अस्तित्वात येईल तेव्हा कदाचित तुम्ही त्याना लावू शकाल की नाही हे सगळे प्रश्नांकित आहेत. आजमितीला, मला आपल्याला फक्त एवढेच विचारायचे आहे की, स्टील व्यापा-यांकडून आपण कुठल्या पध्दतीने सेस वसुल कराल? आपण गोडाउनवर छापे माराल? आपण गोडाउनवर छापे मारल्यानंतर आपण एक वेळ वाहने उभी करुन ती चेक करण्याचा प्रयत्न कराल. तर वाहने उभी करुन चेक करण्याच्या संदर्भात पुन्हा कायद्याच्या तरतुदी अडचणीच्याच आहेत. मग अशा पध्दतीने सेस वसुलीबाबतचे हे नवीन प्रश्न या शहरामध्ये निर्माण झालेले आहेत. ठिक आहे, कोणी व्यापारी कंटाळून असे म्हणत असेल की, मला सेस भरायचा नाही. म्हणून जुना ऑक्ट्रॉय होता तो बरा होता. वैयक्तिक कुठल्याही व्यापा-याची किंवा अनेक संघटनांपैकी एका संघटनेची जशी मागणी असेल, त्या बेसवर आम्ही आमचे धोरण ठरवणार नाही. पण आमचे धोरण हे आर्थिक निकषावर ठरले पाहीजे या मताचा मी आहे. सेस लावल्याने आमचे महिन्याला जर दोन कोटीचे किंवा दिड कोटीचे नुकसान होत असेल तर त्याला कोण कारणीभूत? मग आम्ही पहिले प्रशासनाकडे बोट दाखवणार की, साहेब जेव्हा तुम्ही म्हणालात की, आम्ही संपूर्ण स्टाफ लावला आहे. शंभर कर्मचारी अधिका-यांसह लावले आहेत. आस्थापनेचा खर्च किती होतो हे मला माहिती नाही. पण त्याची सुध्दा तुम्ही गणना करा. की, शंभर लोक लावून सुध्दा आज तुम्हाला १०० टक्के रिझल्ट मिळत नाही. मला असे कळते की, कार्यालयीन वेळेत आपला स्टाफ काम करत असून सुध्दा रात्रीभरात जावून ते दहा-अकरा वाजता नोटीस बजावण्याचे काम करतात, जे इललिगल आहे. तरी सुध्दा ते करतात. तेव्हा मी तुम्हाला एक विचारतो की, आज तुम्ही असे म्हणालात की, सप्टेंबरची फक्त चार कोटी रुपयांची तुमची वसुल झालेली आहे. साधारण आपल्याला ऑक्ट्रॉयचा सात कोटीचा महिन्याचा हप्ता किंवा महिन्याची वसुली होती. तीन महिन्यामध्ये साधारण सात ते आठ कोटी रुपये नुकसानीत आम्ही जाणार आहोत. आणि आपण आम्हाला एक आश्वासन द्या की, तीन महिन्यात प्रत्येक महिन्याला जो दोन कोटी लॉस झालेला आहे किंवा शॉर्टेज झालेली आहे त्याच्यापुढे शासनाने आम्हाला असे म्हटलेले की, जर तुमची सेसची वसुली ऑक्ट्रॉयच्या तुलनेत कमी झाली तर आम्ही १५ टक्के पर्यंत तुम्हाला अनुदान देवू. तर आपण शासनाकडे अशी मागणी करणार आहात का की, आमची ५० टक्के सुध्दा वसुली होत नाही किंवा ६० टक्के झाली आहे, ४० टक्के झालेली नाही. तर आम्हाला १५ टक्के अनुदान न देता तुम्ही ४० टक्के द्या तर आमची आर्थिक परिस्थिती पुर्ववत आहे तशी राहील. दुसरी गोष्ट, आपण अशी मागणी केली नसेल तर आपण अशी मागणी करणार आहात काय ? आणि आपण खरोखर मागणी केल्यानंतर ४० टक्के मिळणार आहेत की, १५ टक्के मिळणार आहेत, याची क्लीअर माहिती आपण द्या. आपण कुठेतरी या तीन किंवा अडीच महिन्यांच्या उपकराच्या वसुलीच्या कारकीर्दीमध्ये आपली माहिती किंवा आपला अहवाल शासनाकडे पाठवला तो अहवाल आपण या सभेपुढे आज वाचून दाखवा. कारण आम्ही काहीतरी वेगळे करावे किंवा आम्ही काहीतरी वेगळ्या ट्रॅकने जावे. आम्ही असे म्हणावे की, सेससाठी तुम्ही अजुन प्रभावीपणे काम करा. शंभरच्या ऐवजी दोनशे लोक कामावर लावा. आणि त्याच्यामधुन १०० टक्के वसुली करा. आणि एकीकडे आपला अहवाल जर वेगळे सांगत असेल आणि शासन त्याला वेगळाच दुजोरा देत असेल तर आमचे हे सगळे श्रम वाया जाणार आहेत. पहिली गोष्ट, मी तुम्हाला मगाशीच सांगितले की, पैशाचे सोंग कोणालाही करता येत नाही. आज आपल्यापुढे अनेक विकासाची कामे आहेत. मी त्याच्या संदर्भात तुम्हाला प्रश्न विचारले आहेत. आमच्या उत्पन्नाच्या दोनच मुख्य बाबी आहेत. साहेब, मला इतके माहिती आहे की, ज्या दिवसापासून जकात वसुली सुरू झालेली आहे. त्या दिवसापासून आमची घरपट्टी कराची वसुली ठप्प झालेली आहे. हे खरे आहे की, नाही ते तुम्ही सांगा. कुठल्याही प्रकारची घरपट्टी कराची बिले गेलेली आहेत पण वसुली सुरू झालेली नाही असे मला वाटते. ठिक आहे आपल्याला माहिती आहे की, घरपट्टी वसुलीच्या बाबत त्या करदात्यांनी स्वतःहून घरपट्टी भरायला पाहिजे. पण आपल्याकडे तशी सवय नाही. आणि ती लोकांना तशी लावलेली आहे. आपणच त्यांच्यावर मालमत्ता जप्तीचे वॉरंट काढतो आणि त्याच्यानंतर वसुली सुरू होते. आणि मग त्याचा ओघ सुरु होतो. पण आजपर्यंत घरपट्टीच्या वसुलीपैकी कुठल्याही प्रकारची वसुली नाही माझा तुम्हाला सहावा प्रश्न असा आहे की, आमच्या संपूर्ण आर्थिक बजेटमध्ये, बजेट जरी साडेतीनशे कोटी रुपयांचे असले तरी त्या बजेटची साडेतीनशे कोटी रुपयांची रक्कम तुम्ही लक्षात घेवू नका. ते फुगवलेले बजेट असेल किंवा त्याच्यामध्ये आम्ही घेणा-या कर्जाचा उल्लेख असेल. म्हणून ते साडेतीनशे कोटीपर्यंत पोहोचले. पण प्रत्यक्षात आमचे महसुली उत्पन्न किती ? गेल्या वर्षी आम्हाला महसुली उत्पन्न किती ? शंभर कोटी मिळाले, सवाशे कोटी मिळाले, १७० कोटी मिळाले, १७५ कोटी मिळाले. मग त्या महसुली उत्पन्नामध्ये आमचे जकातीचे उत्पन्न किती? आणि जकातीचे उत्पन्न

वजा करता, घरपट्टीचे उत्पन्न किती ? ह्या बाबी आपण जर बघितल्या तर असे लक्षात येईल की, त्याचा रेशो जवळजवळ ६०:४० च्या आसपास किंवा ५०:५० च्या आसपास असेल. तर आमचे अर्धे बजेट आज कोलमडलेले आहे. त्याच्यापैकी आम्ही जर दोन कोटी पैकी पावणे दोन कोटी रुपये महिन्याला लॉस खावून सेस पुढे चालू ठेवला तर आम्हाला आमच्या बजेटमध्ये वर्षाला किती तुट येणार आहे किंवा किती उणीव भासणार आहे, किती कमी पडणार आहे, आमचे किती मायनस राहणार आहे त्याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. शेवटी महापालिकेमध्ये लोकप्रतिनिधींना काय हवे, तर लोकप्रतिनिधींना त्यांच्या प्रभागातील किंवा त्यांच्या वॉर्डमधली कामे करुन पाहिजेत. विकासाची कामे झाली पाहिजेत. क्ष्याही पलीकडे रोजची जी विकासाची कामे आहेत ती पूर्ण ठप्प झाली आहेत. दोन-तीन महिन्युपूवी आपल्यावर सर्व नगरसेवकांनी ठपका ठेवलेला की, आमच्या वॉड मध्ये कुठल्याही प्रकारची कामे झाली नाहीत. इंजिनिअरना विचारले तर ते सांगतात की, तुमचे जे प्रस्ताव आहेत ते आम्ही मा.आयुक्त साहेबांकडे पाठवले आहेत. मा.आयुक्त साहेब सांगतात की, त्याच्यासाठी आमच्याकडे आर्थिक तरतुद नाही. साहेब, ही गोष्ट मी नेहमी तुम्हाला सांगतो की, आर्थिक तरतुदींच्या बाबत वेळोवेळी सभागृहामध्ये ही चर्चा व्हायला पाहिजे. कारण प्रत्येक वेळी नगरसेवकांच्या अपेक्षा असतात की, वॉर्डमधील कामे झाली पाहिजेत आणि अधिकारी त्यांना सांगतात की, आत्ता आपण पुढच्या मिटींगमध्ये घेवू या. पण खरोखर आज जर आपण पाहिले की, आमचे वर्षाचे महसुली उत्पन्न मागच्या सभेमध्ये मा. महापौर साहेबांनी एक आदेश दिलेला की, तुम्ही तुमचे वार्षिक ताळेबंद पत्रक म्हणजे जमा खर्च आणि तुमची सगळी बॅलन्स शिट हे सगळे तुम्ही प्रत्येक सन्मा. सदस्यांना द्या. म्हणजे त्यांच्या एवढे लक्षात येईल की, आम्हाला वर्षाला इतकि महसुली उत्पन्न मिळाले. आणि बांधिल खर्च या ठिकाणी महत्वाचा आहे की, आमचा बांधिल खर्च इतका झाला. तर आमच्याकडे इतकेच राहिले. त्या पलिकडे त्या आर्थिक वर्षातील ब-याचशा ठेकेदारांची बिले अदा करणे बाकी राहिलेली आहेत. म्हणजे पुढच्या वर्षातील तरतुद अगोदरच्या वर्षातच संपलेली आहे. येणा-या अनेक पुढच्या वर्षामध्ये जेव्हा आमच्या प्रभागातील विकासाची कामे होणार नाहीत तर मग आम्ही ही अपेक्षा कोणाकडून ठेवायची? हे सगळे बाजुला राहिले. रोजची नगरसेवकांची कटकट किंवा रोजची नगरसेवकांची मागणी, त्यांच्या प्रभागामध्ये विकासाचे काम झाले पाहिजे ही जरी आपण बाजुला ठेवली, अगदी डोळे बंद करायचे म्हटले की, ठिक आहे. नगरसेवकांनी चार वर्षे काही बोलू नका. पाचव्या वर्षी तुमची विकासाची कामे आम्ही करु. तरी सुध्दा महत्वाचा प्रश्न आपल्यासमोर उभा राहतो तो हा की, जे.एन.एन.यु.आर. एम. खाली आपण ज्या योजना राबवणार आहात त्यालाही ठराविक कालावधी आपण दिलेला आहे. साधारण दोन हजार कोटी रुपयांची ही सगळी कामे मंजुर झालेली आहेत. साधारण पाच ते दहा वर्षामध्ये जर आपण करायची झाली तर ५० टक्के कॉन्ट्रीब्युशन हे आपल्या महानगरपालिकेचे असणार आहे. जर तुम्ही पाच वर्षात करायला गेलात तर साधारण दोनशे कोटी रुपये प्रति वर्षाला आपली आर्थिक तरतुद करायला पाहिजे. दहा वर्षात करायला गेलात तर शंभर कोटी रुपये महानगरपालिकेला आर्थिक बजेटमधुन बाजुला काढून ठेवावे लागतील. मग तुमचे महसुली उत्पन्न किती, तर शंभर-सव्वाशे कोटी पेक्षा जास्त नाही. मग तुमचा बांधिल खर्च किती, शंभर कोटी. मग तुमची शिल्लक किती, तर पंचवीस ते तीस कोटी. किंवा पन्नास कोटी. मग पन्नास कोटी मध्ये छोटी-छोटी कामे, आत्ता प्रभाग समित्यांचे सभापती येतील. तेव्हा ते त्यांची कामे सुरु करतील. नगरसेवकांची छोटी-मोठी कामे आहेत. नगरसेवकांचा निधी आहे. ते सगळे काढल्यानंतर तुमची इतरही दायीत्व जी येणार आहेत. त्यांच्यावर होणारा खर्च तुम्ही भागवणार कसा? संपूर्ण दिडशे ते एकशे साठ कोटी रुपयांची रक्कम तुमच्या रोजच्या खर्चामध्ये गेल्यानंतर जे.एन.एन.यु.आर.एम.साठी तुम्ही वर्षाला शंभर कोटींची रक्कम बाजुला कशी काढणार ? माझे तर असे मत आहे की, आपण या ठिकाणी ठामपणे सांगावे की, आत्तापर्यंत या महानगरपालिकेकडे गेल्या पाच वर्षापूर्वी इतक्या कोटी रुपयांच्या फिक्स डिपॉझीट, मुदत ठेवी होत्या. या पाच वर्षात गेल्या पाच वर्षानंतर आज आमच्याकडे काय मुदत ठेवी आहेत? म्हणजे जेव्हा माणसाकडे पैसे संपतात, सर्वसाधारणपणे माझी परिस्थिती अशी आहे की, जेव्हा माझ्या खिशातले पैसे संपतात तेव्हा मी माझ्या बँकेतील सेवींग अकाउंटमधील पैसे काढतो. तेही संपले तर माझी एक फिक्स डिपॉझीट ठेवलेली आहे. मी मॅनेजरला जावून सांगतो की, माझी ही फिक्स डिपॉझीट जेव्हा मॅच्युअर होईल तेव्हा होईल. पण आत्ता तुम्ही ही प्रीमॅच्युअर करा आणि ते पैसे मला द्या. तीच परिस्थिती महानगरपालिकेची गेल्या पाच वर्षात झालेली आहे. हे महानगरपालिकेने प्रशासनाने या ठिकाणी ठामपणे सांगणे गरजेचे आहे की, गेल्या पाच वर्षापूर्वी आमच्याकडे जर सत्तर कोटी किंवा शंभर कोटींच्या मुदत ठेवी होत्या. तर आपल्याला साधारण खर्चासाठी मी म्हणत नाही की, भांडवली खर्चासाठी, महसुली खर्चासाठी आपण त्या एफ.डी. प्रीमॅच्युअर किंवा मॅच्युअर झाल्यानंतर कॅश केलेल्या आहेत. आणि तो सगळा पैसा आपण जनरल फंडामध्ये म्हणजे गंगाजळी मध्ये आणून खर्च झालेला आहे. याच्यापुढे अशा प्रकारच्या मुदत ठेवी आपल्याला करता येणार नाहीत. याउलट ज्या उर्वरित मुदत ठेवी आहेत त्या आम्हाला पुन्हा कॅश कराव्या लागणार आहेत. साहेब, या संदर्भात कुठेतरी आपण स्पष्टपणे या सभागृहाला माहिती दिली पाहिजे. असे माझे मत आहे. या ठिकाणी शंभर अधिकारी उपकराकडे गेल्यानंतर जे जकातीसाठी आम्हाला अधिकारी द्यावे लागत नव्हते. मी ह्या ठिकाणी जकातीसाठी कुठलीही शिफारस करत नाही. ह्या ठिकाणी मी तुम्हाला एवढेच सांगतो की, कुठेतरी चर्चा झाली पाहिजे. ही तुलनात्मक झाली

पाहिजे. त्याला भावनेचा आधार असता कामा नये. कारण भावना कामाला येत नाही. भावनेपोटी पोट भरत नाही. पोट भरण्यासाठी अन्न लागते आणि अन्नासाठी पैसा लागतो. आणि पैशाची किंमत ही फक्त तुमच्या चांगल्या नियोजनाद्वारेच तुम्हाला करता येईल अन्यथा ती करता येणार नाही. दुसरी बाब अशी आहे की, कुठलाही पर्याय शोधतातना बी.पी.एम.सी. अॅक्ट मध्ये ऑक्ट्रॉय किंवा सेस, सेस किंवा ऑक्ट्रॉय आणि इतर महानगरपालिकेमध्ये तर पटकन परिस्थिती बदलली. आपल्यापेक्षा चांगली परिस्थिती असणा-या किंवा आपल्यापेक्षा जुन्या महानगरपालिका असणा-या ठिकाणी ज्यांच्याकडे पंचवीस ते पन्नास वर्षाचा ज्या महानगरपालिकांना इतिहास आहे त्या लोकांनी तो अॅक्सेप्टच केला नाही. त्या ठिकाणी पाच लोकांनी अर्ज भरले. तर कुठे पन्नास लोकांनी अर्ज भरले. तर एका कोल्हापूरच्या महानगरपालिकेमध्ये फक्त दोन लोकांनी अर्ज भरले. कोणीही सेस भरला नाही. तिथे जबरदस्ती ऑक्ट्रॉय लागू झाली. शासनाने आदेश काढले. त्यावेळी शासनाने दिलेले आश्वासन वेगळे होते. विधानसभेतील एका आर्थिक बजेटवर किंवा आर्थिक अधिवेशनामध्ये फायनान्स मिनिस्टरने दिलेल्या आश्वासनाला महाराष्ट्र शासनाने तशा प्रकारचा एक्सरसाइज करण्यासाठी सेस लावावा असे सांगितले. आणि जेव्हा प्रत्यक्षात तशी परिस्थिती सुरु झाली तेव्हा महाराष्ट्रात वेगळे वारे वाहू लागले. मी म्हणत नाही की, या शहरामध्ये वेगळे वारे वाहते. कदाचित, माझ्याकडे डाव्या कानाकडे सांगणारे लोक असे आहेत. ते सांगतात की, साहेब पहिली जी ऑक्ट्रॉय होती ती चांगली होती. आणि उजव्या कानाकडे येवून सांगतात की, साहेब आत्ता तुम्ही नवीन पध्दतीने सुरु करा. ह्या दोन्हीपेक्षा तिसरा पर्याय मला काही दिसत नाही. पण हे सभागृह किंवा केवळ एका विशिष्ठ विषयावर आज सभागृह निर्णय घेवू शकत नाही. आणि सभागृहातील कुठल्याही नगरसेवकाने तशा प्रकारचा एक्सरसाईज करु नये की, आज कुठलाही ठराव आणावा. किंवा तो करावा. मला आज असे वाटते की, या विषयावर अगदी गंभीर चचा आणि गंभीर चर्चा कधी होईल, जेव्हा तुमच्याकडून प्रत्यक्ष फिगर येतील. प्रत्यक्ष आकडेवारी येईल की, हा जमा खर्च आहे. इतके महसुली उत्पन्न आहे. इतका महसुली खर्च आहे. त्याच्यामध्ये इतका बांधिल खर्च आहे. त्याच्यामध्ये विकास कामांसाठी इतकी तरतुद आहे. आणि पुढे जे.एन.एन.यु.आर.एम. ची कामे कराची झाली तर आम्हाला निदान शंभर कोटींची तरतुद करायची आहे. आणि जर तुम्ही असे म्हणत असाल की, जे.एन.एन.यु. आर.एम. जी कामे करायची आहेत. त्याच्यासाठी शंभर कोटी रुपये जर वर्षाला ठेवायचे असतील तर ते शंभर कोटींचे कर्ज आम्ही एम.एम.आर.डी.ए. किंवा इतर तत्सम वित्तीय संस्थांकडून घेवू. तर साहेब, आपण ते विसरा. आपले एम.एम.आर.डी.ए. कडील फिक्श्चर फार वाईट आहे. जर एम.एम.आर.डी.ए. च्या अधिका-यांनी आपल्या अधिका-यांनी हे स्पष्टपणे सांगावे. त्यांनी लाज बाळगू नये. आपली महानगरपालिका दिवाळखोरीत चालली आहे. हे जेव्हा एम.एम.आर.डी.ए. सांगते तेव्हा आपल्या अधिका-यांनी स्पष्टपणे या सभागृहाला सांगितले पाहिजे आणि मग दिवाळखोरीत जाणा-या किंवा दिवाळखोरीत राहणा-या महानगरपालिकेला शंभर कोटी किंवा पन्नास कोटी रुपये कर्ज एखादी वित्तीय संस्था किंवा एम.एम.आर.डी.ए. तुम्हाला का देईल ? किंवा ते तुम्ही भराल किंवा आम्ही काहीतरी परिश्रम करु. आणि वेगवेगळ्या प्रकारचे टॅक्सेस लावू. तर वेगवेगळ्या प्रकारचे टॅक्सेस लावण्यासाठी आम्ही शहराला काही वेगळ्या सुविधा दिलेल्या नाहीत. एक-दोन ठिकाणी एस.टी.पी. प्लान्ट लावले तर आम्ही त्या ठिकाणी विशेष स्वच्छता कर लावला. आत्ता भुयारी गटाराची योजना सुरू झाली नाही. त्याच्या अगोदर आम्ही विशेष स्वच्छता कर लावणार आहोत का? तेव्हा असा प्रश्न निर्माण होतो की, पहिल्यांदा खर्च करण्यासाठी कुठलीही योजना साकारण्यासाठी पहिला पैसा हवा असतो. पैसा असेल तर पुढे कामे होतील आणि पुढे कामे झाली तर तुम्ही पुढे टॅक्स लावू शकाल. पुढे टॅक्स लागला तर तुमच्या लायबिलीटी कमी होतील. म्हणून या ठिकाणी मी तुम्हाला जी प्रश्नावली दिलेली आहे ती प्रश्नावली या ठिकाणी सभागृहाच्या माहितीसाठी मी पुन्हा एकदा वाचून दाखवतो. इतकेच की, या प्रश्नावलीमध्ये दिलेली माहिती जर आपण सादर केली. दरम्यानच्या काळात व्यापा-यांशी काही बोलायचे असेल तर बोला. आम्ही तुम्हाला हे सांगत नाही. कदाचित व्यापारी स्वयंस्फुर्तीने येवून तुम्हाला भेटत असतील किंवा मा. महापौर साहेबांना भेटत असतील की, याच्यावर काहीतरी वेगळा निर्णय घ्या. किंवा स्टीलचे, पाट्याचे व्यापारी तुम्हाला जर काही वेगळ्या प्रकारचा पर्याय सांगत असतील की, आमच्याकडून अशा पध्दतीने सेस घ्या. किंवा तशा पध्दतीने घ्या किंवा सेस लावूच नका. आम्ही पुन्हा ऑक्ट्रॉय भरायला तयार आहोत. तर तो भाग वेगळा आहे. याची चर्चा वेगळ्या प्रकारे करता येईल. त्याच्यातून तुम्ही फायनल निष्कर्ष काढून तो सभागृहापुढे आणू शकता. पण तत्पुवी मी या ठिकाणी तुम्हाला जी एक प्रश्नावली दिलेली आहे की, मागील आर्थिक वर्षात निव्वळ महसुली उत्पन्न किती ? आत्ता आम्ही मागील आर्थिक वर्षाच्या फिगरवरच पुढे जाणार आहोत. मागील आर्थिक वर्षात बांधिल खर्च किती ? त्यामध्ये जकातीचे उत्पन्न किती? मागील वर्षातील घरपट्टी कराचे अपेक्षित उत्पन्न किती ? वरील अपेक्षित घरपट्टी करामधुन प्रत्यक्षात वसुली किती झालेली आहे ? कारण आपल्याकडे घरपट्टी वसुली होतच नाही. आपण काय करतो, गेल्या वर्षी जर आमची दहा करोडची डिमांड असेल. आणि त्यातील आठ कोटी किंवा पाच कोटी वसुली झालेली असेल. तर यावर्षी आम्ही काय करतो, गेल्या वर्षी जी उर्वरित बाकी पाच कोटी किंवा तीन कोटी आहे, ती अधिक या वर्षीचे दहा कोटी. तेरा कोटी उत्पन्न आम्ही दाखवतो. पण ते तसे नाही. या वर्षीचेच निव्वळ उत्पन्न आम्ही दाखवले पाहिजे. म्हणून तशा फिगर पाहिजे. मागील आर्थिक वर्षात स्थायी, साहेब हा विषय फार महत्वाचा

आहे. मागील आर्थिक वर्षात स्थायी, अस्थायी, ठेक्यावरील कर्मचारी यांच्या वेतनासह व इतर भत्ते, सानुग्रह अनुदानासह एकूण आस्थापनेवर झालेला खर्च किती? आस्थापनेवरील खर्च मला वाटते ४०-४५ टक्क्यांपेक्षा जास्त वर चाललेला आहे. मग तुमच्या एकूण बजेटपैकी किंवा तुमच्या निव्वळ उत्पन्नामधून जर ४०-४५ टक्के जर फक्त आस्थापनेवर खर्च जाणार आहे. त्याशिवाय आपण रुग्णांच्या सेवेसाठी काही विशेष लोकांची, डॉक्टर्स किंवा नर्सेस यांची भरती करणार आहात. त्यांच्यावरील सुध्दा तुमचा आस्थापनेचा खर्च अपेक्षित आहे. चालू आर्थिक वर्षात माहे एप्रिल २००८ ते ऑक्टोबर २००८ वर्षापर्यंत महसुली उत्पन्न किती? तसेच बांधिल खर्च किती ? म्हणजे मागच्या सहा महिन्यामध्ये सुध्दा आमची आर्थिक परिस्थिती काय आहे त्याची माहिती आपल्याला पाहिजे. चालू आर्थिक वर्षात प्रत्यक्ष झालेला भांडवली खर्च विकास योजनांवर किती ? आजमितीस ठेकेदार किंवा विकास कामावर किंवा इतर दायीत्व यापैकी किती रक्कमेची बिले दायीत्वाचे भुगतान करायचे बाकी आहे ? म्हणजे आजच्या तारखेला मागे जी कामे झालेली आहेत. आत्ता बजेटमध्ये ती तरतुद नाही. आणि अशी करोडो रूपयांची बिले पेन्डींग आहेत. ठेकेदार लाईनमध्ये उभे आहेत. रोज पालिकेच्या आवारामध्ये खेपा घालतात. पण त्यांना त्यांच्या बिलांचे पेमेन्ट मिळत नाही. चालू वर्षी जे.एन.एन.यु.आर.एम. च्या अंतर्गत तुम्ही भुयारी गटारासाठी किती तरतुद केलेली आहे ? अशा प्रकारचे तुमच्याकडे जवळ-जवळ एकोणीस प्रश्नांची प्रश्नावली मी आपल्याकडे दिलेली आहे. त्याची प्रत मा. महापौर साहेबांना पण देत आहे. परंतु, याच्यावर मा. महापौर साहेब, आर्थिक विषयाबाबत, आर्थिक परिस्थितीबाबत आम्हाला फार महत्वाची आणि अतिशय सखोल चर्चा करण्याची गरज आहे. त्याच्यावरच आम्हाला ठरवता येईल की, आमचे आर्थिक भविष्य काय आहे ?

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, जेव्हा सेस लावला. तेव्हा सन्मा. श्री. चंद्रकांत वैती साहेबांचे फोटो फार झळकले होते. लोकांनी त्यांना अक्षरशः डोक्यावर घेतले होते की, तुम्ही ऑक्ट्रॉय घालवला. आमच्यासाठी फार चांगले काम केले. सेस लावला याबद्दल आम्ही फार समाधानी आहोत आणि ते काम सन्मा. श्री. वैती साहेबच करु शकले असे बोर्डसुध्दा लागले होते. आत्ता सुध्दा जो व्यापारी वर्ग आहे हा सेससाठी खूप नाराज झालेला आहे. म्हणजे त्यांना उत्पन्न दाखवायचे होते ते दाखवू शकत नाही. तर आत्ता ऑक्ट्रॉय लावावा की, सेस राहू द्यावा याचे काहीतरी डिसीजन सन्मा. श्री. वैती साहेबांनीच घ्यावे. आम्ही काहीच नाही. आम्ही नरो वा कुंजरोवा आहेत. सन्मा. श्री. वैती साहेब बोलतील तसे आम्ही करु. त्याचबद्दल आपले मा. आयुक्त साहेब, साठ-सत्तर किलो वजनाचे आहेत. परंतु त्यांनी पाचशे किलोचे वजन ठोक्यावर घेउन एवढा सेस वसुल केला. त्यांनी हेडमास्तरची भुमिका बजावलेली आहे. आणि एकच मर्द माणुस आहे की, एवढ्या महाराष्ट्रामध्ये चार करोड रूपये सेस एका महिन्यामध्ये वसुल करु शकला. तर असा मर्द माणुस ठिक आहे. त्यांच्या काही चुका घडतात, नाही असे नाही. परंतु, त्यांच्या वजनाच्या मानाने त्यांनी डोक्यावर जे वजन घेतलेले आहे आणि वजन घेउन चालतात. आणि संबंध महाराष्ट्रामध्ये हेडमास्तरची भुमिका केलेली आहे. त्याबद्दल आम्ही अभिनंदन करतो.

**अनिल सावंत :-**

शासनाला जो अहवाल पाठवला आहे तो सभागृहाला वाचुन दाखवा.

**मा. आयुक्त :-**

ज्यावेळेस बाकी महानगरपालिकांमध्ये सेस सक्सेसफुल होत नाही असे शासनाला कळले. त्यावेळेस बाकी महानगरपालिकेमध्ये बरेच प्रश्न उत्पन्न झाले. त्यावेळेस इकडे काय परिस्थिती आहे आणि तुम्ही काय करु शकता. क्ष्या अनुषंगाने आम्ही रिपोर्ट पाठवलेला आहे. म्हणजे हा वाचल्यानंतर असे वाटले की, सेस चांगला आहे आणि आम्ही करू शकलो. कसे असते की, तुम्ही तुमच्या वरिष्ठांकडे मी कसे चांगले काम केले एवढेच सांगणार. तसे मी सेसच्या बाबतीत शासनाकडे चांगले काम केले असे सांगितले आहे. पण ह्याचा अर्थ असा नव्हे की, शेवटी सन्मा. श्री. पाटील साहेबांनी सांगितल्याप्रमाणे शहराचे भले आणि शहराचे इकॉनॉमी बघण्यासाठी जो योग्य पर्याय आहे तोच करावा याही मताचा मीच आहे. परंतु हे कुठल्या पार्श्वभुमित पाठवलेले पत्र आहे याची पार्श्वभुमी मी तुम्हाला सांगितली. आणि त्यामुळे याचा असा अहवाल शासनाला गेलेला आहे. म्हणजे त्याचा काही वेगळा अर्थ काढु नये. शासनाला एक कवरिंग लेटर लिहिलेले आहे. मा. सचिव, नगरविकास-२, मिरा भाईंदर महानगरपालिकेतील उपकर वसुलीबाबत. मा. महोदय, आपल्या दुरध्वनी संदेशान्वये, त्यांनी मला फॅक्स इमिजिएटली दोन तासात करा म्हणुन सांगितले होते. यासोबत माहे सप्टेंबर - २००८ मधील उपकर वसुलीबाबतचा अहवाल आपल्या महितीस्तव पाठविण्यात येत आहे. माझी त्याच्यावर सही आहे. मागे दोन पानांची नोट जोडलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेतील उपकर वसुलीबाबतचा अहवाल.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब दुसरा विषय घ्या. फक्त सेसबद्दल माहिती द्यायची आहे. त्यात कुठला निर्णय घ्यायचा नाही.

**प्रभात पाटील :-**

सेसमधील जो मधला दुवा आहे, कमिशनर साहेब, शासन निर्णय आणि आपण लोकल स्थानिक स्वराज्य संस्था तर हा निर्णय आपण अंमलात आणायचा आहे. हा निर्णय अंमलात आणताना आपल्याला काय अपेक्षित आहे. पैशाचे सोंग आणता येत नाही हे तर निश्चितपणे आहे आणि त्यासाठीच आपल्याला हे सगळे करायचे आहे. आपण कधी व्यापाऱ्यांच्या हिशोबाने नाचलो. नाहीतर मी असे म्हणणार नाही. त्याच्यामध्ये कोणाचे नुकसान झाले आहे ते सगळ्यांना माहिती आहे. तुम्हालाही माहिती आहे आणि मलाही माहिती आहे. तुम्ही आमच्यावर कुरघोडी करत राहिले. आम्ही तुमच्यावर केली. ही पण वस्तुस्थिती आहे. ती पण कोणी नाकारणार नाही. पंरतु, याच्यामध्ये आता कमिशनर साहेबांना फेस करावे लागते. की जे उत्पन्न कमी पडते आणि आपल्यालासुद्धा लोकप्रतिनिधी म्हणुन फेस करावे लागते की, आपली कामे होत नाहीत. उद्या त्यांच्यापुढे अशी परिस्थिती होईल की, त्यांना कर्मचाऱ्यांचे पगार देणेसुद्धा शक्य होणार नाही आणि नगराचा विकास कुठे जाईल त्याचा काही नेम राहिलेला नाही. मला एवढेच म्हणायचे आहे की, ह्या सगळ्या परिस्थितीतुन मार्ग काढत असताना जो मधला दुवा आहे, व्यापारी आहेत, ह्या व्यापाऱ्यांचा व्ह्यु काय आहे? मधल्या काळामध्ये काही व्यापारी माझ्या पार्टी कडे आले. काही व्यापारी तुमच्या पार्टीकडे गेले. त्याच्यामुळे त्यांचा नेमका व्ह्यु आपल्याला कळलेला नाही. मा. महापौर म्हणुन तुम्ही काय करणार की, गटनेत्यांची मिटिंग लावणार. तुमचे काही पदाधिकारी आहेत त्यांची मिटिंग लावणार. माझे स्पष्ट मत आहे की, व्यापाऱ्यांना काय म्हणायचे आहे ते सगळ्या लोकप्रतिनिधींच्या समोर आणा. त्यांना काय अपेक्षित आहे? हा मधला दुवा जो आहे. त्याचेसुद्धा तुम्ही मत घ्या. आणि आपल्याला काय निर्णय घ्यायचा आहे तो सन्मा. श्री. पाटील साहेबांनी सांगितलेल्या सगळ्या प्रश्नांसहित आणि कमिशनर साहेब, मी म्हणेन की, मुळ मुद्दा जो आहे तो तुमचा आहे. कारण हे सगळे प्रशासन तुम्हाला चालवायचे आहे. तर तुम्हाला सुद्धा तुमचे मत हे स्पष्टपणे देता आले पाहिजे. येणारा जो विषय आहे तो तुमच्या ओपिनिअनसह, तुमच्या स्वतःच्या विचारांसह हा विषय इथे चर्चेला यावा. तुम्ही येणाऱ्या लगेचच्या मा. महासभेमध्ये हा विषय चर्चेला घ्या आणि त्याच्यामध्ये तुम्हाला जी खास टिपणी आवश्यक आहे ती आणि मधल्या काळामध्ये व्यापाऱ्यांची तुमची होणारी प्रत्येक विभागातील, मिरा भाईंदरमधील सगळे हजार, बाराशे, पंधराशे व्यापरी इथे आले पाहिजेत असे नाही. पाट्यांचा व्यवसाय करणाऱ्यांचा एक प्रतिनिधी, स्टीलचा व्यापारी एक, रंगकामाचा एक अशा सगळ्यांची मते तुम्ही घ्या. आणि ती मतेसुद्धा तुम्ही ग्राह्य धरा की, त्यांना नेमके काय हवे आहे. आपण प्रत्येक वेळेला राजकीय दृष्टीने त्यांना नाचवले आहे. आता झाले ते झाले. पुन्हा पुन्हा ते बोलायला बरे वाटत नाही. परंतु आपण त्यांचेसुद्धा मत घ्या आणि त्या हिशोबाने सगळे विषय एकत्रित करुन तो विषय तुम्ही इथे पटलावर आणा. काही गोष्टी आपल्याला बोलायला होत नाहीत. राजकीय दृष्टीकोनातुन बरे वाटत नाही. पंरतु, या सगळ्यामध्ये शहराचे कुठेही नुकसान होता कामा नये हा विचार करुन तो सगळा विषय तुम्ही आणा. पण मात्र एका महिन्याच्या आतमध्ये याचा निर्णय लागला पाहिजे. नाही तर आपल्यावर बोझा वाढत जाईल. सन्मा. श्री. मिलन पाटील म्हणाले की, त्यांनी पाचशे किलोचे ओझे घेतलेले आहे. त्या ओझ्याखाली तेच दबले नाही गेले पाहिजेत. की, उद्या त्यांनी म्हणावे की, महापालिकाच नको. मी निघुन जातो. खरं म्हणजे कमिशनर साहेबांची सेसमध्ये फार चांगली भुमिका आहे. की इतर महापालिकेने जिथे काहीच प्रतिसाद दिला नाही तिथपर्यंत त्यांनी तरी आपल्याला खुप प्रगती पथावर नेलेले आहे. तर ह्याचा विचार व्हावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, मा. आयुक्त साहब ने जो आकडे दिये, ५० टक्के रजिस्ट्रेशन और चार करोड का उत्पन्न ५० टक्के रजिस्ट्रेशन बाकी उसमे भी स्टील के पाटे उन्होने विवाद दिखाया। उसमे उत्पन्न दिखाया है। अगर मै ऐसा समजता हु की, इस महापालिका के इस मा. महासभा मे अगर मा. आयुक्त चाहते है और यह प्रशासन चाहता है तो यह उत्पन्न दस करोड तक जा सकता है। आज की डेट मे मुझे मालुम है मेरे वॉर्ड मे, ब्युटी पार्लर, जिसको सेस लगता नही है, वह दस पावडर के डब्बे फेस पॅक लाते है, उसको भी जबरदस्ती सेस लेने के लिए बोला है। और जो लेने चाहिए, आज डिफॉल्टर है, मे तो बोलता हुँ आपने एक कलम दिया है। उस कलम के अंतर्गत आपने दसपट, आपने उस समय हमे ग्रीन कोर्ट मे यह विषय दिया था। और उसमे आपने लिखा था की, व्यापारी नियम ४१(२)(अ) इसके अंतर्गत जिसने नोंदणी नही किया है उससे दस टक्का ज्यादा वसुली हम कर सकते है। तो प्रशासन को हमारी जे.एन.एन.यु.आर.एम. की योजना है, भाईंदर का विकास कहापर जायेगा, हमारे वॉर्ड का विकास होगा के नही होगा, यह सब बात सही है। लेकिन जिस व्यापारी ने पाच दिन तक इस शहर को वेठी मे रखा, एक अलग वातावरण, एक दहशत का वातावरण किया है। आज प्रशासन को उसके बारे मे सोचकर विचार लेना है। चार आदमियों ने बोल दिया ऑक्ट्रॉय चाहिए और चार आदमियों ने बोल दिया सेस चाहिए तो नही। वापस वही कोणार्क आएगा। उसकी दहशत होगी। उस समय यह आक्षेप हमपर नही आना चाहिए। इसलिए, कमिशनर साहब, आपको हमारी विनंती है, जैसे मैने पहले सुचना रखी थी। आपने सोला हजार फॉर्म बाटे है। आठ हजार फॉर्म के डिफॉल्टर की यादी जाहीर करो। जो आठ हजार फॉर्म आपने बेचे है, आपने उनसे सौ रुपया लिया है। आपके पास उनका नाम और ॲड्रेस है। उन डिफॉल्टर की यादी आप जाहिर करो। हम जायेंगे, सभागृह फेस करेगा। आखीर इस शहर का

विकास हमको भी चाहिए। आप शायद तीन-छह साल रहेंगे। हमे यहा पर रहना है। वह बात बरोबर है। लेकिन यहा के व्यापारियों को दिखाना है, जो यहा के है वह देते ही है। आपके पास जितना चार करोड सेस आया है। यह स्थानिक लोगो का है। मै दावे से बोलता हुँ। जो बाहर से आये है उन्हे इस शहर से कोई प्रेम नही है। और आज वह लोग ही यहा पर सेस भरने का नाटक कर रहे है। जो इतने इंडस्ट्रीयलीस्ट है हमे मालुम है। आपको हमारी विनंती है, इस विषय पर आप कोई जल्दबाजी मत किजीए। मा. महापौर साहब, आप से भी विनंती है की, इसपर पुरा विश्लेषण किजीए। सिर्फ, भाईंदर का विकास नही होगा, यह समझ कर कल ऑक्ट्रॉय ले आए या कल सेस रद्द कर दे ऐसा विषय आप मा. महासभा मे मत लाना, ऐसी हमारी आपसे विनंती है।

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, दुसरा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ७३ :-**

उपकर आकारणी/वसुलीबाबत आढावा घेणे.

उपकर आकारणी/वसुलीबाबत आढावा घेण्यात आला.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७४, भाईंदर (प.) डॉ. आंबेडकर नगर व भोलानगर येथे ४५.०० मीटर रस्ता रुंदीकरणात विस्थापित झालेल्या कुटूंबाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**जयंत पाटील :-**

प्रथमतः ठराव मांडतो आणि नंतर चर्चा करु. ( ठरावाचे वाचन केले.)

**नयना म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

दिलेली यादी बघता मागे माझ्या वॉर्ड मधील इंदिरा नगर बद्दल बऱ्याचशा बातम्या वर्तमानपत्रात आल्या. बोगस फोटोपास दिलेले होते. फोटोपास देणारे आपलेच अधिकारी. त्यांच्यावर आपण काहीच कार्यवाही केलेली नाही, असे मला वाटते. खरे म्हणजे एवढ्या वर्तमानपत्रात बातम्या आल्यानंतर त्यांना आपण काय करायला हवे होते ते मी सांगण्याची गरज नाही.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, बोगस फोटोपास देणारे श्री. पानपट्टे, श्री. संख्ये, श्री. वाटोरे हे अधिकारी आहेत.

**जयंत पाटील :-**

नावही जाहीर केले.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. कल्याण केळकर साहेबांच्यासुद्धा बोगस स्वाक्षऱ्या करुन भरपुर फोटोपास दिले गेलेले आहेत. १९९७ साली कलेक्टर श्री. उज्वल उके साहेबांनी जी साफसफाई केली. त्याठिकाणी सुद्ध ९७ साली नवीन झोपडपट्ट्या झालेल्या आहेत. आणि त्याचे फोटोपास १९९५ चे दाखवुन, एका रुमवर चार-चार फोटोपास आहेत. तुम्हाला माझी तक्रार दाखल आहे.

**जयंत पाटील :-**

आता याच्यामध्ये आपण पहिलेच नाव दिलेले आहे, श्री. अरविंद सच्छिदानंद गुप्ता आणि ह्या चुकीसंबंधी महापालिकेने त्याने बोगस फोटोपास बनवले आहेत म्हणुन त्यांना अटक करा असे महापालिका पोलिसांकडे सांगते आणि त्यांना झोपडपट्टी मिळावी म्हणुन आपणच नाव देतो. हा काय प्रकार आहे?

**अनिल सावंत :-**

त्यांना द्या म्हणुन तुम्ही ठराव मांडता.

**जयंत पाटील :-**

नाही. याचा अर्थ, ठराव काय आहे तोच तुम्हाला कळला नाही. त्या विषयावर नंतर बोलु.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या ठरावामध्ये यादी संलग्न आहे.

**जयंत पाटील :-**

हे सगळे व्हेरिफिकेशन करुन मी तुम्हाला एक-एक सांगतो. श्री. भगवान पांडुरंग माने, याचा त्यानं दाखवलेला आर.टी.ओ चा पुरावा बोगस आहे. श्री. श्यामराव नारायण पावले, मुलीच्या शाळेचा २००४ चा दाखला दिलेला आहे. म्हणजे १९९५ च्या अगोदरचे दाखले द्यायला पाहिजे. श्री. रत्नाकर कृष्णा प्रधान, २००४ चा पुरावा आहे. श्री. सुनिल पांडुरंग माने, २००७ चा पुरावा आहे. म्हणजे एकंदरीत हे सगळे पाहिल्यानंतर ह्यांतील साधारणतः दहा ते पंधरा लाक एलिजिबल होतील.

**कल्पना म्हात्रे :-**

फक्त सहा लोक ९५ च्या आधीचे आहेत.

**जयंत पाटील :-**

एक व्यक्ती श्री. जियालाल रामदास कोरी हा नवघर इंदिरा नगरला राहतो. म्हणजे तो तिथुन इकडे कधी आला? एक तर इमारतीत राहणार आहे.

**मा. महापौर :-**

सिरियल नंबर आणि नाव सांगा.

**जयंत पाटील :-**

सुनिल पांडुरंग माने याची माहिती अशी मिळाली की, याला दोन बायका आहेत.

**मा. महापौर :-**

सिरियल नंबर?

**जयंत पाटील :-**

सिरियल नंबर सहा आणि पार्वती आनंद माने. हे सगळे मानेच आहेत. म्हणजे हे सिरियल नंबर सांगितले ते जवळ जवळ सगळेच खोटे आहेत.

**मा. महापौर :-**

माझे म्हणणे आहे की, परत ती यादी मागवावी. त्यानंतर निर्णय घ्या.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, ठराव झाला. अनुमोदन झाले. विषय मंजुर झाला.

**मा. महापौर :-**

विषय मंजुर आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही ही जी यादी दिली....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आम्हाला ठराव मांडायचा आहे.

**मा. महापौर :-**

ठराव झालेला आहे. पुढच्या मा. महासभेत जाच पडताळणी करुन मा. आयुक्तांनी ती यादी सादर करावी.

(सभागृहात गोंधळ)

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, त्यांचे ओरिजनल पेपर मागवा.

**मा. महापौर :-**

पुढच्या सभेत यादी सादर करावी.

**सिसिलिया बाविघर :-**

हाउसिंग फॉर डिस हाउस या आरक्षणाखाली या जागेत सदनिका आहेत. तर अशा सदनिका भाडेतत्त्वावर देता येतात का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही घाई करु नका.

**सिसिलिया बाविघर :-**

आपण या जागा भाडेतत्त्वावर देउ शकतो का? त्याचा कोणता नियम आहे याच्याबद्दल माहिती द्यावी.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये आपण पूर्वीच्या टेंबा हॉस्पीटलसाठी असा निर्णय घेतलेला आहे. त्याच धर्तीवर खरे म्हणजे हे डेव्हलपमेंट जो आपला डी.पी. रोड आहे, त्याच्यामध्ये येतात. तथापी , पात्रता वगैरे फायनल करणे हा ही प्रकार आहे. त्यामुळे आपण रिस्क नको म्हणुन भाडेतत्त्वावर देत आहोत.

**सिसिलिया बाविघर :-**

आपण भाड्याने देउ शकतो की नाही?

**संजय पांगे :-**

भाड्याने देउ शकतो?

**मा. आयुक्त :-**

देउ शकतो. आपली प्रॉपर्टी आहे. आपल्याला नॉमिनल भाडे घ्यायचे आहे आणि द्यायचे.

**सिसिलिया बाविघर :-**

इथे गव्हर्नमेंटचा निर्णय काय आहे? शासन निर्णय काय आहे?

**मा. आयुक्त :-**

शासन निर्णय नाही. डी.सी. रुलमधील निर्णय असा आहे की, त्यांचे पुर्नवसन करुन द्यावे.

**सिसिलिया बाविघर :-**

पुर्नवसनासाठी दोनशे दोन झोपड्या आहेत. तुम्ही फक्त अठ्ठयाण्णव झोपड्यांनाच देता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बाकीचे काय करणार? तुम्ही २७२ झोपड्या दाखवता. पंच्चाहत्तर लोकांना घरे द्यायची गोष्ट करता. म्हणजे शेवटी तुमचा ४५ अतिक्रमणे हटल्यानंतर रस्ता क्लिअर झालेला नाही. ठराव करताना तुम्ही एकतर हे करायला पाहिजे की, बाकीचे प्रशासन तयार आहे का? ते अतिक्रमण हटविण्याची तयारी आीहे? मग या पद्धतीने तुम्ही ठराव द्या. मा. आयुक्त साहेब, चार दिवसांपुर्वी तुम्ही आम्हाला टिप्पणी पाठवली. त्यामध्ये आपण फिगर्स दिलेले नाहीत आणि चार दिवसानंतर तुम्ही टिप्पणी पाठवता त्याच्यामध्ये ७३ घरे. म्हणजे प्रशासन किती तयारीमध्ये आहे. या विषयामध्ये किती गांभिर्य आहे हे दिसुन येते. म्हणुन मा. महापौर साहेब, आमचे हे मत आहे की, पुढच्या मा. महासभेमध्ये तुम्ही हा विषय रितसर प्रशासनाची ७५-७० यादी, याच्यामध्ये ३५ चे, ९५ चे २००० चे सर्व मिक्स आहे. जे खरोखर ९५ च्या आधीचे आहेत. जे प्रस्थापित आहेत आणि प्रशासनाने बाकीची हमीपत्र घेतली पाहिजे. हे अतिक्रमण आम्ही काढु तर आम्ही त्यांना घर देण्याचे मान्य करु. नाहीतर प्रत्येंकाला घर द्यायचे. असे आम्ही महापालिकेचे नुकसान करणार नाही. टिप्पणीमध्ये मा. आयुक्तांचे क्लिअर आले पाहिजे की, ही पंधरा घरे ९५ च्या आधीची आहेत. त्यांना देणार. बाकीची आमची, या महापालिकेची या प्रशासनाची गॅरेन्टी आहे. सर्व अतिक्रमणे काढुन पंचेचाळीस मीटर रस्ता आम्ही क्लिअर करु. तरच हा विषय या मा. महासभेत आला पाहिजे. फक्त ७५ लोकांना घरे दिली. तो विषय परत तसाचा तसा. असे या मा. महासभेत होणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. श्री. ओमप्रकाश अग्रवालजी आपका ठराव पढिए।

**सिसिलिया बाविघर :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही जी माहिती दिली. ९५ च्या पूर्वीचे नाहीत. मग यांचा विचार कशाला करायचा?

**मा. आयुक्त :-**

मॅडम असे आहे, सभागृहाला माझी विनंती आहे की, तिथे झोपडपट्टी चांगली दिसत नाही हे तर सर्वांना मान्य आहे. तिथे आपण म्हणता त्याप्रमाण फक्त घरे द्यायची, झोपडपट्टी तशीच ठेवायची या मताचे आपण नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

७३ लोकांना घर दिल्यानंतर २४५ अतिक्रमणे काढण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे हे या टिप्पणीमध्ये लिहा. हा विषय पुन्हा मा. महासभेमध्ये आणावा.

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय सविस्तर मा. महासभेत आला पाहिजे.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही त्यांचे ओरिजनल पेपर मागवा. जे खरे असतील त्यांना द्या. बाकीच्या लोकांना तिकडुन बाहेर काढा. ज्यावेळेला टेंब्याच्या लोकांना भाड्याने रूम द्यायचे मंजूर केले. त्यावेळेला हे भाजपचे नगरसेवक झोपलेले का?

**कल्पना म्हात्रे :-**

मी बंदरवाडीच्या झोपडपट्टी बद्दल बोलते. त्यांचे पास, फोटो सर्व आहे. पण ते बेघर झालेले आहेत. त्यांच्यासाठी तुम्ही काय करणार? ते सर्व बेघर आहेत.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, उनकी सुचना भी इसके साथ मे लिजिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हमारा ठराव है की, यह विषय अगले मा. महासभा मे लिजिए।

**मा. महापौर :-**

बंदरवाडीची घरे किती आहेत?

**कल्पना म्हात्रे :-**

दिडशे घरे आहेत .

**मा. महापौर :-**

पण आपल्याकडे तेवढी घरेच नाहीत.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, मा. महापौर साहेब, मी असे बोलणार नाही की तुम्ही संगळ्यांना द्या. ज्यांच्याकडे ओरिजनल पेपर आहेत त्यांना द्या.

**कल्पना म्हात्रे :-**

२५-३० वर्षापासून तिथे राहतात.

**मा. महापौर :-**

आपल्याकडे त्यांना द्यायला तेवढी घरेच नाहीत.

**नयना म्हात्रे :-**

ज्या लोकांनी तुम्हाला खोटे पेपर दिले आहेत. त्यांना आपल्या अधिकाऱ्यांनी फोटोपास दिले आहेत. आणि ते खोटे सांगून देखील आजपर्यंत अधिकाऱ्यांवर काही कार्यवाही झाली नाही. अशा अधिकाऱ्यांना घरी बसवा.

**सिसीलिया बावीघर :-**

साहेब बेघर झाले ते कुठे जाणार? साहेब, तुम्ही त्यांना घरे देणार की नाही?

**मा. महापौर :-**

आपल्याकडे घरेच नाहीत.

**सिसिलीय बावीघर:-**

पण ते कुठे जाणार? एवढ्या वर्षापासून राहता? ते कुठे जाणार? खोट्या लोकांचे फोटोपासून बघून त्यांना देता. साहेब मला उत्तर द्या.

(सन्मा. सदस्या कल्पना म्हात्रे ह्यांनी ठरावाचे वाचन केले.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**सिसीलिया बावीघर :-**

साहेब, पुढच्या वेळी तुम्ही त्यांची यादी घ्या.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, ज्यांच्याकडे ओरिजनल पेपर खरे आहेत त्यांना तुम्ही द्या.

**मा. महापौर :-**

दोन ठरावानंतर त्यांचे एकमत होउ द्या.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, आंबेडकर नगरमध्ये पुर्वी जवळ-जवळ, श्री. शिवमुर्ती नाईक होते. त्यावेळेला रस्ता रूंदीकरणामध्ये जवळ-जवळ साडेतीनशे लोकांना विस्थापित करण्यात आहे होते. आणि साडेतीनशे लोकांमध्ये काही लोकांना भोलानगर मध्ये शिफ्ट केलेले आहे. आणि याच्यामध्ये पत्र पण आहे. आणि आत्तासुद्धा डिवायडर मध्ये जे लोक आहेत. त्यांना कुठेतरी शिफ्ट करायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

यांनाही घरे द्यायची आहेत का?

**अनंत पाटील :-**

घरे द्यायची आहेत तर.

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब, जो तो आपल्या प्रभागातील आपले मतदार पक्षाच्या राजकिय गोष्टींसाठी नाचवत आहेत. मला तरी वाटते की, १९९५ आणि २००० चा जो कायदा लागू केलेला आहे. ज्याच्याकडे म्युनिसीपालीटी पावती, टॅक्स बिल असेल आणि रेशनकार्ड आणि फोटोपास. फक्त फोटोपास लावायचा कोणीतरी परकिय लोंढ्यामध्ये बिल्डींगच्या कामगिरीकरीता येणारे, लोखंड कापणारे येतात. बांगलादेशी येतात. आणि त्यांच्यानंतर कुठेतरी राहायला एक ताडपत्री बांधून झोपडी करतात. त्याला तुम्ही झोपडपट्टी नाव देता आणि वाटेल तिथे त्यांना घरे द्या, जागा द्या आपल्या मताच्या पेट्या भरण्याकरीता ही कामे करतात. आणि मला तरी वाटते की, हे महापालिकेला नुकसान देत आहे. आपण आपल्या कायद्याचा आणि अधिकाराचा वापर करून ती झोपडपट्टी हटवावी. जर तुमच्या कायद्यामध्ये ते द्यावे असे लिगली वाटत असेल तर द्या. बाकी मला तरी वाटते की, राजकीय दबावाखाली न येता सदर झोपडपट्टी लवकरात लवकर खाली झाली पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, दोन ठराव झालेले आहेत ते मतदानाला घ्या. सगळ्यांचा वेळ वाया जात आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, यांचे म्हणणे असे आहे की, आमचा विरोध नाही. परंतू, ज्या बाकीच्या झोपड्या राहतील त्यांना तुम्ही हटवणार की नाही हे त्यांना सांगा.

**मा. महापौर :-**

ते दोन्ही ठराव पाठवा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, आम्हाला ऐकायची काही गरज नाही.

**जुबेर इनामदार :-**

जे त्यांना सांगायचे होते त्याचा उल्लेख त्यांनी ठरावामध्ये केला आहे. म्हणून मतदानाला घ्या.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आत्ता जी यादी दिलेली आहे ती तुटलेल्या झोपड्यांची आहे. पण आत्ता सध्या डिवायडरवर ज्या झोपड्या आहेत त्यांचे काय?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, हा विषय मंजूर करा. तुम्हाला जे योग्य पेपर वाटतील त्यांना द्या. बाकीच्या लोकांची तिकडून हकालपट्टी करा.

**बर्नट डिमेलो :-**

मा. महापौर साहेब, कम्पलसरी असेल त्यालाच द्यायचे फोटोपासवर द्यायचे नाही.

**नयना म्हात्रे :-**

लोकांनी फोटोपास वगैरे खोटे बनवले आहेत. त्याची देखील तुम्ही चौकशी करा. आणि ज्या अधिकाऱ्यांनी खोटे बनवले आहेत. त्यांना डायरेक्ट घरी पाठवा.

**नर्मदा वैती :-**

आमच्या वॉर्डमध्ये पण लक्ष द्या. आमच्या वॉर्ड मधील पण बंदरवाडीचे पाहिजे.

**मा. महापौर :-**

माझे सन्मा. सभागृहाला निवेदन आहे की, १९९५ पुर्वीचे ज्यांना फोटोपास दिलेल्या झोपडपट्ट्या आहेत. जे रस्त्याने बाधित झाले असतील किंवा कुठल्याही आरक्षणाखाली बाधित झाले असतील ती संपूर्ण यादी मा. आयुक्तांनी द्यावी त्यानंतर सभागृहाने निर्णय घ्यावा. नाहीतर अर्ध्यांना घरे मिळतील अर्ध्यांना मिळणार नाहीत. त्यापेक्षा तो विषय परत आणू या.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब दोन ठराव आले होते त्याचे काय झाले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हाला मंजूर आहे. पुढील मा. महासभेत घ्यावे.

**मा. महापौर :-**

पुढच्या मा. महासभेत घेउ.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, त्या आदिवासींचे कसे काय ? ते आदिवासी या इमारतीखाली राहायचे, त्यांचे काय ?

**मा. महापौर :-**

आपण नाही म्हणत नाही. एकूण किती अशी घरे आहेत ती रस्ता किंवा आरक्षणाने बाधीत झालेली आहेत. ती संपूर्ण यादी आणायची आणि त्यानंतर आपण निर्णय घेउ या.

**नयना म्हात्रे :-**

ती मिटींग तुम्ही किती दिवसांनी लावाल ते बोला.

**मा. महापौर :-**

पुढच्या सभेला.

**नयना म्हात्रे :-**

एवढे मी बोलते की, त्यांची मुळ कागदपत्र तपासून घ्या.

**जयंत पाटील :-**

हा निर्णय तुम्ही कधी आणणार आहात. हा विषय तुम्ही लवकरात लवकर आणा.

**(मा. महापौर यांच्या आदेशाने सदरचा विषय पुढच्या मिटींगमध्ये घेण्यात यावा असे ठरले.)**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७५, मिरा भाईंदर महानगरपालिकेकरिता महानगरपालिका संबंधीत कामकाजासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन व स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन करणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची स्थापना दि.२८ फेब्रुवारी २००२ रोजी झाली आहे. सन२००१ च्या जनगणनेप्रमाणे शहराची लोकसंख्या ५,२०,३८८ इतकी होती. महानगरपालिकेचे एकुण क्षेत्र ७९.४० चौ.कि.मी

इतके आहे. सध्या शहराची लोकसंख्या साधारणतः ८.५० लाखापेक्षा जास्त आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका राज्य शासनाच्या वर्गीकरणानुसार हि 'ड' वर्ग दर्जाची महानगरपालिका आहे. मिरा-भाईंदर हे मुंबई लगतचे शहर असल्याने शहरातील लोकसंख्येत झपाटयाने वाढ होत आहे. महानगरपालिका अंतर्गत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण विरोधात एम.आर.टी.पी. व महानगरपालिका कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करणे त्या व्यतीरिक्त अनधिकृत नळजोडण्या, अनधिकृत जाहिरात, फेरीवाले यांच्या विरुध्द वेळोवेळी गुन्हे दाखल करावे लागतात. काही प्रकरणात कारवाईच्या वेळी होणाऱ्या विरोधामुळे निर्माण होणारी कायदा व सुव्यवस्था परिस्थिती हाताळणे फारच जिकरीचे होत आहे. परिस्थिती हाताबाहेर जाऊन शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतात. या बाबी विचारात घेता वेळीच तपास होऊन गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी महानगरपालिकेच्या संबंधीत कामकाजाकरीता स्वतंत्र पोलीस स्टेशन व स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन होणे गरजेचे आहे.

महानगरपालिकेकरीता निर्माण होणाऱ्या स्वतंत्र पोलीस स्टेशनमध्ये खालील प्रमाणे पोलीस कर्मचारी राहणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **पदाचा तपशील** | **पदाची संख्या** |
|---|---|---|
| १. | सहायक पोलीस निरीक्षक | १ |
| २. | पोलीस उपनिरीक्षक | १ |
| ३. | सहायक पोलीस उपनिरीक्षक | १ |
| ४. | सशस्त्र पोलीस हवालदार | ४ |
| ५. | सशस्त्र पोलीस शिपाई | ८ |
| ६. | कनिष्ठ लिपीक | १ |
| ७. | वाहनचालक | १ |
| | **एकुण** | **१७** |

पोलीस स्टेशन करीता आवश्यक जागा, वाहने, इमारत, यंत्रणा महानगरपालिकेकडून उपलब्ध करुन देण्यांत येतील. यावर होणाऱ्या एकुण खर्चापोटी शासनाकडून प्रतिपूर्ती अनुदानाच्या स्वरुपात मदत व्हावी. पोलिस अधिकाऱ्याचे वेतन, भत्ते, कार्यालयीन खर्च व इतर आवर्तीय व अनावर्तीय खर्चाचा भार शासनाच्या गृहविभागा मार्फत करण्यांत यावा किंवा महानगरपालिकेने खर्च केल्यास त्याची भरपाई प्रत्येक सहा महिन्यानंतर प्रतिपूर्ती अनुदानाच्या रुपात शासनाने करावी.

सदर स्वतंत्र पोलीस स्टेशनामधील पोलीस अधिकारी कर्मचारी यांची पदनिर्मीती नेमणुक व वेळोवेळी बदली शासनाकडून होणे अपेक्षीत आहे. पिंपरी चिंचवड व औरंगाबाद महानगरपालिकेने त्यांच्या महानगरपालिकेशी संबंधीत खटले हाताळण्यासाठी ठराव करुन स्वतंत्र न्यायालये निर्माण केली आहेत. त्याच धर्तीवर मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, अनधिकृत नळजोडण्या आणि अनधिकृत फेरीवाले इत्यादी महानगरपालिकेच्या कामकाजाच्या संबंधीत खटले हाताळण्यासाठी स्वतंत्र न्यायालय निर्माण करण्यांत यावे. न्यायालयाचे अधिकार क्षेत्र महानगरपालिका क्षेत्रापुरते मर्यादीत असेल. या न्यायालयात महानगरपालिकेच्या संबंधीत खटले चालविले जावेत, न्यायालयात कर्मचारीवृंदांची संख्या साधारणतः कमी असावी. न्यायालयाच्या आवश्यक जागेची, इमारतीची सुविधा महानगरपालिका करील यासाठी येणाऱ्या खर्चांचे भरपाई पोटी शासनांनी महानगरपालिकेला अनुदान द्यावे. स्वतंत्र न्यायालयाचा आस्थापना खर्च, इतर आवर्ती व अनावर्ती खर्चाचा आवश्यक भार महानगरपालिका उचलण्यास तयार आहे. परंतु याबाबत शासनानी प्रत्येक सहा महिन्यानंतर होणाऱ्या खर्चाचे प्रतिपुर्ती अनुदान महानगरपालिकेस मंजुर करावे.

तरी पिंपरी चिंचवड व औरंगाबाद महानगरपालिका धर्तीवर मिरा-भाईंदर महानगरपालिकेकरीता महानगरपालिका संबंधीत कामकाजासाठी स्वतंत्र पोलिस स्टेशन व स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन करणेस हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**मिलन पाटील :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. पिठासिन अधिकारी, आपण जो गोषवारा दिलेला आहे. त्या गोषवाऱ्यामध्ये फक्त पोलिस अधिकाऱ्यांची माहिती दिलेली आहे. मग न्याययंत्रणा कशी काय करणार ?

**मा. आयुक्त :-**

न्यायालयाच्या बाबतीत सन्मा. सभागृहाला सांगायचे आहे की, जरी आपण त्याच्यामध्ये न्यायालयाचा उल्लेख केलेला असला तरीही ठाणे येथे एक विशेष स्वतंत्र न्यायालय सध्या महानगरपालिकेसाठी आहे. आणि आम्ही शासनाला असे सांगितले की, आमच्यासाठी वेगळे, आपल्याकडे गुन्ह्यांची संख्या फार एवढी मोठी नाही. त्यामुळे आपल्यासाठी मिरा भाईंदरला वेगळे न्यायालय लगेच मिळेल असे नाही. जे न्यायालय सध्या ठाण्याला स्वतंत्र आहे. त्याच्याकडेच आपले काम सुपूर्द केले जाईल. आणि आपण आपला तेवढा खर्च वाचविण्याचा प्रयत्न करणार आहोत.

**प्रफुल्ल पाटील :-**

बरं आत्ता MRTP खाली एखादा गुन्हा दाखल करायचा असेल, एखादी व्यक्ती अनधिकृत बांधकाम करत आहे. आत्ता तुम्ही जे पोलिस अधिकरी नियुक्त करणार आहोत. हे पोलिस अधिकारी त्यांच्यावर MRTP ॲक्ट खाली कारवाई कशी करतील? म्हणजे तो गुन्हा कुठे नोंदवतील? त्याचा पंचनामा कोण करेल? तपास कार्य कोण करतील?

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये आपण हे जे पोलीस स्टेशन स्थापन करत आहोत. ॲक्च्युअली हे स्टेटचे काम आहे. आपल्या महानगरपालिकेचे काम नाही. म्हणून हे स्टेटचेच युनिट आहे. फक्त स्टेटचे युनिट एक्सक्युझीवली फॉर महानगरपालिका गुन्हे असे शासनाचे धोरण राहणार आहे. शासन याच्यानंतर केबिनेटसमोर जाणार आहे. त्यांना फक्त आपले सगळ्यांचे ठराव पाहिजेत की, आपली सहमती आहे. तर हे जरी एक्सक्युझीव्ह पोलीस स्टेशन असले तरी ते स्टेटचे म्हणून राहील. आणि स्टेटचे असल्यामुळे ते स्वतः गुन्ह्याची नोंद करून घेणे गुन्ह्याचा तपास करणे, चार्जशिट कोर्टात दाखल करणे. आणि त्याप्रमाणे त्याचा पाठपुरावा करणे ह्याही बाबी त्यांनी कराव्या अशा अपेक्षा आहेत. रेग्युलर पोलीस स्टेशन एक्सक्युझीव्हली फॉर महानगरपालिका गुन्हे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मला एक कळत नाही की, आत्ता जे पोलीस स्टेशन आहेत. या ठिकाणी सर्व प्रकारच्या बाबींवर म्हणजे एखादी एन.सी. दाखल करणे किंवा कुठल्याही प्रकारचा गुन्हा दाखल करणे म्हणजे चोरी, डकैती, अनाधिकृत बांधकाम अतिक्रमण, हत्या, भोसकणे, मारणे, ठोकणे किंवा सर काही गोष्टी होतात. ज्या IPC कलमाखाली पनिशेबल आहेत. त्या सगळ्या गोष्टीबांबत त्या ठिकाणी तक्रारी नोंदवल्या जातात. मग हे जे पोलीस स्टेशन स्थापन होणार ते IPC च्या अमुक कलमांच्या फक्त अंमलबजावणी साठी होणार की, फक्त MRTP ॲक्टच्या अंमलबजावणीसाठी होणार किंवा त्यांचे जे काही FIR असेल त्याला काही मर्यादा असणार आहेत का? म्हणजे मला नक्की त्यांच्या कामकाजाची कार्यकक्षा या तुमच्या गोषवाऱ्यामध्ये कळतच नाही.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये असे अभिप्रेत आहे की, सध्या तीन पोलीस स्टेशन समजा आपल्याकडे कार्यरत आहेत. ते तीन पोलीस स्टेशन त्यांच्याकडे जे काही गुन्हे नोंद करून घेतात. ते तह्यात तसेच करतील. त्यांचे ज्युरीडेशन तसेच राहील. हे जे चौथे पोलीस स्टेशन होईल. हे एक्सक्लुझीव्हली फॉर त्यापैकी त्यांच्याकडचे सगळ्यांचे महापालिकेशी संबंधीत ॲक्टच्या गुन्ह्यांचे अधिकार ह्या पोलीस स्टेशनला येतील. आणि त्यांचे तेवढे काम कमी होईल. आणि ह्यांचे एक्सक्लुझीव्हली काम तेवढेच राहील. प्रश्न असाही उपस्थित होतो की, त्या पोलीस स्टेशनला एवढे काम असण्या एवढे गुन्हे खरेच आपल्याकडे आहेत का? परंतू शासनाचा असा उद्देश आहे की, एवढे गुन्ह्याकडे बघण्याची गरज नाही. सुरूवातीला गुन्हे जरी असले तरी भविष्यात आपल्याकडचे जे शहरीकरण वाढते आहे. आत्ता आपण ५०% पर्यंत आहोत. पुन्हा ६०% पर्यंत जाउ. तर भविष्यात महानगरपालिकेला एक ॲसेट म्हणून याचा वापर होईल. महानगरपालिकेतील ही जी काही अतिक्रमणे आहेत, आपला आज जो अर्धा दिवस गेला, तो वाचविण्यासाठी कायमस्वरूपी एक This is only deternate action आहे. म्हणजे याच्यामुळे थोडी भिती निर्माण होईल. फास्ट होईल, गुन्हे लवकर लवकर दाखल होतील. त्याच्यावर लवकर लवकर कॉन्सेन्ट्रेट करून न्यायालयसुद्धा निर्णय घेईल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे सुरूवातीला फक्त शंभरच गुन्हे आहेत. त्यासाठी एक पोलीस स्टेशन, बाकीचे दुसरे पोलीस स्टेशन जर ५०० आणि ७०० गुन्हे एक वर्षातील हॅन्डल करत असतील तर तोही विचार करायला हरकत नाही. परंतू, ह्याचा जो उद्देश आहे की, भविष्यात महानगरपालिकेच्या गुन्ह्याच्या बाबतीत थोडी.....

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब ठाणे महानगरपालिकेमध्ये JFC रँकचे जज एक दिवस, दोन दिवस तिकडे जातात. तिथे ते बसतात आणि हा जो गोषवारा आणला आहे. याचा प्रकारचा अगोदर एक ठराव पास झाला आहे. त्याला दोन वर्षे झाली अजून पर्यंत त्या ठरावाची कारवाई का केली गेली नाही? हा ठराव काही नवीन नाही. ऑलरेडी पोलीसांचे पथक महापालिकेत कामावर घ्यावे म्हणून दोन वर्षापुर्वी मा. महासभेने ठराव करून दिला आहे. परंतू त्या ठरावावर इम्लिमेंटशन का केले गेले नाही? कारण पोलिसांचा बंदाबस्त मिळाला नाही. किंवा मिळत नाही या सबबीखाली अतिक्रमण तोडायलाच जायला मिळत नाही. त्याकरीता त्या ठरावावर कारवाई झालेली नाही. ठरावावर ती कारवाई का झालेली नाही याचा पहिला खुलासा करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तो ठराव तीन वर्षापुर्वी झालेला आहे. आपण महाराष्ट्र शासनाकडून पोलीस बंदोबस्त मागवलेला आहे. नंतर माहितीच्या अधिकारामध्ये विचारल्यानंतर आम्हाला महाराष्ट्र शासनाकडून उत्तर मिळत नाही. जेव्हा एवढे अनधिकृत बांधकाम चालू आहे. आपल्याला पोलीस बंदोबस्ताची आपण मागणी केली. आपण पैसे भरायला तयार आहोत. इकडचे सन्मा. पालकमंत्री श्री. गणेश नाईक यांना पण माहिती आहे की, एवढे इललिगल बांधकाम सुरू आहे. आणि आज पुन्हा तुम्ही ठराव करता. मागचा ठराव गेला खड्डयात म्हणजे तो ठराव पण पोलीस स्टेशनचाच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या ठरावाचे काय झाले? सदर ठराव विखंडीत झाला? सदर ठराव तुम्ही बासनात गुंडाळून ठेवला? त्याच्यावर आपल्या मा. आयुक्तांचा अहवाल सादर झाला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

शासन देणार नाही त्याच्यावर काय झाले?

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या माहितीनुसार श्री. आर. डी. शिंदे साहेबांनी गव्हर्नमेंटला पत्र पाठवले आहे की, त्या ठरावावर आम्हाला पथक पाठवा. आम्हाला इथे पथक ठेवायला मंजूरी द्या.

**मा. आयुक्त :-**

माझी सन्मा. सभागृहाला विनंती की, दोन वेगळे विषय आहेत. आपण यापुर्वी तो जो ठराव केलेला होता. तो आपल्या एखाद्या अतिक्रमण रिमुव्हलची कारवाई करण्यासाठी आपल्याला जो पोलीस प्रोटेक्शन पाहिजे. त्या ठिकाणी कारवाई करताना जर कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली. कोणी आपल्या कर्मचाऱ्यांना अडवले. तर ते फक्त आपल्याला सपोर्ट किंवा प्रोटेक्शन म्हणून होते. आजचा जो पोलीस स्टेशनचा प्रस्ताव आहे. हा इन्वेस्टीगेशनचा पार्ट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मला सांगा या ठरावात तसा काही उल्लेखच नाही म्हणजे मग दोन पथके मागवणार आहात का? ते एक अलग आणि हे एक अलग.

**मा. आयुक्त :-**

शासनाचा प्रस्ताव असा आहे की, आपण एक वेगळे पोलिस स्टेशन फक्त गुन्ह्यांच्या तपासासाठी करत आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

पण त्याच पत्रावरून कशावरून शासनाने तुमचा तो प्रस्ताव पाठवला नसेल? तुम्ही तो खुलासा मागा की, आमच्या या ठरावाद्वारे आम्ही असे पथक नेमावे म्हणून मा. तत्कालीन आयुक्तांनी मागणी केली आहे. ते दोन तर क्लब केले नाही किंवा त्याचा प्रस्ताव पाठवलेला नाही.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, ती सुचना मांडली त्या हिशोबाने आपण प्रस्ताव पाठवावा. सचिव साहेब दुसरा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ७५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेकरिता महानगरपालिका संबंधीत कामकाजासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन व स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन करणेबाबत.

**ठराव क्र. ६८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची स्थापना दि.२८ फेब्रुवारी २००२ रोजी झाली आहे. सन२००१ च्या जनगणनेप्रमाणे शहराची लोकसंख्या ५,२०,३८८ इतकी होती. महानगरपालिकेचे एकुण क्षेत्र ७९.४० चौ.कि.मी इतके आहे. सध्या शहराची लोकसंख्या साधारणतः ८.५० लाखापेक्षा जास्त आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका राज्य शासनाच्या वर्गीकरणानुसार हि 'ड' वर्ग दर्जाची महानगरपालिका आहे. मिरा-भाईंदर हे मुंबई लगतचे शहर असल्याने शहरातील लोकसंख्येत झपाटयाने वाढ होत आहे. महानगरपालिका अंतर्गत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण विरोधात एम.आर.टी.पी. व महानगरपालिका कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करणे त्या व्यतीरिक्त अनधिकृत नळजोडण्या, अनधिकृत जाहिरात, फेरीवाले यांच्या विरुध्द वेळोवेळी गुन्हे दाखल करावे लागतात. काही प्रकरणात कारवाईच्या वेळी होणाऱ्या विरोधामुळे निर्माण होणारी कायदा व सुव्यवस्था परिस्थिती हाताळणे फारच जिकरीचे होत आहे. परिस्थिती हाताबाहेर जाऊन शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतात. या बाबी विचारात घेता वेळीच तपास होऊन गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी महानगरपालिकेच्या संबंधीत कामकाजाकरीता स्वतंत्र पोलीस स्टेशन व स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन होणे गरजेचे आहे.

महानगरपालिकेकरीता निर्माण होणाऱ्या स्वतंत्र पोलीस स्टेशनमध्ये खालील प्रमाणे पोलीस कर्मचारी राहणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदाचा तपशील | पदाची संख्या |
|---|---|---|
| ८. | सहायक पोलीस निरीक्षक | १ |
| ९. | पोलीस उपनिरीक्षक | १ |
| १०. | सहायक पोलीस उपनिरीक्षक | १ |
| ११. | सशस्त्र पोलीस हवालदार | ४ |
| १२. | सशस्त्र पोलीस शिपाई | ८ |
| १३. | कनिष्ठ लिपीक | १ |
| १४. | वाहनचालक | १ |
| | **एकुण** | **१७** |

पोलीस स्टेशन करीता आवश्यक जागा, वाहने, इमारत, यंत्रणा महानगरपालिकेकडून उपलब्ध करुन देण्यांत येतील. यावर होणाऱ्या एकुण खर्चापोटी शासनाकडून प्रतिपूर्ती अनुदानाच्या स्वरुपात मदत व्हावी. पोलिस अधिकाऱ्याचे वेतन, भत्ते, कार्यालयीन खर्च व इतर आवर्तीय व अनावर्तीय खर्चाचा भार शासनाच्या गृहविभागा मार्फत करण्यांत यावा किंवा महानगरपालिकेने खर्च केल्यास त्याची भरपाई प्रत्येक सहा महिन्यानंतर प्रतिपूर्ती अनुदानाच्या रुपात शासनाने करावी.

सदर स्वतंत्र पोलीस स्टेशनामधील पोलीस अधिकारी कर्मचारी यांची पदनिर्मीती नेमणुक व वेळोवेळी बदली शासनाकडून होणे अपेक्षीत आहे. पिंपरी चिंचवड व औरंगाबाद महानगरपालिकेने त्यांच्या महानगरपालिकेशी संबंधीत खटले हाताळण्यासाठी ठराव करुन स्वतंत्र न्यायालये निर्माण केली आहेत. त्याच धर्तीवर मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, अनधिकृत नळजोडण्या आणि अनधिकृत फेरीवाले इत्यादी महानगरपालिकेच्या कामकाजाच्या संबंधीत खटले हाताळण्यासाठी स्वतंत्र न्यायालय निर्माण करण्यांत यावे. न्यायालयाचे अधिकार क्षेत्र महानगरपालिका क्षेत्रापुरते मर्यादीत असेल. या न्यायालयात महानगरपालिकेच्या संबंधीत खटले चालविले जावेत, न्यायालयात कर्मचारीवृंदांची संख्या साधारणतः कमी असावी. न्यायालयाच्या आवश्यक जागेची, इमारतीची सुविधा महानगरपालिका करील यासाठी येणाऱ्या खर्चांचे भरपाई पोटी शासनांनी महानगरपालिकेला अनुदान द्यावे. स्वतंत्र न्यायालयाचा आस्थापना खर्च, इतर आवर्ती व अनावर्ती खर्चाचा आवश्यक भार महानगरपालिका उचलण्यास तयार आहे. परंतु याबाबत शासनानी प्रत्येक सहा महिन्यानंतर होणाऱ्या खर्चाचे प्रतिपुर्ती अनुदान महानगरपालिकेस मंजुर करावे.

तरी पिंपरी चिंचवड व औरंगाबाद महानगरपालिका धर्तीवर मिरा-भाईंदर महानगरपालिकेकरीता महानगरपालिका संबंधीत कामकाजासाठी स्वतंत्र पोलिस स्टेशन व स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन करणेस हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिवः-**

प्रकरण क्र. ७६, सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने वेतन सुधारणा पूर्वक अग्रीम अदा करणेबाबत.

**जयंत पाटील :-**

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत केंद्र शासनाने सुधारणा केली आहे. त्या वेतनश्रेणीचे परिक्षण करुन राज्य शसकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्यासाठी शिफारशी करण्याकरीता श्री. पी. एम. ए. हकीम, केंद्र शासनाचे माजी

सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारण समिती, २००८ ची स्थापना शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेपुर-१२०८/प.क्र.७२/सेवा-९ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि. २३ सप्टेंबर २००८ अन्वये करण्यात आली आहे.

जे कर्मचारी दि. १ एप्रिल २००८ रोजी नियमित वेतनश्रेणीत वेतन घेत आहेत व दिनांक ०१ ऑक्टोंबर, २००८ रोजी राज्य शासनाच्या नियमीत सेवेत कार्यरत आहेत, अशा राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना त्यांच्या दिनांक १ ऑक्टोंबर २००८ रोजी अनुज्ञेय असलेल्या विद्यमान वेतनश्रेणीतील मुळ वेतनाच्या दुप्पट रक्कम अथवा रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अग्रीम म्हणून अदा करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. या अग्रीमाचे प्रदान माहे ऑक्टोंबर २००८ च्या मासिक वेतनाबरोबर काढण्यात यावे असेही शासनाने नमुद केले आहे.

महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांना या शासन निर्णयाप्रमाणे अग्रीम अदा करावयाचा झाल्यास एकूण अंदाजे १४७.०० लाख एवढी रक्कम लागणार असून सदर खर्च अर्थसंकल्पीय तरतुदीतुन लेखाशिर्ष स्थायी आस्थापना (वेतन, भत्ते) अंतर्गत करता येईल. सदर लेखाशिर्षामध्ये २३७०.१९ लाख एवढी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली आहे.

तरी वरील प्रमाणे शासन निर्णयानुसार मुळे वेतनाच्या दुप्पट रक्कम अथवा रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) यापैकी जी जास्त असेल ती रक्कम महापालिका अधिकारी / कर्मचारी तसेच महापालिका शिक्षण मंडळ, शिक्षक कर्मचारी यांना अग्रीम म्हणून माहे नोव्हेंबर २००८ च्या वेतनासोबत अदा करणेस ही सभा आर्थक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**मिलन पाटील :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

या ठिकाणी प्रशासनाने एक बाब नक्की स्पष्ट करावी की, सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी आम्ही लागू केल्यानंतर आम्हाला आस्थापनेवर कारण आत्ता अग्रीम द्यायचा अग्रीम दिला म्हणजे काय बयाणा दिला म्हणजे व्यवहार करायलाच पाहिजे. नाही तर बयाणा बुडतो म्हणून अग्रीम दिला म्हणजे तुम्ही सहावा वेतन आयोग लागू करणारच. मग तो सहावा वेतन आयोगजर लागू झाला तर आम्हाला आस्थापनेवर किती टक्के खर्च वाढणार आहे. त्याची माहिती आपल्याकडे आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. पाटील साहेब, सहाव्या वेतन आयोगाच्या ज्या संवर्ग निहाय सुधारित वेतनश्रेणी आहेत. त्या अजून आमच्यापर्यंत आल्या नाहीत. म्हणून अंदाजे भविष्यात किती परसेंट वाढ होईल. ते आज आपल्याला सांगता येणार नाही. पण निश्चितच आपली महापालिका सहावा वेतन लागू करायला आपण कमी पडू असे मला वाटत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

कामगारांना द्यायला आपण कुठेच कमी पडत नाही. आपले दोन हात असे असतात चार हात असते तर चार हात केले असते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वेतनश्रेणी निश्चित झालेल्या डेटा आमच्याकडे नाही. ते उपलब्ध करून घेउन आपल्याला सागतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

एवढे सगळे दिल्यानंतर आत्ता एकीकडे तुमचे उत्पन्न घटायला लागले आहे. सेसने तोंडात फेस आणला. ऑक्ट्रॉय नको ग बाय. अशी परिस्थिती झालेली आहे तर आत्ता नेमके काय पाहिजे आहे ते सन्मा श्री. ओमप्रकाश अग्रवाल साहेब सांगतील ते ठरवतील, त्याच्यावर आमच्या पालिकेची दिशा ठरणार आहे. आणि हे सहावे वेतन आयोग दिल्यानंतर आमची दशा काय होईल की, दुर्दशा होईल की, दाही दिशा होईल ती परिस्थिती मात्र विचार करण्याजोगी आहे. साहेब, याच्यासंबंधी पुढे अहवाल सादर करा.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. श्री. खतगावकर साहेब सांगतात की, आमच्याकडे ते आलेले नाही. नेटवर माहिती मिळते आहे. सर्वसामान्य शिक्षक, जिल्हापरिषद किंवा यांचे, त्या शिक्षकांकडे त्या प्रती आलेल्या आहेत. सगळे काही .....

**मा. महापौर :-**

अजून फायनल झालेले नाही. नेटवरपण नाही.

**प्रभात पाटील :-**

सगळे फायनल झाले. तुमच्याच कर्मचाऱ्याने नेटवरून काढलेली माहिती आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मॅडम आपण गैरसमज करून घेउ नका राज्य शासनाने अजून सहाव्या वेतनाबद्दल फक्त हे अग्रीम रक्कम देण्याबद्दलचाच निर्णय केला आहे. आणि कमिटी स्थापन केलेली आहे. त्याचे कामकाज चालू आहे. केंद्र शासनाने सहावा वेतनाचे अंतिम केलेले आहे. आणि तुम्ही जी माहिती घेता ती केंद्र शासनाची आहे.

**प्रभात पाटील :-**

आपलेच कर्मचारी ही सगळी माहिती इकडे तिकडे पुरवत आहेत. ठिक आहे आपल्याला द्यायला हरकत नाही. आम्ही तुमच्यासाठी कोणत्याही बाबी समोर आल्या तर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत या सभागृहाची १९९२ पासूनची प्रतिमा अशी आहे की, कधीही कंजूषी करत नाही किंवा तुमच्या कोणत्याही प्रस्तावाला कोणत्याही नगरसेवकाचा विरोध असत नाही.

**मा. महापौर :-**

फक्त काम करून द्या.

**प्रभात पाटील :-**

फक्त काम आणि त्याच्यामध्ये कमिशनर साहेब तुमच्याकडून ही अपेक्षा आहे की, मगाशी सौ. नयना म्हात्रे पाठीमागून जे ओरडत होत्या, पण कोणी लक्ष दिले नाही. मला त्यांचा मुद्दा धरून एकच गोष्ट बोलावीशी वाटते की, आज आपण श्री. दिवटेंना निलंबीत केले. त्यावेळेला आपण श्री. पानट्टेंना राखले हे तर सरळ उघड आहे. आणि कोणाला...

**मा. महापौर :-**

दोघांनाही केले आहे.

**प्रभात पाटील :-**

कोणाला राखायचे, कोणाला ठेवायचे हा मुद्दा नाही. पण जे सरळ सरळ खोटे काम करतात. सन्मा श्री. जयंत पाटील यांच्याच वॉर्डमध्ये सगळ्या पेपरमधून बातम्या आल्या की, फोटोपासाच्या संदर्भामध्ये तुमची भुमिका ठाम असायला पाहिजे. जेव्हा शासन झोपडपट्टी निर्मुलन राबवते तेव्हा आपल्याकडे नवीन नवीन झोपड्या उभ्या राहतात आणि त्यांना सगळ्यांना अगदी कागदोपत्री आणायचे काम आपले अधिकारी जर करत असतील तर हा सर्वात मोठा भयंकर गुन्हा आहे. आणि मी तुम्हाला पुन्हा एकदा आव्हान करते की, अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जर श्री. दिवटे, श्री. पानपट्टे यांच्यावर कार्यवाही होते तर पहिल्यांदा ह्या लोकांवर कार्यवाही व्हायला पाहिजे. ही भुमिका तुम्ही ठेवायला पाहिजे.

**प्रविण पाटील :-**

काय करणार ते सांगा. त्यांनी सांगितले करणार पण नेमके काय करणार ?

**मा. महापौर :-**

अतिक्रमण आणि अनधिकृत बद्दल ?

**प्रविण पाटील :-**

नाही आत्ता मॅडमनी जो विषय सांगितला.

**मा. महापौर :-**

फोटोपास ना ?

**प्रविण पाटील :-**

होय, त्याच्या बद्दल काय करणार, जे अधिकारी गुन्हेगार आहेत किंवा ज्यांनी प्रोत्साहन दिले त्यांच्यावर तुम्ही नेमकी काय. कार्यवाही करणार?

**मा. महापौर :-**

निलंबनाची कार्यवाही.

**प्रविण पाटील :-**

कोणत्या अधिकाऱ्यांवर ?

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांच्या अधिकाऱ्यावर ?

**प्रविण पाटील :-**

तो अधिकारी कोणता?

**मा. महापौर :-**

जे सापडतील त्यांच्यावर.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही नाव सांगा सापडतील काय तुम्हाला सगळे पुरावे दिले आहेत.

**मा. महापौर :-**

मग श्री. पानपट्टे साहेबांना आजतुम्ही केले.

**प्रविण पाटील :-**

पण साहेब अजून आहेत.

**मा. महापौर :-**

अजून असतील ते करतील.

**प्रविण पाटील :-**

तुम्हाला नावे दिलेली आहेत ते बोला.

**मा. महापौर :-**

ते तपास करतील.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपल्याकडे श्री. केळकर साहेब, उपायुक्त म्हणून होते. त्यावेळेला त्यांचा शिक्का इकडेच राहिला. म्हणून श्री. संख्ये शिक्का मारून द्यायचे.

**मा. महापौर :-**

आत्ता कुठे आहे?

**नयना म्हात्रे :-**

आत्ता त्यांनी शिक्का लपवला की काय केला हे त्याचे त्यालाच माहिती.

**मा. महापौर :-**

ठिक आहे सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ७६ :-**

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने वेतन सुधारणा पूर्वक अग्रीम अदा करणेबाबत.

**ठराव क्र. ६९ :-**

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत केंद्र शासनाने सुधारणा केली आहे. त्या वेतनश्रेणीचे परिक्षण करुन राज्य शसकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्यासाठी शिफारशी करण्याकरीता श्री. पी. एम. ए. हकीम, केंद्र शासनाचे माजी सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारण समिती, २००८ ची स्थापना शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेपुर-१२०८/प.क्र.७२/सेवा-९ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि. २३ सप्टेंबर २००८ अन्वये करण्यात आली आहे.

जे कर्मचारी दि. १ एप्रिल २००८ रोजी नियमित वेतनश्रेणीत वेतन घेत आहेत व दिनांक ०१ ऑक्टोंबर, २००८ रोजी राज्य शासनाच्या नियमीत सेवेत कार्यरत आहेत, अशा राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना त्यांच्या दिनांक १ ऑक्टोंबर २००८ रोजी अनुज्ञेय असलेल्या विद्यमान वेतनश्रेणीतील मुळ वेतनाच्या दुप्पट रक्कम अथवा रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अग्रीम म्हणून अदा करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. या अग्रीमाचे प्रदान माहे ऑक्टोंबर २००८ च्या मासिक वेतनाबरोबर काढण्यात यावे असेही शासनाने नमुद केले आहे.

महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांना या शासन निर्णयाप्रमाणे अग्रीम अदा करावयाचा झाल्यास एकूण अंदाजे १४७.०० लाख एवढी रक्कम लागणार असून सदर खर्च अर्थसंकल्पीय तरतुदीतुन लेखाशिर्ष स्थायी आस्थापना (वेतन, भत्ते) अंतर्गत करता येईल. सदर लेखाशिर्षामध्ये २३७०.१९ लाख एवढी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली आहे.

तरी वरील प्रमाणे शासन निर्णयानुसार मुळे वेतनाच्या दुप्पट रक्कम अथवा रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) यापैकी जी जास्त असेल ती रक्कम महापालिका अधिकारी / कर्मचारी तसेच महापालिका शिक्षण मंडळ, शिक्षक कर्मचारी यांना अग्रीम म्हणून माहे नोव्हेंबर २००८ च्या वेतनासोबत अदा करणेस ही सभा आर्थक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७७, प्रतिनियुक्तीवरील अधिकारी श्री. बालाजी खतगांवकर (उपायुक्त मु.) यांना मुदतवाढ देणेबाबत.

**जयंत पाटील :-**

सुरूवातीचे काही विषय कडू झाले. आणि शेवटचे विषय गोड करतो त्यात कर्मचाऱ्यांना अग्रीम अनामत दिली आणि या शहरात बऱ्याचशा अधिकाऱ्यांमध्ये सर्वांचे लाडके असलेले अधिकारी श्री. खतगावकर साहेब आहेत. असे माझे मत आहे. एक अतिशय प्रामाणिक अधिकारी त्याचा स्वभाव, त्यांची काम करण्याची पद्धत या सगळ्यावर आम्ही फिदा आहोत.

**नयना म्हात्रे :-**

हुशार आहेत बरोबर आहे. पण कोणाकोणाला आवडतात ते तरी विचारा.

**जयंत पाटील :-**

म्हणून प्रकरण क्र. ७७ मी आत्ता वाचून दाखवतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. बालाजी खतगांवकर, उप-आयुक्त (मु.) दि. ०५/१२/२००५ पासून कार्यरत आहेत. महापालिका कार्यक्षेत्रात दि. १ सप्टेंबर २००८ पासून जकात ऐवजी उपकर लागु करणे बाबत शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही झालेली आहे व सद्यस्थितीत क्षेत्रात उपकर लागु करणेत आलेला आहे.

महापालिका क्षेत्रातील उपकर वसुली, मुख्यालयातील कामकाजातील वाढता व्याप, यांचे स्वरुप पाहता श्री. बालाजी खतगांवकर, उप-आयुक्त (मु.) यांची महापालिकेस आवश्यकता आहे. श्री. बालाजी खतगांवकर, उप-आयुक्त (मु.) यांचे बदलीस महापालिकेकडील सेवेचा तीन वर्षाचा कालावधी संपत आहे. महापालिकेने चालु केलेले उपकर, कामाचा वाढता कारभार, उप-आयुक्त यांची आवश्यकता यांचा विचार करता श्री. बालाजी खतगांवकर, उप-आयुक्त (मु.) यांना पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणजे हे कंडीशनल आहे. उपकर ठेवणार असाल तर श्री. खतगांवकर साहेब राहतील नाही तर राहणार नाहीत.

**मा. महापौर :-**

आपल्याकडे नवीन अधिकारी आले आहेत. ते त्यांची ओळख करून देत आहेत.

**उत्तरेश्वर लोंढे (सहा. संचालक नगररचना) :-**

नमस्कार माझे नाव श्री. उत्तरेश्वर लोंढे, सहाय्यक संचालक नगररचना या पदावर आपल्या महापालिकेमध्ये ५ नोव्हेंबरला हजर झालेले आहे. यापुर्वी मी सांगली मिरज कुपवाड महापालिका येथे सहाय्यक संचालक, नगररचना या पदावर कार्यरत होतो.

**मा. महापौर :-**

आपले या महापालिकेत स्वागत आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या परवानगीने बोलते की, आपल्याला शासनाचे पत्र आलेले आहे का?

**मा. महापौर :-**

कशाबद्दल?

**नयना म्हात्रे :-**

उपायुक्त श्री. खतगांवकर साहेबांबद्दल आपल्याला शासनाचे पत्र आलेले आहे का?

**मा. महापौर :-**

कुठल्या संदर्भात ?

**नयना म्हात्रे :-**

मुदतवाढीचे काही पत्र वगैरे आले आहे का ?

**मा. आयुक्त :-**

त्यांची बदली झालेली आहे बदलीचा आदेश आलेला आहे. बदली झालेली असताना आपल्याकडे उपकराचे, आपण आत्ता अर्धा दिवस चर्चा केली. एवढा डोंगर, पाचशे किलोचे वजन माझ्या डोक्यावर आहे. त्यांना माझे शांभर किलो होउ द्या. म्हणून आपण त्यांना एक वर्ष मुदतवाढीचा प्रस्ताव मा. महासभेने आणलेला आहे. आणि मी पण त्याच्याशी सहमत आहे.

**नयना म्हात्रे :-**

त्या पत्राचे वाचन करा.

**मा. आयुक्त :-**

ते बदलीचे पत्र आहे.

**नयना म्हात्रे :-**

बदलीचे आहे म्हणूनच वाचन करा. तुम्ही शासनाच्या पत्राला चॅलेंज कराल का?

**मा. महापौर :-**

आपल्याला कॉपी दिली जाईल.

**नयना म्हात्रे :-**

आम्हाला तसे चालणार नाही मग या ठरावाला माझा विरोध आहे.

**मा. आयुक्त :-**

शासन आदेश दि. ०६ नोव्हेंबर २००८ खालील मुख्याधिकाऱ्यांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्यांच्या विनंतीनुसार या शासन आदेशान्वये बदली करण्यात येत आहे. श्री. खतगावकर साहेब- उपायुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका उपायुक्त उल्हासनगर आणि श्री. अशोक बागेश्वर- उपायुक्त, उल्हासनगर- उपायुक्त, मिरा भाईंदर असे वाईस वसी.

**नयना म्हात्रे :-**

आपल्या कडे ते उपकर शिकले आणि आपल्याकडे जर दुसरे उपायुक्त आले तर ते शिकणार नाहीत का? ते कुठे शेण थापायला जातात का त्यांना यातले काहीच माहिती नाही. या ठरावाला माझा विरोध आहे.

**प्रकरण क्र. ७७ :-**

प्रतिनियुक्तीवरील अधिकारी श्री. बालाजी खतगांवकर (उपायुक्त मु.) यांना मुदतवाढ देणेबाबत.

**ठराव क्र. ७० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. बालाजी खतगांवकर, उप-आयुक्त (मु.) दि. ०५/१२/२००५ पासून कार्यरत आहेत. महापालिका कार्यक्षेत्रात दि. १ सप्टेंबर २००८ पासून जकात ऐवजी उपकर लागु करणे बाबत शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही झालेली आहे व सद्यस्थितीत क्षेत्रात उपकर लागु करणेत आलेला आहे.

महापालिका क्षेत्रातील उपकर वसुली, मुख्यालयातील कामकाजातील वाढता व्याप, यांचे स्वरुप पाहता श्री. बालाजी खतगांवकर, उप-आयुक्त (मु.) यांची महापालिकेस आवश्यकता आहे. श्री. बालाजी खतगांवकर, उप-आयुक्त (मु.) यांचे बदलीस महापालिकेकडील सेवेचा तीन वर्षाचा कालावधी संपत आहे. महापालिकेने चालु केलेले उपकर, कामाचा वाढता कारभार, उप-आयुक्त यांची आवश्यकता यांचा विचार करता श्री. बालाजी खतगांवकर, उप-आयुक्त (मु.) यांना पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव बहुमताने मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली.

**नगरसचिव :-**

मा. पिठासिन अधिकारी यांच्या वतीने सभा संपल्याचे जाहिर करत आहे. सर्वांनी राष्ट्रगितासाठी जागेवर उभे रहावे.

(''जन गण मन'' या राष्ट्रगिताने सभा संपविण्यांत आली.)

**सभा संपल्याची वेळ :- संध्या. ६.४५ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**